# शेजवलकरांचे लेख

[ पुस्तक पहिलें ]

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७६०.

REFBK-0005971

—प्रो. त्र्यं. शं. शेजवलकर

निबंध
२५।३।४०

~~श्री~~ मंं

७८८३

# शेजवलकरांचे लेख

पुस्तक १ लें

REFBK-0005971

लेखक

त्र्यंबक शंकर शेजवलकर

प्रकाशक

ह. वि. मोटे, दादर, मुंबई

किंमत २ रुपये

प्रसिद्धी : १० फेब्रुवारी १९४०

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

: मुद्रक :
कृष्णाजी नारायण सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग, त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४

# —शय्येवरून

प्रगति साप्ताहिक बंद होऊन आठ वर्षें झालीं ! मला हा काळ युगासारखा भासत आहे. माझ्या—आणि ज्याच्या प्रगतीची आकांक्षा हृदयाशीं बाळगून मी लेखनास हात घातला त्या जगाच्या—आयुष्यांत अनेक घडामोडी मध्यंतरींच्या काळांत होऊन गेल्या. त्यांचा परिणाम माझी—आणि त्या माझ्या जगाचीहि—पाठ अंथरुणास लागण्यांत झाला आहे. मला माझ्या आयुष्यांत मी व जग असा भेदच करतां आला नाहीं. जगाचें कल्याण तेंच माझें अशा समजावर माझें आचरण उभारलेलें आहे. जगाच्या हिताचें तें आचरतांना माझें काय झालें याचा विचार मी कधींच मनांत आणला नाहीं. पण त्याचा परिणाम मात्र जग सुधारण्यांत झालेला अनुभवास येण्याऐवजीं माझी कार्यशक्ति नष्ट होण्यांत झाला आहे. मला काय बाधलें याचा आढावा घेऊं लागलें कीं, जें सर्व जगाला बाधलें आणि बाधत आहे तेंच माझ्या जीवनाच्या नाशास कारणीभूत झालें असें कळून येतें. बालपणीं बोअर युद्धाची हकीकत वडिलांनी मांडीवर बसवून वाचवून घेतली तेव्हांपासून आतां वाचण्याची बिलकुल इच्छा राहिलेली नसूनहि कानावर शेजारचा रेडियो बातम्या हाणीत आहे तेथपर्यंतच्या काळाचा जागतिक चित्रपट माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्यावरून माझें आयुष्य समकाल पडताळून पहातां जगाच्या ऱ्हासाशीं समांतर असाच माझ्या आयुष्याचा ऱ्हास प्रत्ययास येतो. ज्यांत कोणतेंहि ध्येय शिल्लक राहिलेलें नाहीं तें आयुष्य मानवी कसें ? केवळ द्विपाद बडबड्या प्राण्यांचें शरीरधर्मप्रवण जीवन याला काय जीवन म्हणावयाचें ? पण आज जगांतील मनुष्यसमूहांसमोर कोणतें ध्येय उभें आहे ? दुसऱ्याचें स्वातंत्र्य

हरण करणारा स्वतः स्वतंत्रतेचा उपासक राहूं शकेल का ? दुसऱ्यावर अंमल गाजवूं इच्छिणारा स्वतः समतावादी उरेल का ? परस्वहरणतत्पर असा कोणीहि स्वतः नीतिमान् राहील का ? व्यक्तींच्या जगांतील हाच न्याय मनुष्यसमूहांला लावून पाहिला तर आजच्या जगाचें दृश्य कसें दिसत आहे ? त्यासमोर कोणतें ध्येय उरलें आहे ? ध्येय सरलें कीं द्विपाद पशु माणूस म्हणून ताठ उभा राहावयाला त्याच्या पृष्ठभागांत हाडच कोठें उरलें ? अर्थात् त्याची–त्या जगाची–पाठ अंथरुणाला लागणें अपरिहार्यच झालें !

मला काय काय बाधलें ? काळा आदमी झालों हें बाधलें, हिंदुस्थानांत जन्मलों हें बाधलें, हिंदु जन्मलों हें बाधलें, महाराष्ट्रांत जन्मलों हें बाधलें, ब्राह्मण जन्मणें हेंहि बाधलें, फार काय ! कऱ्हाडा जन्मलों तेंहि बाधल्यावांचून राहिलें नाहीं ! निःस्पृहपणा, सत्यवादित्व, न्यायावर विश्वासून उठवळ न बनणें, स्वतःची जाहिरात करण्यास न शिकणें; मूर्खाला पंडित म्हणण्यास, धनवानाला शहाणा म्हणण्यास, अधिकाऱ्याला सलाम करण्यास न शिकणें; गरिबींत जन्मणें आणि रहाणें; अधिकाराच्या जोरावर काम करणें अन्यायाचें मानणें; झकपक् पोषाक आणि चष्की न करणें; चार अक्षरें लिहितां येत असूनहि प्रत्येक मासिकास वा वर्तमानपत्रास फोटोसहित लेख न पुरविणें; प्रत्येक सभा संमेलन परिषद कॉन्फरन्स काँग्रेस यांना हजर राहून आपलें महत्त्व न वाढविणें; संदेशआशीर्वाद न पाठविणें; ज्यांच्या सहवासांत बसण्यानें कोणताहि ( ? ) लाभ होण्यासारखा नाहीं त्यांच्यात बसत जाऊन आपला एक पारिपार्श्वक गट निर्माण न करणें; या अशा सर्वच गोष्टी मला बाधल्या ! पण याच गोष्टी जगालाहि बाधत नाहींत का ? वर्णभेद, वंशभेद, श्रीमंतगरीब भेद,......हेच सर्व जगाला बाधत आलेले कायमचे शत्रू नाहींत काय ?

आणि हेच शत्रू गाडून टाकण्यासाठीं प्रगति काढलेली होती. ती बंद झाली, तिच्या पुनरुज्जीवनाची आशाही खुंटली, ही गोष्ट सद्यःकालाची सूचक आहे. ज्या समाजाची प्रगति खुंटली आहे त्याला असल्या गोष्टींची काय जरूरी आहे ? त्या समाजाच्या गरजा भविष्यावर चालणारीं आणि भविष्यावांचून

न चालणारीं, चिमटेचमत्कारांची चमक दाखविणारीं व लाकडी ढलपे बोलकीं करणारीं, तो–तीचा तारणहार गुंफणारीं व झरोक्यांतून तिरंदाजी करणारीं, गवाक्षांतून कटाक्ष फेकणारीं व रमण्यांत मोडखुर्दा वांटणारीं, थोडें गोड देऊन बहुत कडू करणारीं व वैतागवनांतून विषारी वाफारे सोडणारीं वृत्त-पत्रे पुरवीतच आहेत ! या अधोगामी समाजाचा वास्तिलगड खणून काढून त्याची माती क्रान्तिसागरांत वाहून जाईपर्यंत त्याच्या प्रगतीची आशा नाहीं हेंच खरें !!!

पण हें समाजाचें झालें ! व्यक्तींचा जीवनक्रम हा यावज्जीव ओढावाच लागतो. प्रगति पत्र बंद पडलें तरी प्रगतिकाराचें कर्तव्य चालूच रहातें. समाजानें झिडकारलें तरी प्रेमानें कवटाळणाऱ्या व्यक्ती थोड्याच नाहींशा होतात ? प्रगतीच्या शवावरहि पुष्पहार घालूं पहाणारे चहाते उरतातच. अशा चहात्यांपैकींच एकाच्या जलसिंचनामुळें तात्पुरती संजीवित होऊन प्रगति पुन्हा बोलूं पहात आहे. जिवंत आवाज पुन्हा ऐकूं येण्याचा संभव नाहीं तेव्हां ग्रामोफोनच्या तबकडीवरच श्रोत्यांना समाधान मानणें भाग आहे.

प्रगति विद्वत्ताप्रचुर असली तरी तरुणांसाठीं काढलेली होती. विश्राम-मंडळांच्या सभासदांकडून प्रगति घडून येते असा मला कधींच विश्वास वाटत नव्हता. त्यावेळीं यूथलीगची चळवळ नुकतीच सुरू झाली होती. माझे स्नेही श्री. उपेंद्र देसाई व मेहेरअल्ली यांनीं त्याच वेळीं इंग्रजींत व्हँगार्ड साप्ताहिक सुरू केलें होतें. त्याच्याच हातांत हात घालून प्रगति चालविण्याचा माझा विचार होता. पण पुढें तें पत्र बंद पडलें. तरुण वर्गांत यानंतर अनेक मतमतांतरें मॉस्कोच्या अनुकरणानें व आदेशानें पसरलीं. आणि त्यांच्या स्वतंत्र चळवळीचा कॉंग्रेसच्या विश्रामधामाच्या कोंदट ब्लॅकहोलमध्यें कोंडमारा झाला. या गोष्टीचे दुष्परिणाम राष्ट्र सध्यां भोगीत आहे.

तरुणांत वृद्ध आणि वृद्धांत तरुण अशी दुहेरी भूमिका मी स्वीकारली होती, पण ती दुटप्पीपणाची नव्हती. माझी परिस्थिति व तयारीच तशी होती. पण या गोष्टीचे परिणाम चांगले झाले नाहींत. तरुणांचें प्रेम आणि वृद्धांचें कौतुक मला थोडेंफार लाभलें तरी दोहोंचाहि विश्वास मला संपादन

करतां आला नाहीं. त्यामुळें राष्ट्राच्या प्रगतीचा गाडा रेटण्यासाठीं आवश्यक असें धुरंधर पुढारीपण मला मिळूं शकलें नाहीं. तरुणांना मी पुरेसा क्रांतिवादी वाटलों नाहीं, तर वृद्धांना मी फाजील क्रांतिकारक भासलों. तरुणांच्या डोक्यांत याचवेळीं रशियन व्होडका चढली होती. तिचे पहिले दुष्परिणाम मला बाधले. वृद्धांचा स्वार्थी नाकर्तेपणा मला बाधला. आपल्याला तर होत नाहीं, आणि दुसऱ्यांकडून झालेलें पहावत नाहीं. अशी त्यांची वागणूक होती. उद्धट तरुणांनीं यांतून मार्ग काढून वृद्धांची पगडी उडवून दिली, आणि स्वतःकडे धुरा ओढण्याचा प्रयत्न केला. यश तरुणांच्याच बाजूला यावयाचें हा त्रिकालाबाधित सिद्धान्त असल्यानें त्यांच्याकडे पुढारीपण झुकलें तरी सार्वत्रिक व पद्धतशीर क्रांतीला, म्हणजेच प्रगतीला, जरूर तितकें बल त्यांना मिळूं शकलेलें नाहीं. याचाच परिणाम सध्यांच्या दुहींत व बेबंद-शाहींत अनुभवास येत आहे. त्यामुळें राष्ट्र बदलत असलें तरी तें अचूक प्रगतीच्याच मार्गावर आहे कीं नाहीं याचें अनुमान करणेंहि कठीण होऊन बसलें आहे. उद्धटपणा माझ्या वांट्याला आलेला नसल्यानें मी सहाजिकच या प्रवाहाच्या बाहेर फेकला गेलों. वृद्धांत जास्त अक्कल आणि कमी स्वार्थ असतीं तर त्यांनीं माझा उपयोग करून घेतला असता. पण त्यांची स्वार्थी महत्त्वाकांक्षा, सत्तेची चटक, त्यांना तसें करावयाची बुद्धि कशी देईल? आपल्या कोतेपणाची फळें ते सध्यां भोगीत आहेत.

गत गोष्टींची आठवण व वैयक्तिक निवेदन येथेंच पुरे. पण सध्यां राष्ट्राचा आशातंतु, समाजाचा आधार, असा जो जवान विद्यार्थिवर्ग तो काय करीत आहे? तो ब्रह्मचारी बोलपट एकदां दोनदां, नव्हे पंधरादां, पंचवीसदां पहाण्यांत बेहोष दंग होऊन गेला आहे. किन्नरकंठी किशोरीचीं 'यमुनाजळिं खेळूं खेळ' व 'फिरवाना ऽ ऽ ऽ जरा डोळा' असलीं गाणीं आळविण्यांत आयुष्यांतील 'बहुमोल अशी ही वेळ' दवडीत आहे. 'कशाला उद्यांची बात? बघ सरुनि चालली रात' असलें स्वतःच्या जीविताच्या तत्त्वज्ञानाचें यथातथ्य वर्णन करणारें पद्य तारवटलेल्या डोळ्यांनीं ऐकत आहे! तंग चड्डी नेसून पोहण्याच्या तयारींत असलेली तरुणी व अठरापगड शेटजी समोर

नाच करणारी वेश्या, रोमांचभरित होऊन, पहाण्यांत तो गंगास्नानाचें पुण्य मानीत आहे. पडद्यावरील तुषारस्नानानें स्वतःचें मार्जन झालें असें समजत आहे. आश्रमांतील कुलगुरूच्या 'कष्ट करा, कष्ट करा' या आदेशांतून ध्वनिकाव्य शोधून काढून त्याचें विडंबन करण्यांत अघमर्षण केल्याचा आनंद उपभोगीत आहे. विषयचिंतन हेंच ज्याचें गायत्रीपुरश्चरण, रंगढंग चष्कीचैन हीच ज्याची जीवनसंध्या, 'लाडे लाडे' बोल हेंच ज्याचें उपस्थान, आणि पोरींभोंवती सतत 'गरगरां गरगरां' फिरणें याच ज्याच्या प्रदक्षिणा, असा हा 'सुशिक्षित' तरुणवर्ग समाजाचा अधःपात पूर्णपणें सूचित करीत आहे.

तरुणांचें हें चित्र एकांगी आहे असें कोणी समजूं नये. अनेक अध्यापक–प्राध्यापकांकडून माहिती काढली तरीहि तिचें सत्यत्व पटूं शकेल. ज्याचा अभिमान गुरूला वाटेल असा खरा विद्या–अर्थी हल्लीं वर्षानुवर्षांत नजरेस येत नाहीं असें नामांकित उच्च प्राध्यापक बोलतांना ऐकूं येतात. पण तेहि विद्यालयाच्या चौकटींत बसलेले असल्यानें त्यांना सत्यस्थिति उघडपणें बोलण्याचें धैर्य होत नाहीं. आजच्या घटकेस महाराष्ट्रांत अनेक–बहुतेक विषयांत नामांकित म्हणण्यासारखे पंडित कोणी नाहींत. पदव्यांचा सुळसुळाट आणि मूलग्राही ज्ञानाचा सुकसुकाट अशी याबाबत विद्यमान स्थिति आहे. तोंडदेखलें बोलतांना सभेंत परस्पर एकमेकांची विद्वान् म्हणून स्तुति करतांना आढळतात, तेच खासगी संभाषणांत त्यांच्या विद्वत्तेची टवाळी करतांना दिसून येतात! यावरून खरा प्रकार निदर्शनास येतो. ही स्थिति प्राप्त होण्याचें कारण, सुलभ देशभक्तीचें आणि वावदूक मुत्सद्दिगिरीचें महाराष्ट्रांत फुटलेलें पेव. महाराष्ट्राचें राजकारण व समाजकारण शब्दपंडितांच्या, साहित्तिकांच्या व तोंडपाटलांच्या ताब्यांत गेलें त्याचाच हा विपरीत परिणाम होय.

पेशवाई कोसळल्यानंतर आरंभीचीं पन्नास वर्षें, राष्ट्राच्या पुनर्घटनेची दिशा महाराष्ट्रांत योग्य तचि होती. जेत्यांचें ज्ञान आत्मसात् केल्याशिवाय स्वातंत्र्याच्या तात्त्विक भूमिकेवरून त्यांच्याशीं समानतेच्या लंब्याचौड्या बाता

करणें व्यवहारदृष्ट्या निरुपयोगीच नव्हे तर समाजबाधक आहे अशी त्या पिढीची खात्री पटली होती. नुसत्या स्वाभिमानावर उभारलेलें राजकारण पोकळ आणि विनवुडाचें असतें हें त्या पिढीला कळून चुकलें होतें. पण त्यानंतर इंग्रजी शिकलेल्या नूतन पदवीधरांची जी पिढी पुढें आली ती पेशवाईची भीतिप्रद आठवण विसरलेली होती. मिल्मेकॉले आणि स्पेन्सर्जॉन्सन् यांचे ग्रंथ पढलेल्या या पिढीला इंग्रजांचें वैशिष्ट्य कशांत आहे या गोष्टीचें विस्मरण झालें. इंग्लिश विश्वविद्यालयांतून जे ग्रंथ शिकविले जातात तेच येथें पढणारे जे अस्मादिक, ते त्या गौरकायांपेक्षां कोणत्याही बाबतींत कमी प्रतीचे वा कमकुवत नाहींत असें त्यांना वाटूं लागलें. अर्थात् त्यांनीं असा आक्रोश सुरू केला कीं, या देशास कांहींएक झालेलें नाहीं, त्याची नाडी साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांहींएक विकार नाहीं, आमच्या परक्या प्रभूंनीं आमची तशी खोटीच समजूत करून दिली आहे! सभा सम्मेलनें, लेख–व्याख्यानें यांचा हलकल्लोळ उडवून दिला म्हणजे इंग्रज पळून जातील असें त्यांच्या बुद्धीला वाटत होतें कीं काय नकळे! तोफाविमानें व मोटारआगगाड्या राहोत, पण साध्या सुयाटाचण्या वा चाकूचमचे सुद्धां ज्यांना करतां येत नाहींत त्यांनीं स्वराज्याच्या बाता झोकणें किती शहाणपणाचें आहे याबद्दलचा त्या पिढीचा अविचार तिची तर्कशून्यता स्पष्ट दाखविते. ज्या समाजाचे आधुनिक औद्योगीकरण झालेलें नाहीं त्याला आजच्या जगांत आपलें असलेलें स्वातंत्र्यही टिकवितां येणार नाहीं, मग ज्यांचें स्वातंत्र्य आधींच नष्ट झालेलें आहे त्यांनीं आधीं आर्थिक, औद्योगिक, व सामाजिक पुनर्घटना घडवून आणल्याशिवाय स्वातंत्र्याची वा स्वराज्याची वार्ताच कशाला!

हिंदुस्थानांतील इतर प्रांतांपेक्षां वर सांगितलेल्या पढतमूर्खपणाची बाधा महाराष्ट्राला अधिक झाली. कारण पेशवाईपासून महाराष्ट्रांत ब्राह्मणांचें जें अवास्तव प्राबल्य झालें होतें तें इंग्रजी राजवटींत प्रथम इंग्रजी शिकल्यामुळें तसेंच टिकलें होतें. स्वराज्य असतांना औद्योगीकरण व आधुनीकरण करण्याचें योग्य वेळीं न सुचल्यामुळें ज्यांचें राज्य गेलें होतें त्यांना स्वराज्याचें ओझें

डोक्यावरून उतरल्यानंतर तरी तें कसें सुचावें ? ते वडिलांची कीर्ति सांगणारे पढतमूर्खच राहिले होते. लेखनकलेच्या व छापखान्याच्या वाढीचा दुरुपयोग त्यांनीं हा पढतमूर्खपणा वाढविण्यांतच केला. काल्पनिक इतिहासाचें बंड महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणावर फैलावलें. शुद्ध करमणूक व खोटें समाधान येवढाच असल्या लेखनाचा उद्देश असता तर त्याचा फारसा दुष्परिणाम झाला नसता, पण स्वराज्यनाशामुळें ज्यांच्या शहाणपणाचा व मुत्सद्देगिरीचा भ्रम पार उतरलेला होता त्यांना पुनः या खोट्या इतिहासानें झपाटलें. ब्राह्मणांच्या खालोखाल या भुताचा झपाटा मराठ्यांस बाधला. कारण वडिलांच्या कीर्तीवर मिशीला पीळ भरण्यांत तेही मागें नव्हते. महाराष्ट्राप्रमाणें ज्या प्रांतांत ब्राह्मण–क्षत्रियादींचें प्राबल्य नव्हतें त्यांना हें भूत फारसें नडलेलें नाहीं. परकी इंग्रजांचें वैशिष्ट्य त्यांच्या धंदेउद्योगांत व व्यापारवसाहतींत आहे, हें वाणियांच्या आगेवुद्धीने ओळखलें म्हणूनच गुजरात पुढें सरसावली. आपल्या प्रभूंच्या अनुकरणानें गुजराथी वनिये प्रथम हिंदुस्थानचे दुय्यम आर्थिक मालक बनले आणि नंतर त्यांनीं मराठ्यांच्या 'जन्मजात' राजकारणाकडे दृष्टि वळविली. त्याबरोबर गर्वानें फुगलेल्या पश्चात्‌बुद्धीच्या महाराष्ट्रीय ब्राह्मणांचें राजकारण पत्त्यांच्या बंगल्यासारखें एकदम कोलमडून पडलें ! तावत्कालपर्यंत आपल्या तोंडपाटिलकीची व लेखन–बहाद्दरीची वास्तविक योग्यता किती हें त्यांच्या लक्षांतच उतरलें नव्हतें ! तरीपण अजूनही एखाद्या कादंबरीकाराच्या काल्पनिक वर्णनांतून शनिवारवाड्याचें रसभरित वर्णन उतरून घेऊन "पेशव्यांचे इमले" सजवण्याच्या खटाटोपांत अजून येथील "पुढारी" दंग आहेत आणि त्यांना 'इतिहासलेखक' म्हणून प्रशस्तिपत्रें वा पारितोषिकें देण्याच्या उद्योगांत इतर "पंडित" भूषण मानीत आहेत ! यांपैकीं कोणाच्या बुद्धीची तारीफ करावी याचाच तेवढा निर्णय उरला ! शास्त्रीबुवांच्या स्वाभिमानाच्या शिकवणीला हीं असलीं मधुर फळें आलीं !

शाळाकॉलेजें, मासिकेंवर्तमानपत्रें, चित्रशाळाकिताबखाने, असले पोटभरण्याचे उद्योग सुरू करून पुनः त्यांना देशसेवा म्हणण्याचा जो प्रकार

महाराष्ट्रांत रूढ झाला त्याचा दुष्परिणाम महाराष्ट्राला चांगलाच बाधला. प्रिन्सिपॉल गोळ्यांसारख्या देशभक्तीचा माज न चढलेल्या जागरुकाला ब्राह्मणांच्या या विद्येचें व सुलभ देशसेवेचें खरें स्वरूप व त्यांचे भावी बाधक परिणाम स्पष्ट दिसले होते. तरीही महाराष्ट्र त्यांच्या इषाऱ्यानें जागा झाला नाहीं ! उलट त्यांच्यावर टीकेचा भडिमार झाला ! आजही महाराष्ट्राचे प्रो. वा. गो. काळ्यांप्रमाणें जे खरे अभिमानी हितकर्ते आहेत ते गोळ्यांच्याच परंपरेंतील आहेत. पण त्यांना देशभक्त म्हणतांना आजही कोणी आढळणार नाहींत ! देशभक्ति म्हणजे तोंडपाटिलकी, व्याख्यानबाजी, लेखनकामाठी, अशीच समजूत प्रायः या भागांत रूढ आहे. शेतकऱ्याला पिळून फुकटची व्याख्यानबाजी करणारा जमिनदार, कुळांना पिळून हवेल्या बांधणारा सावकार, अशिलांना नाडून दौरा काढणारा वकील, परदेशी माल विकून थोडीशी वर्गणी देणारा दुकानदार, हे सर्वच महाराष्ट्रांत देशभक्त म्हणून एका काळीं गाजूं शकले. या सर्वांची तळीं उडलून धरून टिमकी वाजविणारे वर्तमानपत्रकार वा लेखक हे स्वयंभू पुढारी बनले. या सुखवस्तु अकार्यकृत् साहित्तिक 'पुढाऱ्यांच्या' हातांत महाराष्ट्राचें राजकारण गेलें त्याचाच आरंभीं सांगितलेला प्रकार हा दुष्परिणाम होय.

आज महाराष्ट्राचे कान कोणाच्या हातांत आहेत ? कोणाचें कोणत्या विषयांतील कोणत्या तऱ्हेचें लिखाण वाचलें जात आहे ? संपादक कोण आहेत, लेखक कोण आहेत, प्रकाशक कोण आहेत ? लोकशिक्षणाचे श्री. जांभेकर यांच्या कार्यपद्धतीबद्दल मतभेद असेल, पण त्यांचें मुख्य विधान खोटें आहे काय ? महाराष्ट्रांत उच्च लिखाणाची चहा उरलेली नाहीं हें विधान असत्य म्हणतां येईल काय ? विविधज्ञानविस्तार कां बंद पडला ? प्रगति बंद पडली तर तिचें पुनरुज्जीवन शक्य होत नाहीं, पण मोतिरामशेट रांगणेकर हे तुतारी, वसुंधरा, चित्रा, आशा, लागोपाठ अनेक मी मी म्हणणाऱ्या मालकांना लाथ देऊन चालू करूं शकतात, यशस्वी करूं शकतात, स्वतः नामांकित होऊं शकतात ! खेरीज अशांनाच जग टरकतांना दिसतें, त्यांनाच मोठेमोठे वंदन करतांना दिसतात ! ज्या प्रोफेसरांची रेवडी

हे संपादक उडवितात त्यांकडूनच अशा संपादकांना विद्यालयांतील समारंभाचें आमंत्रण येत असतें ! इतिहासाच्या प्रोफेसरांना इतिहाससमंडळांतील कार्यक्रमास हजर रहाण्यास वेळ मिळत नाहीं, पण ते अनंत काणेकरांच्या व्याख्यानासाठीं दोन तास मोडूं शकतात ! या प्रकारांतील इंगित काय असावें ? इंगित असें कीं ' खोटें नाणें खऱ्या नाण्याला बाजारांतून घालवून लावतें ' हा अर्थशास्त्रांतील चलनी नाण्याबद्दलचा सिद्धान्त इतर क्षेत्रांतहि खरा ठरत आहे !

एखाद्या समाजांतील लोक विशिष्ट कार्यासाठीं किती द्रव्य खर्चूं शकतात याला मर्यादा असते. समाजाचा सांस्कृतिक दर्जा व अभिरुचि यांबरोबर त्याची आर्थिक परिस्थिति या खर्चाची मर्यादा मुख्यतः ठरविते. महाराष्ट्रांतील आजचा समाज वर्षाकांठीं जें द्रव्य, ग्रंथ व नियतकालिकें विकत घेण्यासाठीं खर्च करतांना दिसतो त्याचा बहुतेक भाग समाजाचें स्वतःच्या फायद्यासाठीं अनहित करणाऱ्या लोकांकडून उचलिला जात आहे. अर्थात् हें अनहित करणारे लोक अनेक समाजहितसाधक कार्यांचीं पत्रकें कपाळावर चिकटवूनच आपला कार्यभाग साधीत असतात. कोणी आपणाला विशिष्ट थोरांची परंपरा चालू ठेवणारे संबोधितात, कोणी संस्कृतिसंरक्षक म्हणवितात, कोणी शुद्ध राजकीय वा आर्थिक मताचें नांव घेतात, कोणी समाजसुधारक होतात तर दुसरे इतर साहित्य ( कसलें ? ) सेवक, मनोविनोदक, कलाशिक्षणशास्त्रप्रचारक बनतात. पण बहुतेकांचा निष्कर्ष एकच. ते पोटाला मिळवितात, घरदार करतात, बंगलेवाड्या उठवितात, जमीनजुमले वा दागदागिने खरीदतात, किमान मोटारी उडवून जिवाची तात्पुरती मुंबई ( ? ) करतात ! ( मात्र बहुतेक आयुष्य मुंबईंत जाऊनीहि आम्हांला अजून या वाक्प्रचाराचा अर्थ कळूं शकलेला नाहीं ! )

मग काय या लोकांनी पोटाला बिब्बा घालून काम करावयाचें ? तसें कांहीं नाहीं. आमची तक्रार त्यांच्या द्रव्यार्जनाबद्दल नसून आपलीं कामें करण्याच्या नालायकीबद्दल आहे. ज्यांना पंधरावीस वर्षें संपादकवर्गांत राहून एकहि नामांकित वाटण्याजोगा राजकीय लेख लिहितां येत नाहीं त्यांना त्या

जागांवर वसण्याचा अधिकार काय ? तर येवढाच कीं ते विशिष्ट कंपूंत किंवा गटांत किंवा सार्वजनिक संस्थेंत मूग गिळून राहण्याची कार्यैकनिष्ठा दाखवितात. या कंपूंत प्रवेश मूळच्या निकाम्यांशीं समरस होणारांचाच होत असतो. समरस होता येत नसलें तरी किमान् तसें बाह्यतः भासवण्याचें ढोंग पाहिजे ! राजनीतिशास्त्राचें प्राथमिक पुस्तकहि समजण्याची ज्यांच्या मेंदूची कुवत नाहीं असे राजकारणी संपादक महाराष्ट्रभर पसरलेले आहेत ! या शास्त्रांतील शब्दांचीं फुलें ते मुक्तहस्तानें उधळीत असतात, पण अर्थज्ञान भोपळ्याएवढें ! राजकारण या शब्दाचा वटवडा महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणावर अभिमानपुरःसर चालतो, पण त्या विषयाचें शास्त्रज्ञान इतकें कमी इतर कोणत्याहि प्रांतांत नसेल ! आणि या संपादकांचें, पुढाऱ्यांचें, खरें अंतरंगहि स्पष्ट दिसण्यास अडचण पडत नाहीं. त्यांच्या भाषणांत वा लेखांत रामदासांचें ‘ राजकारण ’ येईल, महाभारतांतील राजधर्मपर्वांतर्गत श्लोकांची खैरात होईल, कालिदासभवभूति येतील, पण प्लेटो व ॲरिस्टॉटल, सिजविक वा लास्की यांचीं नांवें सहसा येणार नाहींत ! खरेंच ! त्यांचा राजनीतीशीं काय संबंध ? असलाच तर तो महाभारताशीं समन्वय दाखवण्यापुरता ! याच लोकांनीं महाराष्ट्राची वाट लावली आहे.

हे शब्द अनेकांस कडू लागतील पण वस्तुस्थितीच अशी आहे. यांच्या राजकीय ज्ञानाचे वाभाडे काढणें कठीण नाहीं. त्याला ‘ राजाचें इंग्रजी ’ ग्रंथाचे लेखक फाउलरबंधु यांच्यासारखें ग्लाडस्टन, मोर्ले यांच्या इंग्रजीच्या चुका शोधून काढण्यास लेखसंग्रह घेऊन बसलें कीं पुरे ! जी राजनीतिशास्त्राच्या ज्ञानाची गत तीच अर्थशास्त्राची, समाजशास्त्राची व इतर ज्ञानाची ! जर ह्या पंडितांचें डोकें गिरणींत शिरलें तर दुसऱ्याच दिवशीं यांचे हात तुटलेले दिसतील, विमानांत घुसलें तर यांच्या विमानांचा चुराडा झालेला दिसून येईल, आगगाडींत गेलें तर टक्कर झाल्याचें ऐकूं येईल ! पण सामाजिक शास्त्रांत तसें थोडेंच भय आहे ? देशाचें राजकारण वा समाजकारण नासूनहि हे पुनः राष्ट्रदीप, स्वातंत्र्यवीर, धर्मवीर, लोकनायक, देशबंधु, किमान् देशभक्त वा समाजसेवक ठरतातच !

डोकें ढिलें व ज्ञान तकलुपी असल्यानें या समाजधुरीणांची विचारसरणी वा आचारपद्धति मोठी विचित्र बनते. कोणत्याहि विषयांत यांची गति चालतांना दिसते ! पण मूलग्राही ज्ञान एकाचेंहि असावयाचें नाहीं. शब्द-पांडित्य व वावदूकपणा भरपूर, पण निश्चितपणा एकाहि गोष्टींत नसावयाचा. वेदांत्याप्रमाणें यांना एकांत अनेक व अनेकांत एक दिसत असतें ! म्हणजे असें कीं बदमाषांत साधु व मूर्खांत शहाणा यांना दिसतो तसाच साधूचा भोंदू व शहाण्याचा गाढवहि यांना दिसूं शकतो. इतिहासाच्या क्षेत्रांत हे शिरले तर ह्यांना विशिष्ट नको असलेल्या महात्म्याची हे अशी कसून छाननी करतील कीं तो अखेर बदमाषच ठरावयाचा ! उलट मूर्खांच्या मूर्खपणाची मांडणी ते अशा सफाईनें करतील कीं, तो महान् मुत्सद्दी हटकुन ठरावा ! महाराष्ट्र-सारस्वतकार भावे यांनीं मागें मराठ्यांचें राज्य रावबाजीनें घालविलेलें नसून तें प्रतापसिंहाच्या देशद्रोहामुळें गेलें असें सिद्ध करून दाखविलें होतेंच ! चरित्रें लिहितांना शहाण्याच्या शहाणपणाला ते इतकीं इतर कारणें सहाय्यभूत झालेलीं दाखवितील कीं तो शहाणा होता म्हणण्यापेक्षां केवळ शहाणा ठरला एवढेंच मानण्याकडे कल जावा. उलट बदमाषाच्या बदमाष बनण्याला इतक्या गोष्टी कारणीभूत झाल्या असें म्हणतील कीं त्याच्या बदमाषीला संक्षेप मिळत मिळत तो फक्त दुर्दैवी सज्जन उरावा ! वाचकाच्या मनावर असा ठसा उठा-वयाचा कीं शहाणा आणि मूर्ख, सज्जन आणि शठ, हे जवळजवळ एकसारखे असतात ! व्यक्ती सोडून घडामोडी घेतल्या तर पानिपतच्या युद्धाबद्दल हे म्हणतील कीं त्यापासून मराठ्यांची कांहीं फारशी हानि झाली नाहीं किंवा त्याचे परिणाम चिरंतन नव्हते ! इतिहास सोडून नीतीच्या क्षेत्रांत उतरलें तर हे म्हणतील कीं चांगलें व वाईट हीं पहाणाराप्रमाणें, काला-नुसार, विशिष्ट प्रसंगाप्रमाणें तशीं ठरतात. ज्याला त्याला आत्मस्वातंत्र्य दिलें पाहिजे. मनःपूतं समाचरेत्। परिणाम—प्रत्येकजण आपलें मन पूत झालेलें आहेच व आपणाला वाटेल तें निवडण्याचें स्वातंत्र्य आहेच असें समजून वागत चालला ! एक बायको असून दुसरी केली तरी योग्य, कारण नसतां बायकोला सोडचिठी दिली तरी योग्य, व्यभिचार केला तरी तोहि

सकारण, ग्रॅज्युएट बाईनें एखाद्या मॅट्रिक उनाडाशीं लग्न केलें तरी नीतिधैर्यच, आपल्या लहरीखातर अनेकांची आयुष्यें कोणी नासलीं तरी तोहि पराक्रमच! आमचे नीतिशास्त्रज्ञ या सर्वांचें वकिलपत्र घेण्यास व अभिनंदन करण्यास तयार! ज्यांची आयुष्यें खराब झालीं त्यांचीं मनें कमकुवत, त्यांना कोणत्याहि गोष्टीबाबत कांहींहि वाटण्याचें कारण नाहीं! स्वातंत्र्यामुळें सुप्त शक्ती कार्यप्रवृत्त झाल्या पण कार्याकार्यविवेक जाग्यावर न उरल्यामुळें त्या प्रवृत्ती समाजविध्वंसक ठरल्या. प्रत्येक व्यक्तीचें विचारस्वातंत्र्य जारी झाल्यानें समाजाचें असें कांहीं कार्यमान राहिलें नाहीं. अर्थात् दुराचाऱ्यांना पुष्कळशा पळवाटा खुल्या झाल्या. त्याचाच परिणाम सामाजिक बेबंदशाहींत दिसून येतो. खेरीज आर्थिक पुनर्घटनेवांचून सामाजिक व नैतिक घटनांस आधीं हात घातला गेल्यामुळें तर ही स्थिति फारच चेकाळली आहे.

याच निर्नायकीचें प्रतिबिंब वाङ्मयांत दिसल्यावांचून कसें राहील? ज्यांच्या डोक्याची कुवत आर्थिक, सामाजिक, नैतिक वा राजकीय प्रश्न समजण्याची नाहीं, किंवा ज्यांचा तितका अभ्यास नाहीं किंवा ज्यांना त्यांतील पौर्वापौर्व व परस्परसंघर्ष यांची सरणी लावतां येत नाहीं असे भाई, कवी, कादंबरीकार, लघुकथालेखक, लघुनिबंधलेखक या अज्ञात अगम्य प्रदेशांत पदक्षेप करते झाले! अर्थात् प्रमेयांना सिद्धांतांचें, तर्कांना सत्याचें, अनुमानांना इतिहासाचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य झालें. इतक्याहि मूर्खपणाच्या जोडीला खरें इतिहासज्ञान असतें तर त्यांच्या मर्कट लीलांना कांहीं पायबंद बसता. पण त्याच्या अभ्यासाचें तर या सर्वांनांच वावडें! इतिहास माणसाला शहाणपणा शिकवितो हें बेकनचें वचन या सर्वांनांच नामंजूर—त्यांच्या पितामहश्री मार्क्सनें इतिहासाचें सार आधींच तयार करून ठेवलेलें असल्यानें या नवोद्धटांना मूळ इतिहासाचें प्रयोजनच उरलेलें नाहीं. दुसरे जे इतिहासवाचक वा अभ्यासक उरले त्यांच्या इतिहासाची व्याप्ति पूर्वजवढाईपुरती. या इष्टहेतुसिद्धीसाठीं ते उत्सवमंडळें स्थापतील, फंडदेणग्या जमा करतील; त्याच्या खर्चांतून आपलीं इतिहासदुष्ट चोपडीं प्रकाशित करतील आणि एवंच खऱ्या इतिहासाभ्यासकांचें आयुष्य खर्ची

घालून केलेलें कार्य नाहींसें करण्याची कोशीस करतील! स्वतः चांगलें कार्य करण्याऐवजीं खोटें कार्य नाहींसें करण्यांतच कार्यकर्त्यांची शक्ति, भक्ति, संपत्ति, खर्ची घालण्याची आपत्ति यामुळें ओढवत आहे!

कुंपणानें शेत खावें त्याप्रमाणें सध्यांच्या देशभक्तांनीं व समाजसेवकांनीं समाज खावून टाकला आहे. समाज पुढें लोटून प्रगति घडवून आणण्याऐवजीं स्वतःला पुढें लोटून पुढारी बनण्यांत ते कृतकार्य झाले आहेत. तण माजून पीक बुडावें त्याप्रमाणें क्षुद्र, झोंड, दुष्ट, लोभी, यांच्या सुळसुळाटानें समाजहितसाधक कार्य बुडून जात आहे. लोंढ्यानें शेत वहावावें त्याप्रमाणें जगांतील वेगवेगळ्या देशांत निरनिराळ्या कारणांसाठीं उत्पन्न झालेल्या लाटांच्या पुरांनीं हा देश वाहून जात आहे. येथील समाजरचनाच अशी बनत चालली आहे कीं, ज्यांनीं शरीरदृष्टया, मनोदृष्टया, बुद्धिदृष्टया वा शीलदृष्टया प्रजासंवर्धन करावें त्यांवरच अविवाहित राहण्याची, लग्नें लांबविण्याची, संततिनियमन करण्याची किंवा मुलें मरतांना पहाण्याची पाळी यावी. जीं मुलें वाढण्यासारखीं त्यांना खायला मिळूं नये आणि ज्यांना पचवण्याची ताकद नाहीं त्यांच्या एथें समृद्धि व्हावी. ज्यांना बुद्धि नाहीं, शिकण्याची इच्छा नाही, ग्रहण करण्याची कुवत नाहीं, त्यांच्या शिक्षणावर पाण्यासारखा पैसा खर्च व्हावा आणि ज्यांची बुद्धि तरतरीत आणि शिकण्याची इच्छा अदम्य, त्यांना दहापांच रुपयांसाठीं शिक्षण सोडणें भाग व्हावें. आमचे सुशिक्षित सधन नागरिक मूर्ख पोरांसाठीं बंगले बांधून ठेवतील, तीन पिढ्या पुरण्याइतकें द्रव्य मागें ठेवतील, पण शेजारचा गरीब बृहस्पति उपाशी मरतांना उघड्या डोळ्यांनीं पहातील—आणि वर म्हणतील कीं त्याच्यांतच कांहीं दोष असले पाहिजेत, एरवीं तो उपासावर कसा येईल! मद्रासकडील लोक गणित व आंकडेशास्त्र यांत प्रवीण व तज्ञ असतात पण त्यांच्यांतहि रामानुजन् ओळखून काढणारा एतद्देशीय कोणी निघाला नाहीं, त्याला व्यापारी कंपनींतील एक इंग्रज उपयोगीं पडला! इकडेहि अशीं उदाहरणें सांपडतील. शिल्पकार करमरकरांना कलेक्टर ऑट्टो रॅाथफील्डनीं ओळखिलें, जवळच्या ब्राह्मणांपैकीं कोणी ओळखूं

शकलें नाहीं ! आमच्या समाजांत आज कोणत्याहि विषयांत विशेष गति असलेलीं कोणी मुलें असलीं तर तीं बहुधा ओळखल्याशिवाय सुकून जाण्याचाच संभव फार ! बरें तो माहीत झाला तरी त्याचें चीज होईल ही आशा नको ! तो एक टीकेचा, थट्टेचा, विषय व्हावयाचा ! ठराविक चाकोरींतून निश्चित मार्गानें तो स्वार्थतत्पर राहून वर आला तरच ठीक, नाहींतर तो फुकटच जावयाचा ! साहस, नवीन भरारी, अकल्पनीय मार्ग, हीं आमच्या कारकुनी हिशेबी स्वभावाला मानवत नाहींत. अशा कारकुनी वृत्तीच्या कोत्या बुद्धीच्या माणसांच्या हातांत राजकारण आणि समाजकारण गेल्यानेंच महाराष्ट्राचा घात झाला आहे.

वर जें विवेचन केलें त्यावरून असें दिसतें कीं या देशांत कोलंबस अथवा मॅगेलन्, शॅकल्टन अथवा अमंडसेन, ऐन्स्टैन् अथवा जेम्स जीन्स, नेपोलियन अथवा शिवाजी, यांसारखे पुरुष उद्यास येण्याची शक्यता उरलेली नाहीं. हा देश कारकुनी वृत्तीच्या लोकांनी उपनगरें वसवण्याचा पराक्रम करण्याइतपतच कार्यक्षम आहे. आपल्या समाजांत विडंबनानें विद्वत्तेची आणि विनोदानें विक्रमाची जागा पटकावली आहे. येन केन प्रकारानें, जुगारीनें, सावकारीनें, ठेकेदारीनें, मिरासदारीनें, परदेशी वस्तूंचा प्रचार करून, अनेक संस्थांचें विश्वस्त होवून, नटींची बडवेगिरी करून, द्रव्य मिळवणारांच्या हातांत समाजाचें यंत्र गेलें आहे. वैश्यांनीं व शूद्रांनीं ब्रह्मतेज व क्षात्रतेज लुप्त करून टाकलें आहे. शिक्षणासारख्या शुद्ध बौद्धिक क्षेत्रांतहि या गोष्टीचें प्रत्यंतर येतें. आपल्या विषयांत सतत परिश्रम करणाऱ्या प्राध्यापकांपेक्षां संस्थेसाठीं द्रव्य मिळविण्यांत हुषार अशा उचापती गृहस्थांच्या हातीं संस्थांची सूत्रें गेलीं आहेत. हे सूत्रधार स्वतःस इष्ट त्या तऱ्हेनें संस्था हाकीत असतात. ऑलिवर ट्विस्ट्मधील अनाथालयाच्या चालकांप्रमाणें ते स्वतःच्या मजेंत चूर असतात आणि त्यांच्या संस्थांतील मुलें ज्ञानासाठीं आक्रोश करीत असलीं तरी त्यांच्या वाट्यास नियमित घोकीव ग्रंथांच्या पेजेचे चमचा दोन चमचे आले म्हणजे फार झालें ! खऱ्या विद्वान् माणसाला दीर्घ परिश्रम

करूनहि मान्यता मिळणें किती मुष्किलीचें आहे याचा एक मासला कै. माधवराव पटवर्धनांच्या हृदयद्रावक उदाहरणावरून स्पष्ट झाला आहे ! आधींच विद्वान् असलेल्या माणसानें पांच वर्षें परिश्रम करून सुस्पष्ट गुणांचा ग्रंथ तयार करावा, त्याच्या मान्यतेसाठीं लहान मुलाप्रमाणें परिक्षेस बसण्यांत कमीपणा मानूं नये, तरी त्यांना मान्यता मिळतांना विश्वविद्यालयास आंचके बसतात ! माधवराव मनानें खंबीर, वृत्तीनें झुंजार, तरीहि त्यांचें हृदय पोखरलें गेलें व त्यानें त्यांच्या आयुष्याचीं बरींच वर्षें कमी केलीं याबद्दल शंका वाटण्याचें कारण नाहीं. विशिष्ट रोगांची उत्पत्ति मनाच्या अस्वस्थतेनें होते हें एक वैद्यकीय सत्य आहे.

सद्‍गुणावर विसंबून कार्य करण्याऐवजीं सत्तेच्या जोरावर तें घडवून आणण्याची प्रवृत्ति निर्माण झाली म्हणजे समाजाच्या स्वास्थ्यास ओहोट लागला असें समजावें. तीच परिस्थिति आज विद्यमान आहे. कोणत्याहि क्षेत्रांत वर बसणारीं माणसें तीं विशिष्ट स्थानापन्न आहेत म्हणून त्यांना महत्त्व प्राप्त झालेलें आहे, तीं सुयोग्य आहेत म्हणून नव्हे. या माणसांना त्यांचें स्थान शेअरबाजारासारख्या उलाढाली करून प्राप्त झालेलें असतें, निढळाच्या घामाचा उद्योग करून नव्हे. सट्टे करून श्रीमंत झालेल्या माण-सालाहि लोक श्रीमंतच म्हणतात व समाजांतील त्याच्या महत्त्वास त्या त्या मार्गांमुळें मुळींच बट्टा लागतांना दिसत नाहीं. निवडणूक नामक लोकशाहीचा जो विशेष आहे त्याचें खरें स्वरूप काय असतें हें आतां पोरांनाहि कळा-वयास लागलें आहे. कोणताहि खटाटोप न करतां किती माणसें नुसत्या नामकरणानें निवडून येतील ? मेकॉले अनेक वर्षें एडिन्ब-रोचा रेक्टर होता, पण त्याची निवडणूक आपोआप होत असे. अशीं पुष्कळ वर्षें लोटल्यानंतर त्याला प्रत्यक्ष न ओळखणारी नवी पिढी पुढें आली. तेव्हां त्याच्या चहात्यांनीं एक वर्षी त्यास कळविलें कीं यंदा आपणास थोडी हालचाल केली पाहिजे, नाहींतर पूर्वीसारखें निवडून येण्याची शक्यता संशयांत आहे. त्यानें सांगितलें कीं पूर्वीप्रमाणेंच आलों तरच ती खरी निवडणूक, नाहींतर मला लोभ नाहीं ! असें सांगण्याची किती बड्या

धेंडांची तयारी आपणास दिसते ? एखाद्या खऱ्या शिपायाप्रमाणें किंवा गुळाच्या ढेपेला डसलेल्या डोंगळ्याप्रमाणें ते जागांना चिकटून राहातील, तसेच मरतील, पण मेकॉलेचा विचार त्यांच्या चित्तांत डोकावणार नाहीं ! अशी वृत्ति ज्या समाजांतील लोकांत नांदत आहे तेथें खऱ्या लोकशाहीची वूझ काय ? ही स्थिति राजकीय, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक, सर्वच क्षेत्रांत सारखी विद्यमान आहे.

प्राध्यापक राधाकृष्णन् यांनी नुकतेंच जगाच्या आजाराचें निदान केलें त्यांत तीन गोष्टींचें थैमान त्यांना आढळलें. शास्त्रज्ञान, मनःशक्ति आणि नागडा लोभ यांचा घनघोर संग्राम त्यांना सर्वत्र दिसून आला. संपत्तीचा लोभ, सुखाचा लोभ, सत्तेचा लोभ, कीर्तीचा लोभ, यांनींच अचाट शास्त्रज्ञान व जबरदस्त मनःशक्ति यांचा दुरुपयोग घडवून आणून जगांत अस्वस्थता निर्माण केली आहे. आपल्या देशांतील बेबंदशाहीचीं कारणेंहि वेगळीं नाहींत. फक्त आपला देश परतंत्र असल्यानें त्यांत देशद्रोही बूटपुशांची भर पडली आहे. समाजव्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा आद्य हेतूच सज्जनांना संरक्षण देणें व त्यांचाच उत्कर्ष होऊन तेच व्यवस्थापक होतील अशी घटना घडवून आणणें हा आहे. तो ज्या समाजांत वा राज्यांत साधत नाहीं तें राज्य विघडलें असें समजावें. मोठा लोभ तर राहोच, पण तनुनिर्वाहापुरताहि 'प्रपंच' न केला तरी आपल्या समाजांत अनर्थ घडावयाचा चुकत नाहीं असा आमचा अनुभव आहे. तो जर अपवादरूप नसून सार्वत्रिक असला तर त्या समाजाला भविष्याची आशा नाहीं असें म्हटलें पाहिजे.

समाजहितसाधक पुरुष वर आणण्याऐवजीं त्यांना ठेंचून जमिनींत गाडण्याकडेच आज समाजसत्तेचा दुरुपयोग होतांना दिसतो. आजची नवी पिढी या दुरुपयोगाच्या तंत्रांतच तरबेज होत आहे असें दिसतें ! विनोदाचें रूपांतर हलकट टवाळींत, टीकेचें रूपांतर अन्याय्य विडंबनांत, सत्यान्वेषणाचें रूपांतर असत्यपूर्ण वदनामींत, मोठ्या प्रमाणावर होतांना दिसत आहे. या टवाळीला भिवून, विडंबनानें हृदयविदारण होवून, वदनामीला विचकून जावून, अनेकांनीं आपलीं कार्यक्षेत्रें सोडलीं आहेत. धर्मयुद्धाची

शक्यता नाहीं म्हणून समरांगणाला पाठ दाखवून भागूबाईचा शिक्का सहन करीत निघून जाण्याची पाळी भल्याभल्यांवर आली आहे. साहित्यिकांनीं, लेखकांनी, टीकाकारांनीं, असले धंदे चालवून उदरंभरण करावें, समाजाला अनिष्ट वळण लावावें, निर्मळ नव्या पिढीचीं मतें गढूळ करावीं, याहून वाईट स्थिति कोणती? अमेरिकेंतील बदमाषांच्या कृतीचें हें अनुकरण झालें! वैमानिक लिंडबर्ग सारख्यांवर तेथें देशत्यागाची पाळी आली त्याप्रमाणेंच या देशांतहि सज्जनांवर आली तर त्याहून देशाची अधिक अपकीर्ति कोणती? या लाजिरवाण्या अप्रिय विषयाचें कीर्तन एवढेंच पुरे.

वर एवढें जें संकीर्तन केलें तें अत्यंत दुःखित मनानें, मोठ्या कष्टानें केलें. कोणत्याहि संस्थेवर माझा दांत नाहीं. ज्यांच्या डोक्याला एखादी टोपी बसली असें वाटेल त्यांनीहि ती गोष्ट वैयक्तिक दृष्ट्या घेवूं नये असें मी नम्रपणानें विनवितों. माझे शब्द क्वचित् कडक वाटतील पण माझें मन मी बालकाप्रमाणें स्वच्छ ठेवलें आहे. ज्यांच्यावर माझी टीका असते त्यांचेहि गुण माझ्या दृष्टिआड नाहींत. अशांतील बरेच माझे चांगले परिचित आहेत, त्यांत अनेक स्नेहीहि आहेत. ज्यांच्या स्नेहभावाच्या ओलाव्यावर मी कष्टमय जीवनयात्रा चालविली त्यांच्याबद्दल मला आदर कसा नसेल? कांहीं ठिकाणीं तर कृतज्ञताबुद्धीहि जिवंत आहे. ज्याच्याबद्दल माहिती अत्यल्प, विपरीत आयुष्यक्रमामुळें गैरसमजांना भरपूर अवकाश, निःस्पृह स्पष्टवक्तेपणामुळें अनेकांचा ज्यावर राग, त्याबद्दल अन्याय न झाला तर तें आश्चर्य! पण अशा रागावलेल्यांनीहि मनांत आणावें कीं या माणसानें काय साधलें आहे? कोणात्या लोभानें प्रेरित होवून हा माणून असा वागतो म्हणावा? अन्नाला मोताद होईपर्यंत ताणण्यांत याचा काय हेतु असूं शकेल? संपत्तिसत्ता राहो, कीर्तीचा व मानमान्यतेचा हव्यास तरी त्यानें कधीं दाखविलेला दिसतो काय? आपलें साधुत्व तरी त्यानें कधीं मिरविलें काय? मग समाजकल्याणाबद्दलची आस्था, जग बरें चालावें ही शुभेच्छा, यांव्यतिरिक्त आयुष्यांत प्रवर्तक असें काय उरलें? तीहि गोष्ट मान्य नसली तर अर्थातच बोलणें खुंटलें.

माझी खात्री आहे कीं निर्मळ मनाचा आहे त्याला माझें विवेचन पटेल. रागलोभमदमत्सरादिकांनीं पिडलेल्यांसमोर मी निर्बल आहें. पण महाराष्ट्र-समाजाची घसरट त्यांनाहि अमान्य करणें जड जाईल. डॉ. केतकरां-सारख्यांच्या स्मारकाबद्दल एखादी कमिटी नेमली गेली तरी ती जातमृत होतांना दिसते. त्यांचें लिखाण मौलिक असलें तरी तें छापतां येत नाहीं. आणि ज्यांच्यांत कांहीं असलेंच तर भाषेच्या विलासाखेरीज अन्य कांहीं नाहीं त्यांच्या लेखसंग्रहांचे वा समग्र लिखाणाचे संभार नित्य बाहेर पडत आहेत ! लघुकथागुच्छांचा व काव्यांचा तर नुसता पाऊस पडत आहे ! विनोदी लिखाणाच्या माऱ्यापुढें तर उभें राहणेंहि शक्य नाहीं ! ज्यांची बुद्धि ढिली, मन दूषित, वृत्ति कुत्सित, ध्येय-वत्ता शून्य, चारित्र्य संशयित, आचरण लोभमोहमदान्वित, त्यांच्या लिखा-णांत काय सांपडण्यासारखें आहे ? त्यांकडून कोणता संदेश मिळण्यासारखा आहे ? कार्यप्रवृत्ति कशी होण्याजोग आहे ? ते लेखकसंपादकग्रंथकर्ते म्हणून ज्ञात होतील, सभासंमेलनपरिषदांतून मिरवूं शकतील, क्वचित् द्रव्यदारागृह–समन्वित होवूं शकतील, पण त्यांच्या भाषाविलासाचा उपयोग समाज सुधारण्याकडे होवूं शकणार नाहीं, समाजाची संघटना करण्याकडे होणार नाहीं, अशिवाचा नाश करण्यांत होणार नाहीं, राष्ट्र तारण्यासाठीं होणार नाहीं, जगांत शांति सुख समाधान आनंद पसरविण्यांत त्याला यश प्राप्त होणार नाहीं. असें कांहीं आपल्या हातून व्हावें एतदर्थ मी लेखणी शिणविली; तिचा त्या कार्याच्या सिध्यर्थ कांहीं उपयोग होतो कीं काय तें वाचकांनीं पहावें.

ता. ६ जानेवारी १९४०
डेक्कन कॉलेज–पुणें ६

त्र्यंबक शंकर शेजवलकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | एक अप्रसिद्ध खंदा मराठी वाङ्मयसेवक ... | १ |
| २ | विश्वनाथ काशिनाथ राजवाडे ... ... ... | ५ |
| ३ | " राजवाडे आणि भांडारकर " ... ... | १४ |
| ४ | न्यायमूर्ति तेलंग ... ... ... ... | २९ |
| ५ | दयानंद ... ... ... ... | ३५ |
| ६ | पंडित शामजी कृष्णवर्मा ... ... ... | ४१ |
| ७ | लाला लजपतराय ... ... ... | ४४ |
| ८ | लोकमान्य व लोकामान्य ... ... ... | ५१ |
| ९ | मोहनदास करमचंद गांधी ... ... ... | ५८ |
| १० | मोतीं गळालें ... ... ... ... | ६५ |
| ११ | भगतसिंह, राजगुरु व सुखदेव ... ... | ७७ |
| १२ | नोबेल पारितोषिकाचा जनक आल्फ्रेड नोबेल ... | ८२ |
| १३ | ' नरव्याघ्र ' क्लेमेन्सो ... ... ... | ८८ |
| १४ | नेपाळचे पेशवे कैलासवासी झाले !! ... ... | ९२ |
| १५ | सर व्हॅलेंटाईन चिरोल यांचा मृत्यु ... ... | ९५ |
| १६ | इरिगोयेन ... ... ... ... | ९७ |
| १७ | आशेचा किरण ... ... ... ... | १०३ |


## परीक्षणें


| | | |
|---|---|---|
| १८ | " ज्ञानोपासना व भारतीयांचें कर्तव्य " ... ... | १०९ |
| १९ | खुलासा [ पत्रव्यवहार ] ... ... ... | ११५ |
| २० | खुलाशास उत्तर ... ... ... ... | ११७ |
| २१ | गांवसासू ... ... ... ... | १२१ |
| २२ | सह्याद्रीच्या पायथ्याशीं ... ... ... | १२७ |
| २३ | सुशिलेचा देव ... ... ... ... | १३८ |
| २४ | ' ब्राह्मण कन्या ' ... ... ... | १६४ |
| २५ | " माझें रामायण " ... ... ... | १७० |
| २६ | ' ओलेती ' ... ... ... ... | १८५ |
| २७ | देवदासी ... ... ... ... | १९२ |
| २८ | प्रेमाचें एक अप्रतिम प्रतीक ... ... ... | १९८ |

# श्री. शेजवलकर यांचे लेख

## पुस्तक १ लें

## एक अप्रसिद्ध खंदा मराठी वाङ्मयसेवक

सुमारें तीन महिने झाले. एक अज्ञात मराठी लेखक वडोदें शहरीं मरण पावला. ज्यांनीं त्याच्या शेवटच्या संस्कारप्रसंगीं हातभार लावला त्यांपैकीं किती जणांस श्मशानांत भस्मीभूत होणाऱ्या त्या कष्टानें झिजून झिजून केवळ अस्थिमात्र राहिलेल्या कलेवराच्या मागें केवढी आत्मज्योति होती याची कल्पना असेल? जगांतील यशाच्या मापानें न मोजतां आत्म्याच्या विकासाच्या मापानें जर माणसांची योग्यता कोणी ठरवूं लागता तर त्या गार पडलेल्या प्रेतांत कांहीं घटकांपूर्वी राहणारा आत्मा जीवनन्मुक्तावस्थेच्या बऱ्याच वरच्या कोटीस पोंहोंचलेला होता असें त्यास आढळून येतें. जगांतील यशसुद्धां मानमान्यता, सुखसंपत्ति, अधिकारकीर्ति या ताजव्यांनीं न तोलतां समाजसेवेच्या तागडींत टाकून पाहिलें तर तेंहि या मृताच्या वांट्यास अगदीं कमी आलें होतें असें म्हणतां येणार नाहीं. वाचणारांस केवळ मनोरंजक वाटणारे नव्हे तर ज्ञानवर्धक, बोधप्रद व सर्वस्वी समाजहितकारी असे पंधरावीस ग्रंथ मराठींत आणणारा लेखक बराच वरच्या दर्जाचा समाजसेवक म्हणावा लागेल. तसेंच ही समाजसेवा केवळ अर्थार्जन, कीर्तिलालसा वगैरे हेतूंनीं प्रेरित होऊन केलेली नसून हौसेची वाङ्मयसेवा म्हणूनच केलेली असल्यानें तर त्या सेवेची नैतिक योग्यता फारच जास्त ठरते. केवळ एखादा दहापांच पानांचा लेख खरडून लेखक म्हणून

मिरवणारे लेखक कोणीकडे व पंधरावीस पुस्तकें लिहूनसुद्धां वर आपलें नांवहि न घालूं इच्छिणारा हा खंदा लेखक कोणीकडे ? जगाचें खरें हित करूं इच्छिणारीं माणसें बहुधा अप्रसिद्ध असतात हेंच खरें.

गणेश वामन ऊर्फ दादा गोगटे हें वर वर्णिलेल्या अज्ञात लेखकाचें नांव. यांचा जन्म सुमारें पंचावन वर्षांपूर्वी रत्नागिरीच्या दक्षिणेस असलेल्या गोळप गांवीं झाला. या त्यांच्या जन्मभूमींत त्यांचें घरदार, वतनवाडी सर्व असून त्यांच्या मातु:श्रीहि अजून हयात आहेत. पण काय कारण असेल तें असो, दादांनीं अलीकडे अनेक वर्षे घराचें नांव सोडलें होतें. शेवटच्या कांहींशा खितपत पडलेल्या आजारांतहि त्यांस घरीं जावेंसें वाटलें नाहीं. दादांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत पुण्यास झालें. त्यांचे एक सहाध्यायी व अगदीं जवळचे मित्र ज्ञानप्रकाशांतील रा. बापुराव आंबेकर हे होत. ते त्यांच्या उनाड खेळाडूपणाची व खोडकरपणाची पुष्कळ हकीकत सांगतात. दादांचें शरीर गोटीसारखें होतें. त्यांचें अभ्यासाकडे बिलकुल लक्ष नसे. मॅट्रिक होण्यासहि त्यांस तीन वर्षे लागलीं. पुढें त्यांचे भगिनीपती रा. शारंगपाणी, बडोद्याचे न्यायाधीश, यांच्या मदतीनें ते मुंबईस ग्रँट मेडिकल कॉलेजांतहि कांहीं वर्षे होते; पण डॉक्टर मात्र झाले नाहींत. नंतर त्यांनीं कांहीं वर्षे व्यापारांत घालविलीं. पण त्यांचा व्यापार तुकारामबोवांचाच ठरला. लहानपणीं त्यांचें वाचनाकडे लक्ष नव्हतें. तें पुढें देशभक्तीच्या वावटळींत लागूं लागलें. ते राष्ट्रमत, मनोरंजन वगैरेंतून लिहूंहि लागले. त्यांच्या लेखनांत सर्व विषय येत. मनोरंजनांत त्यांनीं किती लिहिलें तें एक मित्रांसच माहीत असेल. पुढें काशिनाथपंत मित्रांचें लक्ष मनोरंजनाच्या भरभराटीबरोबर प्रोफेसर, वकील, बॅरिस्टरांकडे वळलें व त्यामुळें बी. ए. हीं जादूचीं अक्षरें नांवापुढें नसलेल्या दादांसारख्या लेखकांची मनोरंजनांत खातर उरली नाहीं. तेव्हां दादांनीं तेथून पाय काढला.

कोणाचेंहि नोकर राहूं नये अशी दादांची तीव्र इच्छा. या इच्छेच्या परिपूर्तीसाठीं घड्याळें दुरुस्त करण्याचा धंदा त्यांनीं पत्करिला होता. येथील आर्यन वॉच कंपनींत ते काम करीत. पण तेथें ते नोकर म्हणून नव्हते.

करीन तें काम, पडेल तो दाम अशा तऱ्हेनें ते असत. या कामांत ते जेमतेम पोटापुरती कमाई करीत. जास्त कमाई करतां आली नसती असें नाहीं. पण दादा शक्य तितका वेळ वाचनांत घालवूं इच्छित असल्यामुळें जरूरीपेक्षां जास्त काळ ते घऱ्याळांत घालवूं इच्छित नव्हते. काव्यशास्त्राविनोदाच्या गप्पांत काळ घालविणें त्यांस आवडे व त्यांनीं आयुष्याचा बराच भाग अशाच तऱ्हेनें घालविला. त्यामुळें साहाजिकच त्यांच्यांत बहुश्रुतता आली होती. वेदान्त विषयांत त्यांचें मन विशेष रमे व म्हणूनच विवेकानंदांच्या समग्र ग्रंथांस त्यांनीं मराठी पेहराव चढविला. त्याचे तेरा भाग झाले आहेत. अगदीं शब्दशः भाषांतर न करतां मुळांतला अर्थ उतरविण्याकडे त्यांचें लक्ष असे व त्यामुळें त्यांच्या लेखनांत रसाळपणा आला आहे. बऱ्याच लेखकांप्रमाणें त्यांस लिहिण्याचा कंटाळा असे. त्यामुळें त्यांचें लेखन बहुशः दुसऱ्याच्या हस्तें झालें आहे. त्यांच्या या कंटाळ्याचा उपयोग दुसऱ्यांनीं करून घेतला. भारत–गौरव–ग्रंथमालेचे जनक रा. प्रभाकर श्रीपत भसे यांनीं प्रसिद्ध केलेलीं टॉलस्टॉयचें चरित्र, कैसरची प्रभावळ, जर्मनीचे वज्रबाहु प्रधान बिस्मार्क व ज्ञानदीप हीं पुस्तकें दादांनीं सांगून भशांनीं उतरून घेतलेलीं होत. स्वतः रा. भसे लेखनकलाकुशल असल्यामुळें त्यांस तसें करणें अगदीं सोपें गेलें. एका अर्थी भशांसारखा दादांचा कल पाहून व राखून आपलें काम करून घेणारा माणूस नसता तर दादांचे ग्रंथ त्यांच्या डोक्यांतच राहिले असते. पण दादांनीं पुस्तकावर आपलें नांव कधींहि घालूं दिलें नसल्यामुळें कांहीं वेळींतरी ग्रंथकर्तृत्वाचें श्रेय भशांकडे गेलें असावें. कसेंहि असलें तरी तेणेंकरून मराठी वाङ्मयाची हानि झालेली नाहीं.

विनोद, गप्पा, चहा व विड्या हीं दादांचीं आवडतीं करमणूकीचीं साधनें. अध्यात्मचिंतनांतहि ते बराच काळ घालवीत. हें चिंतन विशेषतः सकाळची सहल करतांना होत असे. मोठ्या पहांटेस उठून दादा हळू हळू विचारी माणसासारखीं सावकाश पावलें टाकीत व प्रत्येक पावलागणीक कांहीं विचार मनांत घोळीत पांचसात मैल चालून येत. चौपाटी, वाळकेश्वर,

मलबारहिल, नेपियन सी रोड, महालक्ष्मी, पेडर रोड असा कांहींसा वेडावांकडा लांबलचक फेरा ते घेत. यांत त्यांचे तीनचार तास जात. मूळ शरीरयष्टि मजबूत असल्यामुळें हें सर्व झेंपे. अध्यात्मचिंतनांत आनंद मानून न राहतां आपला वेदान्त त्यांनीं आचरणांतहि बराच उतरविलेला होता. अढळ शांति, समचित्त, निर्लोभतां, निष्कापट्य, कीर्तिमानभोगपराङ्मुखता इत्यादि गुण त्यांच्यांत बाणले होते. एकदां त्यांचें एकुलतें एक अपत्य कालमुखीं पडून त्याची शेवटची व्यवस्था लावण्यासाठीं सोनापुराकडे जात असतां वाटेंत कोणी ओळखीचा भेटला. त्यावरोबर तात्काल त्यांचें हास्य त्यांच्या मुखावर झळकूं लागलें. बापड्या भेटणाऱ्यानें मात्र त्या गंभीर प्रसंगास उचित असें आंवट तोंड केलें होतें! आपलें कर्तव्य केल्यावर खेद करणारे दादा नव्हते. दादांच्या अंगावरील कपड्यांची एकंदर किंमत कधीं एकदोन रुपये तरी भरली असती कीं नाहीं याची वानवा आहे. कित्येक वेळां त्यांचे जीर्ण कपडे भिकाऱ्यानेंहि घेतले नसते. अस्तु.

कर्नाटक प्रेसचे मालक मंगेशराव कुळकर्णी यांचा व गोगट्यांचा अकृत्रिम स्नेह जडला होता. ‘प्रगति’ पत्र काढण्याची कल्पना अमूर्तावस्थेंत होती तेव्हां दादा बिछान्यावर पडले होते तरी अशा तऱ्हेचें पत्र काढावें, मीहि बरा होतों व घड्याळाच्या कामास शेवटची रजा देतों, व मनांत असलेलें सर्व लिहून टाकूं असें ते बोलले होते. पण त्यांचे विचार तेथेंच राहिले व ‘प्रगती’चे वाचक दादा गोगट्यांच्या लेखनास मुकले. दादांच्या दारिद्र्य, कष्ट, काळजी यांनीं पूर्ण अशा सुखरहित आयुष्यांत त्यांची साध्वी पत्नी हेंच काय तें एक समाधानाचें स्थान होतें. दोघांच्या असामान्य सहनशीलते-मुळें दोघांनींहि अब्रूनें दिवस काढले. अशी खडतर स्थिति नसती तर दादांनीं बरेच जास्त पावसाळे पाहिले असते.

प्रगति } वर्ष १, अंक १,<br>ता. ८ जून १९२९

# विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

## लोकोत्तराणां चेतांसि को नु विज्ञातुमर्हति ॥

Well, here's the platform, here's the proper place.
        Hail to your purlieus.
All ye highfliers of the feathered race
        Swallows and curlews !
Here's the top peak ! the multitude below
        Live, for they can there
This man decided not to Live but Know
        Bury this man there ?
Here–here's his place ! where meteors shoot, clouds form,
        Lightenings are loosened.
Stars come and go ! Let joy break with the storm-
        Peace let the dew send !
Lofty designs must close in like effects.
        Loftily, lying,
Leave him—still loftier than the world suspects,
        Living and dying.

—रॉबर्ट ब्राउनिंग.

तीन वर्षें झालीं. मार्गशीर्ष वद्य १२ भृगुवार शके १८४८ रोजीं धुळें मुक्कामीं संशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे संशोधनेश्वरच्चरणीं विलीन झाले. वर दिलेल्या ब्राउनिंगच्या उक्तींत म्हटल्याप्रमाणें एखाद्या खात्यापित्या

मोतीच्या माणसाचें आयुष्य न जगतां केवळ जिज्ञासातृप्तीसाठीं आत्म्याचें ध्येयवादी जीवित जगणारा राजवाड्यांसारखा दुसरा माणूस महाराष्ट्रांतच काय, पण अलीकडील अखिल हिंदुस्थानांतहि दुसरा झालेला निदान प्रसिद्ध तरी नाहीं. म्हणूनच त्यांवर लिहितांना सर यदुनाथ सरकारांना मध्ययुगीन यूरोपांतील ख्रिस्ती भिक्षूंशीं त्यांची तुलना करावी लागली. निरनिराळ्या विद्यांत प्रवीण असे अनेक विद्वान् झाले, आहेत आणि होतील. पण ज्या ठिकाणीं उल्का पतन पावतात, विजा कडाडतात, वादळें घोंघावतात आणि तारका फिरत रहातात, अशा तऱ्हेचें विद्यागिरिशिखर एवढेंच. विद्येच्या नभोमंडळांत शक्त्यनुसार विहार करणारे अनेक आहेत, पण ते कितीहि उंच उडाले तरी राजवाड्यांची गगनचुंबी भरारी मारणारा त्यांत सांपडणें कठीण. बरोबरच आहे. राजवाड्यांसारखी जीव जावो अथवा राहो। माझा ज्ञानमार्गी भावो। अशा तऱ्हेची निष्ठा दुसऱ्या कोणी दाखविली आहे? ब्राउनिंगच्या भाषेंत सांगावयाचें तर त्यांनीं इतर मूर्खांप्रमाणें आयुष्याचें मोल हाप्त्या हाप्त्यांनीं वटावून रोज मोडून खाल्लें नाहीं.

He would not discount life, as fools do here,
    Paid by instalment!
He ventured neck or nothing—heaven's success
    Found, or earth's failure.
" Wilt thou trust death or not ?" he answered " Yes.
    Hence with life's pale lure!"
That low man seeks a little thing to do,
    Sees it and does it-
This high man, with a great thing to pursue,
    Dies ere he knows it.
That low man goes on adding one to one,
    His hundred's soon hit.
This high man, aiming at a million,
    Misses an unit.

भवितव्यतेवर विश्वास ठेवून, काल हा नित्य आहे हें जाणून, आत्मा अमर आहे अशी खात्री बाळगून, त्यांनीं आयुष्याच्या फिकट मोहाचा त्याग

केला. एखाद्या क्षुद्र माणसाप्रमाणें लहानशी गोष्टच करावयास घेऊन ती संपविण्याचा त्यांनीं विचार योजला नाहीं. तसें करणें कोणासहि सोपें आहे. पण मोठ्या कार्यांचा ध्यास अहर्निश लावून घेऊन आपण कोठपर्यंत आलों हें समजण्यापूर्वीच मरणें कितीकांच्या भाग्यांत असतें ? शंभर रुपये सांठविण्याची हांव धरून एक आणि एक दोन, दोन आणि दोन चार, करीत बसणारा शंभराची मर्यादा सहजच गांठतो. पण कोटीवर लक्ष ठेवून वागून या आयुष्यांत एक कपर्दिकाहि न मिळवणारा कोण आहे ? जगाच्या बाजारांत पहिला माणूस शहाणा ठरतो हें स्पष्ट आहे, पण दुसरा हा खुळाच काय ? कचेरींतील बेरजा करण्यांत गुंग न होतां वेगळींच संख्येचीं कोडीं सोडविणारा रामानुजन् हा योग्य माणसाच्या नजरेस येण्यापूर्वीं वेडाच समजला जात असे, पण असे वेडेच जगाचे थोर उपकारकर्ते पुरुष झाले आहेत हें खोटें काय ? लोकोत्तर पुरुषांचें मोठें दुर्दैव त्यांना समजणारे विरळा असतात हें असतें. पण हा कांहीं त्यांचा अपराध किंवा अवगुण नव्हे. अनेक आधुनिक शास्त्रज्ञ प्रयोगशालेंत वर्षांचीं वर्षें एका साध्या दिसणाऱ्या बाबीवर पुनः पुनः प्रयोग करीत बसतात. आपल्या प्रयोगांनीं कोणतें ज्ञान संपादन होणार आहे याची कल्पना त्यांस बिलकूल नसते. अनेक शास्त्रज्ञ असे दुर्दैवी असतात कीं, त्यांस त्यांच्या हयातींत कोणताहि शोध लावल्याचें श्रेय मिळूं शकत नाहीं. शोध लागणें ही भाग्याची गोष्ट आहे, पण प्रयोग करीत राहणें त्यामुळें खुळेपणाचें ठरतें काय ? एखाद्या व्यक्तीची योग्यता अशा भाग्यावरून किंवा जगांतील यशस्वितेवरून ठरवावयाची विचारी विद्वानांची रीत नाहीं. ती व्यक्तीच्या शुद्ध व उच्च हेतूंवरून व तदनुरूप आचरणावरून ठरवायची असते. त्याप्रमाणें पाहिलें तर राजवाडे हे सहजच लोकोत्तरांच्या मालिकेंत गुंफावयास योग्य ठरतात.

जगांतील यशस्विताहि कार्याच्या मापानें मोजावयाचें ठरविलें तर राजवाड्यांचें यश थोडें नाहीं. त्यांनीं गोळा केलेले सर्व कागद छापले गेलेले नाहींत, पण जेवढे गेले आहेत त्यावरून त्यांचें कार्य मापावयाचें म्हटलें

तरी तें कोणत्याहि लठ्ठ पगाराच्या, भरपूर फुरसतीच्या व गाजलेल्या कीर्तीच्या जाड्या पंडिताच्या कार्याहून कमी भरणार नाहीं. सर यदुनाथ सरकार हे अगदीं हिशेबी, भावनाशून्य, प्रत्यक्षगामी विद्वान् ना, पण त्यांनाहि मुंबई विश्वविद्यालयासमोर दिलेल्या आपल्या छात्रोपदेशांत आदर्श विद्वानांचा नामनिर्देश करतांना भांडारकरांबरोबर राजवाड्यांचें नांव घ्यावें लागलें. राजवाड्यांबद्दल फारसा आदर नसलेल्या माणसाची साक्ष या दृष्टीनें हा निर्देश विशेष महत्त्वाचा आहे. राजवाड्यांच्या क्षुद्र निंदकांना डॉ. सर भांडारकरांच्या समवेत केलेला हा निर्देश इतका झोंबला कीं त्यांचीं तोंडें आंबट झालीं व त्यांपैकीं ज्यांच्या हातीं वर्तमानपत्रें होतीं त्यांनीं यदुनाथांच्या उपदेशाचा गोषवारा देतांना फक्त भांडारकरांचें तेवढें नांव देऊन राजवाड्यांचा उल्लेख अलग टाळला ! खरेंच आहे, भांडारकरांच्या विद्वत्ते-पेक्षां त्यांच्या लठ्ठ पगाराचें व मागच्यापुढच्या पदव्यांच्या अक्षरांचेंच ज्यांना जास्त महत्त्व आयुष्यदृष्ट्या वाटतें, त्यांच्या दृष्टींत गरीब बापुडा विशा राजवाड्या कसा भरावा ? आणि जन्मभर या निंदकानीं मारमारून सुद्धां पुनः कचाप्रमाणें तो जीवंत व अमर ! ! !

आणि वस्तुतः पहातां राजवाडे हे भांडारकरांच्या पंक्तीस बसणारे इसमच नव्हते, दोघांची जात मुळांतच वेगळी. त्यांची कोणत्याहि बाबतींत तुलना नाहीं. ज्या काळांत जें व्यवहारदृष्ट्या सर्वांत जास्त फायदेशीर तें करून आयुष्यक्रमण करणारे भांडारकर, व्यवहारदृष्ट्या जें सर्वस्वीं तोट्याचें तेंच आचरून जीवितयात्रा संपविणाऱ्या राजवाड्यांशीं कसे तुलणार ? सर्वांत जास्त फायदेशीर अशा शालोपयोगी क्रमिक पुस्तकांचें लेखनहि न टाळणारे भांडारकर, "कोणताहि हक्क राखून ठेवलेला नाहीं." असें आपल्या पुस्तकांवर लिहिणाऱ्या राजवाड्यांशीं कोणत्या मापानें तुलणार ? भांडारकर व्हा म्हणून उपदेश करण्याची फारशी जरूरी नाहीं. जोंपर्यंत पैशाचा व मानाचा मोह या पृथ्वीतलावर कायम आहे, तोंवर ब्राउनिंगच्या भाषेंत एक आणि एक दोन करीत बसणारे भांडारकर हे निपजत जातीलच. पण जिवाचें रान करून कनक, कांता, मान आणि सुख यांचा मोह आंवरून, एकच

एक ज्ञानाच्या मार्गे लागणारे राजवाडे सतत उपदेश करीत राहूनहि निपज-विण्याचा मार्ग अजून कोणी शोधून काढलेला ऐकिवांत नाहीं. या महाराष्ट्रांत चित्पावनद्वेषी जे लोक आहेत त्यांच्यांत जोंवर एखादा राजवाडे, एखादा वासुदेवशास्त्री खरे, एखादा टिळक किंवा एखादा आगरकर, फार काय एखादा दत्तोपंत आपटेहि निर्माण होत नाहीं, तोंवर त्यांनीं कितीहि दांत चावले, कितीहि निंदा केली, कितीहि दोष दाखविले किंवा कितीहि बोटें मोडलीं तरी त्यामुळें चित्पावनांचें कांहींहि वांकडें होण्याचा संभव नाहीं. कावळ्यांच्या शापांचा किंवा म्हातारीच्या हात चोळण्याचा जेवढा परिणाम होण्याचा संभव तेवढाच उपयोग अशांच्या वृथा जळफळाटाचा होण्यासारखा आहे. चित्पावनांचें यश सरें, रावबहादुरें, प्रोफेसरें किंवा मोटारवाले, हवेल्या-वाले आणि वडी नोकरीवाले यांनीं वाढविलेलें नाहीं. त्यांची पैदास त्यांच्या-प्रमाणेंच इतर जातींतहि भरपूर आहे. चित्पावनांचें यश त्यांच्या त्यागाच्या पराकाष्ठेंत, एखाद्या गोष्टीचा पिच्छा पुरविण्याच्या चिकाटींत, एकांतिक अढळ निष्ठेंत, अविश्रांत उद्योगांत व सुखलालसेच्या विन्मुखतेंत आहे. जोंवर या गुणांची योग्यता जगांत मोठी मानली जात आहे तोंवर त्यांचें यश चिरंजीव आहे.

राजवाड्यांची योग्यता यदुनाथांनीं प्रत्यक्ष कार्याच्या मापानें भांडार-करांच्या तोडीची ठरविली हें एका परीनें योग्य झालें असलें तरी त्यामुळें त्यांचें विशिष्टत्व लक्षांत येऊं शकत नाहीं. एकदां एका संशोधकानें आम्हांस असा प्रश्न टाकला कीं, राजवाड्यांनीं कोणता असामान्य सिद्धांत आपल्या अलौकिक बुद्धीनें प्रस्थापित केला तें सांगा. या प्रश्नास खरोखरच उत्तर नाहीं, कारण चिरकाल राहूं शकेल असा कोणताहि सिद्धांत त्यांनीं बांधलेला नाहीं, किंबहुना त्यांचे बहुतेक सिद्धांत पुढेंमागें सर्वस्वी चुकीचे ठरतील अशीहि भीति वाटते. पण आपली बाजू मांडतांना ते जें विवेचन व विवरण करीत त्यांतच त्यांच्या बुद्धीचें वैशिष्ट्य दिसून येतें. ज्याप्रमाणें लोकमान्यांचा आर्यांच्या मूलस्थानाबद्दलचा सिद्धांत चुकीचा ठरला तरी त्यामुळें त्यांच्या बुद्धीबद्दल द्विमत होण्याचें कारण नाहीं तोच प्रकार राजवाड्यांच्याहि बाबतींत

आहे. वेद अनेकांनीं वाचले होते तरी त्यांत कोणाला आर्यांचें मूलस्थान आढळलें नव्हतें, तें लोकमान्यांच्या दृष्टिक्षेपांत आलें हाच त्यांच्या तैल-बुद्धीचा पुरावा. त्याचप्रमाणें राजवाड्यांच्या तर्करूप सिद्धांताचें होतें. तावरून ताकभात समजण्याकडे व सुतानें स्वर्ग गांठण्याकडे त्यांच्या बुद्धीचा कल होता हें खरें; तसेंच अनेक वेळीं आपणास पूर्ण अवगत नसलेल्या शास्त्रांतहि ते डोकें खुपशीत व तर्क लढवीत हाहि प्रकार खरा; पण त्यांच्या अशा कोणत्याहि लुडबुडींतहि बुद्धीची चमक आढळल्याशिवाय रहात नसे. एक आणि एक दोनचा सीधा मार्ग त्यांचा नव्हता. कैलासवासी श्रीयुत रामानुजन् यांच्याबद्दलहि अशीच शंका यूरोपिय गणित्यांना येत असे. त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें एका सिद्धांतावरून दुसरा सिद्धांत बांधीत जाण्याकडे त्यांचा कल असे. आपल्या पद्धतीच्या बाहेर जाणाराचा मार्ग त्यांस कळत नसे. पण रामानुजन् कांहींहि दृश्य गणित न करतां पटापट एका श्रेणीवरून दुसऱ्या श्रेणीवर उडी मारीत जात त्यांचा त्यांस अचंबा वाटे. रामानुजनचें आधुनिक गणितशास्त्राचें ज्ञान संपूर्ण नसल्यानें त्यांस आपलें गणित केंब्रिज-च्या पंडितांस त्यांस समजण्यासारख्या रूढ परिभाषेंत समजावून सांगणें कठीण जाई. पण एखाद्या प्रमेयाचें उत्तर मात्र ते बिनचूक देऊं शकत असत. आपल्याशीं पुटपुटण्याची श्रीयुत रामानुजन् यांस खोड असल्यानें इतरांस असेंहि वाटे कीं, यांस कोणी कर्णपिशाच्च सहाय्य आहे, मंत्र पुटपुटून रामा-नुजन् त्याकडून उत्तर मागवितात. पौर्वात्यांच्या मंत्रतंत्र विद्येबद्दल पाश्चात्यांत अजूनहि पुष्कळ श्रद्धा आहे त्याचा हा परिणाम होता. राजवाड्यांतहि केवळ बुद्धीच्या बळावर प्रमेयें सोडवित बसण्याचा प्रकार बराच दिसून येतो. त्यांच्याशीं संबंध येणाऱ्यांना त्यांच्याबद्दल ते जगाच्या कल्पनेबाहेर उच्च आहेत—Still loftier than the world suspects असें वाटे.

मराठी भाषेचा व इतिहासाचा गाढ अभिमान हा तर राजवाड्यांच्या आयुष्याचा मार्गदर्शक दीप. या दोन अंगांवर त्यांचा देशाभिमान उभारलेला होता. मात्र त्यांचा देशाभिमान पाश्चात्यांच्या सारखा केवळ स्थानाभिमान नसून त्यांत धर्मसंस्कृति अभिमानाचा सुद्धां अंतर्भाव होत असे. ब्राह्मणी संस्कृतीबद्दल एवढा गाढ अभिमान असणारा पुरुष विरळा.

राजवाड्यांत परंपरागत संस्कृतीचा अभिमान व आधुनिक शुद्ध शास्त्रीय दृष्टि यांचें चमत्कारिक मिश्रण झालें होतें. त्यामुळें होणारें त्यांचें आचरण अनेकांस विचित्र किंवा विक्षिप्तपणाचें, किंबहुना आचरटपणाचें वाटत असे. अत्यंत शंकेखोर वृत्तीमुळें त्यांचें कोणाशीं कधीं फाटेल याचा नेम नसे. व्यक्तिविषयक सामाजिक दोष तर राजवाड्यांत अगणित होते. त्यांची सोदाहरण यादी द्यावयाची म्हटल्यास फारच लांबेल.

स्वच्छता व एकंदरींत आरोग्यशास्त्रविषयक प्रश्न यावर राजवाड्यांचा मोठाच कटाक्ष असे. या बाबतींत स्पर्शास्पर्शादि दोष ते फारच मानीत. एतद्विषयक आचारांत त्यांची महात्माजींशीं तुलना होण्यासारखी आहे. दोघेहि नेहमीं सारखे आरोग्यविषयक प्रयोग करणारे म्हणावयास हरकत नाहीं. पुण्याच्या आरोग्यमंडळाचे राजवाडे हे उत्पादक होते हें फारसें कोणास ठाऊक नाहीं. तसेंच त्यांनीं एक समाजशास्त्रीय प्रश्नांची चर्चा करणारी संस्था आंखली होती हेंहि थोड्यांसच ठाऊक असेल. समाजविषयक अनेक शास्त्रांत राजवाड्यांची गति असे. विवाहविषयक त्यांची लेखमाला चित्रमयजगताला लोकमताला मान तुकविण्यासाठीं बंद करावी लागली, इतके त्यांचे या विषयावरील विचार समाजाच्या रूढ समजुतीला धक्का देणारे होते. राजवाडे अनेक वेळीं परंपरागत समजुतींना आधुनिक शास्त्रीय-दृष्ट्या धक्का देतांना आढळत. अशा वेळीं त्यांच्या दृष्टीसमोर केवळ कठोर शास्त्रदृष्टीच उभी रहात असे. अशी गोष्ट इतिहासांत कमी प्रमाणांत आढळे. तेथें अभिमानाच्या अतिरेकांत त्यांची शास्त्रदृष्टि साफ मावळलेली दिसे. व्यक्तिविषयक आवडनिवड किंवा पूर्वग्रह यांची बाधा त्यांच्या लिखाणास फार झालेली आढळेल. इतिहासकार या दृष्टीनें राजवाडे हे निराबाध मार्गदर्शक होण्यासारखे नाहींत. त्यांचें बरेंचसें लिखाण बर्कच्या फ्रेंच राज्यक्रांतीवरील प्रबंधाप्रमाणें पूर्वग्रहदूषित व अज्ञानपूर्ण आहे. मात्र त्यांत बर्कसारखेच गुणहि आहेत.

राजवाड्यांची योग्यता अर्थातच त्यांच्या व्यक्तिविषयक दोषांवरून, पूर्वग्रहांवरून, विक्षिप्तणावरून किंवा हास्यास्पद अज्ञानजन्य कोटिक्रमांवरून

ठरवावयाची नाहीं. तर त्यांच्या एकांतिक निष्ठेवरून, अंधारांतील मार्गक्रमणावरून, अविश्रांत उद्योगावरून, बुद्धीच्या चमकेवरून व कल्पनेच्या भरारीवरून ती ठरविली पाहिजे. त्यांची जिज्ञासा इतकी तीव्र होती कीं, तिची कायम तृप्ति केव्हांच होण्यासारखी नव्हती. एक शास्त्र संपलें तर दुसरें, दुसरें संपलें तर तिसरें, अशी त्यांची धांव सारखी सुरू होती. अमका एक टप्पा गांठल्यावर आपण थांबावयाचें अशी त्यांची मनोरचनाच नव्हती. जिज्ञासा तृप्तीच्या एक जातीच्या वेडानेंच ते पछाडलेले होते म्हणाना. त्यामुळें ब्राउनिंगच्या भाषेंत

So, with the throttling hands of Death at strife,
Ground he at grammar;
Still, thro' the rattle, parts of speeeh were rife
While he could stammer.

या वर्णनाप्रमाणें खरोखरच राजवाडे व्याकरणाच्या संसारांत मरणापूर्वी गुंतलेले होते. हजारों मराठी धातूंचें उद्‌घाटन त्यांनीं करून ठेवलेलें आहे. त्यांनीं ब्राउनिंगच्या

Oh, if we draw a circle premature,
Heedless of far gain,
Greedy for quick returns of profit, sure
Bad is our bargain.

या ओळी डोळ्यांपुढें ठेवलेल्या होत्या. ज्ञानमार्गे चालतांना मध्येंच रेषा काढून तेथेंच आपलें मार्गक्रमण संपविण्याचा त्यांचा विचार नव्हता. मार्गे चालतां चालतां मागें मागें सरणारी क्षितिजाची पळणारी रेषा गांठून बुद्धीच्या आटोक्यांत न येणाराहि ज्ञानलोक अगदीं शेवटपर्यंत व्यापण्याचा त्यांचा मानस होता. त्यांनीं

(He) left play for work, and grappled with the world
Bent on escaping.

या उक्तीप्रमाणें सर्व जगच ताब्यांत आणण्यासाठीं सतत झगडा चालविला होता. पण अखेर सर्व राहिलें व श्रुतींतील ' शतायुर्वै पुरुषः ' या वचना-

नुरूप शंभर वर्षं जगणें दूर राहून सामान्य माणसाच्या इतकेंच आयुर्मान राजवाड्यांना लाभलें. असो. येथेंहि ब्राउनिंगचें Lofty designs must close in like effects हें वाक्य गुणगुणतच समाधान मानलें पाहिजे. राजवाड्यांचें कार्य थांबण्यासारखें किंवा वंद पडण्यासारखें नाहीं, इतक्या जोरानें त्यांनीं तें सुरू करून दिलेलें आहे. त्यांच्या चहात्यांसारखे तळमळीचे चहाते दुसऱ्या कोणाच्याहि कार्याला महाराष्ट्रांत लाभलेले दिसत नाहींत. त्यांच्या कार्यपरंपरेनें राजवाड्यांचें नांव चिरस्मरणीय राहील यांत संशय नाहीं.

**टीपः** - वरील लेखांत ठिकठिकाणीं उद्‌धृत केलेली रॉबर्ट ब्राउनिंगची A Grammarian's Funeral ही कविता राजवाड्यांच्या आयुष्याचें ध्येय इतक्या हृदयस्पर्शी रीतीनें दाखविते कीं, ती प्रत्येकानें मुळांतच वाचावी अशा योग्यतेची आहे. तिचें मराठी भाषांतर तितक्याच चांगल्या रीतीनें कोणी करील तर मराठी वाङ्मयांत एका उत्तम कवितेची भर पडेल.

प्रगति } वर्ष १, अंक ३०,
ता. २६ डिसेंबर १९२९

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ सं. ........
ता. ........
ठाणें.

# “ राजवाडे आणि भांडारकर ”

कांहीं दिवस झाले. आमच्या एका सन्मान्य मित्रांनीं दुसऱ्या एका अनोळखी गृहस्थाशीं आमची ओळख करून देण्याचा उपक्रम केला ‘ हे प्रगतीचे संपादक—.’ तेव्हां आमच्या मनांत असा विचार आला कीं वर्तमानपत्राचे संपादक हें नामाभिधान मानाचें समजावयाचें कीं अपमानाचें. आमच्या मतें निदान आजमितीला तरी हें नामाभिधान फारसें स्पृहणीय मानतां येणार नाहीं. या संज्ञेनें लोकमान्य व महात्माजी यांसारखीं माणसें डोळ्यांसमोर उभीं रहाण्यापेक्षां निराळ्याच तऱ्हेचीं माणसें दृष्टीसमोर येतात. या सत्राशें छपन्न लोकांच्या समूहांत मिसळणें कोण मानाचें समजेल? या विचारानें आमच्या स्नेह्यांच्या संबोधनास आम्हीं असंमति दर्शविली. अमेरिकेंत राजकारणी ( Politicians ) या संज्ञेस जसें हीनत्व प्राप्त झालें आहे तीच स्थिति संपादकपणाची होऊं पहात आहे. आम्ही असंमति दर्शविली तेव्हां आमचे मित्र आमच्या असंमतीचें कारण समजून म्हणाले “ अहो, तुम्हींच अस्पृश्यतानिवारणावर लिहितां ना? मग आतां कां कुरकुरतां? आगगाडींत बसल्यावर जसें शेजारीं कोण बसलें आहे याचा विचार करतां येत नाहीं, किंवा उपाहारगृहांत शिरल्यानंतर टेबलावर कोण खात बसलें आहे हें मनांत आणतां उपयोगी नाहीं, तोच प्रकार संपादकांच्या मालिकेंत बसल्यावर घडून येतो.” आम्हांस वादविवादाचा कंटाळा आहे. त्यापासून

विशिष्ट परिस्थिति असल्याशिवाय फायदा होऊं शकत नाहीं व अशी परिस्थिति क्वचित्च अस्तित्वांत असते, असें आमचें मत आहे. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या अर्थनिष्पत्तीपेक्षां 'वादे वादे जायते बुद्धिभेदः' असाच प्रकार आज घडतांना दिसतो. शिकूं इच्छिणारास कोणी शिकवूं शकेल, पण ज्यानें आपणास या जगांत शिकण्यासारखें कांहीं नाहीं असा मनाचा निश्चय केला, त्यास कोण काय शिकवणार ? आजचे वाद बहुधा ठाममत-वाल्यांचे असतात; यांचें मत कोण बदलूं शकणार ?

हे विचार सुचण्याचें कारण आज आम्हांवर बरेच दिवसांनीं दुसऱ्यांच्या टीकेवर लिहिण्याचा प्रसंग गुदरला आहे. आमचे व्यवसायबंधु सुबोधपत्रिका-कार आमच्या राजवाड्यांवरील निबंधावर चवताळले आहेत. मागें एकदां प्रगति सुरू झाली तेव्हां आमचे हे व्यवसायबंधु आमच्या प्रास्ताविक इच्छाप्रदर्शनास असेच बिचकले होते किंवा आपल्या भाषेनें 'बुचकळ्यांत पडले' होते. विचारांनीं प्रगति घडवून आणण्याचा आमचा आरंभींचा संकल्प वाचून मागें बुचकळ्यांत पडलेले पत्रिकाकार आतां आम्हीं विचारांनीं प्रगति घडवून आणण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न करूं लागलों तेव्हां त्याच्या पुढें जाऊन बिथरले आहेत. असलेले रूढ गैरसमज बदलण्याचा प्रयत्न करणें याचेंच नांव विचारांनीं प्रगति घडविणें असा आम्हीं समजतों. कै. राजवाडे यांबद्दल असलेले गैरसमज दूर करून त्यांच्या कार्याचें वैशिष्ट्य लोकांसमोर ठेवणें हा आमच्या निबंधाचा हेतु होता. तो लक्षांत घेणें बाजूस ठेवून त्यांतील सरळ मनानें केलेल्या एका तुलनेचा वाईट अर्थ लावून सुबोधपत्रिका-कार आम्हांवर उखडले आहेत. आम्हीं आजवर समजत होतों कीं नेहमीं प्रार्थनामंदिरांतील हरिकथेंत दंग असणारे पत्रिकाकार निदान 'नादान' मनो-विकारापासून मुक्त झाले असतील, पण येथें आम्हांस 'स्नानसंध्या टिळेमाळा। पोटीं क्रोधाचा उमाळा।' असाच अनुभव आला आहे. आम्हीं लहानपणीं एका हरिदासाच्या तोंडचें 'हरिचि कथा हरिचि कथा खैंच्या गांवाक गेलांय' असें वचन ऐकलें होतें. त्याचा प्रत्यय आज आला. आमची समजूत कीं पत्रिकाकार हे 'अक्रोधेन जयेत् क्रोधं' या मार्गाचा अवलंब करून आमच्या-

सारख्या ‘ नादान ’ असाधूंस आपल्या साधुत्वानेंच जिंकण्याचा प्रयत्न करितील. पण या बाबतींत तरी ज्यांच्या कार्याचें ‘ पारडें हवेंत टांगलें जाण्याची खात्री ’ पत्रिकाकारांना वाटते, त्या दुर्वासतुल्य ‘ बढाईखोर कावळ्याचे ’ पत्रिकाकारांनीं आपल्या कल्पनेनें बनविलेले शिष्य बरे, असें म्हणण्याची पाळी आली आहे.

आम्ही आपल्या ‘ राजवाड्यांसंबंधीं आदराचा दिवा ’ प्रगतींत लावला असा आमच्यावर पत्रिकाकारांचा पहिला आरोप आहे. एखाद्या मोठ्या माणसावर निबंध लिहिणें हें ‘ दिवे लावण्यांत ’ मोडतें हें आतां आम्हांस कळलें. पण आम्ही एकट्या राजवाड्यांवर निबंध लिहिला असें नसून आजवर प्रगतींत तेलंग, लजपतराय, दयानंद वगैरे माणसांवरहि निबंध लिहिले आहेत, म्हणून आम्ही त्यांचे शिष्य झालों असें ठरतें काय ? इंग्लंडांत ए. जी. गार्डिनेर हे विख्यात लेखक नेहमीं जगांतील प्रसिद्ध माणसांवर लिहित असतात, पण त्यावरून ते त्यांचे शिष्य आहेत असा आरोप कोणी केल्याचें ऐकिवांत नाहीं. मग आम्ही राजवाड्यांचे भक्त, ‘ संशोधनेश्वराचे दास, ’ कसे ठरतों हें कोडें आम्हांस तरी उकलत नाहीं. खरी स्थिति अशी आहे कीं पत्रिकाकारादि अनेक लोकांनीं आम्ही राजवाड्यांचे भगत असल्याबद्दल आपली खोटी समजूत करून घेतली आहे. तिच्या भ्रमांत असल्यामुळें आमच्या निबंधाच्या आरंभींच्या वाक्यांतील विनोदाची खोंच त्यांच्या लक्षांत येऊं शकली नाहीं. ज्याप्रमाणें शिवकालीन विषयावर नाटक लिहिणारा तत्कालीन चालीरीतींचें व भाषापद्धतीचें अनुकरण करून त्या काळाचा आभास उत्पन्न करण्याचा यत्न करतो, त्याप्रमाणें राजवाड्यांवर लिहावयाचें असल्यानें आम्हीं त्यांच्या स्वतःच्या व त्यांच्या शिष्यांच्या पद्धतीचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला. एरवीं आम्हीं स्वतः कधीं शकाचा उपयोग करीत नाहीं, शुक्रवाराला भृगुवार म्हणत नाहीं, किंवा संशोधनेश्वरावर फुलें वहात नाहीं. आम्हीं संशोधनेश्वराचे दास असतों तर प्रगतीच्या संपादक-स्थानावरून पत्रिकाकारांसारख्यांची समजूत पाडीत बसण्याचें दुर्दैव आम्हांवर कशाला कोसळलें असतें ? तसें असतें तर प्रगतीवर तारखेऐवजीं तिथि

दिसली असती व सनाऐवजीं शिवशक दिसला असता. पण ही साधी गोष्ट येनकेन प्रकारेण आम्हांस राजवाड्यांचे शिष्य बनवून झोडण्याच्या नादांत पत्रिकाकारांच्या लक्षांत आली नाहीं.

आम्ही मागेंच प्रगतींत एक स्वतंत्र लेख लिहून स्पष्ट जाहीर केलें होतें कीं, एखादा माणूस कितीहि मोठा असो, त्याचे शिष्य होण्यास आवश्यक असणारी मनोरचना ईश्वरानें आमच्या वांट्यास घातलेली नाहीं. सर्वच मोठ्या माणसांबद्दल आम्हांस आदर वाटतो, त्यांच्या गुणाचा अणुरेणु तरी आपल्यांत यावा या हेतूनें आम्ही यथाशक्ति प्रयत्नहि करीत असतों, पण त्यांच्या चरणारविंदीं मिलिंदायमान होण्यासारखी मनोवृत्ति आमच्याजवळ नाहीं. आम्हांस राजवाड्यांच्या गुणांबद्दल आदर वाटतो, तसाच भांडारकरांच्या गुणांबद्दलहि वाटतो. जेव्हां जेव्हां सत्यनिष्ठा, उत्तम गृहशिक्षा, नियमितपणा, सदाचार, आदर्श विद्याव्यासंग, इत्यादि गुणांबद्दल आम्हांस कोणी विचारतें तेव्हां आम्ही राजवाड्यांचें नांव घेत नसून भांडारकरांचेंच उदाहरण देतों. पण आम्ही असें करतों म्हणून दोघांतील फरक किंवा तरतमभाव किंवा प्रत्येकाचें वैशिष्ठ्य आम्ही विसरून जातों असें मात्र नाहीं. ज्या दिवशीं इतिहासाच्या क्षेत्रांत आम्ही दाखल झालों त्याच दिवशीं प्रथम आम्हास तरतमभावाची तीव्र जाणीव करून घ्यावी लागली. आपण अनेक माणसांना मोठीं माणसें म्हणून संबोधितों, अनेक माणसांस विद्वान् हें सामान्य अभिधानपद लावतों, पण याचा अर्थ असा नसतो कीं त्या त्या संज्ञेनें निर्देशित केलेलीं सर्व माणसें सारख्या दर्जाचीं आहेत. इतिहासाच्या क्षेत्रांत शिरलें कीं आपली व्यक्तिविषयक आवडनिवड बाजूस ठेवून आपणासमोर येणाऱ्या प्रत्येक पात्रास ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें यथायोग्य शेलापागोटें देऊन त्यांची यथोचित संभावना करावीच लागते. असें करतांना आमच्या डोळ्यांसमोर राजवाडे किंवा भांडारकर या मूर्ति रहात नसून त्यांच्या गुणावगुणांचे संग्रह तेवढे उभे असतात. या बाबतींत आम्ही प्रख्यात इतिहासशास्त्रविवेचक लॉर्ड ॲक्टन यांचीं वचनें व उपदेश डोळ्यांसमोर वागवितों. त्यांतील कांहीं येणेंप्रमाणें—

1 Have no favourites. 2 Keep men and things apart. 3 Guard against the prestige of great names. 4 See that your Judgements are your own and don't shrink from disagreement. 5 No trusting without testing. 6 Be more severe to ideas than to actions. 7 Judge talent at its best and character at its worst.

"—Suffer no man and no cause to escape the undying penalty which history has the power to inflict on wrong. The plea in extenuation of guilt and mitigation of punishment is perpetual. At every step we are met by arguments which go to excuse, to palliate, to confound right and wrong and reduce the just man to the level of the reprobate."

" If, in our uncertainty, we must often err, it may be sometimes **better to risk excess in rigour than in indulgence**, for then at least, we do no injury by loss of principle. "

यांतील उपदेशाप्रमाणें आम्हांस कोणाबद्दल रागद्वेष नाहीं. आम्ही गाजलेल्या व्यक्तींच्या मोठेपणास बुजून त्यांच्या मोठेपणाची छानणी करावयास मागेंपुढें पहात नाहीं. आमचीं मतें स्वतः आमचीं आम्हींच विचारानें बनविण्याचा प्रयत्न करतों, दुसरे अमके म्हणतात म्हणून त्यांचें म्हणणें कबूल करीत नाहीं. माणसाच्या कृतीपेक्षां त्यांमागील तत्त्वज्ञानाची छानणी आम्हीं जास्त कसोशीनें करितों. बुद्धीचा विचार कर्तव्य तेव्हां उत्तमावरून एखाद्याची योग्यता ठरवूं पाहातों, पण शीलाचा विचार कर्तव्य असतां त्यांतील शक्य तितकी वाईट बाजूच आम्ही घेतों. व्यक्तीला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें जें स्थान इतिहासदृष्ट्या देणें तें न भितां देण्याची काळजी घेतों. जर चुकण्याची पाळी आली तर निदान तत्त्वनिष्ठा सुटूं नये म्हणून ढिलाईची भाषा वापरण्यापेक्षां पूर्णअर्थप्रतिपादक कडकपणाचा अवलंब आम्ही करतों.

वर सांगितलेली वृत्ति स्वीकारून आम्हीं आमचा राजवाड्यांवरील ऐतिहासिक निबंध लिहिला आहे. त्यांत जसे राजवाड्यांचे गुण ठसण्यासारख्या भाषेंत पुढें मांडले आहेत तसेच त्यांचे अवगुणहि दृष्टिआड करून सोडलेले नाहींत, त्यांचाहि उल्लेख केलेला आहे. जर राजवाड्यांचा केवळ उदोउदो आम्हास कर्तव्य असता तर त्यांचे दोष लक्षांत न येऊं देतां झांकण्याचें कसब दाखविण्यास आम्ही समर्थ होतों. या दोषसंकीर्तनामुळें कांहींचा राग आम्हांवर ओढवला आहे हें प्रगतीच्या वाचकांस माहित झालेलेंच आहे.

आतां सुबोधपत्रिकाकारांच्या कांहीं आरोपांचें खंडण यथामति करतों. त्यांचा पहिला आरोप असा कीं आम्ही केवळ आमचा भांडारकरांबद्दलचा द्वेष प्रदर्शित करण्यासाठीं त्यांची राजवाड्यांशीं तुलना करण्याच्या भानगडींत पडलों. खरी स्थिति काय आहे हें प्रगतींतील निबंध ज्यांनीं वाचला असेल त्यांस सांगणें नकोच. राजवाड्यांच्या विद्वत्तेचा दर्जा स्वतः ठरविण्याच्या भानगडींत न पडतां त्यांच्यावर ज्यांनीं एका काळीं कोरडे ओढले होते त्या यदुनाथांच्या शब्दांत तो ठरविणें आम्हांस बरें दिसलें. टीकाकाराचें मत हें जास्त विश्वसनीय मानलें जातें म्हणून आम्हीं तसें केलें. यदुनाथांनीं राजवाड्यांबरोबर भांडारकर घेतले ही त्यांची निवड आहे, आमची नाहीं. त्यांनीं भांडारकरांऐवजीं रानडे घेतले असते तर आम्ही त्यांच्याशीं राजवाड्यांची तुलना करून दोघांच्या व्यक्तिमहात्म्यांतील फरक तितक्याच स्पष्टपणें दाखविला असता. आणि खरें पहातां आदर्श विद्वान् म्हणून सांगतांना भांडारकरांपेक्षां रानड्यांचेंच नांव जास्त योग्य ठरलें असतें. कारण बुद्धीची तीव्रता, विशालता, गाढपणा वगैरे गुणांत रानडे हे भांडारकरांपेक्षां वरच्या दर्जाचे होते याबद्दल द्विमत होईल असें वाटत नाहीं. पण यदुनाथ इतिहाससंशोधक असल्यानें त्यांस संशोधकाचींच उदाहरणें पुढें ठेवावींशीं वाटलीं. ही व्यक्तीची आवडनिवड झाली. त्याबद्दल आमचेवर गहजब कां ? तसेंच आमचा निबंध न वाचतां फक्त सुबोधपत्रिकेंतील टीका वाचणारास असें वाटेल कीं जसें कांहीं आम्हांस भांडारकरांची विद्वत्ता

कबूलच नाहीं. खरें पाहूं जातां आमची टीका भांडारकरांच्या विद्वत्तेवर नसून त्यांच्या विद्वत्तेपेक्षां त्यांच्या जगांतील बोलबाल्याचेंच जास्त महत्त्व वाटणारांवर होती व या लेकांत आम्ही इतरांबरोबर सुबोधपत्रिकाकारांनाहि आतां बसवितों. कारण त्यांना राजवाडे हे ' बढाईखोर कावळे वाटतात, त्यांच्या कार्याचें पारडें हवेंत टांगलें जाईल ' अशी खात्री आहे, यावरून त्यांच्या दृष्टींत राजवाडे कां भरत नाहींत हें उघड होतें. तरी पुनः पुढें जातांच ' राजवाडे आम्हांसहि मोठे वाटतात ' असें म्हणण्याची त्यांची तयारी आहेच. तेव्हां आतां यांतील पत्रिकाकाराचें खरें मत कोणतें ?

वास्तविक आम्हीं राजवाड्यांची भांडारकरांशीं जी विरोधालंकार योजून तुलना केली आहे ती विद्वत्तेच्या बाबतींत नसून व्यक्तिमहात्म्याच्याबद्दल केली आहे. फक्त क्रोधान्ध झालेल्या पत्रिकाकारांच्या लक्षांत येवढी उघड गोष्ट येऊं शकली नाहीं. तसेंच तुलना करतांना दोन व्यक्तींचे विरोधी विशेष आम्हीं दाखविले म्हणजे त्या विशेषांस आमची संमति आहे असें थोडेंच आहे ? विरोध दाखवितांना लेखक नेहमींच डोळ्यांत भरूं शकणाऱ्या विरोधांचा उल्लेख करीत असतो व तसा तो आम्हीं केला आहे. आम्ही भांडारकर हे व्यवहारदृष्ट्या फायदेशीर आचरण करणारे होते असें म्हटलें म्हणून तसें करणें नेहमींच वाईट असतें असें आमचें मत नाहीं. तसेंच राजवाडे व्यवहारदृष्टया तोट्याचें आचरण करीत असत असें म्हटलें, म्हणून त्यांच्या वर्तनास आमची संमति आहे असें ठरत नाहीं. विरोध दाखवितांना भांडारकरांच्या पदरीं हीनत्व बांधणें हा आमचा हेतु नसून दोघांना त्यांचें यथायोग्य स्थान द्यावें हा होता. दोघांची व्यक्तिविषयक तुलना कर्तव्य असतां त्यांस मापण्यास योग्य असें एक माप अस्तित्वांत नाहीं हेंच आम्हांस सांगावयाचें होतें. दोघांचें आयुष्यांतील ध्येयच जर मुळांत वेगळें तर त्यांची समान पातळीवर तुलना कशी होणार ?

पत्रिकाकारांनीं मात्र आमच्यावर टीका करण्याचा आव आणून राजवाड्यांच्या विद्वत्तेवर शिंतोडे उडविले आहेत व तसें करतांना भांडारकरांची भरमसाट स्तुति केली आहे. तेव्हां आतां या गोष्टीचा थोडा परामर्ष

चिकित्सापूर्वक घेऊं. भांडारकरांचें मत खोडलें जात नाहीं हा पत्रिकाकारांच्या मतें त्यांचा मोठा गुण. पण हा त्यांचा गुण बुद्धिप्रकर्षदर्शक नसून फक्त त्यांची शहाणपणाची सावधगिरी दाखवितो. ज्याप्रमाणें पायवाटेनें जाणारा माणूस गाडीखालीं चिरडून मरण्याचा संभव नाहीं, झाडावर कधींहि न चढूं इच्छिणारा पाय मोडून लंगडा होणें शक्य नाहीं, अमंडसेनाप्रमाणें ध्रुवावरील प्रदेशांत उड्डाण करण्याचें धाडस न करणारा बर्फांत पडून थिजून मरण्याची भीति नाहीं, कोलंबसाप्रमाणें पुढील किनाऱ्याची कांहींहि कल्पना नसतांना भर महासागरांत तारूं न ढकलणारा बोटीचा कप्तान समुद्रांत सहसा गडप होऊन जाण्याची धास्ती नाहीं, त्याच न्यायानें भांडारकरांचें मत चुकीचें ठरण्याचा संभव नाहीं. जर एखाद्या इतिहासलेखकानें एखादा ताम्रपट पुढें ठेवून त्यांतील नांवें, तिथी व माहिती आहे तशीच आपल्या लेखनांत उतरण्याचा क्रम सतत ठेवला, तर तो चुकण्याचा संभवच राहिला कोठें? त्यांवरून जो तर्क लढवावयास लागेल, एखाद्या किरकोळ उल्लेखावरून सर्व इमारतीची कल्पना बांधण्याचा प्रयत्न करील, आपण चुकण्याचा संभव आहे हें लक्षांत असूनहि धाडसानें जो एखादें प्रमेय उकलूं पाहील, त्याचेंच मत खोडलें जाण्याचा संभव रहातो. भांडारकरांचें ग्रंथलेखन सर्व गॅझेटिअरच्या किंवा जंत्रीच्या स्वरूपाचें आहे. त्यांत चुकीचा संभवच अत्यल्प आहे. भांडारकरांचे ग्रंथ सर्वांस निःशंकपणें उपयोगांत आणतां येतात व आणावे लागतात हें खरें आहे. पण त्याप्रमाणेंच कारकून रेडिरेकनरचा उपयोग अगदीं निःशंकपणें करतात व तसें करणें त्यांस सोइस्कर पडतें हेंहि खरें आहे. तारखांची जंत्री, स्थलनामसूची किंवा गॅझेटिअर यांचा उपयोग हरघडीं प्रत्येकास करावा लागतो म्हणून त्यांस उत्तम विद्वत्तेचे निदर्शक ग्रंथ असें मात्र कोणी समजत नाहीं. भांडारकरांच्या सारखें कार्य कोणीहि सर्वसामान्य बुद्धीचा, टापटिपीचा व दीर्घ उद्योगाचा माणूस करूं शकेल असें आमचें मत आहे. आमच्या देशांत आळसाचें प्राबल्य विशेष असल्यामुळें असलें खटपटीचें व त्रासाचें कामहि कोणी अंगावर घेत नाहीं व म्हणूनच तसें तें घेणारा भांडारकरांसारखा संथ प्रवाहाचा माणूस कीर्तिमान्

होतो. पण अशा तऱ्हेच्या कामास वरच्या प्रतीची बुद्धिमत्ता लागते किंवा भांडारकरांच्या ग्रंथांत तशी ती कोठें दिसते असें आम्हांस वाटत नाहीं.

भांडारकरांची गणना बुद्धिदृष्ट्या पहिल्या दर्जाच्या विद्वानांत होण्यासारखी नाहीं असें आमचेंच एकट्याचें मत नसून अनेक संस्कृताध्यायी विद्वांनांचें तसें मत असल्याचें आम्हीं ऐकिलें आहे. मात्र हे विद्वान् खासगी रीतीनें तसें म्हणत असले तरी बाहेर येऊन व सुबोधपत्रिकाकारांसारख्यांची टीका सहन करून आपलें मत पुढें मांडण्याचें धैर्य त्यांस होत नाहीं. कारण ते व्यवहारदृष्टि असतात. उगाच समाजांत कशासाठीं वादळ उठवा, भांडारकर मेले गेले, त्यांना त्यांच्या वास्तविक योग्यतेपेक्षां पुष्कळच जास्त मान मिळाला व ते तो भोगूनहि गेले. आतां त्यांची योग्यता ठरवून काय करावयाचें आहे? अशा तऱ्हेची त्यांची विचारसरणी असते. जर तेलंग किंवा आपटे हे अल्पवयांत गेले नसते, जर लोकमान्य टिळक केवळ संशोधनाकडे वळते, तर भांडारकरांच्या वांट्यास एकमेवाद्वितीयतेमुळें सहज आलेला अग्रपूजेचा मान त्यांच्याकडे येऊं शकला नसता असें कित्येकांनीं आम्हांजवळ म्हटलें आहे. धाकट्या अल्पायुषी पिढींतील डॉ. गुण्यांची चमकहि भांडारकरांत नव्हती. सारांश, भांडारकरांची विद्वत्ता उद्योगशील माणसाची विद्वत्ता होती. तिचा उपयोग सर्वांस होतो, पण तींत वरच्या प्रतीची बुद्धिमत्ता नाहीं.

राजवाड्यांच्या लिखाणाचा कालान्तरानें मागमूसहि रहाणार नाहीं असा पत्रिकाकारांचा कयास आहे. तो खरा ठरतो किंवा काय तें इतिहासच ठरवील. पण सध्यां तरी त्यांच्या लोकोत्तरतेबद्दल टीकाकारांचीहि कशी खात्री होत आहे याचें एकच उदाहरण येथें देतों. राजवाड्यांच्या महाराष्ट्रांतील टीकाकारांस जोर येण्यास त्यांना यदुनाथ सरकार मिळाले हें एक आगंतुक कारण झालें होतें. त्यांची ती कान फुंकल्यामुळें झालेली समजूत आतां विचारानें व अनुभवानें पालटत असून त्याचें प्रत्यंतर त्यांनीं मुंबई विश्वविद्यालयाच्या पुढें छात्रोपदेश केला तेव्हां आलें. अगदीं अलीकडे परवां ते ग्वालेरीस ऐतिहासिक परिषदेस आले असतां तेथें त्यांस धुळ्याहून आमंत्रण आलें कीं, आपण राजवाड्यांच्या स्मरणदिवशीं येथें यावें. ज्यांच्या

हातांत ही निमंत्रणपत्रिका पडली त्यांस यदुनाथांचा पूर्वग्रह माहीत असल्यामुळें ते भीत भीतच ती घेऊन यदुनाथांकडे गेले. तेव्हां त्यांनीं एकदम मोठ्या आदरानें गहिंवर येऊन उद्गार काढले कीं, " Oh yes, he was a great man, and if I get an opportunity to do homage to his memory, I must clutch at it " यदुनाथांच्या या इच्छेप्रमाणें तावडतोव तारेनें आमंत्रण स्वीकारण्यांत येऊन ते धुळें येथें समारंभाच्या वेळीं हजरहि राहिले व तेथें त्यांनीं मराठींत काढलेले राजवाड्यांवद्दलचे प्रशंसोद्गार अनेकांस कौतुकास्पद वाटले.

राजवाड्यांवद्दल पत्रिकाकारांनीं त्यांना खाल्ल्याघरचे वांसे मोजणारे, निमकहराम, भिकारी, खर्डेघाशा वगैरे वगैरे शेलक्या शब्दांत काढलेले गर्भित किताव देऊन त्यांचा जो गौरव केला आहे त्यावद्दल आम्हांस कांहींहि लिहावयाचें नाहीं. ज्यांचें शील त्यांच्यावरोवर ! पत्रिकाकारांस आपल्या प्रार्थनासमाजाच्या उदात्त तत्वांचा प्रचार या मार्गें करावयाचा आहे असें दिसतें. त्यांनीं तो खुशाल करावा, म्हणजे समाजाची गेल्या साठ वर्षांत जशी अपूर्व भरभराट झाली आहे तशीच ती पुढेंहि होईल. आतां त्यांच्या दुसऱ्या एका सिद्धान्ताचें खंडण करूं. " कार्याचा विचार करितांना नोकरी किंवा नोकरीचा अभाव या गोष्टी तुलनेलाच घेतां येत नाहींत " असा त्यांचा दंडक आहे. कार्यास लागणारी वुद्धिमत्ता वगैरेंचा विचार कर्तव्य असतांच हा दंडक उपयोगांत आणावयाचा असेल तर तो योग्यच आहे. राजवाडे भिकारी होते म्हणून त्यांचें विवेचन खरें किंवा श्रेष्ठ वुद्धीचें निदर्शक, व भांडारकर दरिद्री नव्हते म्हणून त्यांचे लेखन कमी दर्जाचें असें आम्ही कोठेंहि म्हटलेलें नाहीं. पण व्यक्तीच्या विशेषाचा ( Personality ) किंवा एकंदर आयुष्याचा समाजदृष्ट्या विचार कर्तव्य असतां ती किंवा तसली गोष्ट अवश्य लक्षांत घेतली पाहिजे असें आमचें मत आहे. वुद्धिमत्ता ही वऱ्याच अंशीं दैवी देणगी म्हणतां येईल, पण तसें आयुष्यांतील व्यवसायाच्या निवडीवद्दल म्हणतां येणार नाहीं. तेथें तत्वनिष्ठा, ध्येयवादित्व, त्याग वगैरे अनेक गुण धसास लागतात व या कसोटीवर माणसाची पारख कराव-

यास लागलें म्हणजे शीलाचें खरें स्वरूप बाहेर येतें. या बाबतींत राजवाडे व त्या वर्गांतील इतर पुरुष ह्यांच्याशीं भांडारकर व त्यांच्या जातींतील इतर माणसें यांची तुलना केली कीं, सहजच राजवाडेप्रभृति उंच दिसतात व भांडारकरादि ठेंगणे दिसतात व त्यामुळें सुबोधपत्रिकाकारांच्या तळव्याची आग मस्तकांत जाते त्यास आम्ही काय करावें ? पत्रिकाकारांस या गोष्टीची जाणीव मागील अनेक अनुभवांवरून झालेली असल्यामुळें ते असा बूट काढतात कीं अशा तऱ्हेची तुलना करणेंच गैर आहे. ठेंगण्या माणसाच्या शेजारीं उंच माणूस येत नाहीं तोंवर त्यास आपल्या उंचीबद्दल बढाई मारतां येते. पण तसा तो आला कीं सर्व विरघळतें. पत्रिकाकारांनीं बनविलेले प्रार्थनासमाजाचे महर्षी 'लोभमूलानि पापानि' या न्यायानें लोभाजीरावांच्या तडाख्यांतून सुटलेले नसल्यानें तज्जन्य पापांस जबाबदार होण्याची पाळी त्यांवर येते. मनोविकारांपैकीं कामक्रोध वगैरेंचा प्रभाव तात्पुरता किंवा कांहीं कालच चालत असतो; त्याची व्याप्तीहि थोड्या क्षेत्रांतच असते. पण लोभाचा प्रभाव मात्र मुलाचा हात वस्तूला पोहोंचूं लागल्यापासून माणसांचीं हाडें जळून जाईपर्यंत जाणवत असतो. म्हणूनच त्यागाचें महत्व विशेष मानलेलें आहे. जास्तींत जास्त उत्पन्न ठेवण्याचा खटाटोप करून शिळो-प्याच्या वेळीं लोकहित साधूं पहाणारास त्याग्यांची योग्यता कशी मिळणार ? भांडारकरांनीं मिळवलेल्या पैशाचा सद्व्यय केला, व्यसनादिकांत त्यांनीं पैसा उधळला नाहीं, आपणास मिळणाऱ्या वेतनाबद्दल त्यांनीं इमानें इतबारें भरपूर कामहि केलें याबद्दल ते एका दृष्टीनें स्तुतीस पात्र आहेत. त्यांच्या-इतका किंवा त्यांच्या अनेकपट पगार मिळणारा प्रोफेसरांचा वर्ग या देशांत आहे त्यांपैकीं कितीजण काम करीत आहेत ? पण ही या प्रश्नाची एक बाजू झाली. आमच्या डोळ्यांसमोर बर्नार्ड शॉ या इंग्रज ग्रंथकाराची 'सद्गृहस्थ' या शब्दाची व्याख्या या बाबतींत आहे. समाजांतील जो माणूस समाजाकडून त्यास मिळणाऱ्या मोबदल्याच्या किंमतीपेक्षां जास्त किंमतीचें काम समाजासाठीं करतो तो सद्गृहस्थ जाणावा अशी शॉची मोठी मार्मिक व्याख्या आहे. भांडारकर, रानडे, तेलंग वगैरे माणसांनीं समाज-

हिताचें बरेंच काम केलें. पण तें फुकट केलेलें नाहीं. समाजाकडून त्यांस भरपूर मोबदलाहि मिळत होता. ज्याप्रमाणें आपल्या कामाबद्दल हजारों रुपये वेतन मिळविणारे हजारों लोक असतात, तरी त्यांचें नांव कोणी घेत नाहीं, पण समाजासाठीं एक रुपया वर्गणी देणारांचें नांव वर्तमान-पत्रांत झळकतें, तोच न्याय या बाबतींत आहे. राजवाड्यांनीं जें काम राष्ट्रासाठीं जवळ जवळ केवळ पोटावारीं केलें त्याची किंमत आज विश्व-विद्यालयांत अशा कामाबद्दल जो मोबदला देण्यांत येतो त्या किंमतीनें तुलतां अनेक लाख रुपयांवर होईल. हें सर्व काम त्यांनीं फुकट राष्ट्राला अर्पण केलें. कांहीं वर्षापूर्वी मुंबई विश्वविद्यालयानें विलायतेंतील एका गाजलेल्या प्रोफेसरास इकडे आणून त्याच्या पायीं दीड लाख रुपये खर्च केला; पण त्यानें केलेलें प्रत्यक्ष कार्य पाहूं जातां तें अगदींच थोडें दिसतें. त्या दरानें पाहतां राजवाड्यांनीं इतिहासाचें जें साहित्य शोधून काढून उजेडांत आणून राष्ट्राला अर्पण केलें व इतिहास संशोधनाच्या कार्याचा फैलाव करून महाराष्ट्रांत या विषयाबद्दल जी आस्था उत्पन्न केली तिची किंमत सहजच लाखांनीं भरावी यांत आश्चर्य नाहीं. एवढें महत्त्वाचें काम करतांना त्यांस उत्साह येण्यासाठीं कोणी एखादा भलेपणाचा शब्दहि त्यांस अर्पण केला नाहीं. पैसा, मान, सोयी वगैरेंचा पाठिंबा नसतांहि त्यांनीं एवढें कार्य उत्साहभग्न न होतां झेपलें यांतच त्यांचा मोठेपणा, वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व आहे. शॉच्या व्याख्येप्रमाणें राजवाडे, खरे, वगैरे गृहस्थ खरे सद्‌गृहस्थ ठरतात, इतर ठरत नाहींत. हीच दृष्टि ठेवून आम्ही राजवाड्यांची व भांडारकरांची तुलना केली होती. ही दृष्टि 'सुबोधपत्रिका'कार व त्यांच्या गट्टींतले लोक यांस समजण्यासारखी किंवा मानवण्यासारखी नसेल तर त्यास आमचा नाइलाज आहे. आज समाजांतील अनेक किंबहुना बहुतेक मोठे उत्पन्नवाले आपणांस समाजाकडून मिळणाऱ्या फायद्याच्या मोबदल्यांत जवळ जवळ कांहींहि काम करीत नाहींत अशी खरी स्थिति आहे, म्हणूनच बोल्शेव्हि-जमूसारखीं नवीं तत्त्वें राष्ट्रीय उत्पन्नाची योग्य विभागणी करण्यासाठीं पुढें येत आहेत.

आतां शेवटीं 'सुबोधपत्रिका' कारांनीं शिष्टपणानें हळूच केलेल्या एका खोडसाळपणाची हजेरी घेऊन हा कंटाळवाणा विषय संपवूं. आम्ही आमच्या राजवाड्यांवरील निबंधांत जो चित्पावनद्वेष्ट्यांसाठीं कांहीं उल्लेख चित्पावनांच्या तोंडच्या शब्दांतच केला होता त्याचा उद्देश अनेकांच्या लक्षांत आलेला दिसत नाहीं. राजवाडे व दुसरे अनेक हुषार चित्पावन कडवे जातिप्रेमी होते, त्यांच्यांत स्वतःच्या जातीबद्दल फाजील अभिमान किंबहुना दुरभिमान वास करीत होता. एवढेंच असतें तर हरकत नव्हती; पण त्याच्या बाहेर जाऊन त्यांनीं कांहीं वेळीं इतर जातींबद्दल ? भलतेच उद्गार काढून त्या त्या जातींचीं मनें दुखविलीं, त्यामुळें प्रतिक्रिया म्हणून इतर जातींच्या लोकांनींहि त्यांच्याशीं चार हात केले. या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, दुखविलेल्या जातींपैकीं अनेक कट्टे चित्पावनद्वेष्टे बनले. हे चित्पावन-द्वेष्टे वेळीं अवेळीं संधि सांपडेल तेथें आपल्या द्वेषाचें प्रदर्शन करीत असतात; पण त्यांच्या लक्षांत ही गोष्ट येत नाहीं कीं, चित्पावनांचा इतर जातींबद्दलचा खवचटपणा किंवा अनादर हा चालण्याचीं कारणें वेगळींच आहेत. चित्पावनांतील बरेच खवचट पुरुष त्यागी व देशाभिमानी असल्यामुळें त्यांचें समाजावरील वजन केवळ त्यांचे दोष दाखवून कमी होण्यासारखें नाहीं. चित्पावनांची या बाबतींत कैफियत अशी आहे कीं, इतर जाती आमच्यावर सरकारचा रोष आहे असें पाहून त्याचा गैरफायदा करून घेत असतात. या जाती स्वतः त्यागी किंवा देशाभिमानी किंवा धीट नाहींत त्या नाहींतच, पण दुसऱ्या आम्हांसारख्यांच्या कार्याबद्दल मात्र त्या गैरसमज पसरविण्याचें काम करितात. चित्पावनांकडे बोट दाखवून आपल्या राजनिष्ठपणाची बढाई ते सांगतात व त्याच्या जोरावर देशांतील जास्त उत्पन्नाच्या जागा व्यापून बसतात. देशाबद्दलचें किंवा समाजाबद्दलचें जें काम फुकटांत करावयाचें तें स्वतः न करतां या जाती आपल्या जिवाला धक्का लावूं न देतां किंवा त्रास न सोशितां दुसऱ्यांच्या कार्यांतील दोष मात्र निर्घृणपणें दाखवीत राहतात. पण अशांनीं बोटें मोडून आमचें काय व्हावयाचें आहे ? जोंपर्यंत या आमच्या टीकाकार जातींतून आमच्याप्रमाणें त्यागी, उद्योगी, धीट, सुख-

विन्मुख व देशाभिमानी लोक निपजत नाहींत तोंवर त्यांची टुरटुर फुकट आहे.

आम्हीं आमच्या निबंधांत राजवाडे आदि चित्पावनांच्या लिहिण्यावर ते चित्पावन म्हणून खवळलेल्या लोकांच्या माहितीसाठीं व हितासाठीं चित्पावनांची वरील कैफियत जोरदार शब्दांत ठांसून पुढें मांडली होती. त्यांत चित्पावनांची स्तुति करावी असा आमचा हेतु नसून इतर जातींनीं आपला लंगडेपणा कोणत्या गोष्टींत आहे हें ओळखून सुधारणा करावी असें सुचविण्याचा होता. त्यावर आचरटपणाचा व अश्लाघ्यतेचा शेरा मारून आमच्याबद्दल वाचकांचें मन कलुषित करण्याचा खोडसाळ प्रयत्न पत्रिकाकारांनीं केला आहे. प्रगतिकार चित्पावन नाहींत हें ठाऊक असल्यामुळें त्यांस आमच्या लेखनावर प्रत्यक्ष जातिनिष्ठेचा आरोप करितां येईना; तेव्हां निस्पृहतेचा टेंभा मिरविणारे म्हणून आमची बोळवण त्यांनीं केली आहे. अनेक चित्पावनांचें आमच्याबद्दल काय मत आहे हें आम्ही नानासाहेब पेशव्यांच्या चरित्राला प्रस्तावना लिहिल्यापासून पुढें आलेलेंच आहे. खरें पाहूं जातां आमची भूमिका इतिहासकाराची असल्यामुळें आम्ही प्रत्येक बाबतींत निर्मम, निरहंकार असतों. 'शत्रौ मित्रे पुत्रे बंधो मा कुरु यत्नं विग्रहसंधौ । भव समचित्तः सर्वत्र त्वम्' अशी दृष्टि आम्ही ठेविली आहे. आमच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला किंवा गोष्टीला तिचें यथायोग्य स्थान मिळवून देणें एवढेंच आमचें काम आहे; असें करितांना अनेकांच्या दृढ समजुतींना धक्का देण्याची पाळी आम्हांवर येते; अनेकांच्या स्वाभिमानाला झोंबणाऱ्या गोष्टी आम्हांस पुढें मांडाव्या लागतात त्याला आम्हीं काय करणार? इतिहासकाराचें कर्तव्य असेंच अत्यंत खडतर व कटु आहे. पत्रिकाकारांनीं इसापनीतींतील न बोलतां कोपऱ्यांतील दडून बसलेल्या कोल्ह्याकडे बोट दाखविणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणें बोट दाखवून आमच्याबद्दल इतरांचें मन कलुषित करण्याचा जो यत्न केला आहे तो मात्र अत्यंत अश्लाघ्य आहे.

पत्रिकाकारांनीं शेवटीं आम्हांस आम्ही आपलें हंसें करून घेऊं नये असा पोक्तपणाचा उपदेश केला आहे. हंसें कोणाचें होतें? आपला अधिकार

सोडून उपदेश करणाराचें कीं, आपलें कडू कर्तव्य योग्य रीतीनें करणाराचें? भांडारकर व राजवाडे यांच्या कार्याचें तरतम न्यायानें महत्त्व जोखून त्यावर मत देण्याचा अधिकार पत्रिकाकारांचा आहे कीं, प्रगतिकारांचा आहे हें महाराष्ट्रांतील लोक चांगलें जाणतात. आम्हीं या बावतींत पत्रिकाकारांस जुन्या भाषेत एवढेंच सांगतों—

> पिबन्त्येवोदकं गावो मंडूकेषु रुवत्स्वपि ।
> न तेऽधिकारो धर्मोस्ति मा भूरात्मप्रशंसकः ॥

तळ्यांतील बेडूक डरॉंव डरॉंव ओरडले म्हणून कांठावरील गाई पाणी पिण्याचें भीतीनें बंद करीत नाहींत. या विषयांत आम्हांस आमचें कर्तव्य शिकविण्याचा अधिकार संपादकाच्या खुर्चीवर वसले तरी पत्रिकाकारांस नाहीं. या बावतींत त्यांनींच संशोधकाचा अधिकारहि वढाईनें लाटण्याचा आव आणून आपलें हंसें करून घेऊं नये—इत्यलम्.

प्रगति } वर्ष १, अंक ३३, ता. १६ जानेवारी १९३०

# न्यायमूर्ति तेलंग

## मुहूर्तं ज्वलितं श्रेयो नच धूमायितं चिरम् ॥

बरोबर तीन तपें लोटलीं. राष्ट्रनभोमंडळांत चमकणारा एक तेजस्वी तारा अकालीं तुटून पडला. ता. १ सप्तंबर सन १८९३ रोजीं पहांटे, न्यायमूर्ति काशिनाथ त्रिंबक तेलंग यांनीं त्रेचाळीस वर्षांची आपली गर्दीची आयुष्ययात्रा संपविली. चवदावे वर्षी मॅट्रिक, एकोणिसाव्या वर्षी एम्. ए., बाविसाव्या वर्षी ॲडवोकेट, बत्तिसावे वर्षी एज्युकेशन कमिशनचे सभासद, चौतिसावे वर्षी नामदार, एकुणचाळिसावे वर्षी हायकोर्ट जज्ज, बेचाळिसावे वर्षी व्हाइसचॅन्सेलर, अशी त्यांच्या आयुष्याची मेलगाडी वेगानें निघून गेली. वयाच्या विसाव्या वर्षी आद्यशंकराचार्यांचें चारित्र लिहिणारे तेलंग आचार्यांप्रमाणेंच अल्पावधींत आपली जीवनस्मृति ठेवून निघून गेले. बाविसाव्या वर्षी वेबरची 'रामायण ईलियडवरून रचलें आहे' ही कल्पना लीलेनें खोडून काढून दिगंत कीर्ति मिळविणारे तेलंग आपल्या परिपक्व ज्ञानानें वृद्धपणीं एखादा स्वतंत्र ग्रंथ निर्माण करण्यापूर्वीच अस्तंगत झाले. महाराष्ट्र-इतिहाससंशोधनाच्या त्या प्राथमिक कालांत मराठ्यांच्या बखरींत वेंचक दाणे निवडणारे तेलंग सबंध महाराष्ट्रेतिहासाचें आलोचन करण्यास राहिले नाहींत. तरीहि भांडारकरांच्या निम्में जगूनहि जी कामगिरी तेलंगांनीं पार पाडली, ती भांडारकरांच्या दुप्पट आयुष्याच्या कामगिरीपेक्षां कमी दर्जाची

होती असें वाटत नाहीं. किंबहुना अल्पकालांत चमकलेलें तेलंगांचें चरित्र भांडारकरांपेक्षां खुलून दिसतें व चटका लावतें.

तेलंगांच्या कालापासून आपल्या समाजाची प्रगति झाली कीं अधोगति झाली, याचा आढावा घेण्यास त्यांच्या कालाचें स्वरूप ध्यानांत घेतलें पाहिजे. हें स्वरूप बरोबर ध्यानांत यावें म्हणून आपण या मुंबई शहराच्या सामाजिक जीवनाकडेच पाहूं या. कारण आकार संकुचित केला कीं स्वरूपाची रूपरेखा जास्त चांगली लक्षांत येईल. तेलंगांच्या कालीं या मुंबईच्या जीवनांत जी एकरूपता होती, तशी आज कोठें आहे ? त्या काळीं हिंदु, पारशी, मुसलमान हेच काय पण इंग्रज लोकहि नागरिकत्वाच्या मोठ्या अभिमानानें, उत्साहानें व कर्तव्यबुद्धीनें या शहराच्या प्रश्नांकडे आस्थेनें लक्ष देऊन त्याचें वैभव वाढविण्याच्या विचारानें वागत असत. आज ती स्थिति विद्यमान आहे काय ? तशी ती कां नाहीं ?

कारण आज नगरनिष्ठा किंवा राष्ट्रनिष्ठा दुरावून ज्ञातिनिष्ठा वळावली आहे. दादाभाई, फिरोजशहा, वाछा, बद्रुद्दीन तैयबजी, सयानी, तेलंग, रानडे, चंदावरकर वगैरे त्या काळांतील माणसें, सार्वजनिक कामास एकत्र जमलीं, कीं त्यांच्यांत कोठें ज्ञातिनिष्ठेचा वासहि येत नसे. सर्व समाजाच्या हिताचाच विचार त्यांच्यासमोर उभा राही. आज सर्वत्र त्याच्याविरुद्ध गोष्ट अनुभवास येते. नाहीं तर तेलंगांची पुण्यतिथि सार्वजनिकरीत्या साजरी न होतां विशिष्ट लोकांनींच ती करावी असें दृश्य नजरेस पडलें नसतें. पुण्यतिथी उठल्या सुटल्या दरसाल साजऱ्या कराव्या कीं नाहीं याबद्दल भिन्नमनोरचनेनुरूप मतभेद होणें साहजिक आहे; पण जेव्हां त्या करावयाच्या तेव्हां त्या ज्ञातिनिष्ठेच्या अधिष्ठानावर उभें राहून करणें अत्यंत राष्ट्रघातक आहे. या प्रकारामुळें तरुण पिढीची वृत्ति जास्त जास्त संकुचित होत जात आहे. राष्ट्राचें अधिष्ठान पुढें ठेवून ज्या गोष्टींचा विचार करावयाचा, त्यांचा ज्ञातिनिष्ठेनें आज विचार होऊं लागला आहे. बाळशास्त्री जांभेकर, दादाभाई नौरोजी, नाना शंकरशेट, किंवा तेलंग यांनीं या मुंबईत जे उपक्रम सुरू केले ते आपआपल्या जातीसाठीं केले असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं; मग त्यांचें वार्षिक

स्मरण फक्त कऱ्हाडे, पारशी, दैवज्ञ किंवा सारस्वत यांनींच साजरें करावयाचें हा प्रकार काय म्हणून ? बाळशास्त्र्यांनीं ज्ञानाचीं जीं नवद्वारें खुलीं केलीं, तीं सर्व लोकांसाठीं नव्हत काय ? दादाभाईंचा देह सर्व राष्ट्रासाठीं झिजत राहिला नव्हता काय ? नाना शंकरशेटींच्या धर्मकृत्यांचा फायदा आज मुंबईतील सर्व लोकांस मिळत नाहीं काय ? तेलंगांनीं आपल्या आयुष्यांत जें वाङ्मयिक, शैक्षणिक, सामाजिक किंवा राजकीय कार्य पार पाडलें तें सर्व समाजासाठीं नव्हे काय ?

पण आमची वृत्ति आज इतकी चमत्कारिक बनली आहे कीं, दुसऱ्या जातीच्या मोठ्या माणसांचें मोठेपण कबूल करण्यासहि आम्हीं तयार नाहीं ! मोठ्या माणसांच्या मोठेपणांत तरतमभाव असणारच; पण त्यांचें नांव ऐकून कपाळास आंठ्या पडण्याचें कारण काय ? याचा परिणाम असा होत आहे कीं, इतरांच्या चरित्रांच्या वाचनानें जी तरतमभेद कळण्याची बुद्धि किंवा सारासार विवेकबुद्धि तीव्र व्हावी त्याऐवजीं ती नष्ट होत आहे; प्रत्येक ज्ञातींत विशिष्ट वेगवेगळ्या मनोरचनेचे किंवा कमीजास्त बुद्धीचे लोक असणें शक्य आहे. प्रत्येकाच्या गुणांचा विकास होण्यास तत्सदृश गुणांचा प्रकर्ष झालेल्या माणसाचें चरित्र त्यासमोर पाहिजे. सर्व दैवज्ञ मुलांसमोर नानांचेंच ध्येय ठेवून त्यांच्या गुणांचा विकास कसा होईल ? सारस्वतांत लोकमान्यांच्याच गुणांचें संकीर्तन वाचून ज्यांच्या उपजत गुणांची वाढ होऊं शकेल असे मुलगे नसतील काय ? सर्व चित्पावनांनीं लोकमान्यांचाच मार्ग सर्वकाळ अवलंबावा, त्यांच्यांत कोणी ‘ शठं प्रति सत्यं ’ करणारे गांधी निघूं नयेत, टाटांसारखे कोट्याधीश धंदेवाले होऊं नयेत, किंवा रवींद्रनाथांप्रमाणें भावनाप्रधान संस्कृतिमान् साधुकवि होऊं नयेत, असें धोरण ठेवलें पाहिजे काय ? आजच्या आमच्या संकुचित वागणुकीमुळें आमच्या समाजांतील अनेक तरुणांचे गुण वांया जात आहेत. त्यांच्या गुणांची योग्य जोपासना किंवा वाढ होऊं शकत नाहीं, याचें मुख्य कारण प्रत्येक ज्ञातीसमोर विशिष्ट ध्येयेंच ठेवलीं जात आहेत हें आहे. हीं ध्येयें बहुधा त्या ज्ञातींतील कोणा कर्तबगार माणसांच्या चरित्राशीं संलग्न असतात.

ब्राह्मणांत दुबळ्या विद्वानांचीच पैदास कां होते, धनाढ्य शंखांची कां होत नाहीं, याचें कारण सर्वांच्या डोळ्यांसमोर जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर्शिपचें ध्येय ठेवलें गेलें हें होय. उलटपक्षीं पारशांत वांटणीस येईल तें काम उचलण्याच्या तयारीमुळें सर्व बाजूंनीं प्रगति झाली. अनेक गोष्टींत तरबेज असे पारशी सांपडतील तितके ब्राह्मण सांपडणार नाहींत. कारण एकांगी ध्येय ठेवल्याचा तो परिणाम आहे. ज्ञातिनिष्ठेनें एकांगनिष्ठाहि वृद्धि पावते व त्यामुळें राष्ट्राच्या प्रगतीस अडथळा उत्पन्न होतो.

तेलंगांच्या काळीं मुंबईत हिंदु युनिअन क्लब व हेमंत व्याख्यानमाला चालूं शकली, नव्हे गरजली, आज तशा संस्था कोठें आहेत ? त्या काळीं तेलंग रानड्यांसारखीं माणसें आपल्या ज्ञानाचा व शीलाचा फायदा सहवासानें इतरांस देण्यास तत्पर असत, आजचे हायकोर्ट जज्ज काय करीत असतात ? इंग्रजासारखेच इंग्रजी लिहूं शकणोर व बोलणारे तेलंग त्या काळीं आपल्या इंग्रजींत दंग न होतां, आपल्या मागासलेल्या देशबांधवांसाठीं इंग्रजीं पुस्तकांचीं भाषांतरें मराठींत उतरीत; आजचे तसले इंग्रजी वाक्पंडित काय करीत असतात ? आज ज्या काल व श्रम कमी करणाऱ्या सोया—म्हणजे मोटारी, विजेचे दिवे व पंखे, टाइपरायटर्स, लघुलेखक, वगैरे—उपलब्ध झाल्या आहेत त्या तेलंगांस नव्हत्या. तरीहि त्यांच्या कामाचा व्याप व उरक केवढा दिसतो ? तसेंच तेलंगांनीं विभूषित केलेल्या जागा मंडित करणारीं आजचीं माणसें विद्या, विनय, बुद्धि, शील, समाजहितैषा, वगैरे गुणांत त्यांच्याशीं तुलण्यासारख्या दर्जाचीं आहेत काय ? वरील सर्व प्रश्नांचीं उत्तरें ‘ नाहींत ’ या एकाच शब्दानें द्यावीं लागतील. मग आमच्या समाजाची प्रगति झाली असें कसें म्हणतां येईल ?

‘ हिंदु युनिअन क्लबची हकीकत ’ या लेखांत केसरीनें सन १८८९ सालीं पुढील उद्गार काढले होते.—“ आज आमच्या समाजास असल्या संस्थांची फार जरूरी आहे. आमच्यांत अजून ऐक्यभाव चांगला जोरावला नाहीं. किंबहुना असलेला ऐक्यभाव जातो कीं काय अशी भीति उत्पन्न झाली आहे. सुशिक्षित म्हणविणाऱ्या व सुधारणेवर अत्यंत आसक्ति दाख-

विणाऱ्या आणि देशहिताची चिंता वहाणाऱ्या लोकांत देखील एकमेकांविषयीं उदारता व निरभिमानता दिसून येत नाहीं. जिकडे तिकडे फाजील स्वमताभिमान व एकलकोंडेपणा हे वाढत चाललेले दिसतात. ऐक्य राहिलें एकीकडे, नुसती मैत्री व शत्रुत्वाचा अभाव इतकें जरी असतें तरी पत्करतें. पण तसें देखील आमच्यानें होत नाहीं. ज्याला त्याला वाटतें कीं अन्यतर मत प्रतिपादणाऱ्या माणसास चीत करावें ! अशा या अभिमानामुळें आज कित्येक चांगल्या हितकारक संस्था शून्यवत् होऊन बसल्या आहेत. अशा स्थितींत हिंदु युनिअन क्लबाची भरभराट चाललेली पाहून, त्यांतील प्रमुख लोकांच्या अंगीं कांहीं चांगले गुण असावेत असें स्पष्ट दिसतें. आमच्या पुण्यांत मात्र पोकळ वडबडीखेरीज कशाचेंच बीं रुजत नाहीं ! ”

वरील उताऱ्यांत वर्णिलेली स्थिति आज चाळीस वर्षांनंतर तशीच आहे, नव्हे जास्त वाईट झाली आहे. हिंदु युनिअन क्लबासारख्या संस्थांनीं जो ऐक्यभाव उत्पन्न केला होता तो जाऊन आज जात्यभिमान इतका बोकाळला आहे कीं, आतां सर्व हिंदु एक ठिकाणीं जमविणारी संस्था साऱ्या मुंबईंत राहिलेली नाहीं. केसरीची ‘ असलेला ऐक्यभाव जातो कीं काय अशी भीति ’ खरी ठरली आहे. वास्तविक चाळीस वर्षांपूर्वीपेक्षां आतां ज्ञातिबंधनें अगदीं शिथिल झालीं आहेत. आज सोवळें ओवळें राहिलेलें नाहीं, स्पर्शास्पर्श नाहीं, सर्व जाति खाणावळींत व उपहारगृहांत एकत्र खातात, पितात, आचाराचें बंड राहिलेलें नाहीं, कांहीं नाहीं. असें असूनहि एकी मात्र होत नाहीं, बेकीच वाढते आहे. आज सर्व जातींचे हिंदु इराण्याच्या दुकानांत केक खातांना दृष्टीस पडतील, पण त्यांनाहि आपली स्वतंत्र ज्ञातिसंस्था लागते ! कॉडलिव्हर ऑइल, चिकनसूप, बॉवरिल यांसारखीं ‘ पवित्र ’ औषधें सर्व जातींतून सारखींच खपतात, तरीहि अजून अस्पृश्यांच्या स्पर्शानें तळें बाटतें ! पुष्टीसाठीं पोर्ट वाइन पिणारे धर्ममार्तंड आहेत, जिलबी खाल्ल्यावर करपट ढेंकर येऊं नयेत म्हणून सोडावॉटर सोंवळे भट रोज पितात, तेथें स्पर्शास्पर्श आड येत नाहीं, फक्त महारानें देव पाहिला तर तो बाटतो !

आज जिकडे तिकडे इंग्रजी शिक्षण बोकाळलें आहे. तेलंगांच्या वेळीं सर्व इलाख्यांत जितके पदवीवर नसतील तितके हल्लीं दरवर्षी बाहेर पडतात. तरीहि हल्लीं तेलंगरानड्यांप्रमाणें इंग्रजी बोलणारे व लिहिणारे कितीसे आहेत ? आजहि इंग्रजी दैनिक किंवा मासिक चालवूं शकणारा महाराष्ट्रीय शोधूनसुद्धां सांपडणें कठीण पडेल ! मद्रासी लोक आपला ' हिंदु ' चालवूं शकतात, बंगाली ' लिबर्टी ' संपादितात, आम्हांस मात्र क्रॉनिकलसुद्धां चालवितां येत नाहीं. केसरी कांहींहि म्हणो, आज महाराष्ट्राची एका इंग्रजी ज्ञानाभावामुळें पिछेहाट झाली आहे, आज आम्ही मागासलेल्या पंजाब्यांच्याहि मागें पडलों. इंग्रजी भाषाज्ञानावर अवलंबून असणाऱ्या उच्च नोकरीधंद्यांत व अखिल भारतीय राजकारणांत आमचा शिरकाव या आमच्या व्यंगामुळें होऊं शकत नाहीं. आम्हांस बॅरिस्टर लागला तर चिमणलाल किंवा भुलाभाई पकडावा लागतो, कॉंग्रेसला अध्यक्ष लागला, तर जवाहरलाल किंवा सुभाषचंद्र हे नरसोपंतांनाहि मागें टाकतात, याचें कारण हें एकच आहे. परवांच ज्ञान-प्रकाशानें आमच्या इंग्रजी शिक्षणावर लिहिलें होतें, त्याप्रमाणें सर्व शाळांत व परीक्षांत सुधारणा झाली पाहिजे, नाहींतर आम्ही जास्तच मागें पडूं.

असा सर्व विचार करतां, तेलंगांच्या कालपेक्षां आम्ही कांहीं बाबतींत तरी निःसंशय मागें पडलों असें स्पष्ट दिसतें. आज त्यांचें स्मरण करावयाचें तर त्यांचे गुण अनुसरले पाहिजेत. एरवीं मोठ्या माणसांच्या पुण्यतिथींचा उपयोग काय ?

प्रगति } वर्ष १, अंक १२
ता. ३१ आगष्ट १९२९

ठाणे.

# दयानंद

कोलंबसाची एक आख्याइका प्रसिद्ध आहे. अमेरिका खंड शोधून काढल्यानंतर त्याचा मत्सर वाटणारे कांहीं कुत्सित टीकाकार म्हणाले, " उं:, यांत काय आहे ? कोलंबसानें यांत मोठें तें काय केलें ? " तेव्हां कोलंबसानें त्यांची फजिती करण्यासाठीं अत्यंत शांतपणानें त्यांना जवळ बोलावलें आणि जवळचें एक अंडें घेऊन तो म्हणाला " हें अंडें टोंकावर उभे करून कोणी दाखवील काय ? " अंड्यासारखी लांब वर्तुळाकार चीज केव्हांहि बाजूवर उभी रहात असते. ती टोंकावर उभी करतां येणें शक्य नाहीं. अर्थातच सर्व टीकाकार कोलंबसाच्या या प्रश्नापुढें कुंठित झाले. तेव्हां कोलंबसानें त्याच्या एका टोंकाच्या बाजूची थोडी कवची फोडून तें अंडें उभें केलें. तेव्हां सर्वजण म्हणाले, " अहो, यांत काय आहे ? " कोलंबसानें उत्तर दिलें " ही एक अत्यंत साधी गोष्ट आहे, हें खरें; पण ती आपणांपैकीं कोणाला सुचली नाहीं, हेंहि तितकेंच खरें आहे. मीं कांहीं विशेष केलें नसेल पण तुम्ही न केलेलें केलें, पूर्वी कोणी शोधून न काढलेलें अमेरिका खंड शोधून काढलें ही गोष्ट खोटी काय ? " तेव्हां ते सर्व चूप बसले. लोकमान्यांना जे शब्द बोलण्याबद्दल आणि लिहिण्याबद्दल शिक्षा झाली ते शब्द आणि तीं वाक्यें आज पोरें सुद्धां लिहितात, बोलतात. पण त्यामुळें पहिल्यानें ते बोलल्याबद्दल लोकमान्यांना मिळालेलें महत्त्व अयोग्य म्हणतां येईल काय ? याच न्यायानें

पहातां आज या हिंदुस्थान देशांत ज्या चळवळी कमी जास्त प्रमाणांत सर्वमान्य झाल्या आहेत व सर्वत्र ज्यांचा प्रसार जारीनें सुरू आहे त्या गोष्टी लहानशाच खऱ्या पण ज्यानें पहिल्यानें प्रतिपादिल्या त्याची योग्यता सामान्य माणसांपेक्षां वरच्या दर्जाची ठरावी यांत गैर तें काय ?

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांच्यावद्दल महाराष्ट्रांत अत्यंत गैरसमज पसरलेला आहे. हा गैरसमज वहुधा अज्ञानजन्य आहे. स्वामीजींची माहिती महाराष्ट्रांत कितीजणांना आहे यावद्दल आम्हांस जवरदस्त शंका आहे. त्यांच्या कार्याची महंति कळण्याऐवजीं त्यांच्यावद्दल दूषित मत उत्पन्न होण्यास महाराष्ट्रांतील एका लेखणीवहाद्दराचे लेख कारणीभूत झालेले आहेत. आतां चाळीस वर्षांनंतर स्वामीजींचें कार्य अन्यत्र फलद्रूप होऊन त्याची लाट महाराष्ट्रापर्यंत येऊन पोंचली आहे. आज अस्पृश्योद्धार, पतित-परावर्तन, आर्यधर्मवृद्धि, हिंदुसंघटन, वगैरे गोष्टी हिंदुस्थानांत दृढ प्रस्थापित झाल्या आहेत. पण त्या ज्या इसमानें अत्यंत हाल सोसून, अपमान आणि उपहास सहन करून, सत्यसंकल्पाचा दाता भगवान् असून परिणामीं तोच आपले मनोरथ सिद्धीस नेईल अशी दृढ श्रद्धा धरून, या गोष्टी पहिल्यानें पटवून दिल्या त्याची आठवण लोकांस फारशी होत नाहीं.

दयानंद स्वामींची विद्वत्ता कदाचित् शंकास्पद असेल, त्यांच्या वर्तनावद्दल कदाचित् कोणी कोनाकोपऱ्यांत कुजवुजत असतील, त्यांनीं स्वीकारलेल्या मार्गावद्दलहि मतभेद असेल, पण अखिल हिंदुसमाजाच्या व परंपरेनें अखिल मानव जातीच्या हिताची अशी एक प्रचंड सुधारक चळवळ त्यांनीं उत्पन्न केली यावद्दल आतां तरी द्विधा मत होईल असें वाटत नाहीं. मुसलमानांच्या आगमनापासून किंवा त्यापूर्वीच कांहीं शतकांपासून हिंदुसमाज वर्द्धिष्णुता सोडून संकुचित वनत चाललेला होता; जयिष्णुता सोडून अहिंसावादाच्या गप्पा मारण्यांत चूर झाला होता, प्रयत्नवादाची कांस सोडून दुर्वल दैववादांत गुरफटून गेला होता; त्या समाजाला झणझणीत हेमगर्भाची मात्रा देऊन स्वामीजींनीं शुद्धीवर आणलें. नंतर त्याला हळूहळू आपल्या प्राचीन संस्कृती-ची आठवण करून दिली. ज्या आर्यांनीं जगाच्या एका टोंकापासून दुसऱ्या

टोंकापर्यंत आक्रमण करून आपली संस्कृति सगळीकडे प्रस्थापित केली, त्या आर्यांच्या वंशजांनीं, विशेषतः त्यांतील अगदीं वेदांपासूनची मूळ परंपरा अजूनहि चालू ठेवणारांनीं आपण कोण, आपल्या संस्कृतीचा विशेष काय, हें पूर्ण विसरून जाऊन स्वकर्मच्युत होणें व आपल्या उच्च स्थानावरून घसरणें हें किती अनुचित, किती लाजिरवाणें आहे, याची जाणीव ज्यांनीं जागृत केली, त्या दयानंदाची कामगिरी हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरंजीव होईल यांत संशय नाहीं.

हिंदुसमाजाला जडलेला मोठा रोग म्हणजे भीतीचा. दुसऱ्याचा धक्का लागला म्हणजे गोगलगाय ज्याप्रमाणें आपलें अंग काढून घेऊन आपल्या कवचीखालीं लपून बसते, जणुं काय या करण्यानें तिला खाणारा प्राणी निघून जाईल, त्याप्रमाणें मुसलमानांची भीति उत्पन्न झाल्यापासून हिंदु समाज कवचीखालीं दडून वसून आपलें रक्षण करूं पहात आहे. जिवंत व वर्धिष्णु प्राण्याचें मुख्य लक्षण म्हणजे बाहेरच्यांस खाणें, त्यांस आपल्या पोटांत घालणें, त्यांचा आपल्या मांसपेशींशीं एकजीव बनविणें हें आहे. जी प्राण्याची गोष्ट तीच लक्षणेनें समाजाची. जो समाज बाह्यांचा अंतर्भाव आपल्यांत करून घेत नाहीं, तो मृत्युपंथास लागला हें खास समजावें. ज्या आर्य ब्राह्मणांनीं हिंदुस्थानाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत वेदांचें म्हणजे शब्दार्थानें ज्ञानाचें वर्चस्व स्थापून अज्ञानतिमिरांत बुडालेल्या अनेक परजातीय वन्यांचा समावेश आर्यसंस्कृतींत करून घेतला, ते आर्य आजच्या त्यांच्या वंशजांप्रमाणें संकुचित मताचे खास नव्हते. या संकुचितपणाचा परिणाम कसा होत गेला, हें चंगीजखानाच्या एका दंतकथेवरून स्पष्ट होईल. अशी आख्याइका आहे कीं, चंगीजखान एकदां काश्मिरांत येऊन उतरला व आपल्या बाहुबलानें त्यानें तो प्रदेश काबीज केला. चंगीजखानाला मूळचा धर्म कांहींच नव्हता. तो एका भटक्या मंगोल टोळीचा नायक होता. काश्मीरच्या ब्राह्मणांची संस्कृति बघून त्यास इच्छा उत्पन्न झाली कीं, आपल्यालाहि या उच्च संस्कृतीचा लाभ होईल तर बरें. म्हणून त्यानें तेथील ब्राह्मणांस बोलावणें पाठविलें व त्यांस

आपल्या धर्माची दीक्षा देण्याबद्दल विनंति केली. पण यवनाशीं बोलवयासहि तयार नसणाऱ्या त्या अहंमन्य ब्राह्मणांनीं तसें करण्याचें साफ नाकारिलें. ब्राह्मणांच्या या कृत्यानें चंगीजखानाच्या मनाला मोठी तळमळ लागून राहिली. त्या रात्रीं त्याला झोंप आली नाहीं. आणि त्यानें मनांत निश्चय केला कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं जो पहिला मनुष्य दृष्टीस पडेल त्याच्या धर्माची दीक्षा आपण घ्यावयाची. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याच्या तंबूपुढें एक मुसलमान फकीर दोहेरे म्हणत आला. त्यास पुसतां त्या फकिरानें आपल्या धर्माची दीक्षा या जगज्जेत्या चंगीजखानास देण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. कारण महंमदाच्या आज्ञेप्रमाणें काफिरास आपल्या धर्मांत आणणें यासारखी पुण्यकारक गोष्ट दुसरी नाहीं. स्वतः मुसलमान झाल्यानंतर क्रोधाविष्ट झालेल्या त्या चंगीजखानानें आपल्या नव्या धर्माची ही वरील आज्ञा तावडतोब अमलांत आणली; आदल्या दिवशीं आपल्या धर्माचा भलताच अभिमान धरून या पराक्रमी पुरुषाचा अपमान करणाऱ्या सर्व ब्राह्मणांना त्यानें धरून आणून जबरीनें मुसलमान बनविलें. हिंदुस्थानांतील मुसलमानांची उत्पत्ति बहुधा याच प्रकारानें झालेली आहे.

प्रसरण हा जसा जिवंत प्राण्याचा एक धर्म आहे त्याप्रमाणेंच दृढीकरण हा दुसरा धर्म आहे. दुसऱ्यांचा समावेश आपल्यांत करून घेतल्यानंतर त्यांना पूर्णपणें आपल्याशीं समरस बनविणें हें समाजाचें शांततेच्या काळांतील कर्तव्य आहे. क्रिस्ती किंवा मुसलमानी धर्म हें तत्त्व आपल्या अनुयायांना आचरणांत आणण्यास सांगतात. क्रिस्ती मिशनरी किंवा मुसलमान मौलवी आफ्रिकेंतील नागव्या उघड्या मागसलेल्या शिद्दी लोकांत गेले तरी आपलें कुराण किंवा बायबल तेथील लोकांस शिकविण्यास माघार घेत नाहींत. ते असें म्हणत नाहींत कीं, या नागव्या उघड्या लोकांस हजारों वर्षांच्या उन्नतीनें बनलेला आमचा धर्म काय समजणार आहे? समजो वा न समजो, मुलाची आवड नावड न पहाणाऱ्या पितरांप्रमाणें बोंडल्यानें कडू औषध पाजण्याचें काम ते करीतच असतात. त्यामुळें बरेंच जग त्यांनीं व्यापिलें आहे व आणखी व्यापण्याचा त्यांचा उद्योग जोरानें सुरू आहे, आम्हांस मात्र हजारों वर्षें

हिदुस्थानांत शेजारीं राहूनसुद्धां ब्राह्मणाबाहेर वेद शिकविणें अप्रशस्त वाटतें. मग सबंध संस्कृतीचें शिक्षण देण्याचा उपक्रम दूरच राहिला. राजकारणाची वेळ आली म्हणजे मतसंख्या फुगविण्यासाठीं लोकसंख्या वाढलेली दिसावी म्हणून महार, चांभार, मांग, ढोर इत्यादि अस्पृश्य किंवा भिल्ल, गोंड, कातकरी वगैरे वन्य लोकांचा समावेश आम्ही हिंदुधर्मात करूं पहातों; पण त्यांपैकीं कितीजणांस हिंदुधर्माच्या मुख्य पुस्तकांचीं नांवें तरी ठाऊक आहेत, याची काळजी मात्र करण्यास आम्ही तयार नाहीं. मुसलमान झालेला शिद्दी हुषार व पराक्रमी असला तर एकाच आयुष्यांत पूर्ण गौरवर्ण असलेल्या तुर्कांचा सेनापति होऊं शकतो किंवा बगदादच्या खलिपाचा जांवई बनतो. आम्हांस मात्र हजारों वर्षे शेजारीं रहाणाऱ्या लोकांस स्पर्श करण्याची आशंका वाटते. असला अनागोंदी प्रकार ज्या धर्मात चालू आहे आणि तसाच तो चालू ठेवणें म्हणजेच धर्मरक्षण करणें अशी त्यांतील शिष्टांची समजूत आहे तो धर्म ऱ्हास पावला, त्या धर्माचे लोक सर्व जगांत हीन दीन बनले; परक्यांच्या लाथा त्यांस प्रत्यहीं खाण्याची आपत्ति उत्पन्न झाली तर त्यांत नवल तें काय ?

प्राचीन काळचे आर्य असे नव्हते याबद्दल कोणास शंका असल्यास त्यानें चोहोंकडे जरा बारकाईनें पहावें. पूर्व बंगाल्यांत गेलें तर असें दिसेल कीं तेथील उच्च वर्णीय हिंदुसुद्धां वंशानें मंगोल वंशाचे आहेत. सुभाषचंद्र बोस किंवा चित्तरंजनदास किवा बाबू विपिनचंद्रपाल यांकडे पहा, म्हणजे आमच्या म्हणण्याची सत्यता कोणाच्याहि लक्षांत येईल. जनरलच्या वेषांतील सुभाषबाबू पाहून, नांव ठाऊक नसणारा कोणीहि त्यांस जपानी माणूस म्हणेल. तीच गोष्ट गुरख्यांची, तीच दक्षिणेकडील द्रविड लोकांची. अशा सर्व गोष्टींवरून पहातां वंश हा हिंदुधर्म प्रचारास आड येत नव्हता ही गोष्ट उघड दिसते. मग एका काळीं सुरू असलेली ही हितकारक गोष्ट आम्ही कां बंद केली ? ती कोणत्याहि कारणानें बंद केलेली असो. आतां तरी डोळे उघडल्यावर ती पुन्हां कां सुरू करूं नये ? धर्मप्रसार, स्वधर्मीय संघटण, संस्कृतीचें दृढीकरण, पतितांचें उद्धरण, अनाथांचें सम्यक्‌पालन, सर्वांची भौतिक आणि

नैतिक उन्नति, अशा सर्व गोष्टींचा उपक्रम ज्या महापुरुषानें या देशांत पुन्हां प्रचलित केला त्या पुरुषाचे हिंदुस्थानवर मोठे उपकार झाले आहेत व त्याचें नांव या देशांतील कर्त्या पुरुषांच्या मालिकेंत गुंफावयास योग्य आहे. यावद्दल शंका प्रदर्शित करणें म्हणजे आपल्या क्षुद्र वृत्तीचें केवळ प्रदर्शन करणें आहे. आज जरी कांहीं शिष्ट तसें करीत असले तरी त्यांचीं नांवें नष्ट होतील व दयानंदांचें नांव चिरकाल स्फूर्तिदायक राहील यावद्दल आम्हांस बिलकुल शंका वाटत नाहीं.

प्रगति } वर्ष १, अंक २२
ता. ३१ आक्टोवर १९२९

# पंडित श्यामजी कृष्णवर्मा

पारतंत्र्याचा सर्वांत मोठा दुष्परिणाम म्हणजे एखाद्या देशांतील पराक्रमी माणसांचा पराक्रम फुकट जाणें हा होय. परकीय अंमलाखालीं अनेक जातींच्या पराक्रमाला बिलकुल वावच राहात नसतो. जीं माणसें देश स्वतंत्र असता तर खात्रीनेंच मोठ्या पदाला चढलीं असतीं, तीं परक्या अंमलाखालीं केवळ मातिमोल होऊन जातात. स्वतंत्र देशांत ज्या गुणांचा स्वदेशाभिमान म्हणून गौरव केला जातो त्याच गुणांबद्दल परकीय अंमलाखालीं तो राजद्रोह म्हणून शिक्षा भोगण्याची पाळी येते. अशाच स्वदेशभिमानी पुरुषांपैकीं पंडित श्यामजी कृष्णवर्मा हे एक सद्‌गृहस्थ होते. हे गृहस्थ मूळचे काठेवाडांतील रहिवासी असून बरेच श्रीमंत असावे. पुण्याला चाफेकर बंधूंनीं रँडसाहेबाचा खून केला त्यांत पंडितजींचें कांहीं अंग असावें असें त्यांच्याच पुढें लिहिल्या गेलेल्या एका कैफियतीवरून वाटतें. या खुनाशीं आपला संबंध पोहोचूं नये म्हणून त्यांनीं हिंदुस्थानला रामराम ठोकून विलायतेस प्रयाण केलें. आरंभीं बरीच वर्षे ते बहुधा अज्ञातवासांत राहात होते, पण सन १९०५ च्या आरंभीं त्यांनीं 'इंडिया होमरूल सोसायटी' नांवाची संस्था लंडन मुक्कामीं स्थापन केली. या संस्थेचे अध्यक्ष तेच होते. या संस्थेतर्फे 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' नांवाचें एक आणा किंमतींचें एक मासिक त्यांनीं सुरू केलें. यांत हिंदुस्थानानें स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं रशियांतील अराजकी

क्रांतिकारकांचा मार्ग स्विकारावा असें ते प्रतिपादन करीत असत. त्यांनीं डिसेंबर १९०७ च्या या मासिकाच्या अंकांत पुढील उद्गार काढले होते;
"It seems that any agitataion in India must be carried on secretly and that the only methods which can bring the English Government to its senses are the Russian methods vigourously and incessantly applied until the English relax their tyranny and are driven out of the country ! No one can forsee what rule will be laid down or line of action defined for any particular course. That will probably depend on local conditions and circumstances, but it is likely that as a general principle the Russian method will begin with *Indian Officials* rather than European." या उताऱ्यावरून त्यांना देशद्रोही हिंदी सरकारी अधिकाऱ्यांबद्दल तीव्र द्वेष वाटत असावा व त्यांनाच पहिल्यानें उडविलें पाहिजे अशी त्यांची समजूत होती ही गोष्ट उघड होते.

सन १९०५ च्या डिसेंबरांत बंगालच्या फाळणीमुळें झालेल्या या देशांतील असंतोषाचा फायदा करून घेण्यासाठीं त्यांनीं हजार हजार रुपयांच्या सहा शिष्यवृत्त्या हिंदी ग्रंथकार, वर्तमानपत्रकार किंवा इतर अभ्यासी माणूस यांस देऊं केल्या. या शिष्यवृत्तीचा फायदा घेणाऱ्या लोकांनीं जगाचा प्रवास करून त्यापासून आपल्या देशाची उन्नति व एकी कशी घडवून आणितां येईल हें शिकावें, अशी त्यांची इच्छा होती. पंडितजींप्रमाणेंच दुसरे एक हिंदी देशभक्त या वेळीं पॅरिस शहरीं रहात असत. त्यांचें नांव श्रीयुत एस्. आर. राणा असें होतें. त्यांनींही कृष्णवर्म्यांप्रमाणें दोन दोन हजार रुपयांच्या तीन शिष्यवृत्त्या या वेळीं जाहीर केल्या. नांवावरून हे गृहस्थ राजपूत दिसतात; त्यांनीं शिष्यवृत्त्यांचीं नांवें राणा प्रताप, शिवाजी व एक कोणीतरी मुसलमान महापुरुष यांचीं देण्याचें ठरविलें होतें. यावरून त्यांची ज्ञातिनिष्ठारहित जाज्वल्य देशभक्ति दिसून येते. पंडित शामजींनीं एकोणिसशें सहा सात सालीं लंडन मुक्कामीं आपल्या सोसायटीला जोडून 'इंडिया हाऊस' नांवाचें वसतिगृहही चालविलें होतें. या वसतिगृहांत अनेक हिंदी विद्यार्थी राहात असत. त्या ठिकाणीं राष्ट्रीय संमेलनें, सन १८५७ सालाबद्दल वार्षिकोत्सव व इतर चर्चा होत असत. तेथें एकदां बॉंबच्या कृतीबद्दलही

व्याख्यान झालें. १९०७ सालीं ५७ सालच्या "स्वातंत्र्ययुद्धा" बद्दल अर्धशतसांवत्सरिक उत्सव या संस्थेनें कडकडावून साजरा केला. त्यावरून पार्लमेंटांत प्रश्नोत्तरें होऊन श्यामजींनीं पॅरिसला पलायन केलें. तेथून ते 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' मासिक चालवित असत. सन १९०९ सालच्या जुलै महिन्यांत या मासिकाच्या मुद्रकाला शिक्षा देण्यांत आली. तरीही तें दुसऱ्या छापखान्यांत छापलें जाऊं लागलें. या दुसऱ्या मुद्रकाला त्याच सालच्या सप्टेंबर महिन्यांत एक वर्षाची सजा देण्यांत आली; तेव्हां श्यामजी तें पॅरिस मुक्कामीं काढूं लागले. त्यांचा अनेक हिंदी क्रांतिकारकाशीं दृढसंबंध असे; व पॅरिसमधील त्यांच्या घरीं अनेकांना आश्रयही मिळत असे. हिंदुस्थानांतील कोणत्या क्रांतिकारकाशीं त्यांचा किती संबंध होता किंवा हिंदुस्थानांतील कोणत्या अत्याचाराच्या कृत्याशीं त्यांचा साक्षात् संबंध होता हें एक त्यांना, त्या क्रांतिकारकांना व सरकारला ठाऊक. या गृहस्थांजवळ भरपूर खजिना मात्र असावा असें खास वाटतें. महायुद्धाच्या आरंभीं फ्रान्स—इंग्लंडाची दोस्ती होऊन त्यांचे हितसंबंध एकरूप झाल्यामुळें पंडितजींना फ्रान्स सोडून स्वित्झर्लंडांत जाऊन राहावें लागलें; तरीही त्यांची या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याची धडपड बंद पडली नाहीं. महायुद्ध सुरू होतांच पंजाबांतून काबुलाकडे पळालेले एक मुसलमान गृहस्थ बरकतुल्ला यांच्याद्वारें पंडितजींचें कारस्थान सुरू होतेंच. दुसरे एक परागंदा क्रांतिकारक राजा महेंद्र प्रताप यांनीं रशिया, अफगाणीस्तान वगैरे देशांनीं ब्रिटिशांविरुद्ध उठावें म्हणून जो प्रयत्न चालविला होता त्यांतही पंडितजींचें अंग असावें. पंडितजींचा मृत्यु गेल्या आठवड्यांत स्वित्झर्लंडांतच झाल्याची बातमी आली आहे.

या काठेवाडी देशभक्तांचेच एक प्रांतबंधु महात्मा गांधी हे सध्यां पंडितजींच्या चळवळीच्या मार्गाच्या अगदीं विरुद्ध असा अहिंसेचा मार्ग अवलंबित आहेत; व हा देश सध्यां त्यांचाच अनुयायी आहे. असें असलें तरी परदेशांत मरण आलेल्या या स्वातंत्र्याभिमानी ज्वलज्जहाल देशभक्ताबद्दल सहृदय हिंदवासियांच्या डोळ्यांतून अश्रु गळल्याशिवाय राहणार नाहींत.

**प्रगति** { वर्ष १, अंक ४५
ता. १० एप्रिल १९३०

# लाला लजपतराय

आधुनिक युगाचा एक विशेष त्याची विस्मरणशीलता हा आहे. सिनेमांत ज्याप्रमाणें आपल्या डोळ्यासमोरून चित्रपट झरझर निघून जातात, त्याप्रमाणें आधुनिक माणसांचें स्मरण फक्त वर्तमानपत्रांतील जाड्या टाइपांतील मथळे वाचीपर्यंतच असतें. दृक्पटलाच्या आंत बहुधा कोणतीहि गोष्ट शिरत नसावी. मेंदूपर्यंत एखादी गोष्ट नेणें आधुनिक माणसास पसंत पडत नाहीं. डोक्याला त्रास कोणी द्यावा घ्यावा? असें आधुनिक माणूस नेहमीं म्हणत असतो. स्वतःला कोणत्याहि प्रकारचा त्रास होऊं नये, अशी त्याची खटपट असते. ही त्याची प्रवृत्ति संभाळण्यासारखीच या युगाची रचना करण्यांत आली आहे. शाळेंतील मुलाला स्वतः अर्थ समजून घेण्याचे श्रम सोसत नाहींत, त्याला पुस्तकावर टिप्पणी पाहिजेत ! आधुनिक माणूस तारतम्य कधींच शिकत नाहीं, याचें कारण दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची त्याची संवय. तो जें वर्तमानपत्र वाचतो त्याप्रमाणें त्याचें मत; हें असें कां, असा प्रश्न तो कधीं विचारण्याच्या भानगडींत पडावयाचा नाहीं. विचार करून डोक्यास त्रास होईल ना !

लाला लजपतराय जाऊन एक वर्ष लोटलें पण राष्ट्राला त्यांची फारशी आठवण राहिलेली दिसत नाहीं. एरवीं त्यांचें संस्थास्मारक करण्यासाठीं पांच लाख रुपयांची मागणी करण्यांत आली होती ती पूर्ण झाल्याशिवाय राहिली

नसती! सायमनकमिशनच्या आगमनप्रसंगीं मिळालेल्या पोलिसच्या वेत्रिका-प्रसादामुळें लालाजींवर मरण ओढवलें हें देश एवढ्यांतच विसरला! त्यांच्यावरील आपत्तीचा सूड घेण्याची कोणती तजवीज करण्यांत आली आहे? त्यांनीं मरण ओढवून घेतलें तें व्यर्थच काय?

लाला लजपतरायांसारखा चौरस देशभक्त दुसरा नाहीं. या चौरसपणामुळें त्यांना लोकमान्यांसारखी लोकप्रियता संपादन करणें शक्य झालें नाहीं. लोकमान्यांनीं पुराणमताभिमानी पक्षाचा पाठिराखेपणा वेळोवेळीं केला. त्यामुळें महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांत राहणारा व शिक्षणांत मागासलेला असा वर्ग नेहमीं त्यांच्या बाजूस राहिला. राजकारण हें लोकांच्या रोजच्या व्यवहारांत अडखळविणारें नसल्यानें सामान्य जनास लोकमान्यांच्या राज-कारणाची अडचण वाटत नव्हती. पण जर त्यांनीं समाजसुधारकाचा अवतार घेतला असता, तर त्यांची बहुतेक लोकप्रियता रसातळास गेली असती हें निश्चित आहे. लालाजींनीं राजकारणांत क्रांतिकारकांच्या सीमेवर उभें राहून, समाजकारणांतहि तसेंच सीमेवर उभें राहण्याचा उपक्रम केला होता. आपल्या जोरकसपणानें पंजाबांतील आर्यसमाजाची चळवळ त्यांनीं ब्राह्मो किंवा प्रार्थनासमाज यांच्या चळवळीपेक्षां शतपटीनें यशस्वी केली. ब्राह्मोसमाजाप्रमाणें हिंदी संस्कृतीचा व धर्माचा पाया त्यांनीं सोडला नाहीं. पण त्याबरोबरच आधुनिक काळाला नडणाऱ्या सर्व गोष्टींची धर्मापासून फारकत करण्याची तजवीज त्यांनीं केली. अस्पृश्यता, पतितपरावर्तन, अनाथपालन, स्त्रीशिक्षण वगैरे प्रश्न आर्यसमाजाइतक्या धडाक्यानें कोणीहि हिंदुस्थानांत धसास लाविलेले नाहींत. पंजाबांतील शिक्षणाचा प्रसार बराचसा आर्यसमाजिस्टांनीं केलेला आहे, हें महशूर आहे. आपल्या शिक्षणसंस्थांना अनाथविद्यार्थिगृहांची जोड दिल्यानें आर्यसमाजाला आपल्या कार्याचें जाळें पसर-विण्यास मोठी मदत झाली आहे. आर्यसमाजाच्या अनाथालयांतून बाहेर पडलेले बहुतेक सुशिक्षित त्याचे आजन्म प्रचारक बनतात. याचा अर्थ ते समाजां-तील सामान्य धंद्यांत किंवा व्यवहारांत पडत नाहींत असा नव्हे. पण आपला निर्वाहाचा धंदा चालवित असतानाच ते समाजाचें कोणतें ना कोणतें

तरी कार्य करीतच राहतात. महाराष्ट्रांतील फर्ग्युसन कॉलेजसारख्या संस्थांतून बाहेर पडलेले ग्रॅज्युएट असें कोठलेंहि कार्य करण्यास समर्थ झालेले दिसत नाहींत. महाराष्ट्रिय विद्यार्थ्यांइतके राजकारणाच्या गप्पा मारणारे विद्यार्थी दुसरे नसावे. पण प्रत्यक्ष समाजकार्य करण्यास त्यांतील अगदींच थोडे समर्थ असतात किंवा पुढें येतात. फर्ग्युसन कॉलेजला विठ्ठलराव शिंद्यांचें 'अस्पृश्योद्धारा'चें कार्य, कर्व्यांचें स्त्रीशिक्षण व विधवांचा प्रश्न सोडविण्याचें कार्य, गोखल्यांचें देशांतील अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याचें कार्य, कै. अण्णा विजापूरकरांचें ' राष्ट्रिय शिक्षण ' कार्य, अशा सर्व कार्यांची जोड दिली असतां जें कार्य घडून आलेलें दिसेल, तें सर्व कार्य एका आर्य-समाजाच्या विविध चळवळींनीं व कार्यशाखांनीं पंजाबांत केलें आहे. या सर्व कार्यांत लालाजींचा हात प्रामुख्यानें होता एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या योग्यतेची योग्य कल्पना येईल. राजकारणांत टिळकांप्रमाणें किंबहुना क्वचित् त्यांच्याहि पुढें उभे राहून, खेरीज शिंदे, कर्वे, गोखले व विजापूरकर या सर्वांची भूमिका त्यांच्यात अंशतः एकवटलेली होती. म्हणून आम्हीं त्यांस चौरस देशभक्त असें म्हटलें आहे.

हिंदुस्थानांत पुढारी आणि देशभक्त हे शब्द पुष्कळदां एक अर्थानेंच योजण्यांत येतात. एका अर्थी पाहूं गेलें, तर असें सिद्ध करतां येईल कीं, या जगांतील प्रत्येक माणूस जन्मतःच देशभक्त असतो. आपला देश स्वतंत्र असूं नये असें मनांत तरी कोणत्या अधमाला वाटत असतें ? त्यांपैकीं कित्येकजण भीतीनें, स्वार्थानें, अधिकारलालसेनें किंवा मानाच्या इच्छेनें मनांतील ही इच्छा बाहेर सांगण्यास न धजोत, पण प्रत्येकास तसें वाटणें ही अत्यंत सरळ गोष्ट आहे. पण एवढयावरून आपण प्रत्येकास देशभक्त म्हणत नाहीं. देशाचें नुसतें प्रेम एवढीच गोष्ट देशभक्त नामाभिधान मिळ-ण्याला पुरेशी ठरणार नाहीं. एकदां याच मुद्यावर वाद करतांना एक विद्वान् आम्हांस म्हणाले कीं, तुमची देशभक्तीची व्याख्याच आमच्यापेक्षां वेगळी आहे. त्यांच्या मतें सर चिमणलाल, जिन्हा यांसारखे लोकहि देशभक्तच आहेत. आम्ही आरंभीं वर सांगितलेला अर्थच अभिप्रेत असेल तर, इतरां-

बरोबर तेहि देशभक्तच ठरतील, हें उघड आहे. पण देशाच्या राजकारणांत भाग घेणें एवढीच गोष्ट देशभक्तिनिदर्शक नाहीं, असें मानणारास वरील सद्गृहस्थांस देशभक्त हें नांव देतां येणार नाहीं. एखाद्या माणसाच्या आयुष्यांतील सर्व गोष्टी जेव्हां देशकल्याणाच्या अनुरोधानें चालतांना दिसतील तेव्हांच त्यास देशभक्त हें नांव देणें योग्य ठरेल. अर्थातच असें करतांना परतंत्र राष्ट्रांतील देशभक्तांना कधीं तरी परकी सत्तेचा जाच जाणवल्या-शिवाय राहणार नाहीं. याच दृष्टीनें हिंदुस्थानांत राजद्रोहाचे खटले होणारे सर्व गृहस्थ देशभक्त मानले जाण्याचा प्रघात पडला आहे. लालाजींवर हद्दपारी व स्वदेशागमनबंदी हीं दोन्ही भोगण्याची पाळी आलेली होती. अमेरिकेंत महायुद्धाच्या वेळीं रहावें लागलें असतां, त्यांस किती हाल भोगावे लागले हें थोड्यांसच ठाऊक असेल. लोकमान्य विलायतेस गेले तेव्हांच त्यांच्या कानीं वरील गोष्ट आली व त्याप्रसंगीं त्यांनीं आपल्या जवळ असलेले सर्व पैसे लालाजींकडे पाठवून दिले, असें आम्हीं ऐकलें आहे. अत्यंत आपत्तींत असूनसुद्धां आपलें दैन्य बाहेर न दाखविणारा असा पुरुष विरळा.

लालाजींनीं मोठी प्राप्ती असलेली आपली वकिली सोडून, आपलें सर्वस्व देशासाठीं वेंचलें. त्यांचा साधेपणा व उज्वल चारित्र्य हीं लोकविश्रुतच आहेत. या बाबतींत त्यांची बरोबरी लोकमान्य किंवा महात्माजी अशा माण-सांशींच होण्यासारखी आहे. लोकमान्यापेक्षांहि लालाजींच्या देशभक्तीचा एक असा विशेष होता कीं, लालाजी देशभक्तींत स्वतःचें अस्तित्व विसरून जात असत. देशसेवा करतांना त्यांची व्यवहारदृष्टि कायम राहूं शकत नसे. लोकमान्य किंवा महात्माजी हे देशभक्त असले तरी त्यांची व्यवहारदृष्टि कधींहि सुटलेली दिसणार नाहीं. देवाशीं एकरूप होऊन आपलें स्वत्व विसर-णारा भक्त जसा वरचढ, तसाच या ठिकाणीं लालाजींचा दर्जा वरचा म्हणणें भाग आहे.

आधुनिक सुधारक हे बहुधा शुद्ध बुद्धिवादी असतात. उच्च धर्मवासनेचा किंवा पवित्र सदाचरणाचा आदर्श ते क्वचितच असतात. लालाजींत या दोन्ही गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून समावेश झाला होता. त्यांची धर्मवासना

एखाद्या मध्ययुगांतील साधूला शोभण्यासारखी होती. इतकी उत्कटता लोकमान्यांच्या धर्मबुद्धींत होती असें वाटत नाहीं. दुसरें, लोकमान्यांच्या धर्मबुद्धीबद्दल साशंक असणारे अनेक लोक सांपडतील. बऱ्याच वेळीं त्यांचें वर्तन शुद्ध धर्मबुद्धीशीं विसंगत भासे. शंकराचार्यांवर ज्याप्रमाणें ते प्रच्छन्न बौद्ध असल्याबद्दल आरोप केला जातो, त्याप्रमाणेंच लोकमान्यांना मिलस्पेन्सरच्चेच शिष्य मानणारे बरेच लोक महाराष्ट्रांत आहेत. या बाबतींत आरंभीं तरी त्यांचीं व आगरकरांचीं मतें एकरूप होतीं, अशी किंवदंती आहे. लालाजींवर असा आरोप करतां आला नसता. तसेंच लोकमान्य हे जसे अत्यंत लोकप्रिय होते, तसेच कांहीं लोक त्यांचे अत्यंत द्वेष्टे होते—लोकमान्यांबद्दल कडवा द्वेष बाळगणारे जसें लोक आम्हीं पाहिले आहेत तसे द्वेष्टे आम्हांस अन्यत्र कोठेंहि दिसलेले नाहींत—हीहि गोष्ट महाराष्ट्रांत तरी सांगावयास पाहिजे असें नाहीं. या गोष्टीवरून काय अनुमान निघतें, किंवा त्याचा अर्थ काय लावावयाचा हें प्रत्येक माणसाच्या दृष्टीवर अवलंबून राहील. पण इतकें तरी म्हणणें भाग आहे कीं, असे ज्याचे द्वेष्टे नाहींत तो मनुष्य वेगळ्या कोटींतील व वरच्या कोटींतील समजला पाहिजे. लालाजी किंवा महात्माजी यांचा द्वेष करणारे बहुधा कोणी नाहींत. ही एकच गोष्ट त्यांच्या शुद्ध मनाची व सरळ वर्तनाची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

व्यक्तिविषयक गुणांकडे पाहिलें तरी लालाजींची विद्वत्ता लोकमान्यांपेक्षां वेगळ्या तऱ्हेची असली, तरी कमी दर्जाची होती असें नाहीं. हिंदुस्थानांत संस्कृतज्ञाला व तज्जन्य विद्वत्तेलाच खरी विद्वत्ता समजण्याचा विशेष प्रघात आहे. ज्याप्रमाणें ऑक्सफर्ड येथें लॅटीन व ग्रीक येत असल्याखेरीज कोणी विद्वान् समजला जात नसे, त्याप्रमाणेंच हा प्रकार आहे. संस्कृत भाषा ही आर्यसंस्कृति, धर्म, व तत्त्वज्ञान वगैरे विषयांशीं एकरूप असल्यानें ब्राह्मणी संस्कृतीच्या परंपरेंत वाढलेल्या समाजांत एतद्विषयक ज्ञान विद्वत्तेचें लक्षण समजलें जावें हें साहजिक आहे. पण या विशिष्ट दृष्टीमुळें आधुनिक शास्त्रांतील पारंगत इसमास विद्वान् न मानण्याचा जो प्रकार बराच आढळण्यांत येतो, तो गैर आहे. उदाहरणार्थ; गोखले लोकमान्यांपेक्षां अर्थशास्त्रांत जास्त

पारंगत होते, पण त्यांस कोणी विद्वान् असें विशेषण लावतांना महाराष्ट्रांत क्वचितच आढळे. तीच गोष्ट लालाजींच्या बाबतींत म्हणतां येईल. लालाजींची विद्वत्ता लोकमान्यांप्रमाणें संशोधक स्वरूपाची नव्हती. पण त्यांच्या लेखनाकडे पाहतां त्यांची बुद्धि किंवा ज्ञान कमी दर्जाचीं होतीं, असें म्हणवत नाहीं.

लोकमान्य किंवा महात्माजी या दोघांहिजवळ नसणारा वक्तृत्व गुण लालाजींजवळ होता. हिंदुस्थानांतील इंग्रजी वक्त्यांत त्यांचा नंबर बराच वर लागेल. बंगाली वक्ते बहुधा कृत्रिम दिसतात. वक्तृत्वशास्त्राचा त्यांनीं बराच अभ्यास केला असावा, असा भास होतो. लालाजींच्या वक्तृत्वांत अशी कृत्रिमता मुळींच आढळून येत नसे. त्यांच्या मनाचा सरळपणा वक्तृत्वांतहि तसाच दिसे. मैत्रीला व चारचौघांत बसण्याउठण्याला लालाजी लोकमान्य किंवा महात्माजी यांपेक्षां जास्त चांगले ठरण्यासारखे होते.

असा एकंदर विचार करतां लालाजींचें चरित्र हें अनेक दृष्टींनीं सामान्य-जनासहि बोधप्रद व मार्गदर्शक होणारें आहे. आपल्या अंतिम ध्येयप्रवणतेमुळें महात्माजी किंवा एकांतिकतेमुळें लोकमान्य हे सामान्य जनांना पुढें ठेवण्या-सारखे गुरु ठरूं शकत नाहींत. तशी स्थिति लजपतरायांची नाहीं. कोणींहि मनुष्यानें त्यांचें अनुकरण करावें, असें त्यांचें चरित्र आहे. त्यांनीं लिहिलेलें आत्मचरित्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांचें भाषांतर पुढील अंकापासून प्रगतीच्या वाचकांस क्रमशः वाचावयास मिळेल अशी व्यवस्था आम्हीं ठरविली आहे. तें वाचून वाचकांस सर्व कल्पना येईलच.

**प्रगति** { वर्ष १, अंक २५<br>ता. २१ नोवेंबर १९२९

# लोकमान्य व लोकामान्य

उत्तम या शब्दाचा अर्थ सर्वांत चांगला असा आहे. सर्वांत चांगला म्हणजे कोणत्याहि दिलेल्या समूहांतील एकाखेरीज बाकींच्याहून जास्त चांगला असा जो एक तो; पण व्यवहारात असें दिसतें कीं, आपण उत्तम हा शब्द एकाहून अनेक व्यक्तींबद्दल किंवा समानजातीय वस्तूंबद्दल नेहमीं वापरतों. इंग्रजी भाषेंत तर 'One of the best' असा वाक्प्रचार सुरू आहे. 'उत्तमांतील एक' ही शब्दरचना व्याकरणदृष्ट्या चुकीची आहे हें उत्तम या शब्दाच्या मूल अर्थावरूनच उघड होतें. तरीहि आपण अशाच तऱ्हेचा अर्थ मनांत बागवून तो शब्द योजतों व त्याबद्दल कोणी निषेध करतांनाहि दिसत नाहीं. या स्थितीचें कारणहि उघड आहे. आपण उत्तम शब्द योजतांना झाडून साऱ्या समानजातीयांची यादी करून व त्यांत तरतम-भावांची सावकाश सूक्ष्म पारख करून तो योजतो असें थोडेंच आहे! पण अशी उत्तमपद ठरविणारी एक सभा भरविली तर तींत तरी या गोष्टीबद्दल एकमत होणें शक्य आहे काय? तेथेंहि उत्तमपदाला लायक असे अनेक लोक ठरतील व म्हणूनच उत्तम याचा भाषेंतील अर्थ त्या मानाला योग्य असा अनेकांतील एक असाच घेतला पाहिजे व समजला जातो.

एवढी चिकित्सा सुचण्याचें कारण असें कीं, या महाराष्ट्रांत लोकमान्यांना लोकमान्य न समजणारे, व नुसतें समजूनच न राहतां त्यांचा मुद्दाम 'राजश्री'

५८५१



टिळक असा उल्लेख करण्यांत भूषण मानणारे असे कांहीं सद्गृहस्थ होते व आहेत. या लब्धप्रतिष्ठितांचें म्हणणें असें कीं जोंपर्यंत हे लब्धप्रतिष्ठित 'लोक' या शब्दाखालीं येतात, त्यांचा 'लोक' या संज्ञेंत समावेश होण्याचा हक्क कोणत्याहि सरकारनें काढून घेतलेला नाहीं, तोंपर्यंत टिळकांना **लोकमान्य** म्हणतां येणार नाहीं. कारण अस्मादिक ( म्हणजे हे प्रतिष्ठित ) हे एकवार नव्हे त्रिवार या मान्यत्वाविरुद्ध हात वर करून मत देत आहेत ! अर्थात् टिळकांची लोकमान्य ही पदवी चूक आहे, असत्य आहे, अशास्त्रीय आहे, हें यांच्या वक्रभूमितीच्या नियमांनीं सिद्ध झालें.

या लब्धप्रतिष्ठितांची अशी समजूत, नव्हे गाढ आत्मविश्वास, आहे कीं त्यांनीं लिहिलेलीं 'राजश्री टिळक' या नांवांनीं चित्रित झालेलीं लिखाणें तेवढींच अलग कालाच्या ओघांत वाहून न जातां जगत्प्रलयांत वेद वांचले त्याप्रमाणें वांचतील व मग इतिहासांत टिळकांची खरी योग्यता ठरली जाईल. म्हणजे टिळकांना लोकमान्य ही पदवी होती ही गोष्ट पुढील पिढ्यांना कळणार नाहीं व अशा रीतीनें या महाभागांना लोकामान्य होऊन राजश्री टिळक हीं अक्षरें लिहितांना झालेले श्रम सफल होतील. यामुळें आमच्या या महाभागांना जो सात्विक आनंद होईल त्या आनंदामृतपानानें यांचे आत्मे तृप्त होतील व त्यांच्या वंशजांस आपल्या पितरांस पाणी देण्याचें काम करण्याची जरुरी राहणार नाहीं !

याप्रमाणें या लोकांच्या मतें लोकमान्यांचें लोकमान्यत्व इतिहासांतरीं तरी संशयांत पडणार आहे. असेलहि ! काळाच्या उदरांत काय आहे, पुढील इतिहाससंशोधक काय ठरविणार आहेत हें कोणी सांगावें ? आज इतिहास-संशोधकांच्या हातांत जी सत्ता आहे ती जुन्याकाळीं कवींच्या हातीं होती. बिल्हण कवीनें आपल्या विक्रमांकदेवचरिताच्या प्रस्तावनेंत कवींच्या 'कर्तुम-कर्तुमन्यथाकर्तुम्' शक्तीचें वर्णन फार मार्मिक केलें आहे. तो म्हणतो, ज्या राजांच्या जवळ कवि नाहीं त्यांस यश कैचें ? यशस्वी राजांजवळ जर त्यांचे पराक्रम वर्णन करणारे कवी असतील, तरच त्यांच्या यशाची प्रभा फांकणार ! यास उदाहरण देतो—'लंकापतेः संकुचितं यशो यत् यत्कीर्तिपात्रं

रघुराजपुत्रः ॥ स सर्व एवादिकवेः प्रभावो न कोपनीयाः कवयः क्षितीन्द्रैः ॥'
विल्हणाच्या मतें तरी रावणाच्या यशाला कालिमा फांसण्यास व रामाच्या पराक्रमाची वढाई होण्यास कारण एक आदिकवि वाल्मिकीची कारवाई. म्हणूनच राजांनीं कवींवर रागाऊं नये अशी धोक्याची सूचना तो देतो. फारशी कवि फिर्दौसी हा गझनीच्या महंमुदावर रागावल्यामुळें त्या कवीनें महंमुदाची कशी अपकीर्ति केली आहे तें सुप्रसिद्ध आहे. हा प्राचीन कवींचा अधिकार अलीकडे कांहीं वर्तमानपत्रें वळकावूं पहात आहेत. आज एखाद्याची कीर्ति किंवा अपकीर्ति करणें हें सर्वस्वीं या वर्तमानपत्रांच्या हातांत आहे. या वर्तमानपत्रांच्या लिहिण्यावरून जर एखादा कोण्या माणसाची योग्यता जाणूं म्हणेल तर तो फसल्याशिवाय सुटणें कठीण आहे. याचें एक मुख्य कारण म्हणजे संपादक कोणी व्हावें व होऊं नये यावद्दल विधिनिषेध राहिलेला नाहीं हें होय.

लोकमान्यांचें लोकमान्यत्व संशयांत पडेल किंवा नाहीं ही गोष्ट संशयास्पद असली तरी त्यांच्या या विरोधभक्तांच्या लोकामान्यत्वावद्दल कोणीहि ग्वाही देऊं शकेल. गेल्या पिढीस त्याचा अनुभव येऊन चुकला आहे व चालू पिढीसहि येत आहे. महाराष्ट्रांत जर कोणी अतिशय द्विष्ट लोक असतील तर हे लोकामान्य लोक होत. याचें कारण काय ? कारण इतकेंच कीं स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यावर टीका करणारांची अशी स्थिति होते. पराक्रमी पुरुषास जग हजार अपराध माफ करतें, पण कुत्सितांच्या एकहि अपराधास क्षमा मिळण्याची आशा नाहीं. या टीकाकारांचा वहाणा असा कीं आम्ही काय बोलून चालून फाटके ! आमची अब्रू ब्रह्मदेवहि कमी करूं शकणार नाहीं ! पण जे अब्रूदार म्हणून मिरवितात, त्यांची तर अब्रू आम्ही काढूं शकतों कीं नाहीं ? होय, त्यांची अब्रू तुम्ही काढूं शकतां हें खरें; पण या कृत्यामुळें तुमची अब्रू कांहीं वाढूं शकत नाहीं. पराक्रमी पुरुषावर टीका करणाऱ्यांस कोणी पराक्रमी समजत नाहीं. दुसऱ्याच्या कार्यांतील वैगुण्य दाखविणाराला कोणी कार्यकर्ता म्हणत नाहीं. दुसऱ्याच्या देशभक्तीचा दांभिकपणा दाखविण्याच्या कामगिरीवद्दल तुम्हांस कोणी देशभक्त म्हणून चुकूनहि

म्हणणार नाहीं. दुसऱ्याच्या स्वार्थत्यागाची मीमांसा करून तुम्ही स्वार्थत्यागी ठरण्याचा संभव नाहीं. दुसऱ्याच्या विद्वत्तेस गालबोट लावण्याचा प्रयत्न केल्यानें तुमचें शंखसहोदरत्व नाहींसें होणार नाहीं. समजणारे समजतच असतात, आणि या सर्व गोष्टींची पूर्ण जाणीव असल्यामुळें हे टीकाकारहि आपल्या वालेकिल्ल्याच्या तटाआड उभे राहूनच आपले विषारी वाण सोडीत असतात.

या टीकाकारांचा संबंध येथें आणण्याचें प्रयोजन पडलें नसतें; पण एक आगलाव्या ज्याप्रमाणें हजारों कारागिरांची करामत क्षणार्धांत धुळीस मिळवूं शकतो, तसें या बावतींत झालें असल्यानें त्यांविषयीं लिहिणें भाग झालें आहे. परकी सत्तेच्या जाचामुळें कोणत्याहि स्वाभिमानी व पराक्रमी पुरुषाच्या अंगाला आधींच क्षतें पडत असतात, त्यांवर हे दोषैकदृष्टि खल ‘ व्रणार्त पशुच्या शिरावरी वनीं ’ जसे कावळे चोंची मारीत रहातात, त्याप्रमाणें आपलें कार्य निर्घृणपणें अव्याहत चालू ठेवतात. त्यामुळें आज हिंदुस्थानांत सगळीकडे थंडाथंड झालें आहे. कोणीहि सज्जन काम करण्यास पुढें येऊं धजत नाहीं. प्रत्येक माणसांत दोष हे असणारच, पण त्यामुळें त्याचें चांगलें कार्य कसें वाईट ठरेल? पण जर एखाद्या माणसाचे दोष तेवढे काढीत वसलें, तर त्यामुळें तो माणूस नाउमेद होऊन स्वस्थ वसतो व त्याच्या अल्पस्वल्प कार्यासहि समाज मुकतो. आज या देशांत स्वराज्य मिळण्याचें मोठें कार्य राहो, पण लहानसहान सहज होऊं शकणारीं कामेंहि जीं काम करणाऱ्यांच्या अभावामुळें अडून राहिलीं आहेत, त्याच्या मुळाशीं हें कारण आहे. ज्याप्रमाणें रंगपंचमीच्या दिवशीं टवाळ पोरांच्या पिचकारीच्या भीतीनें कोणीहि माणूस चांगला पोषाख करून बाहेर पडत नाहीं, तीच गोष्ट या टीकाकार खलांच्या वेगुमान वागणुकीनें या देशांत प्राप्त झाली आहे. या स्थितीचा या खलांवर कांहींहि परिणाम होण्यासारखा नाहीं. साऱ्या मुंबईचा व्यवहार बंद पाडण्याच्या आपल्या पराक्रमामुळें गेल्या दंग्यांत जसे मुंबईचे मवाली शेफारले होते तसे हे टीकाकार शेफारले आहेत. मवाली जसे मगरूर झाले होते तसे हे कोणासहि न जुमानणारे मगरूर फिदी फिदी हांसून आपल्या पैशुन्याच्या पराक्रमानें उडवलेली मजा वर्णीत आहेत. साऱ्या

देशाच्या नाड्या आंखडवून जिकडे तिकडे शुकशुकाट करण्याचा त्यांचा हा पराक्रम मोठा तर खराच! पण हें असें किती दिवस चालूं द्यावयाचें याचा या देशांतील विचारी सज्जनांनीं तरी विचार करावयास नको काय? या मवालीपणाला आळा घालण्याचें कार्य कोणी वीर करणार नाहीं काय? आम्ही या दादागिरीस आळा घालण्याचा एक उपाय सुचवितों. अशा टीका-कारांचे लेख वाचावयाचे नाहींत, ते छापणारीं लिखाणें विकत घ्यावयाचीं नाहींत, त्यांच्याशीं संबंधाट्टालन ऊर्फ असहकार्य करावयाचें, एवढाच उपाय आपल्या हातांत आहे. जोंपर्यंत तुम्ही यांचे विषारी लेख वाचीत रहाल, तोंपर्यंत तुमचीं अंतःकरणें कलुषित रहाणार व तुमचे चांगले विचार जागच्या जागीं दबले जाऊन तुम्हीं निष्क्रिय होणार हें निश्चित आहे. याचा अनुभव आजच येत आहे. दुसरें जोंपर्यंत तुम्हीं असें 'घासलेटी' साहित्य विकत घेण्याचें थांबत नाहीं, जोंपर्यंत असे लेख लिहून कुचाळकांचें पोट भरतें, तोंपर्यंत लाजेनें हे कुचाळ आपलें काम बंद करतील ही आशा व्यर्थ आहे. हें विषारी घासलेटी साहित्य वाचून ज्यांच्या मनावर चटकन् परिणाम होऊं शकतो, त्या तरुणांच्या मनावर किती वाईट परिणाम झाला आहे याचें वर्णन करवत नाहीं. आज तरुणांच्या कोणत्याहि समूहांत वसा, या घासलेटी लिखाणांचा दुर्दमनीय दुर्गंध तुम्हांस आल्यावांचून रहाणार नाहीं. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, लढाईपूर्वी स्टूडंटस् ब्रदरहुडच्या प्रार्थना-समाजांतील व्याख्यानांस जेथें जागा मिळण्याची मारामार पडे, तेथें आतां तीं व्याख्यानें अगदीं लहान जागेंत करवितात तरी खुर्च्या भरणें शक्य होत नाहीं. ज्ञानलालसेच्या ऐवजीं टवाळकी, स्वार्थत्यागाच्या जागीं चार्वाक्य, आदराच्या जागीं तिरस्कार, सहानुभूतीच्या जागीं औदासिन्य, कर्तव्यतत्पर-तेच्या ठिकाणीं आळस आज सर्वत्र दृग्गोचर होत आहे. अशी तरुण पिढी ज्या देशांत निर्माण केली जात आहे त्याचा उदय होणें शक्य आहे काय?

टिळक लोकमान्य कां झाले व त्यांचे टीकाकार लोकामान्य कां झाले याचें कारण आपण एका नवीन रीतीनें पाहूं या. इंग्लंडांत रिव्हर्स नांवाचा एक विद्वान् समाजशास्त्री नुकताच होऊन गेला. त्यानें मानसशास्त्राचा विचार करतांना

संकटांमुळें संकटांत सांपडणाऱ्यांवर काय परिणाम घडतात याची मीमांसा केली आहे. संकट पुढें येऊन ठाकलें असतां पुढें दिलेल्या चार अवस्था संभवतातः—

१ भिऊन पळ काढणें,

२ त्वेष येऊन लढणें,

३ संकटपरिहाराची योजना मागून सूत्रें हालवून करणें, व

४ मतिमूढ, स्तंभित होऊन कांहींहि करण्यास असमर्थ होणें,

या त्या अवस्था होत.

एखाद्या देशाला पारतंत्र्य प्राप्त होणें हें सर्वांत मोठें संकट होय. या संकटामुळें इतर अनेक संकटें उद्भवतात. या महासंकटाचें निवारण करण्याच्या कामाला कंबर बांधून लागणारा पुरुष कोणत्याहि काळीं कोणत्याहि स्थळीं लोकमान्य होतो. लोकमान्य होण्याचा यासारखा राजमार्ग दुसरा नाहीं. पण हा राजमार्ग चोखाळणाऱ्या माणसाचें सामर्थ्यहि तसेंच असावें लागतें. परकीय सत्तेला तोंड देण्याचा मार्ग म्हणजे प्रचलित राज्यांत एक नवीन राज्ययंत्र चालू करणें होय. नामदार गोखल्यांनीं टिळकांबद्दल बोलतांना एकदां असे उद्गार काढले होते कीं, 'पेशवाईत हा पुरुष होता तर त्यानें एक नवें राज्य स्थापलें असतें.' हें मत अगदीं खरें होतें. याच आपल्या आंगच्या गुणांचा उपयोग आजच्या विपरीत परिस्थितींतहि करून लोकमान्यांनीं स्वराज्याचें बीं रुजत घातलें व त्यास कोंब येण्यापूर्वीच खाऊन टाकण्यासाठीं जे उंदीर टपून बसले होते, जे कीटक कुरतडूं लागले होते, त्यांस न जुमानतां आपलें रोपटें रुजवून काढून वाढीस लावलें. त्या रोपट्याचें खतपाणी देऊन संवर्धन करणें व त्यावर कोणी कुऱ्हाड चालवूं लागलें तर त्यापासून त्याचें रक्षण करणें हीं कामें ज्या जोरानें हिंदुस्थानवासी करतील त्या प्रमाणांत त्यांस स्वराज्यवृक्षाचीं फळें चाखावयास मिळतील.

समाजशास्त्री रिव्हर्स यानें संकटानें ज्या चार अवस्था संभवतात म्हणून सांगितलें, त्यांपैकीं पहिल्या व चौथ्या या दोन अवस्थांच्या फेऱ्यांत बहुतेक सर्व लोक सांपडतात. म्हणजे एकतर ते भिऊन पळ काढतात किंवा मूढ-

मति होऊन ‘ कालाय तस्मै नमः ’ म्हणत स्वस्थ बसतात. टिळकांपर्यंत राष्ट्राच्या आपत्तीचा विचार करणारे जे पुरुष हिंदुस्थानांत झाले ते कमी-जास्त प्रमाणांत तिसऱ्या मार्गाचें अवलंब करणारे होते. ‘ बुद्धिर्यस्य बलं तस्य ’ हें वचन जरी खरें असलें, तरी त्या बुद्धीच्या पाठीमागें जर लढण्याची तयारी नसेल तर बुद्धीचे बहुतेक डाव हुकतात. ब्राह्मणाच्या बुद्धिबलामागें क्षत्रियाचे धनुष्यबाण सज्ज पाहिजेत हें त्रिकालाबाधित सत्य आहे. विश्वामित्राचा यज्ञ रामाच्या मदतीशिवाय सिद्धीस जाऊं शकला नाहीं. सुदैव हें कीं, हे ब्राह्मणक्षत्रियांचे गुण लोकमान्यांत एकवटले होते. लोकमान्यांचे प्रतिस्पर्धी हे स्वराज्यांत शांतता नांदत असतां राज्यसूत्रें चालविण्यास कदाचित् लायक ठरले असते, पण स्वराज्य अस्तंगत झालें असतां राजनीतिनैपुण्याबरोबर जेव्हां झुंझारपणाची आवश्यकता असते, तेव्हां त्यांच्या हातून फारसें कांहीं होण्याचा संभव नव्हता. महात्मा गांधींचें राजकारण बाह्यतः अहिंसापुरस्कारी व शांततावादी असलें तरी त्यांत क्षत्रियांचा झुंझारपणा आहे, हें येथें कोणी विसरूं नये. तसा झुंझारपणा त्यांत नसता तर बारडोलीचा सत्याग्रह फलदायी झाला नसता. गांधींनीं बदललेल्या परिस्थितींत शक्य ती तोड म्हणून झुंझण्याचीं शस्त्रास्त्रें व मार्ग बदलले आहेत इतकेंच. पण त्यांचेंहि राजकारण झुंझारपणाचेंच. सारांश, टिळकांत रिव्हर्सच्या तिसऱ्या तत्त्वाबरोबर दुसरें तत्त्वहि होतें म्हणून ते लोकमान्य झाले, इतर होऊं शकले नाहींत.

राजकारणाचीं सूत्रें हालवणाऱ्यानें झुंझारराव व्हावयाचें तर त्यांच्या अंगांत अलोट स्वार्थत्याग पाहिजे. सुखलोलुप माणसांचा तेथें उपयोग नाहीं. शत्रूशीं लढाई देण्यास निघालें म्हणजे प्रसंगीं आपलें घर आपल्या हातानें जाळावें लागतें, सैन्याची गति वाढावी म्हणून सुटसुटीतपणा येण्यासाठीं केवळ युद्धोपयोगी शस्त्रास्त्रांखेरीज जास्त बाडबिछायत जवळ बाळगतां येत नाहीं. बरोबर कनातीचे तंबू व नाटकशाळा बाळगणारा सेनापति कामास येत नाहीं. लोकमान्यांइतकी ‘ स्वसुखनिरभिलाषा ’ दुसऱ्या कोणत्याहि पुढाऱ्यानें दाखविलेली नाहीं हें निश्चित आहे. ब्राह्मणाचा त्याग व क्षत्रियाचें धैर्य

असल्यानेंच त्यांच्या हातून एवढी कामगिरी पार पडली. ईश्वराची कृपा व लोकांचें प्रेम यामुळें लोकमान्यांस कशाचीहि ददात भासली नाहीं हें खरें असलें, तरी त्यामुळें त्यांच्या स्वार्थत्यागाची किंमत रेसभरहि कमी होत नाहीं. कुत्सित बुद्धीनें त्यांच्या स्वार्थत्यागाची चिकित्सा करीत बसणारे लोक केवळ अधमाधम होत.

ब्राह्मणाचा त्याग व क्षत्रियाचें धैर्य यांच्या जोडीस लोकमान्यांत वैश्याची व्यवहारकुशलता होती हें थोड्यांसच ठाऊक असेल. या त्यांच्या कुशलते-मुळेंच त्यांस स्वार्थत्यागाची झळ लागली तरी बाधूं शकली नाहीं. इंग्रज मुत्सद्दी व देशभक्त विल्यम पिट हा अविवाहित एकटा होता, त्यास मुख्य प्रधानाचा पगार मिळत होता, तरी त्याच्या अव्यवस्थित वागणुकीमुळें त्यास मोठें कर्ज झालें व तें शेवटीं राष्ट्रानें फेडलें. त्याच्या उधळ्या स्वभावाबद्दल त्याची मेकॉलेनें निर्भर्त्सना केली आहे. बहुधा असें आढळतें कीं उत्कट वृत्तीचे सज्जन व्यवहारानभिज्ञ असतात. टिळकांची देशभक्ति व ज्ञानलालसा अत्यंत उत्कट होती तरी त्यांच्या भरांत ते व्यवहार विसरले नाहींत. त्यामुळेंच त्यांची आयुष्ययात्रा संथपणानें तडीस गेली.

ब्राह्मणक्षत्रियवैश्यांचे मुख्य सद्गुण अंगीं असणाऱ्या टिळकांनीं शूद्रांची सेवावृत्ति देशाकडे लावली होती. ती सेवा त्यांनीं किती एकनिष्ठपणें, किती निरलसतेनें, किती कष्ट भोगून आमरण चालू ठेवली होती हें सर्वांस ज्ञात आहे. तिचें वर्णन कशास?

ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रादि चतुर्वर्णांचीं कामें एकट्यानें करण्यास समर्थ असणारा हा विराट्पुरुष 'लोकमान्य' झाला यांत आश्चर्य तें काय? त्यांस राजश्री टिळक म्हणून संबोधणाऱ्यांचें संबोधनहि सार्थ करण्याइतकी 'राजश्री' टिळकांच्या चेहेऱ्यावर नेहमींच झळकत होती व राजांनाहि दुर्लभ असें ऐश्वर्यहि (भौतिक नव्हे नैतिक) त्यांनीं भोगलें. त्यांच्या तेजानें अंध झालेलीं दिवाभीतें दिवसा तोंड लपवून व मोडक्या वृक्षांच्या ढोलींत राहून रवि अस्तास गेल्यावर आपले अमंगल घूत्कार काढीत बसलीं आहेत तीं लोकामान्य ठरलीं तर तें योग्यच नव्हे काय?

**प्रगति** } वर्ष १, अंक ८
ता. २७ जुलै १९२९

# मोहनदास करमचंद गांधी

## ' भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् '

जन्मतांना प्रत्येक मातेला आपलें बाळ गुणी, कुलदीपक होणार, असेंच वाटत असतें. पण बहुतेक माणसें आशेचा विघात करणारींच निपजतात, असें जगाचा इतिहास सांगतो. कांहीं थोडीं माणसें आपल्या कुटुंबाचें हित आयुष्यांत साधूं शकतात. त्याहून थोडीं जातीचें किंवा गांवाचें कांहीं हित करतात. फारच थोडीं देशाचें हित साधण्यास समर्थ होतात व शतकांनीं एखादें माणूस अखिल मानवजातीच्या उद्धारास कारणीभूत होतें. अशांतीलच एक महापुरुष सध्यांच्या या देशाच्या हीन स्थितींत उदयास आला व येऊं शकला, हीच काय ती या देशाच्या निराश स्थितींत, निबिडांधकारांत लुकलुकणारी एक आशा उत्पन्न करणारी तारका आहे. ६२ वर्षांपूर्वी काठेवाडांतील एका गांवीं एक मुलगा जन्मला. त्या वेळीं कितीकांस तो पुढें अखिल जगाला धडा घालून देणारा महापुरुष होणार आहे याची कल्पना असेल? प्रत्यक्ष त्याच्या आईबापांची आपल्या मुलाच्या भविष्याविषयीं जास्तींत जास्त आशा कोणती बरें असेल? ज्या ज्योतिषांनीं या बाळाची पत्रिका तयार केली त्यांना त्याच्या आयुष्याची मांडणी कितीशी लक्षांत आली असेल? त्याच घटकेस जगावर काय थोडीं बाळें जन्मास आलीं असतील? पण त्यांपैकीं किती—ज्योतिषशास्त्र खरें मानावयाचें तर—महात्माजींसारखीं निपजलीं आहेत

वरें ! यावरून ज्योतिषशास्त्रापेक्षां कर्मविपाकशास्त्रच जास्त खरें ठरतें. ‘अनेक जन्मसंसिद्धः’ असा क्वचित् एखादाच पुरुष महात्मा बनतो व जगाच्या उद्धाराला कारणीभूत होतो हेंच खरें.

महात्माजी हे देशभक्त आहेत पण देशभक्ति हा कांहीं त्यांचा विशेष गुण नव्हे. केवळ देशभक्तीचाच विचार कर्तव्य तर कदाचित् लोकमान्य, लालाजी यांसारखीं माणसें महात्माजींपेक्षां कमी ठरणार नाहींत, पण अखिल मानवजातीच्या हिताचा मार्ग ते शोधीत होते, असें वाटत नाहीं. तें श्रेय एकट्या महात्माजींनांच देतां येण्यासारखें आहे. इतरांचीं कार्यक्षेत्रें संकुचित, मार्ग तात्पुरत्या उपयोगाचे व ध्येयें दृष्टीच्या टप्प्यांतील अशी स्थिति होती तशी ती महात्माजींच्या बाबतींत नाहीं. अखिल मानवजातीच्या किंबहुना चराचर सृष्टीच्या हिताचा विचार डोळ्यांसमोर वागवून तें हित साधण्याचा मार्ग कोठला, याचें संशोधन महात्माजींनीं आरंभिलें व आपल्या कल्पनेप्रमाणें एक मार्ग आंखला. हा मार्ग सुरू झाल्यास व्यक्तीव्यक्तींतील किंवा राष्ट्रांराष्ट्रांतील लढे तोडण्याचा आजवर चालत आलेला मार्ग रद्द ठरून निराळाच सर्वांच्या हिताचा मार्ग रूढ होईल. प्राचीन काळचे ऋषि धर्म हा मनुष्याच्या सर्व आयुष्याला पुरून उरणारा व सर्व कर्तव्यांचा विचार करणारा असा मार्ग आहे, असें सांगत आलेले आहेत. पण दिवसेंदिवस जगाची प्रवृत्ति अधार्मिक, त्याचीं कर्तव्यें संकुचित वर्गीकृत, त्याचे मार्ग हंगामी इष्टकार्यसाधक, अशी स्थिति प्राप्त झाली. एकाच व्यक्तीचें आयुष्यांतील वेगवेगळीं कर्तव्यें करतांना आढळणारें आचरण वेगवेगळें होऊं लागलें. व्यापारांत खोटें बोलणें क्रमप्राप्त, राजकारणांत कपटनीति अवलंबिणें हेंहि अनिवार्य, पोटासाठीं कांहींहि करणें हें तर अवश्य कर्तव्य, अशी विचारसरणी सर्वत्र समाजांत रूढ झाली. एकाची देशभक्ति ही दुसऱ्यास उपद्रव असें ठरूं लागलें. जर्मनांची देशभक्ति वाढली कीं फ्रान्सला उपद्रव पोंहोंचण्यास सुरवात व्हावयाची; पोलंडची राष्ट्रभक्ति बळावली कीं जर्मनांस त्राहि भगवान् व्हावयाचें आणि इतालीची राष्ट्रप्रीति ओतास जाऊं लागली कीं जगांतील अनेक राष्ट्रें त्रस्त व्हावयाचीं, असा काळ सुरू झाला. मनुष्याच्या

आयुष्यांत किंवा समाजांत कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावयाचें, इष्ट गोष्ट कोणती व अनिष्ट कोणती, थोड्यांच्या हिताची कोणती व सर्वांच्या हिताची कोणती, अल्पकाळ फायद्याची वाटणारी कोणती व कायम चिरकालीन हिताची कोणती, याबद्दलचा विचार बहुशः सुटला. न्यायदेवतेचें नांव घेऊन दंडुक्यानें वागण्याचा मार्ग सर्वत्र प्रचलित झाला. अशा स्थितींत सर्वांच्या हिताचा कायम अवलंबिण्यासारखा असा न्यायपर, निरुपद्रवी, अहिंसात्मक मार्ग शोधून काढण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. गेल्या जागतिक महायुद्धांत सर्वांवर जो अनर्थ कोसळला व त्यामुळें जगाची जी हानि झाली त्यामुळें कांहीं विचारी माणसांचे डोळे आपल्या स्थितीच्या धोक्याकडे जोरानें वळले. पण मार्गांत आमूलाग्र सुधारणा कल्पिण्याची बुद्धि त्यांच्यांत नव्हती. त्यामुळें बापडे आरमारी परिषदा, शस्त्रसंन्यासपरिषदा, शांतितह, राष्ट्रसंघ वगैरे भरविण्याच्या पंथांत बुचकळत आहेत. स्वार्थ सोडण्याची कोणाचीच तयारी नसल्यामुळें त्यांचे सर्व मार्ग आपला हपापाचा माल राखण्याच्या दृष्टीनें आंखलेले आहेत. त्यांत सुधारणा करण्याची इच्छा अगदीं भाग पडल्याशिवाय त्यांस होण्यासारखी नाहीं. म्हणून असा मार्ग शोधून काढण्याची जबाबदारी गुलामगिरीनें त्रस्त झालेल्या निःशस्त्र हिंदी लोकांवर येऊन पडली व त्यांच्यांतील एकानें ती पार पाडून जगाला धडा घालून देण्याचा मार्ग उघडला आहे.

गांधींना आपला मार्ग सुरू करण्यास व त्याचे प्राथमिक प्रयोग करून पाहण्यास योग्य अशी भूमि हिंदुस्थानाखेरीज दुसरी सांपडली नसती किंबहुना गांधींचा मार्ग हाहि हिंदुस्थानच्या भूमींतच रुजण्यासारखा मार्ग आहे. या देशांत महावीर व गौतम यांनीं अडीच हजार वर्षांपूर्वी जी विचारसरणी सुरू केली तिचेंच पक्कफल महात्माजींचा मार्ग होय, असेंहि म्हणतां येईल. महात्माजींचे गुरू राजकारणांत ना. गोखले होते. पण ते त्यांच्या आयुष्याचीं ध्येयें किंवा मार्ग ठरविणारे गुरू नव्हते. महात्माजींच्या मनावर ज्याच्या शिकवणीचा व आयुष्यसरणीचा परिणाम विशेष झाला असे गृहस्थ राजचंद्र नांवाचे एक जैन साधुतुल्य पुरुष होते. ते तरुणपणींच वारले पण त्यांनीं

गांधी दक्षिण आफ्रिकेस जाण्यापूर्वीच त्यांच्या मनावर जो संस्कार उठविला होता त्याचें परिणत फल महात्माजींच्या सध्यांच्या आयुष्यांत दृष्टीस पडतें. टॉलस्टॉय किंवा रस्किन् यांच्या शिकवणीपेक्षां राजचंद्रजींच्याच उपदेशाचा परिणाम आपल्या मनावर जास्त झालेला आहे, असें महात्माजींनींच म्हटलेलें आहे. महात्माजी आफ्रिकेंत गेल्यानंतरहि त्यांचा राजचंद्रजींशीं पत्रव्यवहार सुरू होता व अनेक शंकांचें निरसन या विरक्त गुरूकडून महात्माजींनीं करून घेतलें होतें. एका महापुरुषाच्या आयुष्याला वळण लावणाऱ्या या अल्पवयांत गेलेल्या गुरूची फारशी ओळख गुरूच्या आयुष्यांत जगास झाली नाहीं हें केवढें आश्चर्य ! यावरून अनेक पहिल्या दर्जाचे महात्मे कीर्तीस पारखे असतात असें जें बुद्धवचनास अनुसरून विवेकानंदांनीं एके ठिकाणीं म्हटलें होतें त्याची प्रचीति येते.

एका अर्थी विचार केला तर महात्माजींच्या उपदेशांत नवीन असें कांहीं नाहीं. त्यांचे सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय, वैराग्य वगैरे संयमनाचे नियम प्राचीन काळापासून अनेक पुरुषांनीं प्रतिपादिलेले आहेत. पण त्या सर्व नियमांचा उपयोग विशिष्ट काळांत कशा तऱ्हेनें वागून करून दाखविला पाहिजे याचें उदाहरण गांधींनीं स्वतःच्या वर्तनानें घालून दिलेलें आहे. जसा ज्याचा गुरु तसा त्याचा शिष्य या न्यायानें श्रीकृष्णाला आदर्श समजणारे लोकमान्य एका तऱ्हेचे झाले व बुद्ध, ख्रिस्त, महावीर यांच्या पंथाचें तत्त्व अनुसरणारे महात्माजी दुसऱ्या प्रकारचे झाले हें योग्यच आहे. ‘शठंप्रति शाठ्यम्’ हा लोकमान्यांचा आचारमार्ग; ‘शठंप्रति सत्यम्’ हा गांधींचा आचारमार्ग. आपल्या विशिष्ट मार्गामुळेंच टिळकांचें ध्येय देशहितापुरतेंच संकुचित राहिलें; गांधींचें ध्येय त्यांच्या उच्चतर मार्गामुळेंच अखिल मानवजातीच्या हिताइतकें वाढलें. ध्येय जितकें वरच्या दर्जाचें तितकें तें साध्य होण्याचा संभव कमी. त्याला वेळ जास्त लागेल, त्रास जास्त पडेल पण तें चिरंतन हिताचें ठरेल, सर्वांच्या हिताचें ठरेल. टिळकांचें लक्ष राजकारणापुरतेंच संकुचित होतें. गांधींचें लक्ष समाजांतील सर्व गोष्टींकडे एकसमयावच्छेदेंकरून लागून राहिलेलें आहे. चार गोष्टी स्थिर ठेवून पांचवी चालवूं पाहणाऱ्यास तितकेंच सोपें

जाईल हें खरें; पण पांचीहि सुधारणा एकदम घडवून आणूं पाहणाऱ्याचा मार्ग कायम सुधारणेचा, हें विसरतां येणार नाहीं.

आधुनिक जगाचे सुधारणेचे मार्ग बाह्य स्वरूपाचे म्हणजे सरकारी कायद्यांनीं सुधारणा घडवून आणण्याचे असतात. आधुनिक युगांतील माणसाला स्वयं-स्फूर्तीनें सुधारणा ही जवळ जवळ पटेनाशी झालेली गोष्ट आहे. पण एका काळीं याच प्रकारच्या सुधारणेवर समाजाचा भर होता, हें विसरतां येणार नाहीं. लोकांमध्यें एखादी गोष्ट विशिष्ट स्वरूपांत पाळण्याबद्दल आधीं सार्वत्रिक मत उत्पन्न करावयाचें आणि नंतर समाजमताच्या दट्टयावर त्याची बिनबोभाट अंमलबजावणी होईल अशी मनोरचना समाजांत घडवून आणावयाची, असा जुन्या काळचा मार्ग असे. चीन देशांत कन्फ्यूशिअसचें तत्त्वज्ञान गेलीं अडीच हजार वर्षे रूढ राहिलें; व त्यानें घालून दिलेले आचरणाचे नियम चिनी लोक बिनबोभाट पाळीत राहिले. कोणत्याहि बादशहाचे कायदे अशा तऱ्हेनें पाळले गेले नसते. आतां पाश्चात्यांच्या कायद्याच्या कल्पनेनें पछा-डल्यामुळें चिनी राष्ट्रीय सरकार या प्राचीन तत्त्ववेत्याची शिकवण शिकविली जाऊं नये अशी व्यवस्था घडवून आणीत आहे ! तीच स्थिति या देशांत दृष्टीस पडते. या देशांतील लोकांनीं अहिंसेचा मार्ग प्राचीनकाळीं अवलंबिला तो आजतागायत तत्त्वदृष्ट्या तसाच रूढ आहे. हिंदुस्थानांतील मांसाहारी लोकांतसुद्धां मांस खाण्याचें प्रमाण इतकें थोडें आहे कीं, मांसाहार त्यांच्या अन्नाचा मुख्य भाग मानतां येणार नाहीं. तीच गोष्ट दारूबाजीची. एकंदरींत पहातां या देशांत या व्यसनाचें प्रस्थ अत्यल्प होतें. शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दीत पुण्यनगरी व्यसनांचें माहेरघर बनली होती तेव्हां सुद्धां त्या शहरांत दारूबाजी फारशी नव्हती, असें एल्फिन्स्टननें लिहून ठेविलें आहे. पठाण लोक रानटी समजले जातात पण त्यांच्यांत मद्याला शिवणारेहि कोणी नाहींत, हें सांगितलें तर कोणाला तें खरेंहि वाटणार नाहीं. उलटपक्षीं आधु-निक सुधारणेचें माहेरघर जी अमेरिका तेथें कडक कायदा पास करूनसुद्धां त्याची अंमलबजावणी करणें अशक्यप्राय झालें आहे. जर लोकांत अमुक एक गोष्ट करणें हें निंद्य, पापकारक आहे अशी समजूत नसेल तर कायदा

पास करूनहि त्याची अंमलबजावणी करणें शक्य होणार नाहीं. उलटपक्षीं केवळ महंमदाच्या एका आज्ञेनें पठाण दारूपासून अलिप्त राहतात. अमुक एक गोष्ट बेकायदेशीर आहे, ती केली असतां शिक्षा होईल, या भीतीनें मनुष्याच्या मनांत तिच्या निंद्यत्वाचा ठसा उमटत नाहीं. उलटपक्षीं पाप-पुण्याच्या धार्मिक समजुतीनें तें कार्य अगदीं सुलभ रीतीनें चिरंजीव स्वरूपाचें बनूं शकतें. कायद्याची मदार त्याची अंमलबजावणी घडवून आणण्याच्या लाठीच्या शक्तीवर असते तर धार्मिक स्वरूपाच्या आचारांचें अधिष्ठान माणसाच्या शुद्ध, निष्पाप मनावर ठेवलेलें असतें. गांधींचा मार्ग हा अशा मतावर उभारलेला मार्ग आहे. तो मार्ग आक्रमिण्याचें सामर्थ्य मनःशुद्धीनें व आत्मिकबलानें प्राप्त करून घ्यावयाचें असतें. कायद्याच्या भयापेक्षां स्वतःच्या मनाचें भय असणें हें जास्त हितकर व परिणामकारक आहे, हें उघड आहे.

आधुनिक जगानें मिस्टर गॉडची कल्पना खोडून काढण्याचें ठरवून अधार्मिक बनणें ही फॅशन चालू केली आहे. धर्म याचा अर्थ गांधी वेदाच्या किंवा कुराणाच्या किंवा बायबलाच्या आज्ञा असें समजत नाहींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. विवेकबुद्धीला पटतील तेवढ्याच आज्ञा ते ग्राह्य मानतात. सध्यांच्या समाजांत उच्च विचारांचें शब्दपांडित्य पुष्कळच पसरलेलें आढळून येतें. पूर्वीच्या गांवढळ मनुष्याशीं तुलना करितां आधुनिक सुशिक्षित अनेक प्रश्नांचा खल मोठ्या हुषारीनें करतांना आढळतो. पण विचार आणि आचार यांच्यांत एवढी फारकत पडली आहे कीं, पूर्वीं जे सदाचार बहुधा कोणीहि मोडीत नसे ते एक मनोदौर्बल्यामुळें आजचे गाढ पंडितहि प्रत्यहीं मोडीत असतात. असें मनोदौर्बल्य बोकाळण्याचें कारण मनुष्याची कार्यप्रेरक इच्छाशक्ति नष्ट झाली आहे, हें होय. याचें कारण धार्मिक भावनेचा अभाव. अमूक एक गोष्ट चांगली आहे, असें कळल्यानें किंवा वाटल्यानें ती करण्याचें सामर्थ्य निर्माण होत नसतें. प्रो. वामनराव जोशी आपल्या "सुशीलेच्या देवा"च्या उपसंहारांत म्हणतात त्याप्रमाणें शुष्क तत्त्वज्ञानांत आणि तार्किक वृत्तींत, कार्यप्रेरक "उत्साह" उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं. धर्माशिवाय

असा उत्साह व मनोबल संभवत नाहीं. मिस्टर गॉडच्या कल्पनेशिवाय धर्महि संभवत नाहीं. गांधींची सर्व शक्ति त्यांच्या धार्मिक भावनेवर अवलंबून आहे. अशी शक्ति सर्व राष्ट्रांत, अखिल मानव जातींत, कायद्याच्या भयानें नव्हे, लाठीच्या भयानें नव्हे, उत्पन्न करावयाची असेल, तर गांधींत उतरलेलें जगांतील सर्व महापुरुषांचें तत्त्वज्ञान अनुसरण्याची तयारी सर्वांनीं केली पाहिजे.

प्रगति } वर्ष २, अंक १८
ता. २ आक्टोबर १९३०

# मोतीं गळालें !

**भारतचा दिवा मालवला ! हिरा हरपला !**
**काय गुपीत घाला केला मोतिलालाला जी।**

( जुन्या शाहिरास वंदून )

एका हातानें शत्रूशीं आणि दुसऱ्यानें मृत्यूशीं झुंजतां झुंजतां या परतंत्र देशांतील लोकांच्या कंठांतील लाल बनलेल्या पंडित मोतिलालांना अखेरीस युद्ध ऐन रंगांत आलें असतां काळानें गांठलें! या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं चाललेल्या प्रस्तुत संग्रामांतील सेनापति, विजय डोळ्यांसमोर दिसत असतां अशा रीतीनें समरांगणीं पडला! भारताची परंपरा अशीच आहे. पाश्चात्यांतील सेनापती आपला जीव बचावण्यासाठीं मागें मागें राहून युद्ध चालवीत असतात. एवढ्या पराक्रमी नेपोलिअनला वाटर्लूच्या लढाईतून पळून जावेंसें वाटलें; शत्रूच्या हातीं सांपडून आपलें यश मलीन करण्यापेक्षां लढतां लढतां मरणें श्रेयस्कर वाटलें नाहीं ! जगास आव्हान देणाऱ्या कैसरला हॉलंडांत पळून जाऊन लांकडें फोडीत बसणें चांगलें दिसलें; पण ज्या लाखों लोकांनीं त्याच्यासाठीं धारातीर्थीं शयन केलें त्यांत जाऊन पडण्याची वासना त्याला शिवली नाहीं ! या देशाची परंपरा याहून अगदीं वेगळी आहे. सेनापतीनें अंगचोरपणा करणें ही गोष्ट महाभारताच्या कालापासूनच या देशांतील लोकांना ठाऊक नाहीं. भीष्मद्रोणकर्णापासून आरंभ करून तो तहत दत्ताजी

शिंदे, सदाशिवरावभाऊ ते झांशीच्या राणीपर्यंत खऱ्या हाडाच्या कोणी सेनापतीनें क्षुद्र जीवाचा लोभ धरून आपलें यश मलीन करून घेतलें नाहीं. आजहि युद्धाचें स्वरूप बदललें तरी तीच उज्ज्वल नीतिपरंपरा या परतंत्र देशांतहि अजून तगून आहे. टिळक, दास, लजपतराय हे सर्व झुंजार वीरमणि अगदीं शेवटच्या घटकेपर्यंत देशहिताचा विचार करीत पारतंत्र्याशीं झगडत आलेले आहेत. या परंपरेला पंडित मोतिलाल नेहरूच कसे अपवाद ठरतील? त्यांनींहि अगदीं तोंडांतून शब्द निघत होता तोंपर्यंत स्वराज्याचीच चिंता वाहिली व तें अगदीं हातीं आलें असें समजून त्याला कवटाळावयाला ते लागणार तोंच या उत्कट भावनेचा धक्का जर्जर शरीराला न सोसून त्यांचें प्राणोत्क्रमण झालें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

इतिहासांत व अद्‌भुत कादंबऱ्यांत अकल्पनीय अशा घटना घडून आलेल्या आपण वाचतों. पण सत्यसृष्टींतहि असें अकल्पनीय घटनेचें उदाहरण पारतंत्र्यपंकांत रुतलेल्या या हिंदुस्थानांतहि आज दृष्टीस पडतें. पंडित मोतीलाल नेहरूंचें उदाहरण हें अशाच उदाहरणांत सर्वश्रेष्ठ ठरेल असें वाटतें. जुन्या काळांत तरवारीचा मार्ग मोकळा होता तेव्हां अनेक शूर राज्यें स्थापूं शकत असत. पण आजच्या काळांत तसें कोणी स्थापलें असेल तर तें नेहरूंनींच स्थापलेलें दिसतें. राजघराण्याबद्दल जी एक विशिष्ट प्रकारची पूज्य भावना लोकांत निर्माण होत असते, तशा तऱ्हेची भावना आज जर कोणा एका घराण्याबद्दल हिंदुस्थानांत वसत असेल तर ती नेहरूंच्या घराण्याबद्दल वसत आहे यांत तिलमात्र संदेह नाहीं. आनंदभवनांत बादशाही थाटानें राहणारें नेहरू घराणें हें आज एका लेखकानें म्हटलें आहे त्याप्रमाणें जुनाट ऑस्ट्रियन बादशहांच्या घराण्याइतकेंच प्रेमानें खानदानीचें मानलें जात आहे. आज हिंदुस्थानांत अनेक लहान मोठे राजेरजवाडे गजान्त-लक्ष्मी उपभोगीत आहेत त्यांपैकीं अनेकांची संपत्ति नेहरूंपेक्षां पुष्कळच जास्ती आहे. नेहरूंसारखेच लाखों रुपये मिळविणारे दुसरे लोकहि या देशांत पुष्कळ आहेत. पण दुसऱ्यांवर राज्य करण्यासाठींच ज्यांचा जन्म झाला आहे व अशा तऱ्हेचें राजतेज ज्यांच्या चेहऱ्यावर निसर्गतःच झळकत आहे

असे दुसरे कोणी इसम बहुधा कोणासहि दिसणार नाहींत. या देशांत राजकारणांत पडणारे लोक सध्यां बहुतच आहेत व ते आपापल्यापरी हुषार व राजनीतिशास्त्रनिष्णातसुद्धां आहेत. पण एक सुप्रसिद्ध विद्यमान् राजनीतिशास्त्रज्ञ मि. सी. ई. जी. कॅटलिन् यानें या शास्त्राची जी व्याख्या केली आहे त्याप्रमाणें माणसांमाणसांतील संबंध आपल्या लगामीं राखून एकंदर लोकसमूहावर तावा चालविणें, हा जर या शास्त्राचा मुख्य गड्डा असेल तर त्या कलेंत मोतीलालांइतके निष्णात थोडेच असतील. लोकमान्य, महात्माजी वगैरे माणसांनीं आपल्या उच्च चारित्र्यानें, दीर्घकालीन देशसेवेनें व त्यागी साधुसदृश वागणुकीनें लोकांच्या मनांत स्वतःबद्दल पूज्यभाव उत्पन्न करून सर्व देशावर आपली छाप बसविलेली असेल. पण ज्या माणसाच्या डोळ्याकडे पाहूनच लोक नमतात, अशा तऱ्हेची रुबाबदार जरबेची मुद्रा किंवा वागणूक त्यांच्याजवळ होती किंवा आहे असें म्हणवत नाहीं. मोतीलालांसारखीच कांहींशीं भीतिप्रद जबरेची मुद्रा सर फिरोझशहा मेथांजवळ होती, असें सांगतात. फिरोझशहांच्या समोर गोखले असोत, टिळक असोत वा दुसरे कोणी असोत, त्यांवर त्यांची छाप पडल्याखेरीज रहात नसे, त्यांच्या देखत नाहीं म्हणण्याची कोणाची प्राज्ञा नसे—मग मागाहून कोणी कांहींहि करोत—असें म्हणतात. तशाच तऱ्हेची मुद्रा मोतीलालांना लाभलेली होती. कांहीं वर्षांमागें दिल्लीच्या असेम्ब्लीचें कामकाज पाहण्यासाठीं एक इंग्रज बातमीदार या देशांत आला होता. त्यानें मोतीलालांची तुलना प्राचीन रोमन पॅट्रिशिअन् ( सरदारी ) सेनेटराबरोबर केली आहे. त्यांची ती अणकुचीदार प्रथमदर्शनींच डोळ्यांत भरण्यासारखी हनुवटी, तो भव्य भालप्रदेश, ते तेजस्वी डोळे, यांच्याकडे पाहून हा माणूस लोकांवर अंमल चालविण्यासाठींच जन्मलेला आहे, असें एकदम कोणालाहि वाटे.

पंडित मोतीलाल हे जाडे विद्वान् नव्हते, उत्तम वक्तेहि नव्हते किंवा कांहीं नवमतप्रतिपादकसुद्धां नव्हते. त्यांहून खुद्द त्यांच्या कायद्याच्या विषयांतहि जास्त तरबेज किंवा गाढे पंडित बरेच आहेत. वक्तृत्वांत सर तेजबहादुर, शास्त्री, जयकर किंवा जिन्हा यांच्याशीं तुलण्यासारखे ते नव्हते.

ते अरविंद घोष, चित्तरंजनदास यांसारखे स्वप्नसृष्टींत विहार करणारे कधींच नसून त्यांना महात्माजींप्रमाणें जगाला एखादा संदेशहि कथन करावयाचा नव्हता. अमक्या एका बाबीबद्दल म्हणजे त्यांचें कांहीं ठाम मत होतें किंवा एखादा सिद्धांत त्यांना प्रतिपादून अंमलांत आणून दाखवावयचा होता असेंही नाहीं. पण या अभावांतच त्यांच्या कर्तृत्वाचें बीज सांठविलेलें होतें. ज्या कामांत आपण एकदां पडावयाचें त्याचा पिच्छा पुरविण्यांतच त्यांची कर्तबगारी दिसून येत असे. आपली बाजू वादविवादानें किंवा उलाढाली, खटपटी वगैरे करून दुसऱ्याच्या गळीं उतरवण्याची कला त्यांच्यांत विशेष प्रामुख्यानें वास करीत होती. हातीं घेतलेल्या कार्यासाठीं चिकाटीनें लढणें व तें कुशलतेनें, कधीं थांबून तर कधीं जोराचा हल्ला प्रतिपक्षावर चढवून, कधीं बोलाचाली करून तर कधीं दुसऱ्यांचीं कारस्थानें त्यांच्याच गळ्यांत अडकवून देऊन, इष्ट कार्य-सिद्धीसाठीं झगडावें कसें हें त्यांस उपजतच कळत होतें असें दिसतें. न्याय-कोर्टांत किंवा कायदेकौन्सिलांत त्यांच्या या गुणांचा उपयोग उत्तम तऱ्हेनें होऊं शकत असे; तसाच तो मोठ्या प्रमाणावरील लोकशाहीच्या चळवळींतहि होत असे. मुत्सद्देगिरी व झुंझारपणा हेच त्यांचे मुख्य उदयकारी गुण होते. कोणत्याहि मताला, कोणत्याहि सिद्धान्ताला किंवा कोणत्याहि तत्त्वाला त्यांनीं आपल्या उराशीं घट्ट धरून ठेवलेलें नव्हतें. त्यामुळें जरूरीप्रमाणें बदलण्याची त्यांची तयारी असे, व हाच गुण राजकारणाच्या आखाड्यांत उतरणाऱ्या दूरदर्शी मुत्सद्याजवळ जरूर असावा लागतो. भीष्माप्रमाणें प्रतिज्ञा करून तदनुरूप वागणें हें व्यक्तिदृष्ट्या मोठेपणाचें निदर्शक असेल किंवा वरच्या प्रतीच्या दैवी नीतिमत्तेचें द्योतकहि असेल; पण कोट्यावधी माणसांच्या हिताचा विचार मनाशीं बागवून व त्यांना आपल्याबरोबर नेहमीं घेत राहून इष्ट मार्ग आक्रमीत राहणें हें जास्त समाजहितकारक म्हणावें लागेल. प्रचंड जनसमूहांत नाना मनोवृत्तींचे, नाना हितसंबंधांचे, नाना दर्जाचे लोक असतात. त्या सर्वांचीं अंतरें राखून काम करणें हेंच जर मुत्सद्देगिरीचें सारसर्वस्व असेल, तर तो गुण गांधींसारख्या पुरुषांपेक्षां लोकमान्य किंवा मोतीलाल यांजवळच जास्त वसत असतो, असें बहुतेकांना

वाटेल. पंडित मोतीलाल हे हाडानें क्रांतिकारक वृत्तीचे नसून प्रगतिप्रिय होते. जुनें आणि नवें यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण करून काम साधण्याची कला त्यांजवळ होती. जुन्याचा सर्वस्वीं नायनाट करून एकदम नवा मनु प्रस्थापित करण्यासारखी त्यांची मनोरचना नव्हती. नवीन कल्पना पुढें ठेविल्याबरोबर तदनुरूप बदलण्याला माणूस कांहीं यंत्र नाहीं, ही गोष्ट त्यांना कळत असे. ठाम मतांचा उपसर्ग त्यांस कधीं बाधलेला नसल्यामुळेंच त्यांना एकदम आनंदभवनांतल्या सुखशय्येवरून राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत पडतां आलें, किंवा राजकारणांतहि सनदशीर मार्ग सोडून असहकारिता, असहकारिता बंद ठेवून कौन्सिलांत जाणें, कौन्सिलें सोडून स्वातंत्र्याच्या चळवळींत पडणें, हे प्रकार जरूरीप्रमाणें साधूं शकले. धर्माच्या बाबतींतहि त्यांची अशीच स्वतंत्र वृत्ति होती. युरोपियन, मुसलमान वगैरेंशीं समानत्वानें मिसळत राहण्यापासून मरणाच्या दिवशीं रामनामाचा जप करणें किंवा गायत्रीमंत्र स्मरणें त्यांना शक्य झालें. अनेक मुसलमानांनाहि ते आपल्यांतीलच वाटत असत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या त्यांच्या गुणांचा उपयोग देशाच्या प्रचलित वातावरणांत मोठा होता. पंडित मोतीलालांच्या शब्दांवर किंवा करारावर मुसलमानांचाहि पूर्ण विश्वास त्यामुळें बसूं शकत असे. एकदां केलेला करार ते मोडणार नाहींत याबद्दल सर्वांची खात्री असे. अशा सर्वांच्या विश्वासास पात्र झालेल्या माणसाच्या मृत्यूनें झालेली हानी भरून येणें आज तरी अशक्य आहे.

त्यांच्याशीं लढणाऱ्या विरुद्धपक्षालासुद्धां त्यांच्याबद्दल केव्हांहि द्वेष किंवा अनादर वाटणें शक्य नव्हतें. गोऱ्या लोकांसहि ते परकेपरके असे वाटत नसत. समानत्वाच्या दर्जानें गव्हर्नरांबरोबरसुद्धां नेहमीं वागत आल्यामुळें मोतीलालांत अशा तऱ्हेचा डौलदार आत्मविश्वास निर्माण झालेला होता कीं, तेणेंकरून त्यांसहि ते आपल्यांतीलच वाटूं शकत. मोतीलालांसारखा माणूस कधीं सरकारी बाजू सोडून एकदम विरुद्ध पक्षांत सामील होईल असें युरोपियन लोकांना कधींच वाटलें नाहीं, व ते एकदम तुरुंगांत जाण्याइतके चळवळींत पडलेले त्यांनीं पाहिले तेव्हां ते आश्चर्यानें चकितच झाले ! मोतीलालांच्या

असहकारितेच्या काळांतील या तुरुंगवासाच्या वेळीं सर हार्कोर्ट बटलर हे संयुक्त प्रांताचे गव्हर्नर होते. ते मोतीलालांचे अगदीं जानीदोस्त होते. आपल्या तुरुंगांत गेलेल्या मित्राची व्यवस्था त्यांच्या सर्व गरजांकडे लक्ष पुरवून या गव्हर्नरांनीं उत्तम ठेवली होती, असें म्हणतात. अशा तऱ्हेची गोष्ट सरकारी अधिकाऱ्यांकडून किंवा एकंदरींत गोरकायांकडून टिळकांच्या बाबतींत होणें केव्हांहि शक्य नव्हतें हें उघड आहे. यावरून मोतीलालांचें वैशिष्ठ्य लक्षांत येईल.

पंडित मोतीलाल नेहरूंचा जन्म स० १८६१ सालीं दिल्ली मुक्कामीं झाला. नेहरू, सप्रू, गुर्तु, कुंझरू वगैरे घराणीं, जीं संयुक्तप्रांतांत आज पुढारलेल्या वर्गात मोडत आहेत, तीं सर्व या प्रांतांतील मूळचीं स्थानिक घराणीं नव्हत. बाहेरून आलेल्या काश्मिरी पंडितांचीं हीं घराणीं आहेत. काश्मिरी पंडित हे सारस्वत ब्राह्मणकुलांत मोडतात. काश्मीर, पंजाब व संयुक्तप्रांत यांत त्यांची वस्ती पसरलेली आहे. या काश्मिरी पंडितांचीं जीं घराणीं मूळ स्थान सोडून पोटाच्या पाठीमागें लागून खालीं मैदानांत उतरलीं, त्यांनीं अर्थात्‌च वैदिक भिक्षुकी सोडून देऊन राजदरबारी शिक्षण घेण्यास सुरुवात केली, व आपल्या पिढीजात हुषारीच्या जोरावर पडतील त्या धंद्यांत व जातील त्या प्रदेशांत ते यशस्वी झाले. हिंदुस्थानांतील अत्यंत कुशाग्रबुद्धीच्या जातींत या काश्मिरी पंडितांची गणना होऊं शकेल. मुसलमानी दरबारांत यांचा ठिकठिकाणीं प्रवेश झाल्यामुळें त्यांस फारशी व आरबी भाषा शिकाव्या लागल्या व या भाषा त्यांच्या इतक्या आंगीं मुरल्या आहेत कीं, एवढ्या पुरते ते मुसलमानांत समान दर्जावर उभे राहूं शकतात. पंडित मोतीलालांना फारसी काव्यें फार प्रिय असत, व काव्यांतील ओळी ते आपल्या भाषणांत किंवा बोलतांना नेहमीं आणीत असत. फारसी व आरबी येणारांना उर्दूंत वक्तृत्व करणें हें अर्थात्‌च केवळ हाताचा मळ आहे. मोतीलाल लहानपणीं दिल्लीच्या मुसलमानी धार्मिक शिक्षणसंस्थांत ( मक्तावांत ) शिकलेले असल्यामुळें त्यांस या दोन्हीहि भाषा चांगल्या येत होत्या. मोतीलालांचे वडील पंडित गंगाधर नेहरू हे दिल्लीस कोतवाल होते व

ते फारसे श्रीमंत नव्हते. मोतीलालांचें शिक्षण दिल्ली व कानपूर मुक्कामीं झालें. त्यांनीं बी. ए. पर्यंतचा कॉलेजचा अभ्यास केला होता तरी ते परीक्षेला बसले नव्हते. त्यांनीं बी. ए. चा नाद सोडून वकिलीच्या परीक्षेकडेच आपला मोर्चा वळविला व त्यांत ते पहिल्या नंबरला पास झाले. त्यांचे बंधु नंदलाल हेच त्यांना पित्याच्या ठिकाणीं होते. कारण मोतिलालांचा जन्म वडिलांच्या मृत्यूनंतर चार महिन्यांनीं झाला होता. नंदलाल हे अलाहाबादेस चांगल्यापैकीं वकील गणले जात असत व त्यांच्याच आश्रयानें मोतीलाल वर चढले. कै. सर सुंदरलाल व मोतीलाल या दोघां वकिलांत अलाहाबादच्या हायकोर्टातील मुख्य कज्जे विभागले जात असत व दोघांनींहि भरपूर पैसा या धंद्यांत मिळविला. मोतीलालांचे खटले मुख्यतः जमिनदारीबाबत असत, व त्यांचे अशील राजे महाराजे, सरदार तालुकदार अशीं मोठीं कुळें असत. मोतिलालांची प्राप्ति सालाची चार पांच लाख होती असें म्हणतात. गेल्या पिढींतील अनेक नामांकित वकील पैसा पुष्कळ कमावीत असत, पण मोतीलालांप्रमाणें तो मुक्तहस्तानें खर्चणारे किंवा भोगणारे फारजण नसत. मोतीलाल आपले कपडे पॅरिसहून शिवून आणवीत असत ही एकच वार्ता सांगितली कीं त्यांच्या राहाणीची व वैभवाची कल्पना येईल. पंडितजींचे एकुलते एक चिरंजीव जवाहरलाल यांच्यावर त्यांचें एवढें प्रेम होतें कीं, त्यांच्या मर्जीसाठीं त्यांनीं किती खर्च करूं असें कधीं म्हटलें नाहीं, व मोतीलालांचें राजकारणांत पडणें किंवा त्यांत वेळोवेळीं विशिष्ट मार्ग पत्करणें हेंहि मुलाच्या प्रेमामुळेंच शक्य झालें, अशी सामान्य समजूत आहे. इंग्रजांशीं समान शिक्षण घेऊन त्यांबरोबर वाढलेल्या जवाहरलालांस आपल्या काळेपणाच्या हीनतेची व देशाच्या पारतंत्र्याची तीव्र जाणीव राजकारणांत पाडण्यास कारणीभूत झाली असावी, असा तर्क आहे. मोतीलाल त्यांच्या वैभवामुळें व उच्च स्थानामुळें एकदां स० १९०७ सालीं प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष झाले होते व प्रांतिक कायदे-कौन्सिलांतहि ते होते; तरी बिझांटबाई राजकारणांत पडेपर्यंत ते फारसे आस्थेनें या बाजूकडे वळले नव्हते, असें म्हणावयास हरकत नाहीं. थिऑ-

सफीच्या ओढ्यामुळें जीं अनेक घराणीं राजकारणांत पडलीं त्यांतीलच नेहरू घराणें म्हणावें लागेल. स० १९१७ सालापासून मात्र त्यांचें मुख्य लक्ष राजकारणांत खर्ची पडूं लागलें. सन १९१९ सालच्या पंजाबांतील लष्करी अंमलापासून व जालियनवाला बागप्रकरणापासून मोतीलाल राजकारणांत पडले, ते कायमचेच. पंजाबांतील ओडवायरशाहीच्या अत्याचारांची हकीकत त्यांनीं चौकशी करून प्रसिद्ध केली, त्यामुळें ते एकदम पुढें आले व त्या सालीं अमृतसर कॉंग्रेसचे अध्यक्षहि झाले. पुढील सालीं त्यांनीं असहकारितेच्या आगींत उडी घेतली व त्या वेळीं तुरुंगवासहि त्यांनीं भोगला. तुरुंगांतून सुटून आल्यावर जिकडेतिकडे सामसूम झालेली पाहून त्यांनीं कायदेकौन्सिलांत जाण्याचा व सरकारशीं त्यांच्या घरांतच चार हात करण्याचा विचार केला, व गांधींच्या मर्जीविरुद्ध जाऊनहि तो अंमलांत आणला. मॉंटेगचेम्सफर्ड सुधारणांची फजिती व अव्यवहार्यता त्यांनीं जशी आपल्या असेंब्लींतील पराक्रमानें पटवून दिली तशी दुसऱ्या कोणी दिली नसेल ! या ठिकाणींच त्यांचें वैशिष्ट्य, तेज, मुत्सद्देगिरी व अनेकांना एकत्र आणून काम करून घेण्याची रीति, हीं सर्व प्रकट झालीं व दासांच्या मृत्यूनंतर ते देशाच्या पुढाऱ्यांत गांधींच्या खालोखाल समजले जाऊं लागले. पंडित मालवीय, लजपतराय वगैरे माणसेंहि म्हणजे कमी असें नव्हे, पण त्याहूनहि मोतीलालांचें कौन्सिलांतील कर्णधारत्व जास्त कुशलतेचें होतें असें म्हणावें लागतें. यानंतर बर्कनहेडच्या दर्पोक्तीस उत्तर म्हणून जो राज्यघटनेचा मसुदा सर्वपक्षीय परिषदेच्या मार्फत तयार करण्यांत आला, त्या वेळीं त्यांचें राजकारणकौशल्य जास्तच तेजानें प्रकट झालें. यानंतर सायमन कमिशनवर बहिष्कार, कलकत्त्याच्या कॉंग्रेसमधील त्यांची सरकारला एक वर्षाची मुदत देऊन निरोप पाठविण्यांत दिसून आलेली मुत्सद्देगिरी व लाहोरच्या राष्ट्रीय सभेंत तरुणांच्या धडाडीनें स्वातंत्र्यसंग्रामांत पडण्यांत त्यांनीं दाखविलेली निर्भयता, यामुळें त्यांचें नांव या देशांत सारखें दुमदुमत राहिलेलें आहे. कांहीं आगापिछा नसणाऱ्या माणसानें चळवळीच्या आगींत पडणें वेगळें व राजसदृश वैभवांत रुळणाऱ्या माणसानें सर्व वाढविछायत,

घरदार, कुटुंब यांसह उडी घेणें वेगळें, हें उघड आहे. नेहरू घराण्याचा त्याग हें प्राचीन आर्यांच्या आनुवंशिक उच्च मनोवृत्तीचें व संस्कृतिविशेषाचें एक झळझळीत विशेष उदाहरण आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. पंडितजींत ब्रह्मतेजापेक्षां क्षात्रतेज जास्त निदर्शनास येत होतें. त्यागापेक्षां भोगाकडेच त्यांची मूळ प्रवृत्ति होती; पण रक्तांत सुप्त असलेलें ब्रह्मतेज शेवटीं त्यागरूपानें बाहेर पडलेंच. किंवा खरें पाहूं जातां ब्रह्मतेज किंवा क्षात्रतेज असा भेद न मानतां एकंदरींत उच्च आर्यध्येयांचें प्रदर्शन त्यांच्या ठायीं झालें, असेंच म्हटलें पाहिजे. आर्यांच्या ध्येयांचें उत्तम वर्णन कालिदासाखेरीज कोण करणार ? रघुवंशांत रघुराजांचें जें वर्णन केलेलें आहे, त्याचीच छाया नेहरू घराण्यांत पडलेली दिसते.

**शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ॥**
**वार्धक्ये मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ॥ १ ॥**

या वर्णनाप्रमाणें मोतीलालांनीं बालपणांत अभ्यास, तरुणपणांत यावच्छक्य राजविलास करून वयाच्या ६० व्या वर्षी एकदम जादूची कांडी फिरल्याप्रमाणें मुनीवृत्तीचा अवलंब केला, व अखेरीस स्वराज्ययोग साधूनच तनुत्याग केला, असें म्हणावयास हरकत नाहीं. ‘ त्यागाय संभृतार्थानाम् ’ या वचनाप्रमाणें कमावलेला पैसा हा देशकार्यासाठीं व अतिथिसत्कारासाठींच मिळविलेला आहे, असें त्यांनीं स्वतःच्या वर्तनानें सर्वांस दाखवून दिलें आणि त्यांचें भाग्य एवढें थोर व पुण्याई एवढी सबळ कीं रघुराजांप्रमाणें आपल्या हातानें आपल्या डोक्यावरील राष्ट्रनेतृत्वाचा मुकुट खालीं उतरून तो मुलाच्या डोक्यावर—व तो ‘ बापसे बेटा सवाई ’ अशा जवाहरलालांसारख्या सुपुत्राच्या डोक्यावर ठेवतां आला. संसारांतील अत्यंत दुर्लभ अशा जातीच्या भाग्यांत या गोष्टीची गणना करावी लागेल, यांत संशय नाहीं. लाहोरच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींतील हा देखावा प्रेक्षकांच्या डोळ्यांतून अश्रु बाहेर पाडण्यास कारणीभूत झाला होता. त्या वेळीं पंडित मोतीलालांनीं एक फारसी काव्यांतील चरण म्हणून दाखविला होता. त्या चरणाचा अर्थ असा होता कीं, बापानें जें कार्य अर्धवट ठेवलें आहे, तें

मुलगा यशःसिद्धीला नेईल. आतां मृत पंडितजींच्या या जिवंतपणीं काढलेल्या उद्गारांप्रमाणें खरोखरीच अशी गोष्ट घडो व जवाहरलालांकडून हें स्वराज्यस्थापनेचें कार्य सिद्धीस जावो, असेंच प्रत्येक भारतवासी आज ईश्वराजवळ प्रार्थीत आहे.

पंडित मोतीलालांच्या व्यक्तिस्वभावनिदर्शक अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, व त्या सध्यां अनेक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत आहेत. बहुधा समाजांत असें आढळतें कीं दुसऱ्यावर छाप बसविणारे जरबेचे पुरुष अंतःकरणाचे कठोर असतात. पंडित मोतीलालांच्या बाबतींत अशी गोष्ट नव्हती. खासगी संभाषणांत किंवा इतरांबरोबर वागण्यांत त्यांचा मनमिळाऊपणा, मनाचा उदारपणा, हृदयाचा हळुवारपणा वगैरे गुण अनेक वेळीं प्रगट होत असत. मोतीलाल हे अलाहाबाद, दिल्ली, सिमला वगैरे ठिकाणच्या उच्च, सुशिक्षित स्त्रीसमूहांतहि फार लोकप्रिय असत. असेंब्लींत जाण्यापूर्वींच्या काळांत पंडितजींची झुबकेदार मिशी ही एक चर्चेचा विषय होऊन बसली होती. इतकी कीं त्यांनीं एक दिवस ती उतरून आपल्या नव्या खादीच्या संन्यासी वेषास अनुरूप असा मिशीचा संन्यासहि केला तेव्हां प्रतिष्ठित स्त्रियांचें एक मंडळ त्यांकडे त्यांच्या वर्तनाबद्दल निषेध करण्यासाठीं गेलें होतें. मोतीलालांनीं त्यांस पुन्हां मिशी ठेविण्याबद्दल आग्रह करण्यास आलेल्या या बायांस "तुमच्या सूचनेचा योग्य तो विचार शांतपणें केला जाईल," असें उत्तर दिलें. असे पंधरा दिवस गेल्यानंतर सरोजिनी नायडूसहित या स्त्रियांस असें वाटावयास लागलें कीं, मोतीलाल मिशी काढण्यानेंच बरे दिसतात. पंडितजींच्या बोलण्यांत काव्यमयता, विनोद वगैरे भरपूर असे. मात्र या गोष्टींचा उपयोग ते योग्य ठिकाणींच करीत असत. प्राचीन आर्य, मध्ययुगीन मुसलमानी व आधुनिक युरोपीय अशा तिन्ही संस्कृतींतील उच्च गुणांचें त्यांच्यांत असें सुंदर मिश्रण झालें होतें कीं, त्यांच्या आयुष्याला जन्मजात सौंदर्याबरोबरच विशेष मधुरपणा प्राप्त झाला होता.

पंडित मोतीलालांच्या विशिष्ट गुणांची या देशाला जितकी जरूरी आज होती तितकी पूर्वी कधींच नव्हती. पंडितजींनीं गेलीं दोन वर्षें जें राजकारण

कुशलतेनें व धडाडीनें चालविलें होतें, त्याचा फायदा करून घेण्याचा समय प्राप्त झालेला होता. मोतीलाल हे मागल्या किंवा पुढल्या काळासाठीं नसून वर्तमानकाळासाठीं मुख्यतः जन्मलेले होते. स्वराज्यांतील मुख्य प्रधान असें टोपण नांव त्यांना जो तो लावीत होता. महात्माजी व मोतीलाल यांचे गुणावगुण परस्पर पोषक व पूरक होते. जें काम महात्माजींच्या साधुत्वाकडून होण्यासारखें नाहीं तें मोतीलालांकडून तडीस जाण्यासारखें होतें. जवाहरलाल व महात्माजी यांवर कांहीं वजन पडूं शकतें तर तें मोतीलालांचेंच पडलें असतें. आतां मोतीलाल गेल्यामुळें मोठा चिंताजनक कठीण समय प्राप्त झाला आहे. महात्माजी देशाचें हृदय मानलें तर मोतीलालजी हे मेंदू मानण्यासारखे होते. हृदयानें कोणत्याही गोष्टीचा ठाव घेतल्याखेरीज मेंदूकडून व्यवस्थित काम होऊं शकणार नाहीं, हें खरें, पण मेंदूचें म्हणजेच शुद्ध कठोर बुद्धीचें काम हें अनेक प्रसंगीं हृदयाच्या उमाळ्यांनीं बिघडतें हेंहि तितकेंच खरें आहे. स्वराज्यसाधनासाठीं प्रचंड विद्युच्छक्ति निर्माण करण्याचें काम टिळकांनीं किंवा गांधींनींच करावें. पण ही विद्युत् योग्य प्रमाणांत योग्य वेळीं, योग्य ठिकाणीं नळ्यांनीं पुरवून तिचा योग्य उपयोग करून घेणें हें इतरांस त्याहून जास्त साधण्यासारखें होतें. अशा इतरांत मोतीलालजी हे अग्रेसर होते, असें म्हणावयास हरकत नाहीं. महात्माजींना मोतीलालांच्या उपयोगाची जाणीव किती आहे, हें त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरूनच कळून येण्यासारखें आहे. 'माझी स्थिति विधवाबाईपेक्षांहि जास्त शोचनीय व कठीण आहे.' असें महात्माजी म्हणाल्याचें प्रसिद्ध झालें आहे. 'स्वराज्य आपल्याला मिळालेंच आहे.' असें मोतीलाल गांधीजवळ मरणाच्या आदल्याच दिवशीं बोलले होते, असें महात्माजी सांगत आहेत. पंडित मोतीलालांच्या या उद्गारांचा अर्थ काय हें आतां कोण सांगूं शकणार !

प्रस्तुत चळवळींत झालेल्या त्रासामुळें, सोसलेल्या दगदगीमुळें व भोगलेल्या तुरुंगवासामुळें मोतीलालांचें मरण अलीकडे आलें, असेंच कोणासहि वाटणार. एरव्हीं त्यांच्या एकंदर पिंडाकडे व प्रकृतीकडे पाहतां आणखी १० वर्षें तरी ते वांचतील अशी आशा सर्वांस वाटत होती. प्रस्तुत चळवळीनेंच

म्हणजे या चळवळींतील सरकारच्या जुल्मानेंच त्यांचा प्राण घेतला, असें म्हणावयास हरकत नाहीं. मोतीलालांनीं वयाच्या ७० व्या वर्षी आनंदभवन सोडून तुरुंगवास पत्करण्यांत जी धडाडी दाखविली ती तरुणांनाहि लाजवील अशीच होती. त्यांच्या या आत्मबलिदानानें तरी या देशांतील तरुणांस व म्हाताऱ्यांसहि सुबुद्धि सुचो व त्यांच्या चिरंजिवांच्या नेतृत्वाखालीं त्यांचें ईप्सित कार्य सिद्धीस जावो असें म्हणून जड अंतःकरणानें आम्ही लेखणी खालीं ठेवतों.

प्रगती } वर्ष २, अंक ३७
ता. १२ फेब्रुवारी १९३१

# भगतसिंह, राजगुरु व सुखदेव

**भगतसिंग, राजगुरु, सुखदेवप्रभृति इसमांवर** चाललेल्या लाहोरच्या कटाच्या खटल्याचा निकाल होऊन उपरिनिर्दिष्ट तीन इसमांस फांशीची शिक्षा झाली व इतरांस कोणास जन्मठेप तर कोणास पांचसात वर्षें सक्तमजुरी मिळाली. कटाचा हा खटला व्हाइसरॉयांच्या एका स्वतंत्र ऑर्डिनन्सनें चालविण्यांत आलेला असल्यामुळें त्यावर अपील नाहीं. व्हाइसरॉयांना याबाबत वटहुकूम काढावा लागला, यावरूनच आरोपींवर आरोप शाबीत करण्याची निःसंदिग्ध तयारी पोलिसांजवळ नव्हती, असेंच कोणासहि वाटेल. अर्थात् वटहुकुमाचा हेतु बाह्यतः आरोपींच्या सरकारास अडथळा करण्याच्या कृत्यांस आळा घालण्याचा म्हणून जाहीर झालेला असला, तरी आपल्या कृत्यांची छाननी दुसरा कोणी करणार नाहीं, अशी खात्री असणारे अधिकारी कशा तऱ्हेनें वागले असतील याचें अनुमान होतें. ज्या ठिकाणीं कटाशीं काडीमात्र संबंध नसणाऱ्या सोलापुरच्या प्रजाजनांच्या गोळीबारानें झालेल्या मृत्यूंची दाद लागूं शकत नाहीं किंवा त्याविरुद्ध एखादा ठरावहि कौन्सिलांत मंजूर होऊं शकत नाहीं, त्या ठिकाणीं या प्रकरणानें विशेष न्याय मिळेल, अशी आशा करणें चुकीचें ठरतें. म्हणून आम्ही कायद्याच्या दृष्टीनें या प्रकरणावर कांहींहि लिहूं इच्छित नाहीं. तें काम या देशांतील कायदेपंडित वृत्तपत्रकार हिंदू, ट्रिब्यून वगैरे वर्तमानपत्रांत करीतच

आहेत; पण कायद्याच्या पलीकडेहि सारासार विवेक हा असतोच. जर या फांशीं जाणाऱ्या आरोपींपैकीं एखादाहि इसम खरोखरी गुन्हेगार नसून फांशीं जात असला तर ती खऱ्या न्यायाच्या दृष्टीनें गैरच गोष्ट होय, असें म्हणावें लागेल. आणि ज्या ठिकाणीं भरपूर पुरावा मिळूं शकत नाहीं अशा तऱ्हेच्या ऱ्या खटल्यांत तशा तऱ्हेचा अन्याय होण्याचा संभव बराच आहे हें सरकारासहि नाकबूल करतां येणार नाहीं. मग ज्या ठिकाणीं यत्किंचित्‌हि संदेह उत्पन्न होतो, त्या ठिकाणीं संशयाचा फायदा आरोपींस देऊन निदान त्यांची फांशीची शिक्षा रद्द करणें योग्य होणार नाहीं काय? एखाद्या इसमास एकदां फांशीं दिल्यावर मग तो निरपराधी असल्याचा पुरावा कोठून तरी पुढें आला तरी काय कामाचा? शिक्षेचा हेतु डोळ्याला डोळा व दांताला दांत घेण्याचा नसून समाजांत न्यायबुद्धि वाढावी व गुन्ह्यास प्रवृत्त झालेल्या इसमास सुधारावें, असा असतो. अलीकडे सर्व जगांत फांशीची शिक्षा रद्द करण्याबद्दल चळवळ सुरू आहे. अनेक देशांत ही शिक्षा यापूर्वींच बंद करण्यांत आलेली आहे. या इसमांस फांशी देण्यानें आत्तां अगदीं क्षणांत होऊं घातलेल्या बंडाचा मोड दहशतीनें होणार आहे, असेंहि नाहीं. मग सरकारनें या बाबतींत या देशांतील प्रचंड लोकमत लक्षांत घेऊन थोडी दया दाखविली तर तें गैर तर ठरणार नाहींच, पण उलट राज्यास बळकटी आणणारें ठरणार आहे. म्हणून न्यायांतील संदेह, शिक्षेचा उद्देश, शिक्षेचा लोकमतावर होणारा परिणाम वगैरे सर्व बाबी लक्षांत घेऊन सरकारनें या प्रकरणीं वागावें हें त्याच्या हिताचें आहे.

व्यक्तिविषयकदृष्ट्या पाहतां आजचे हिंदुस्थानांतील क्रांतिकारक हे श्रेष्ठ दर्जाचे राष्ट्रप्रेमी खासच ठरण्यासारखे आहेत. त्यांचा मार्ग आपणांस पसंत असो वा नसो, तो इष्ट असेल वा नसेल, त्यापासून इष्ट कार्यसिद्धि होईल किंवा न होईल, असा विचार करूनहि एका हातांत शिरकमल घेऊन हिंदमातेच्या चरणीं वाहावयास निघालेल्या या तरुणांच्या धारिष्ट्याबद्दल व नितान्त राष्ट्रप्रेमाबद्दल कोणासहि त्यांच्यापुढें मान लववावी लागेल व म्हणूनच महात्मा गांधींच्या अहिंसेच्या मार्गाचा प्रसार सर्वांत जास्त ज्या ठिकाणीं

झाला आहे, त्या मुंबईतील लोकांनीं शिक्षेची वार्ता ऐकून अगदीं कडकडीत हरताळ पाडला व आजपर्यंत गेल्या सहा महिन्यांच्या चळवळींतसुद्धां जेवढी गर्दी सभेस जमली नव्हती तेवढी सुमारें एक लाख लोकांची गर्दी येथील मैदानांतील सभेस जमली होती. यावरून अखिल जनतेस या प्रकरणाबाबत काय वाटत आहे याची कल्पना सरकारास येण्यासारखी आहे. बॅ. सेनगुप्त यांनीं त्या दिवशीं सांगितल्याप्रमाणें लोकांनीं अहिंसेचा मार्ग सोडला असा त्याचा अर्थ नसून या व्यक्तींच्या श्रेष्ठ व वंदनीय ध्येयवत्तेबद्दल वाटणारें कौतुक व आदर लोकांनीं आपल्या वर्तणुकीनें व्यक्त केलीं एवढाच याचा अर्थ आहे. भगतसिंगाबद्दल पं. मोतिलालांसारख्या कोणापुढें सहसा न नमणाऱ्या किंवा दवणाऱ्या पुरुषास काय वाटलें हेंहि लक्षांत ठेण्यासारखें आहे. ज्यांची स्तुति सर्व पाश्चात्य व इंग्रज वातमीदार प्राचीन उच्च कुलांतील ( पॅट्रीशीअन् ) रोमन सेनेटरांप्रमाणें रुबाबदार दिसणारा अशा गौरवदर्शक शब्दांनीं करतात, त्या पं. मोतिलालांनाहि भगतसिंगास भेटून असें वाटलें कीं, उभ्या जन्मांत आज आपल्याहून श्रेष्ठतर माणूस आपणास भेटला. भगतसिंगाचें या सबंध खटल्यांत जें वर्तन दिसत आलें आहे व ज्या शांतपणानें तो फांशीची शिक्षा अगदीं एक शब्द उच्चारल्याखेरीज भोगावयाची असा आपला निर्धार व्यक्त करीत आहे त्याकडे पाहतां कोणाहि माणसास त्याची स्थितप्रज्ञ योग्याशीं तुलना करावीशी वाटेल. अशा श्रेष्ठ ध्येयवत्तेचे शूर तरुण फांशी देऊन सरकार या देशांत वसाहतीच्या स्वराज्याचा अंमल शक्य तितक्या लवकर सुरू करणार आहे या म्हणण्यावर कोणाचा विश्वास बसेल ? भगतसिंगासारख्या माणसांची योग्यता स्वराज्यांतील सेनापति होण्याची दिसते. म्हणून व आयरिश बंडांतील अनेक फांशीची शिक्षा दिलेल्या पुढाऱ्यांनासुद्धां इंग्लंडांतील आपल्या जातभाईनीं समानत्वाच्या हक्कानें पुढें बोलाचालीस बोलाविलें हा इतिहास लक्षांत घेऊन या देशांतील सरकार वागेल काय ? सरकारच्या हातीं एका क्षणांत या इसमांस फांशीं देणें आज आहे, हें सर्व हिंदी लोक व स्वतः आरोपीसुद्धां पूर्णपणें ओळखून आहेत; पण फांशीच्या शिक्षेचा परिणाम ब्रिटिश राज्यास

वळकटी आणण्याऐवजीं त्या राज्याच्या पायाचे दगड ढिले करण्याकडे होईल, असा स्पष्ट इषारा सरकारास देणें या प्रसंगीं आम्ही आपलें कर्तव्य समजतों. कोट्यवधी प्रजेच्या मनास दुखवून कोणतेंहि राज्य स्थिर होत नसतें.

**प्रगति** } वर्ष २, अंक २०
ता. १६ आक्टोबर १९३०

*   *   *

**भगतसिंग, राजगुरु व सुखदेव** अखेरीस देहाच्या विटंबनेंतून मुक्त झाले ! अधिकारीवर्गाचें मन किती पालटलें आहे, याचा हा भक्कम नवा पुरावा हिंदी लोकांस लाभला आहे. लोकांच्या विरुद्ध राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांचे जीव अनन्वित कृत्यें करूनहि सुरक्षित राहावे, त्यांच्या दुष्ट कृत्यांचा जाब त्यांस कोणत्याहि रीतीनें विचारला जाऊं नये म्हणून ही दराऱ्यानें राज्य करण्याची पद्धति या देशांत चालू आहे. सॉंडर्स सारख्यांच्या लाठीवाजीनें लाला लजपतराय दगावले तर त्यांच्या जिवाची कितीशी किंमत ! त्या बावतींत पोलिसांच्या कृत्याची नुसती चौकशीहि सरकार करूं देणार नाहीं ! पण जर कां एखादा सॉंडर्स किंवा दुसराहि क्षुद्र अधिकारी प्राणास मुकला तर त्याची भरपाई जिवाला जीव घेऊनच झाली पाहिजे ! जेथें सोलापूरचे गर्दीत सांपडलेले चार पुढारी फांशीं दिले जातात, तेथें सांगून सवरून क्रांतिकारक बनलेले भगतसिंगप्रभृति फांशीं जावे, यांत काडीचेंहि आश्चर्य नाहीं व हे तीन जीव घेऊनच ब्रिटिश राज्य म्हणजे नोकरशाहीचें राज्य या देशांत स्थिर होणार असेल तर तिनें ते अवश्य घ्यावे असेंच आम्ही म्हणतों. या देशांत अशी विपरीत स्थिति अस्तित्वांत आलेली आहे कीं, लोकांच्या पैशानें लठ्ठ पगार देऊन पोसलेले व स्वतः कागदोपत्रीं ‘ आपले अत्यंत आज्ञाधारक सेवक ’ असें म्हणवून घेणारे सरकारी नोकरच शिरजोर होऊन मन मानेल तसा राज्यकारभार कायद्याचें सोंग राखूनहि करूं शकतात. त्यांस जाब विचारूं शकणारा या पृथ्वीवर तरी कोणी नाहीं; आकाशांत असल्यास न कळे ! असेंब्लींत या विषयावर प्रश्नोत्तरें झालीं असतां गृहमंत्री गंभीरपणानें सांगतात कीं, आम्हीं वरील

तीन इसमांना फांशीं दिलें नसतें तर **आम्ही हिंदुस्थानाबद्दल आमचें कर्तव्य केलें नाहीं, असें झालें असतें.** केवढी हिंदुस्थानाबद्दलच्या कर्तव्याची ही नोकरशाहीची तळमळ ! बापड्यांचे जीव या देशाच्या कल्याणासाठीं नेहमीं कासावीस झालेले आहेत ! हिंदुस्थानाच्या कल्याणाचें काय व अकल्याणाचें काय हें या देशांतील मोठमोठ्या पंडितांपेक्षांहि या शिरजोर नोकरांना जास्त कळत असतें. बाकी हें सर्व इंग्रजांच्या पालकपणाच्या सोंगास शोभण्यासारखेंच आहे. या देशांतील लोक दूध कसें ओढावें हें न समजणारीं कुकुवाळें ! तेव्हां त्यांच्या हिताची गोष्ट कडू असली तरी या आमच्या दाईला बोंडल्यानें पाजणें भाग ! महात्मा गांधींना व त्यांच्या अनुयायांना हिंसाहिंसेच्या पेंचांत पकडण्याची मोठी शिताफी नोकरशाहीनें या गोष्टीनें दाखविली आहे, यांत संशय नाहीं. ज्याप्रमाणें द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं भीष्म मुकाट्यानें वसले, त्याप्रमाणेंच महात्मा गांधी या गोष्टीबद्दल शब्द काढणार नाहींत, अशी खूणगांठ बांधून नोकरशाहीनें आपला हेतु सिद्धीस नेला. येणेंकरून नोकरशाहीचा राजकीय हेतूहि सिद्धीस जाण्यास मदत होणार आहे. नोकरशाहीच्या इच्छेपुढें या देशांतील तीस कोटी लोकांचें मतहि फुकट, महात्मा गांधींच्या किंवा दुसऱ्या कोणाच्याहि इच्छेचा प्रभाव शून्य, असें दृश्य वचक वसण्यासाठीं नोकरशाहीनें भीषणपणें दाखविलें आहे. तसेंच या डावानें गांधींचें तरुणांवरील वजन कमी होण्यास मदत होऊन त्यांची बाजू तितकीच ढिली होईल, असा तर्क नोकरशाहीनें केला असावा. आपणास भारी झालेल्या कॉंग्रेसपक्षांत फूट पाडण्यासाठीं मुद्दाम सर्वांच्या नाकावर टिचून या फांशीच्या शिक्षा अमलांत आणल्या गेल्या असाव्यात. सज्जनांचे मुकुटमणि म्हणून गाजले जाणारे जे इर्विन बहादुर त्यांच्या सज्जन नवनीतसम कोमल मनाचा थांगहि पुनः एकदां या नव्या अनुभवानें हिंदी लोकांस लागला आहे. दयेवांचून न्याय हा भुतांच्या हातांतील कोलिताचा खेळ आहे, याचें हें ताजें उदाहरण आहे.

प्रगति } वर्ष २, अंक ४३
ता. २६ मार्च १९३१

# नोबेल पारितोषिकाचा जनक आल्फ्रेड नोबेल

वर्तमानपत्रांतील परदेशाच्या तारा वाचणाऱ्यांनीं गेल्या आठवड्यांत जाहीर झालेला नोबेल बक्षिसांचा या वर्षीचा निकाल वाचला असेलच. या वर्षी नोबेल वाङ्मयपारितोषिक टॉमस मन् या जर्मन कादंबरीकाराच्या वांट्याला आलें असून, यंदाचें नोबेल शांतिपारितोषिकहि एरिक रेमार्क नांवाच्या दुसऱ्या जर्मन कादंबरीकाराला देण्यांत येणार, अशी दाट वदंता आहे. रेमार्कला केवळ लेखक असूनहि शांतिपारितोषिक देण्याचें कारण असें कीं, त्याच्या एका कादंबरीमुळेंच राष्ट्रांराष्ट्रांतील शांततेस पोषक असें वातावरण उत्पन्न झालेलें आहे. ही कादंबरी गेल्या महायुद्धाच्या वर्णनपर असून तिचें सूचक नांव All quiet on the Western Front 'पश्चिम सरहद्दीवर सर्व शांत आहे' असें व्याजोक्तिपूर्ण आहे. यंदाचीं पदार्थविज्ञान व रसायन-शास्त्रविषयक बक्षिसें फ्रेंच व इंग्रज गृहस्थांच्या वांट्याला आलीं आहेत.

नोबेल परितोषिकाचें नांव प्रथम सन १९१३ सालीं हिंदुस्थानास मशहूर झालें. कारण त्या वर्षी कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर यांना त्यांच्या गीतांजलीच्या इंग्रजी अनुवादाबद्दल नोबेल वाङ्मयबक्षीस देण्यांत आलें. तेव्हांपासून हिंदुस्थानचें लक्ष या बक्षिसाकडे वेधलें गेलें आहे. कांहीं वर्षामागें महात्मा गांधींना त्यांच्या अहिंसातत्त्वाच्या पुरस्काराबद्दल नोबेल शांतिपारितोषिक मिळणार अशी बातमी पसरली होती, पण तसा योग घडून आला नाहीं.

उलट ऑस्टिन चेंबर्लेन या इंग्रज परराष्ट्रमंत्र्याला तें दिल्याबद्दल थोडी टीका सर्वत्र झाली. नोबेल बक्षिसें देण्याबाबत मूळ संस्थापकानें कोणतीहि राष्ट्रीय आडकाठी ठेवलेली नसली, तरी निवड करणाऱ्या संस्था नॉर्वे व स्वीडन या देशांतील असल्यामुळें त्यांचें लक्ष यूरोप, अमेरिकेबाहेर फारसें जात नाहीं. यूरोपीय भाषांतून भाषांतर झालेल्या परकी ग्रंथकारांच्या कृतींस संधि मिळणें सोपें जाईल हें उघड आहे. आंतरराष्ट्रीय कीर्ति संपादन केलेल्या इसमासच त्यांचा लाभ होणें बहुधा शक्य होईल. मात्र नेहमीं सर्वांत उत्तम किंवा योग्य किंवा कीर्तिमान् माणसासच त्यांचा लाभ झाला, असें म्हणतां येत नाहीं. जसा गांधींस शांतिपारितोषिकाचा लाभ झाला नाहीं, तसा पूर्वी त्यांचे एक आदर्श जे टॉलस्टॉय त्यांसहि कधीं हें बक्षीस दिलें गेलें नाहीं. उलट अनेक सामान्य, आपल्या लहान देशाच्या बाहेर फारशा ठाऊक नसणाऱ्या इसमांसहि नोबेल बक्षिसें मिळालेलीं आहेत.

नोबेलच्या बक्षिसांचा याप्रमाणें मोठा बोलबाला होत असला, तरी त्यांच्या संस्थापकांचें चरित्र थोड्यांसच अवगत असेल. जगप्रसिद्ध झालेल्या पांच मोठ्या रकमेच्या बक्षिसांचा प्रवर्तक जो आल्फ्रेड नोबेल त्याच्याइतकें विचित्र व बाह्यतः तरी विसंगत वाटण्याजोगें आचरण थोड्यांचेंच असेल. ज्यानें डायनामाइटसारखीं विनाशक द्रव्यें शोधून काढण्यांत जन्म खर्चून उमाप संपत्ति मिळविली, त्यानेंच जगांत सर्वत्र शांततातत्त्वाचा पुरस्कार व्हावा म्हणून बक्षिस ठेवलें. यावरून असें वाटतें कीं, इंग्रज कादंबरीकर्त्री मेरी कॉरेली हिला तिचा एक कादंबरीनायक नोबेलवरून सुचला असावा! निरीश्वरवादी नोबेल धर्मादायखर्च करण्यांत सढळ होता. स्वतः एकान्तांत आयुष्य घालवणारा नोबेल मानवजातीवर प्रेम करणारा होता. त्याचें सर्व आयुष्य स्वदेशाबाहेर गेलें व तो स्वतःस विश्वनागरिक भटक्या म्हणवीत असे, तरी शेवटीं त्यानें आपल्या बक्षिसांची योजना स्वदेशांतील संस्थांच्या स्वाधीन करून ठेविली. स्वतःचा धंदा शास्त्रीय असूनहि तो इंग्रज कवी शेले याचा मोठा चहाता होता, त्यानें इंग्रजींत कांहीं कविता रचिली, मातृभाषा जी स्वेडिश तींत कादंबऱ्या व नाटकें लिहिलीं. या ध्येयवादी स्वप्नसुखविलासी

माणसानें मोठी संपत्ति कमावली. धर्मावर अविश्वास असणाऱ्या या सद्‌गृहस्थानें अनेक देवळांस पैसा दिला. स्वतःची वृत्ति स्वभावतःच दुःखी असूनहि शास्त्रीय प्रगतीनें माणसें सुखी होतील असें त्यास वाटे. स्वतःची प्रकृति नेहमीं वाईट, कुरणेकरी असलेल्या नोबेलनें आपलें एक बक्षीस वैद्यांना द्यावें असें लिहून ठेवलें. स्वतः ब्रह्मचारी राहूनहि त्यानें आपल्या बक्षिसांचा फायदा स्त्रियांस मिळूं नये अशी योजना ठरविली नाहीं. नेहमीं निराशापूर्ण असणाऱ्या या माणसाला भविष्यकाल सुखमय होईल असा विश्वास असे !!!

आलफ्रेड बर्नार्ड नोबेल सन १८३३ सालीं स्वीडनची राजधानी स्टॉकहोम् येथें जन्मला व सन १८९६ सालीं वयाच्या चौसष्ठाव्या वर्षी वारला. त्याचे वडील त्याच्यासारखेच शास्त्रीय प्रयोग करून नवीं द्रव्यें निर्माण करणारे होते. त्यांच्या गुणाकडे तत्कालीन रशियन सरकारचें लक्ष गेलें व त्यानें त्यांस रशियाची राजधानी सेंट पीटर्सबर्ग येथें वेतन देऊन प्रयोग करीत राहण्यासाठीं बोलाविलें. तेथें आलफ्रेडच्या बापानें बंदुकीची दारू, पाण्यांतून मारतां येणारे सुरुंग [ टॉर्पेडो ], जलद डागतां येणाऱ्या तोफा, वगैरे तयार करून रशियन सरकारास क्रिमियांतील युद्धप्रसंगीं मदत केली. बापाबरोबर त्याचे चार मुलगेहि काम करीत असत. परदेशांत बालपण गेल्यानें त्यांचें शाळेंतील शिक्षण फारसें झालें नाहीं. पण प्रवास, स्वतंत्र वाचन व बापाची प्रयोगशाला यांनीं आलफ्रेडचें शिक्षण केलें. क्रिमियांतील युद्धानंतर आलफ्रेडचे वडील दुसऱ्या मुलाकडे आपलें सेंट पीटर्सबर्गमधील काम सोंपवून स्टॉकहोमला परत आले. तेथेंहि त्यांचे स्फोटक द्रव्यांचे प्रयोग चालत. एकदां प्रयोग करीत असतां आकस्मिक स्फोट होऊन त्यांत त्यांस कायम अधू करणारी इजा झाली व आलफ्रेडचा धाकटा भाऊ तर तावडतोब मरण पावला. त्यामुळें स्वीडन देशांतील सरकारनें त्यांस नायट्रोग्लिसरीनचा उपयोग प्रयोगांत करण्यास बंदी केली. तरी नोबेल पितापुत्रांचा नाद सुटला नाहीं. जमिनीवर प्रयोग करण्यास बंदी झाली, तेव्हां त्यांनीं एक होडी घेऊन सरोवराच्या मध्यावर तींत आपले प्रयोग सुरू केले. आलफ्रेडला त्याच्या बापानें वयाच्या सतराव्या वर्षी न्यूयॉर्कला पाठविलें होतें. तेथें कॅप्टन एरिक्सन्

याजवळ त्यानें यंत्रशास्त्र शिकावें अशी बापाची इच्छा होती. पण यंत्रशास्त्रांत आलफ्रेडनें नांव मिळवावें अशी ईश्वरी इच्छा नव्हती. बापाप्रमाणेंच स्फोटक द्रव्यें तयार करण्यांत त्यास यश मिळावें असा ईश्वरी संकेत होता. त्याप्रमाणें सन १८६३ सालीं नायट्रोग्लिसरीन बरोबर इतर द्रव्यांची योजना करून आलफ्रेडनें डायनामाइटचा शोध लावला.

आल्फ्रेड नोबेलच्या शोधांनीं जगाचें पुष्कळ काम सोपें झालें आहे. डायनामाइटचा उपयोग जसा विघातक कामांत करतां येतो, तसाच उपयुक्त कामांतहि होतो. इताली देशांतील सेंट गोथार्दचा प्रचंड बोगदा करतांना डायनामाइटच्या शोधामुळें निदान दोन कोट रुपये वांचले असावे. डायनामाइटनंतर आल्फ्रेडनें विनधुराची दारू यांसारखीं दुसरीं अनेक द्रव्यें शोधून काढलीं. त्यानें घेतलेल्या पेटंटांची संख्या ८५ होती. हीं पेटंटें अनेक राष्ट्रांतील सरकारांस देऊन त्यानें उमाप पैसा मिळविला. नंतर नोबेलबंधूंनीं आपलें लक्ष कॉकेशस प्रांतांतील पेट्रोलियम तेलाच्या खाणींकडे वळविलें. खाणींतून तेल काढणें, त्याची वहातुक करणें व तें शुद्ध करणें यांबाबत अनेक शोध करून त्यांनीं स्वतःचा व त्याबरोबरच रशियन सरकारचा मोठा फायदा केला. महायुद्धापूर्वी रशियन सरकारला एक षष्ठांश इतकें उत्पन्न नोबेलच्या धंद्यामुळें मिळत असे.

सन १८७३ सालीं आल्फ्रेड नोबेल पॅरिस येथें येऊन राहिला. आल्फ्रेडचीं मतें अराजक स्वरूपाचीं होतीं, असा प्रवाद आहे. त्याला शेलेच्या काव्यांची मोठी गोडी लागली होती व शेलेच्या बंधनें झुगारून देणाऱ्या मतांचाहि त्याच्यावर बराच परिणाम झाला असावा. यांपासूनच आल्फ्रेडच्या ध्येयवाद, अखिल मानवजातीबद्दल प्रेम, त्याचा शांततावाद, त्याचीं अराजक मतें व त्याची निरीश्वरवादी वृत्ति हीं बनलीं असावीं. मात्र नोबेलचें शिक्षण शास्त्रीय स्वरूपाचें असल्यानें व त्याची बुद्धि तीव्र असल्यानें नोबेल कधीं व्यवहारपराङ्मुख झाला नाहीं किंवा वहावला नाहीं. नोबेलनें बरीच इंग्रजी कविता लिहिली होती, पण तीं त्यानें स्वतःच जाळून टाकली. नंतर त्यानें स्वेडिश भाषेंत कादंबऱ्या लिहिण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी ठरला

नाहीं. मरणापूर्वी त्यानें एक नाटक लिहिण्याचाहि प्रयत्न केला होता. हे सर्व प्रयत्न निष्फळ झाले, तरी त्याच्या पत्रांत त्याचें वाङ्मयकौशल्य ठिकठिकाणीं दिसतें. त्याच्या चरित्रकाराचें असें मत आहे कीं, नोबेल शोधक झाला नसता तर ग्रंथकार झाला असता.

नोबेल अत्यंत दयाळू धनी होता. आपल्या कारखान्यांतील लोकांस तो चांगल्या रीतीनें वागवित असे. अन्यायाची त्याला चीड होती. वकिलांबद्दल त्यास तिटकारा वाटत असे. आपल्या मोठ्या संपत्तीचें मृत्युपत्र त्यानें कोणाहि वकिलाचा सल्ला घेतल्याशिवाय स्वतःच्या मतीनें स्वहस्तानें लिहून काढलें. या मृत्युपत्रांत कायद्याच्या दृष्टीनें कांहीं दोष होते व जर त्याच्या पुतण्यांनीं उदारपणानें निरिच्छा दाखवून मृत्युपत्र नाशावीत ठरविण्याचा प्रयत्न सोडला नसता, तर नोबेलची सर्व संपत्ति त्याच्या पुतण्यांकडे जाऊन त्याच्या बक्षिसांमुळें झालेलें त्याचें नांव अंधारांत राहिलें असतें.

मरणापूर्वी त्याच्यावर गुप्त हेर असल्याबद्दल आरोप आल्यामुळें, त्याला पॅरिस सोडावें लागलें. याला कारण असें झालें कीं, या वेळीं त्यानें ज्या द्रव्याचा शोध चालविला होता, तसल्यास द्रव्याचे प्रयोग फ्रेंच लष्करी खातें करीत होतें. सुदैवानें आल्फ्रेडचा प्रयोग प्रथम यशस्वी झाला व त्यानें आपला शोध जाहीर केला. या शोधाचे प्रयोग फ्रेंच लष्करी खात्यांत अत्यंत गुप्तपणें केले जात असल्यामुळें फ्रेंच सरकारास संशय आला कीं, आल्फ्रेडनें कांहीं युक्ति करून हा शोध चोरला. अर्थातच त्यास पॅरिस सोडून जाणें भाग झालें. नंतर तो इटलींतील सान्रेमो या समुद्रकिनाऱ्यावरील हवा खाण्याच्या जागीं जाऊन राहिला व तेथेंच तो ता. १० डिसेंबर १८९६ रोजीं मरण पावला. त्याच्या बक्षिसांची रक्कम नेहमीं या तारखेस देण्यांत येते.

नोबेलच्या मृत्युपत्राप्रमाणें त्याची सर्व संपत्ति शहाजोग ठिकाणीं गुंतविलेली असून, तिच्या व्याजांतून दरवर्षी सारख्या रकमेचीं पांच बक्षिसें द्यावयाचीं असतात. व्याजाच्या दराप्रमाणें बक्षिसाची रक्कम कमीजास्त होते. सरकारच्या करामुळेंहि त्यांवर परिणाम होतो. अजूनपर्यंत प्रत्येक बक्षिस सुमारें नव्वद हजार रुपयांपासून सव्वा लाख रकमेपर्यंत दिलें गेलें आहे.

हीं पांच बक्षिसें अनुक्रमें रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, वैद्यक, वाङ्मय व शांततापुरस्कार यांबद्दल द्यावयाचीं असतात. वाङ्मयशाखेबद्दल असा नियम आहे कीं, ज्या पुस्तकाबद्दल बक्षिस द्यावयाचें तें ध्येयात्मक स्वरूपाचें असलें पाहिजे. शांतिपारितोषिक राष्ट्राराष्ट्रांत भ्रातृभाव उत्पन्न व्हावा किंवा लष्करी तयारी कमी करण्यांत यावी किंवा अन्य शांतताप्रसाराचें कार्य करण्यांत यावें म्हणून ठेवण्यांत आलें आहे.

नोबेलच्या मोठ्या बक्षिसांमुळें अनेक शास्त्रज्ञांना आपले प्रयोग पोटाच्या विवंचनेंत न राहतां करतां आले आहेत. बक्षिसाच्या इच्छेनें दुसऱ्या अनेकांना प्रयोग करण्यास उत्तेजन मिळालें आहे. अनेक अज्ञात व दरिद्री ग्रंथकारांना त्यांनीं जगप्रसिद्ध केलें आहे. आज यांपैकीं एखादें बक्षिस मिळणें ही मानाची एक मोठी खूण बनली आहे. बक्षिसासाठीं माणसांची निवड स्वीडनमधील व नॉर्वेमधील ठरविलेल्या संस्थांनीं करावयाची असते. त्यांच्या माहितीप्रमाणें त्या संस्था आपलें काम योग्य रीतीनें व निःपक्षपातानें करीत असल्या तरी पुष्कळ वेळां या बक्षिसांसाठीं उत्तमांची वर्णी लागूं शकत नाहीं. महात्मा गांधींना किंवा टॉलस्टॉयला शांतिपारितोषिक न मिळतां तें चेंबर्लेन किंवा रुझवेल्ट यांना मिळतें यावरून ही गोष्ट सिद्ध होईल. हिंदुस्थानांत सर सी. व्ही. रामन्, कलकत्ता येथील पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ, यांना पुढें मागें नोबेल पारितोषिक मिळण्याचा बळकट संभव आहे. सर जगदीशचंद्रांचे शोध वैद्यकदृष्ट्या उपयुक्त ठरले तर त्यांनाहि वैद्यकपारितोषिक मिळणें शक्य आहे. डॉ. सर प्रफुल्लचंद्र रॉय यांना त्यांच्या रसायनशास्त्रांतील शोधांबद्दल हें बक्षिस मिळावयास पाहिजे होतें. पण त्यांना नाहीं तरी त्यांच्या शिष्यांपैकीं कोणाला तरी असें बक्षिस मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं, असें वाटतें. वाङ्मयांत मात्र हिंदुस्थानांतील कोणाची वर्णी जवळपास लागण्याचा संभव दिसत नाहीं. लाहोरचे सर महंमद इकबाल या उर्दू कवीला तें मिळणार अशी अफवा कांहीं वर्षांमागें कोणी उठविली होती. पण तींत कांहीं तथ्य असेल असें वाटत नाहीं.

**प्रगति** } वर्ष १, अंक २५
ता. २१ नोव्हेंबर १९२९

# ‘ नरव्याघ्र ’ क्लेमेन्सो

‘ नरव्याघ्र ’ क्लेमेन्सो हे गेल्या आठवड्यांत मृत्यु पावले. त्यांचें वय अठ्ठ्याऐंशीं वर्षांचें असल्यानें या गोष्टीचें विशेष आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. पण मरेपर्यंत त्यांची कार्यशक्ति एवढी प्रबळ होती कीं, तीमुळें ते आणखी वरींच वर्षें जगतील असें सहाजिकच वाटे. नुकत्याच फ्रान्स देशांत झालेल्या प्रधानमंडळाच्या उलाढालींत क्लेमेन्सोचा हात होता, हें सांगितलें म्हणजे त्यांच्या उत्साहाची कल्पना येईल. क्लेमेन्सोचें चरित्र मोठें विचित्र आहे. फ्रान्स देशांत अनेक स्थित्यंतरें झालेलीं त्यांनीं पाहिलीं. त्यांच्या लहानपणीं फ्रान्स देशांत लुई फिलिप्पे हा राजा गादीवर होता. नंतर तेथें प्रजासत्ताक राज्य झालें. नंतर पुनः नवें साम्राज्य स्थापिलें जाऊन त्याची समाप्ति बिस्मार्कच्या जर्मनीनें सन १८७० सालीं केली. त्यांचे वडील प्रजासत्ताक पक्षाचे कट्टे अभिमानी असल्यामुळें त्यांस तुरुंगांत टाकलें होतें. बाल क्लेमेन्सोलाहि क्रांतीच्या उत्सवांत भाग घेण्याबद्दल दोन महिने तुरुंगवास भोगावा लागला होता. राजकीय प्रश्नांच्या बोलाचालींवरून भांडण होऊन एका माणसाशीं ते एकदां द्वंद्वयुद्ध खेळले होते. त्यांनीं वैद्यकीचें शिक्षण घेतलेलें असून एम्. डी. पदवी मिळविली होती.

या वेळीं एका गुप्त कटांत त्यांनीं भाग घेतला होता. तो फुटला तेव्हां क्लेमेन्सोनीं प्रथम लंडन येथें प्रयाण केलें. व तेथून ते पुढें अमेरिकेस

जाऊन न्यूयॉर्क शहरीं मास्तरकी करीत राहिले. तेथेंही स्वारी स्वस्थ बसून होती असें नाहीं. पॅरिसच्या ‘ टेम्स ’ पत्रास ते पत्रें लिहून पाठवीत. त्या काळाच्या कांहींसें पुढें जाऊन त्यांनीं एका अमेरिकन मुलीशीं लग्नहि केलें. ही मुलगी त्यांची शिष्या असून त्यांच्या घोडदौडीच्या कसबामुळें खुष झाली होती. पण या विवाहाचें सुख त्यांना फार वर्षें लाभलें नाहीं. नेपोलियन बादशहा जाऊन फ्रान्सांत राज्यक्रांति झाली, तेव्हां क्लेमेन्सो स्वदेशास परत आले. त्या वेळीं त्यांची पत्नी त्यांजबरोबर फ्रान्स देशांत आली. पण पुढें लवकरच तिचें नवऱ्याशीं पटेनासें होऊन, ती कायमची अमेरिकेस परत गेली. पॅरिसला परत आल्यावर क्लेमेन्सो तावडतोब आपला जुना मित्र आरागो यास भेटले. आरागो हा या वेळीं पॅरिसच्या राज्यक्रांतीमुळें तेथील नगराध्यक्ष झाला होता. या वेळीं नगराध्यक्ष म्हणजे वस्तुतः लष्करी सुभेदारच होता. त्यानें क्लेमेन्सोला पॅरिसमधील अत्यंत मवाळी, झोंड व बंडखोर लोकांच्या भागावर मुख्य नेमलें. तेथें क्लेमेन्सोनें अशी चोख व्यवस्था ठेविली कीं, पुढें नवें राज्ययंत्र सुरू झालें तेव्हां तेथील लोकांनीं त्यांसच आपले प्रतिनिधी निवडलें. नव्या पार्लमेंटांत क्लेमेन्सोचा आडदांड क्रांतिकारक पक्ष अल्पसंख्याक होता. त्यामुळें त्यांच्या पक्षाच्या हातीं राज्य-सूत्रें येण्याचा कधींच संभव नव्हता. पण आपल्या पराक्रमानें व वक्तृत्वानें त्यांनीं अनेक प्रधानमंडळें मोडून टाकण्याची कीर्ति मिळविली.

सन १८९१ सालीं त्यांच्यावर फंदगुंदपणाचा आरोप आला. इंग्रज-सरकारचे ते फ्रान्सांतील हेर होते असाहि आरोप त्यांच्यावर केला गेला. एक खोटें बनावट पत्र त्यांच्या हस्ताक्षरांत म्हणून छापण्यांत आलें. पण क्लेमेन्सोनीं धैर्यानें व वक्तृत्वानें आपल्यावरील आरोप खोडून काढून सदर पत्राची बनावटता सिद्ध केली. त्यामुळें ते कायद्यांच्या कचाट्यांतून सुटले. पण लोकांत त्यांच्याबद्दल उत्पन्न झालेला संशय एकदम नाहींसा होऊं शकला नाहीं. त्यामुळें त्यांस घरीं बसावें लागलें. या वेळीं त्यांनीं आपल्या लेखणीनें आपला निर्वाह चालविला. पण पुढें लवकरच फ्रान्सांत ‘ ड्रेफुस ’ प्रकरण उपस्थित होऊन त्यांत क्लेमेन्सोनीं जोराचा भाग घेतला. टिळकांच्या

चरित्रांत वापटप्रकरणाचें किंवा ताईमहाराज खटल्यांचें जें महत्त्व आहे, तसेंच क्लेमेन्सोंच्या चरित्रांत ' ड्रेफुस ' प्रकरणाचें आहे. या भानगडीच्या प्रकरणामुळें फ्रान्स देशांत जवळ जवळ राज्यक्रांति झाली. निरपराध ' ड्रेफुस 'चें सरकारच्या एकवटलेल्या सत्तेपासून रक्षण करतांना क्लेमेन्सोंचे सगळे गुण पुढें आले. ते पार्लमेंटांत निवडून येऊन प्रधानमंडळ त्यांच्या तंत्रानें चालूं लागलें व पुढें तर ते स्वतः मुख्य प्रधान झाले. या वेळीं माजी जर्मन कैसरनें कासा ब्लांका प्रकरणावद्दल फ्रान्स देशास क्षमा मागण्यास सांगितलें, पण क्लेमेन्सोनीं तें साफ नाकारलें व सन १८७० पासून जर्मनीचा फ्रान्सवर असलेला वरचष्मा उतरून टाकला, त्यामुळें कैसरलाहि मूग गिळून स्वस्थ बसावें लागलें. यानंतर फ्रान्सांत क्लेमेन्सोचे प्रतिस्पर्धी पांक्वारे यांचें प्रस्थ देशांत माजलें व क्लेमेन्सो मागें पडले. महायुद्धाचीं पहिलीं तीन वर्षें त्यांचा काळ तत्कालीन फ्रेंच सरकारचें दुबळेपण दाखविण्यांत गेला. त्यामुळें शेवटीं प्रतिस्पर्धी पांक्वारेलाहि तो फ्रान्सचा अध्यक्ष होता तरी क्लेमेन्सोंची मदत मागावी लागली. आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या हाताखालीं मुख्य प्रधान होऊन क्लेमेन्सोंनीं आपलें 'विजयी प्रधानमंडळ' बनविलें व एक वर्ष जोराची तयारी करून व नेटानें युद्ध सुरू ठेवून त्यांनीं जर्मनीचा पराभव केला. सर्व नाश झाला तरी जर्मनीचा पूर्ण पराभव केल्याखेरीज, तह करावयाचा नाहीं, असें फ्रान्सचें धोरण त्यांनीं ठरविलें होतें. त्याला यश येऊन ते विजयी वीर बनले. युद्धसमाप्तीनंतरच्या तहांत त्यांनीं अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन व इंग्लंडचे लॉइड जॉर्ज यांच्यावरहि मात करून सर्वस्वीं फ्रान्सला अनुकूल असा तह करून घेतला. या वेळीं त्यांची मुत्सद्देगिरी सर्व जगांत श्रेष्ठ ठरली. सन १९२० सालीं महायुद्धाचा ताप उतरल्यावर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनीं त्यांना उडवून दिलें. तरीहि निराश न होतां वयाच्या ऐंशींव्या वर्षी त्यांनीं हिंदुस्थानचा व पूर्वेकडील देशांचा प्रवास केला. सन १९२२ सालीं अमेरिकेचें मन फ्रान्सच्या बाजूस वळविण्यासाठीं त्यांनीं तिकडेहि दौरा काढला होता. गेलीं कांहीं वर्षें तत्त्वज्ञान, आत्मचरित्र वगैरे लिहिण्यांत त्यांचा काळ गेला. स्वदेशाचा उद्धारक त्राता असा हा महापुरुष अत्यंत साधा होता. सांपत्तिक

दृष्ट्या तो अगदीं सामान्य स्थितींत राहिला. आपल्या मृत्यूनंतरसुद्धां आपलें उत्तरकार्य थाटामाटाशिवाय अत्यंत साधेपणानें व्हावें असें त्यानें लिहून ठेवलें होतें. मृत्युसमयीं स्त्रीचें दर्शनहि आपणास न व्हावें म्हणून त्यानें बहिणीलांहि बाहेर घालविलें. यावरून त्यांचें ' व्याघ्रत्व ' स्पष्ट होईल.

प्रगति { वर्ष १, अंक २६
ता. २८ नोव्हेंबर १९२९.

# नेपाळचे पेशवे कैलासवासी झाले !!

पारतंत्र्यांत घट्ट जखडलेल्या हिंदुस्थानचा एक लहान भाग अजून पूर्ण स्वतंत्र आहे याची आठवण हिंदी लोकांस बहुधा नसते. पण वस्तुतः तशी स्थिति आहे, नेपाळचें पूर्ण हिंदु राज्य आजहि स्वतंत्र असून त्यास इंग्रज सरकारकडून दरसाल दहा लाख रुपये वक्षीस मिळत असतें. नेपाळचें डोंगराळ राज्य लहान म्हटलें तरी युरोपांतील अनेक राज्यांहून तें मोठें आहे. त्याची लोकसंख्याहि अनेक राज्यांहून कमी नाहीं. पण तीं लहान राज्यें पडलीं युरोपांत व तेथील लोक आहेत ख्रिस्ती गोरे. तसेंच त्या राज्यांचा संबंध आधुनिक सुधारणेमुळें येतो सर्व जगाशीं. तशी स्थिति काळ्या हिंदूंच्या या राज्याची नाहीं म्हणून त्याचा बोलवाला नाहीं. आजच्या काळीं शक्य तितक्या हिंदु पद्धतीनें चालणारें हें एवढेंच राज्य आहे. महायुद्धापूर्वी या राज्यास इंग्रजलोक स्वतंत्र समजून नकाशांतहि त्याचा रंग वेगळा दाखवीत तरी त्यांचा आव नेपाळशीं वागतांना वरचढपणाचा असे. महायुद्धानंतर जसें शेजारचें अफगाणिस्तान युद्धानें स्वतंत्र झालें तसें नेपाळहि पूर्ण स्वतंत्र असल्याची मान्यता त्याच्या महायुद्धांतील मदतीमुळें इंग्रजांस द्यावी लागली. आतां नेपाळांतील ब्रिटिश वकिलास रेसिडेंट म्हणत नसून त्यास अँबॅसडर अशी संज्ञा आहे. नेपाळ राष्ट्रसंघाचाहि सभासद आहे. बलिष्ठ इंग्रजसरकाराशीं शहाणपणानें वागून ज्यानें ही मान्यता आपल्या देशास मिळवून दिली तो

# नेपाळचे पेशवे कैलासवासी झाले !!

नेपाळचा मुख्य प्रधान महाराजा चंद्र समशेरजंग बहादूर गेल्या आठवड्यांत वयाच्या ६७ व्या वर्षी वारला. त्याचें चरित्र मननीय आहे.

नेपाळच्या राज्याची स्थिति सध्यां जुन्या मराठशाहीप्रमाणें आहे. तेथील नामधारी राजे हे साताऱ्याच्या छत्रपतींप्रमाणें केवळ कुंकवाचे अधिकारी आहेत. त्यांस महाराजाधिराज राणे म्हणतात. त्यांच्या इतमामांत कोणत्याहि प्रकारचें न्यून पडूं दिलें जात नाहीं. सर्व कारभार त्यांच्याच नांवें चालविला जातो. पण तो चालविण्याचा वंशपरंपरागत अधिकार समशेरजंग घराण्याकडे गेलेला आहे. सन १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं ज्या तीन माणसांनीं इंग्रजांना ऐनवेळीं मदत करून त्यांचें राज्य राखलें त्यांत निजामाच्या सालर-जंगाप्रमाणें व ग्वाल्हेरच्या रावराजे दिनकरराव राजवाड्यांप्रमाणें नेपाळचा जंगबहादूरहि होता. त्याचेंच वंशज घराणें पेशवेपदावर आहे. प्रस्तुत मृत चंद्र समशेर जंगबहादूर हे सन १८६३ सालीं जन्मलेले असून त्यांचें शिक्षण कलकत्त्यास झालें होतें. नेपाळच्या पेशवे घराण्यांत इंग्रजींत तरबेज होणारा हा पहिलाच पुरुष होता. हे कलकत्त्याची मॅट्रिक परीक्षा पास झालेले असून पुढें कॉलेजांतहि त्यांनीं कांहीं वर्षे घालविलीं होतीं. पण पुढें वडील बंधु वारल्यामुळें त्यांस काटमांडूस परत जावें लागलें. नेपाळच्या पेशवे घराण्यांत अशी रीत आहे कीं, घराण्यांतील सर्वांत वडील माणसानें मुख्य प्रधान व्हावयाचें. बापाकडून मुलाकडे असा प्रकार चालू नाहीं. त्या पद्धतीप्रमाणें अनेक हुद्यांचीं कामें केल्यावर सन १९०१ सालीं चंद्र महाराजे मुख्य प्रधान झाले. सन १९०८ सालीं त्यांनीं विलायतचा प्रवास केला होता. त्या वेळीं त्यांनीं परदेशांतहि पूर्ण हिंदु आचार पाळण्याचें अगत्य दाखविलें होतें. बोटींत गंगोदक भरून घेतलें होतें. सन १९०५ सालीं लॉर्ड किचनेर नेपाळांत गेले होते त्या वेळीं चंद्रमहाराजांनीं गुरखे शिपायांची इंग्रज सैन्यांत भरती करण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणें सोळा हजार गुरखे इंग्रज लष्करांत शिरले. महायुद्धांत तर नेपाळनें इंग्रजांची एक बाजूच राखली असें म्हणावयास हरकत नाहीं. महायुद्धांत ज्या ठिकाणीं मुसलमान शिपाई तुर्के-स्थानच्या प्रेमानें शत्रूंस मिळतील असें भय वाटत होतें त्या त्या ठिकाणीं मराठे, शीख किंवा गुरखे यांची योजना केली होती. अफगाणिस्थानच्या

सरहद्दीवर मुख्यतः गुरख्यांचा तळ होता. शिपायांप्रमाणेंच आपल्या तोफा, दारूगोळा वगैरे वस्तूहि नेपाळनें इंग्रजांस पुरविल्या. याच मदतीबद्दल कृतज्ञता दाखविण्यासाठीं इंग्रजसरकारनें दरसाल दहा लाख रुपयांचें वर्षासन नेपाळला करून दिलें आहे. तसेंच सन १९२३ सालीं नवा तह करून त्याचें पूर्ण स्वातंत्र्य मान्य करून इंग्रजांचा वकील काटमांडूस पाठविण्यांत आला.

महायुद्धानंतर अमानुल्लाखानानें हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हां इंग्रजांची पंजाबांतील स्थिति अत्यंत चिंताजनक होती. महायुद्धासाठीं जमविलेलें हंगामी इंग्रज लष्कर मोडलें जात असून पंजाबांतील मुसलमान व शीख या उभयतांहि बद्दल सरकार साशंक झालें होतें. त्या वेळीं गुरखे मदतीस धांवले म्हणून निभावलें. तीच स्थिति वझिरिस्थानांतील बंडाच्या वेळीं होती. या सर्व प्रसंगीं नेपाळनें इंग्रजांची अब्रू राखली असें म्हणावयास हरकत नाहीं.

चंद्रमहाराजांनीं नेपाळच्या राज्यांत अनेक सुधारणा केल्या. बाह्य गोष्टींत पाश्चात्य सुधारणेचा अंमल गुरख्यांवर बसूं न देतां जरूर त्या गोष्टींत मात्र त्यांनीं सुधारणा करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. उदाहरणार्थ, लष्करी बाबतींत त्यांनीं शक्य तितकी आजतागायत सुधारणा केली आहे. राष्ट्र-संघाच्या ठरावाप्रमाणें नेपाळच्या राज्यांतील गुलामगिरीच्या प्राचीन पद्धतीस मूठमाती देऊन त्यांनीं प्रगतिप्रियताहि दाखविली. या सुधारणेमुळें साठ हजार गुलाम स्वतंत्र करण्यांत आले व तसें करण्यासाठीं नेपाळ सरकारास पसतीस लाख रुपये खर्च करावा लागला. चंद्रमहाराजे चांगले लेखकहि होते. नेपाळी भाषेंत युद्धशास्त्रावर त्यांनीं ग्रंथ लिहिले आहेत असें समजतें. त्यांनीं बनारसच्या हिंदु विश्वविद्यालयास व इतर परोपकारी संस्थांस मदत दिली होती, त्यांच्या गुणांमुळें त्यांस इंग्लंड, चीन, तिबेट वगैरे देशांकडून मोठे किताब मिळाले होते. इंग्रज लष्करांत त्यांचा हुद्दा जनरलचा मानला जात असे. मरणापूर्वी आठच दिवस त्यांना फ्रेंच सरकारकडून फ्रान्सांतील अत्युच्च पदवीदर्शक ग्रँड क्रॉसचा मान मिळाला होता. चंद्रमहाराजांच्या मागें त्यांचे धाकटे बंधु भीमराजे मुख्य प्रधान झाले आहेत. ते अत्यंत पुराणमता-भिमानी कडवे हिंदु आहेत अशी समजूत आहे. त्यांच्या कारकीर्दीत नेपाळची याहूनहि जास्त भरभराट होईल अशी प्रत्येक हिंदूस आशा आहे.

**प्रगति** } वर्ष १, अंक २७<br>ता. ५ दिसेंबर १९२९

## सर व्हॅलेंटाइन चिरोल यांचा मृत्यु—

या जगांत कांहीं माणसें सत्कृत्यें करून आपलें नांव चिरंजीव करतात, दुसरीं कांहीं माणसें आपल्या नाठाळ वर्तनानें अजरामर होतात. अशा या दुसऱ्या प्रकारच्या माणसांत सर व्हॅलेंटाईन चिरोल यांची गणना करावी लागेल. जोंपर्यंत महाराष्ट्रांत टिळकांचें चरित्र विसरलें जाणार नाहीं तोंपर्यंत या गृहस्थाच्या नांवाच्या चिरस्थायित्वाबद्दलहि शंका नाहीं. वीस वर्षांपूर्वी लंडन टाइम्सचे बातमीदार म्हणून हिंदुस्थानांत येऊन, हिंदी असंतोषावरील आपलें पुस्तक लिहून यांनीं जे गुण पाघळले त्याचा परिणाम हिंदी राजकारणावर बराच झाला होता. अलीकडील महामाया मिस मेयो हिनें आपले गुण उधळून जो पराक्रम केला तशीच गोष्ट वीस वर्षांपूर्वी चिरोलबहादुरांनीं केली होती. महाराष्ट्रांत ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद चेतण्यास चिरोलची कारवाई बऱ्याच अंशानें कारणीभूत झाली. हिंदुस्थानाप्रमाणेंच इजिप्त वगैरे पौर्वात्य देशांवर उपकार करून त्यांनीं आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवलें आहे. राजसत्तेच्या पाठिंब्यावर इतरांची बदनामी करून त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्यांत त्यांची जी हानी झाली तीबद्दल पुनः हे राजश्री म्हणतात, " Nothing could quite compensate me for the three years' suspense and heavy work and constant pre-occupation and a long absence in India, when

I would ever so much rather have been in England during the war. " या गृहस्थांना आपल्या वेळाची, कामाची आणि कर्तव्याची जर इतकी काळजी वाटत होती, तर त्यांना एवढा उपद्व्याप कोणी करावयास सांगितला होता ? लोकमान्यांसारख्यांच्या आयुष्याचीं बहुमोल वर्षे खराब करून पुनः या राजश्रींची हळहळ आहेच ! वास्तविक चिरोलसाहेबांच्या हातांत जो जोर आला होता तो त्यांचा स्वतःचा नसून ‘ समर्थाच्या घरचें श्वान ’ या नात्यानें त्यांस तो प्राप्त झाला होता. ज्या ठिकाणीं त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें लॉर्ड सिंह, बिकानेरचे महाराज किंवा भारतमंत्री मॉन्टेग यांनीं त्यांना त्यांच्या पराक्रमाबद्दल शाबासकी दिली होती, त्या ठिकाणीं त्यांचें बल कशावर अवलंबून होतें हें वेगळें सांगणें नलगे. हिंदी अधिकाऱ्यांच्या मदतीनें ज्याप्रमाणें मिस मेयो शेर होऊन पराक्रम करती झाली, तद्वतच तत्कालीन ब्रिटिश राज्यरक्षक शिष्ट धूर्तांच्या मदतीनें व्हॅलेंटाइनसाहेब शिरजोर झाले होते. महाराष्ट्रांतील जनता तरी औरंगजेबाच्या शिवाजीबद्दलच्या उद्गारां-प्रमाणें ‘ काफिर नरकाला गेला ’ असेंच त्यांची मृत्युवार्ता ऐकून म्हणेल !

प्रगति } वर्ष १, अंक २१
ता. २६ आक्टोबर १९२९

# इरिगोयेन

## आर्जेंताईन देशाचे माजी अध्यक्ष

दीड महिन्यांपूर्वी ' प्रगतीं'त दक्षिण अमेरिकेंतील एका देशांत झालेल्या बंडाची हकीकत दिली होती. तो आर्जेंताईन देश दक्षिण अमेरिकेंत सर्वांत सुधारलेला समजला जातो, हा देश त्या खंडाच्या अगदीं दक्षिणेस असून त्याचें क्षेत्रफळ हिंदुस्थानापेक्षां थोडेंसेंच कमी भरेल. पण तेथील लोकसंख्या दीड कोटीहि नाहीं. पण ती सर्व बहुतेक स्पॅनिश व इटालियन लोकांची वंशज आहे, तिच्यांत काळ्या रक्ताची भेसळ फारशी नाहीं, यामुळें त्या खंडांत हाच देश श्वेतवर्णीयांस आपलासा वाटतो. या देशाची भाषा स्पॅनिश असून तेथील मुख्य धंदे शेती, पशुपालन व खनिजपदार्थ काढणें हे आहेत. आरंभीं तिकडे गेलेल्या स्पॅनिश लोकांनीं देशाची बहुतेक जमीन चापून ठेविली होती. त्यांच्याच ताब्यांत बहुधा ती अजूनहि आहे. या भूपति लॉर्डांचें प्रस्थ या प्रजासत्ताक राज्यांत मोठें आहे. राज्यघटना प्रजासत्ताक असल्यामुळें तिकडे सरदार व सामान्य माणूस यांत नागरिकदृष्ट्या भेद नाहीं. तरी त्यांच्या आपसांतील जुटीमुळें बहुतेक राज्यकारभार त्यांच्याच हातांत असतो. अफाट माळावर व कुरणांतून गाई, बैल, घोडे, मेंढ्या वगैरे पाळावयाचीं, हे पशु किंवा त्यांचें मांस परदेशास–मुख्यतः इंग्लंडास–विकावयास पाठवावयाचें, मेंढ्यांची लोंकर, कातडीं हेहि जिन्नस विकावयाचे व तसेंच गहूं वगैरे धान्यें

परदेशास पाठवून श्रीमंत व्हावयाचें असा या जमिनदारांचा धंदा असतो. त्यावर ते गबर झालेले असून त्यांच्या वसतीचें राजधानीचें मुख्य शहर जें ब्यूनोस आयरेस तेंच सर्व दक्षिण अमेरिकेंत सर्व बाजूंनीं श्रेष्ठ समजलें जातें.

अशा या सोन्याचा धूर निघणाऱ्या श्रीमंत प्रदेशांत खालचा वर्ग गुलाम-सदृश आहे. मागाहून आल्यामुळें यांच्या वांटणीस जमीन येऊं शकली नाहीं. अर्थात् त्यांस दुसऱ्यांचीं कुळें किंवा मजूर बनणें भाग झालें. अनेक स्पॅनिश व इटालियन शेतकरी पोटाच्या पाठीस लागत या देशांत येतात. त्यांतील कांहीं पैसा सांठवून परत स्वदेशासहि जातात. पण बाकीचे देशांतच राहातात. या देशांत ज्या आगगाड्या, आगबोटी वगैरे आधुनिक सोयी झालेल्या आहेत, त्या सर्व परदेशी–मुख्यतः इंग्लंडच्या भांडवलानें उत्पन्न केलेल्या आहेत. देशाचा सर्व परराष्ट्रीय व्यापार, इंग्रज पेढ्या, इंग्रज व्यापारी व इंग्रजांच्याच आगबोटी यांच्या द्वारें चालतो. महायुद्धापूर्वी देशांत जर्मनीचें प्रस्थ बरेंच होतें; पण तें नंतर नष्ट झालें. अशा या राज्याचे नुकतेच श्रीमंत बंडखोरांनीं पळवून लावलेले माजी अध्यक्ष हिपोलितो इरिगोयेन यांचें चरित्र फारसें प्रसिद्ध नाहीं पण तें पाहतां हा पुरुष महात्मा गांधींसारख्या मानवजातीच्या हितार्थ जन्मलेल्या पुरुषांच्या मालिकेंत बसण्यायोग्य दिसतो. यांची वागणूक व आयुष्यक्रम गूढ व कांहींसा विचित्र आहे. त्यांचे शत्रु त्यांना ढोंगी, कीर्तिसाधु म्हणतात; तर उलट आर्जेंताईन देशांतील सामान्य जनता त्यांना अवतारी पुरुष मानतात. त्यांचें वय आतां पाऊणशेंच्या वर असावें. असावें म्हणण्याचें कारण ते कोणासहि आपल्या जन्मतिथीचा सुगावा लागूं देत नाहींत. त्यामुळें कांहींजण त्यांना ९० वर्षांहूनहि जास्त वर्षांचे ठरवितात. पण त्यांची शरीरप्रकृति इतकी चांगली आहे कीं, ते ६० च्या घरांतील दिसतात. त्यांनीं आपले फोटोसुद्धां फारसे घेऊं दिलेले नाहींत. सार्वजनिक कार्यक्रमांनाहि ते क्वचित्च हजर राहिलेले आहेत. त्यांना बोलण्याची आवड नाहीं. अशा त्यांच्या वृत्तीमुळें त्यांची ओळखहि थोड्यांशींच झालेली आहे. एकदां एक यूरोपियन प्रवासी, वर्तमानपत्राचा बातमीदार तिकडे गेला. त्याला इरिगोयेनला भेटावयाचें होतें. पण त्यानें शहरांतील

अनेक मोठ्या लोकांची भेट घेतली तरी या राज्याच्या अध्यक्षाला ओळखीची चिठ्ठी देणारा त्याला कोणी भेटेना. राजधानीच्या शहरांतील मुख्य वर्तमानपत्राच्या बातमीदारानेंहि त्यांना कधीं पाहिलेलें नव्हतें. अशा तऱ्हेचा हा गूढ पुरुष लोकांना अवतारी वाटावा यांत आश्चर्य नाहीं. त्यांच्याविषयीं लिहिणारे त्यांना हिंदुस्थानांतील योगी किंवा तिबेटांतील लामा असें नांव देतांना आढळतात.

इरिगोयेनचा पोटाचा धंदा गांधींप्रमाणेंच वकिली हा होता. पण गांधींप्रमाणेंच त्यांच्या आयुष्याचा मुख्य भाग फुकट शिक्षक, पार्लमेंटचे सभासद, सार्वजनिक चळवळ्ये असा गेलेला आहे. सन १९१६ सालीं महायुद्ध सुरू असतां इरिगोयेन राज्याचे मुख्य अध्यक्ष म्हणजे सर्वसत्ताधीश राजेच झाले. आर्जेंताईनच्या अध्यक्षाला अमेरिकेच्या अध्यक्षाप्रमाणेंच पुष्कळ अनियंत्रित अधिकार आहेत. आपल्या पहिल्या सहा वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं वतनदार बनलेल्या झब्बू जमिनदार भांडवलवाल्याचें बंड मोडून काढलें. देशांतील सर्व लोकांच्या हिताची सारखीच काळजी घेणें आपलें कर्तव्य आहे, असें तें म्हणत व त्याप्रमाणें वागत. अधिकारावर असतां अधिकाराच्या जागेचा पगार त्यांनीं स्वतः न घेतां तो सार्वजनिक हिताकडे लावून दिला. अध्यक्षानें सरकारी वाड्यांत राहण्याचा प्रघात असे. हा वाडा म्हणजे एक सुंदर, भव्य राजवाडाच आहे. पण इरिगोयेननीं त्यांत राहण्याचा प्रघात मोडून ते स्वतः-च्याच जुन्या लहानशा घरांत राहिले. हें त्यांचें घर शहरांतील मोठ्या लोकांच्या वस्तींत नसून सामान्य वस्तींतच होतें. घराचा खालचा भाग एका विडीच्या दुकानास त्यांनीं भाड्यानें दिलेला होता. वर ते स्वतः रहात. आपल्या घराला त्यांनीं एक मागील दरवाजा ठेवला होता. त्या वाटेनें कोणीहि येऊन दाद मागावी अशी मोकळीक असे. या त्यांच्या वागणुकीमुळें वरचा वर्ग त्यांच्यावर नेहमीं नाखूष राहिला. लोकांवर आपली छाप बसवण्यासाठीं हा साधूचें ढोंग करितो, असें त्यांचे टीकाकार म्हणत. पण त्यांनीं तिकडे कधींहि लक्ष दिलें नाहीं, किंवा आपल्या मार्गापासून ते क्षणभरहि ढळले नाहींत. आपण ईश्वराचे हस्तक आहोंत व म्हणूनच यानें आपल्यास या पदावर आणलें

आहे, असें ते समजत. त्यांचा साधेपणा इतक्या पराकोटीला गेलेला होता कीं पहिल्यानें अध्यक्ष निवडिले तेव्हां ते साध्या ट्रममध्यें बसून राज्याच्या मुख्य कचेरीकडे जाण्यास निघाले. व स्वतःचें तिकीट स्वतःच पैसे देऊन काढणार असें ते म्हणत होते. पण त्यांच्या अनुयायांनीं त्यांना धरून एका घोड्याच्या गाडींत बसविलें, व घोडे सोडून देऊन स्वतःच लोक गाडी ओढीत घेऊन गेले. स्पॅनिश लोक हे मानाचे व तन्निदर्शक चालीरीतींचे मोठे भोक्ते असतात. त्यांची तारांबळ या विचित्र अध्यक्षाच्या वर्तणुकीनें उडाली. राज्याचे प्रधान, परराष्ट्रांचे वकील वगैरेंना अध्यक्षाशीं वागतांना ठराविक कुर्निसात करून वागण्याची संवय अंगवळणीं पडली होती; चोपदारानें अमके अमके आले म्हणून ललकारावयाचें, यांनीं वांकत वांकत जाऊन आदबीनें सलाम करावयाचा, वगैरे पद्धति मोडून एका साध्या जुन्या घराच्या घरगुती खोलींत अध्यक्षांना भेटण्यासाठीं जाण्याची पाळी त्यांच्यावर येऊं लागली. रूढ, शिष्ट चालीरीतींना फांटा देऊन एकदम कामास हात घालण्याचा इरिगोयेनचा प्रघात असे. एकदां शिष्टाचाराबद्दल गाजलेल्या व स्वतः त्याच्या तालमींत मुरलेल्या एका देशाच्या वकिलास इरिगोयेननां भेटण्याचें काम पडलें. म्हणून त्यानें भेटीची वेळ ठरविण्यासाठीं आपला नोकर इरिगोयेनच्या घरास पाठविला. इरिगोयेन त्या वेळीं विशेष काम नसल्यामुळें रिकामे होते. त्यांनीं चिठी पाहून तावडतोब तोंडींच सांगितलें कीं, वकिलानें तावडतोब यावें. हा निरोप ऐकून वकिलाची धांदल उडाली. त्याची समजूत होती कीं, चार-आठ दिवसांनीं केव्हां तरी जावें लागेल. त्यासाठीं पोषाख वगैरेंची तयारी त्यानें चालविली होती. पण बापड्यास वरील निरोपामुळें आंगांत असलेल्या कपड्यांसह भेटीस जाणें भाग झालें. अशा तऱ्हेचा ढोंगीपणा आर्जेंटाइन-सारख्या सुधारलेल्या देशाच्या मुख्य अधिकाऱ्यास शोभत नाहीं, असें त्यांचे शत्रु-टीकाकार म्हणत असत.

महायुद्धकालीं इंग्लंडच्या व जर्मनीच्या दोन्ही बाजूंच्या वकिलांनीं आर्जेंटाइनला आपल्या बाजूनें युद्धांत ओढण्याची शिकस्त केली. पण कोणाच्या रागलोभास न जुमानतां त्यांनीं लोकांच्या हितासाठीं युद्धांत

पडण्याचें नाकारिलें. त्या वेळीं काउंट लक्झंबर्ग हे जर्मनीचे वकील होते. त्यांनीं इंग्लंडचें प्रस्थ आर्जेंताइनमध्यें मोठें असूनहि व श्रीमंत स्पॅनिश लोकांची सहानुभूति इंग्रजांच्या बाजूस असूनहि इरिगोयेन युद्धांत पडत नाहींत असें पाहिलें तेव्हां कैसरला असें कळविलें कीं, इरिगोयेनची सहानुभूति जर्मनीच्या बाजूस आहे व लवकरच आर्जेंताईन जर्मनीच्या मदतीस येईल. वकिलाचा कयास असा कीं, आपल्या या डावपेंचानें इरिगोयेननां युद्धांत पडणें भागच पडेल. पण त्याला उलट अनुभव आला. इरिगोयेननीं खोटी बातमी पसरविल्याबद्दल जर्मनीला आपली माफी मागावयास सांगितलें; व जर्मनीनें ती अखेर मागितलीहि. आर्जेंताइनच्या राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणें एका अध्यक्षाला लागोपाठ दोन वेळां अध्यक्ष होतां येत नाहीं. पण लोकांवरील त्यांच्या जबरदस्त वजनामुळें त्यांच्या शत्रूंना असें वाटत होतें कीं, इरिगोयेन आपल्या सहा वर्षांच्या मुदतीच्या शेवटीं राजीनामा देणार नाहींत; तर अध्यक्षपद बळकावून बसतील. पण त्यांचा तो कुतर्क फुकट जाऊन इरिगोयेननीं १९२२ सालीं मुदत संपली तेव्हां बिनबोभाट पद सोडलें. त्यामुळें त्यांचे शत्रु फुशारून जाऊन त्यांस वाटलें कीं, आतां इरिगोयेनचा अवतार संपला. त्याला पुनः राजकारणांत कोणीहि विचारणार नाहीं. पण सामान्य जनतेची त्यांच्यावरील भक्ति नाहींशी झाली नाहीं. सहा वर्षांनंतर दुसरी निवडणूक आली, तेव्हां त्यांच्या श्रीमंत व बलाढ्य शत्रूंनीं वाटेल तें करूनहि इरिगोयेनच प्रचंड बहुमतानें सन १९२८ सालीं दुसऱ्यांदा अध्यक्ष निवडून आले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. लिओपोल्दो मेलो यांच्या दुप्पट मतें त्यांना पडलीं. आर्जेंताइनमधील निवडणुकीची पद्धत अमेरिकेप्रमाणेंच आहे. इरिगोयेननीं पुनः लोकांची स्थिति सुधारण्याचा आपला कार्यक्रम जोरानें सुरू केला. त्याचा परिणाम घुमसत जाऊन अखेर बंडात झाला असें दिसतें. या देशांतील लष्कर, आरमार व बहुतेक सरकारी वरिष्ठ अधिकारी उच्च वर्गांतले असल्यामुळें त्यांना हा महात्म्याचा कारभार सोसेनासा झाला. व त्यांनीं कट करून पैशाच्या मदतीनें सैन्य वळवून इरिगोयेनना गेल्या महिन्यांत पदच्युत केलें. जी गोष्ट लोकमतानें सिद्ध होत नव्हती ती अशा

रीतीनें जबरदस्तीनें सिद्धीस नेण्यांत आली. इरिगोयेनच्या घरावर बंडखोरांनीं हल्ला चढवून त्यांची सर्व चीजवस्त रस्त्यावर आणून जाळली व त्यांना जखमी करून गिरफदार करण्यांत आलें. आज जगांत ज्या तारा पाठविण्यांत आलेल्या आहेत, त्या सर्व बंडखोरांच्या म्हणजेच उच्चवर्णीय भांडवल-वाल्यांच्या आहेत. त्यांवरून इरिगोयेन हे सामान्य जनतेला अप्रिय झालेले आहेत असें म्हणतां येत नाहीं. पण त्यांच्या बाजूच्या लोकांना श्रीमंत बंड-खोरांना मोडतां येईल किंवा काय याची शंका आहे. सध्यां तरी इरिगोयेनचें अवतारकृत्य समाप्त झालें आहे, असेंच म्हणणें भाग आहे.

प्रगति } वर्ष २, अंक २१
ता. २३ आक्टोबर १९३०

# आशेचा किरण

आधुनिक बंगालचे—किंबहुना अखिल हिंदी राष्ट्राचे एक विधाते ऋषिवर्य बंकीमचंद्र यांनीं आपल्या आनंदमठ कादंबरींत एक ध्येयमार्गदर्शक सिद्धान्त लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. हा सिद्धांत निराशा—गाढ निराशा—करणारा होता. बंकीमचंद्र हे अत्यंत कलाकुशल कादंबरीकार होते, त्यामुळें आपल्या कथापरिपोषास साजण्यासारखा मागील काल घेऊन त्यांनीं आपला सिद्धान्त कादंबरींतलि पात्रांच्या मुखानें पुढें मांडला. तो सिद्धान्त जुनाच होता. 'कालाच्या ओघाला कोणी थांबवूं शकत नाहीं' हा तो सिद्धान्त होय. मानवजातीला कालाबरोबर जावें लागतें, त्याच्या विरुद्ध कोणाला जातां येणार नाहीं. पाश्चात्यांच्या भरभराटीच्या भरतीचा हा काल आहे; याला अडवणें आपल्या हातचें नाहीं; या ओघांतच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य बुडून गेलें आहे; जेव्हां कालाच्या करणीनेंच या भरतीची ओहोटी होईल तेव्हां आपोआपच बुडालेला प्रदेश पुनः वर आलेला दिसेल; जगत्-सूत्रचालक परमेश्वराचा हा खेळ आहे, तो बरोबर आहे कीं चूक आहे, न्याय्य आहे कीं अन्यायाचा आहे, हें म्हणण्याचा आपणाला अधिकार नाहीं; विधात्याच्या हुकुमापुढें मान लववीणें एवढेंच आपलें कर्तव्य आहे; असा व्यापक मार्गदर्शक सिद्धान्त बंकीमचंद्रांनीं पुढें मांडला.

हा सिद्धान्त मांडून दोन पिढ्यांवर काळ आतां लोटला आहे. पौर्वात्य संस्कृतीचे विशेष जे जगत्सूत्रचालक ईश्वरावरील गाढ विश्वास व त्याच्या अनुरोधानें सर्व गोष्टींची तात्त्विक संगति लावण्याचा प्रयत्न, त्यांस अनुसरून वंकीमचंद्रांनीं हिंदुस्थानच्या पारतंत्र्याची मीमांसा करून सरणी लावली. या मीमांसेवरच तत्कालीन हिंदी लोकांचें आयुष्य उभारलेलें असे. धार्मिक श्रद्धेच्या पायावर हा सिद्धान्त मांडलेला असल्यानें तत्कालीन जुन्या लोकांना तो मानवण्यासारखा होता.

पण वंकीमचंद्रांची पिढी जाऊन 'युगान्तर' झालें तेव्हां हा सिद्धान्त सर्वांनाच पटणारा राहिला नाहीं. दैववाद आणि प्रयत्नवाद यांचा जो झगडा अनादिकालापासून सुरू आहे त्यांतील प्रयत्नवादाचा जोर वाढत चालला तसतसें इंग्रजांचा अंमल गोडीगुलावीनें सहन करण्याचें धोरण सुटत चाललें. पण परकी सत्तेच्या वास्तील किल्ल्याच्या भिंती पूर्ववत् अभेद्यच होत्या.

'परकीसत्तेच्या या अभेद्य वास्तील तुरुंगाच्या तळघरांत राहणाऱ्या हिंदी लोकांना कधीं स्वातंत्र्यसूर्यदर्शन होईल का हो?' असें हिंदी तरुण विचारावयास लागला. वडीलधाऱ्या माणसांचें उत्तर ठरलेलें होतें. ते वंकीमचंद्रांच्या भाषेंत तें देत. 'वेड्या, या अभेद्य भिंतीवर डोकें आपटून जीव देण्यांत काय अर्थ आहे? जेव्हां धरणीकंप होईल तेव्हांच या भिंती कोसळल्या तर नकळे! या तुरुंगाच्या खोलींतच कांहीं सोय लागल्यास लावून घ्यावी हें उत्तम! अनेक पिढ्या तुरुंगांत गेल्या कारणानें आतां स्वातंत्र्यसूर्याकडे पाहण्याचीहि आपल्या डोळ्यांस संवय राहिलेली नाहीं, डोळे तावडतोव दिपतात. सूर्य पाहण्यासाठीं या किल्ल्याच्या वाहेर पडलों तर आपणाला चालतांहि येणार नाहीं, अडखळून पडावयाला होईल. खेरीज वाहेरील कोणी आपला वाटाड्या होण्याला आपली कोणाशीं ओळख राहिलेली नाहीं. तेव्हां स्वस्थ चित्तानें येथेंच कालक्रमणा करणें चांगलें!'

वृद्ध पित्याचें हें म्हणणें तरुणास पटलें नाहीं; पण करणार काय? सूर्यदर्शन व्हावें अशी तर इच्छा होती, पण उपाय सुचेना! तेव्हां तुरुंगाच्या जेलरला भेटून तरी आपणास सूर्यदर्शन होतें कीं काय हें पाहण्याचा विचार

त्याच्या मनांत आला व एकदां तरी उजेड दाखविण्याबद्दल त्यानें त्याला विनंति केली. पण त्या जेलरजवळ तुरुंगांत वागावयाच्या नियमांचें एक अगडवंब पुस्तक होतें. सूर्यदर्शन तर राहोच पण तुरुंगांतच कांहीं मोकळीक मिळविण्यासाठीं तरुणानें प्रश्न टाकला कीं तो जेलर कोणत्या तरी नियमावर आपलें बोट ठेवी. 'या नियमाप्रमाणें हें करतां येत नाहीं व त्या नियमाप्रमाणें तें देतां येणार नाहीं,' असा नन्नाचा पाढा त्यानें चालविला.

मध्यंतरीं एकदां खरोखरीच धरणीकंप झाला. सूर्यदर्शनाची उत्कंठा लागलेल्या त्या माणसाला वाटलें, आतां बापानें सांगितल्याप्रमाणें या भिंती कोसळतील व आपली इच्छा एकदांची पूर्ण होईल. भिंतीचे दगड हालल्याचाहि त्याला भास झाला. पण दुर्दैव त्याचें, भिंत ढांसळली नाहीं व तट कायमच राहिला. हेंच काय, पण या धक्क्याच्या अनुभवानें शहाणें होऊन त्या जेलरनें त्या तटाला आणखी बुरूज बांधून मजबुती आणली.

असें होतां होतां त्या तरुणाचेंहि केंस पांढरे झाले. पुढें एक दिवस तो मरावयास टेकला तेव्हां त्यानें आपल्या मुलास जवळ बोलाविलें. बापाची गाढ निराशा झालेली होती ही गोष्ट तरुणास ठाऊक होती. बापानें आपल्या अनुभवानें शहाणें होण्याबद्दल मुलास उपदेश केला. तो म्हणाला, 'या जेलरजवळ तूं कांहीं मागूं नको, त्याचा पुरा अनुभव मीं घेतला आहे. तुझ्या दांतांच्या कण्या झाल्या तरी या जेलरवर त्याचा कांहीं परिणाम होणार नाहीं. तुझ्या आंगांत कांहीं पाणी असलें तर या जेलरला तूं सळो कीं पळो करून सोड. जन्मभर विनवण्या करून त्या पाषाणहृदयाला कांहीं दया आली नाहीं. माझी गाढ निराशा त्यानें केली.' असें म्हणून म्हाताऱ्यानें डोळे मिटले.

तरुणानें बापाचा उपदेश लक्षांत ठेवला व त्याच्या अनुरोधानें आपलें वर्तन चालविलें. बाप ज्याप्रमाणें तुरुंगाच्या नियमांनुरूप बिनबोभाट वागत असे त्याप्रमाणें मुलगा वागत नाहीं हें जेलरच्या लक्षांत येण्यास वेळ लागला नाहीं, कारण तो जेलर तसाच चाणाक्ष होता. त्यानें या बेलगाम झालेल्या तरुणाच्या स्वैर वर्तनाला आळा घालण्यासाठीं आपल्या त्या अगडबंब पुस्त-

कांत नवे नियम घातले व कांहीं जुन्या नियमांस पुस्त्या जोडण्याचा तडाखा चालविला. खुळा बापडा जेलर, नियम न पाळणाऱ्या इसमाला नियमांची भीति उरत नाहीं हें तो विसरला.

जेलच्या नियमांपैकीं एक, प्रत्येक तुरुंगवासियानें जेवलेंच पाहिजे असा होता. हा नियम करण्याचा हेतु असा होता कीं, प्रत्येक तुरुंगवासियाच्या अंगांत चटया विणण्याचें तुरुंगांतील काम करण्याइतकी शक्ति राहिली पाहिजे. पण जेव्हां त्या तरुणानें तुरुंगाच्या नियमाशीं असहकारिता चालविली, तेव्हां जेलरपुढें मोठा विकट प्रश्न येऊन पडला. कारण जेलरचा वरिष्ठ जो तुरुंगाचा मालक त्याची अशी सक्त आज्ञा होती कीं, रोज माणशीं दहा चटया विणल्या गेल्याच पाहिजेत. हें काम व्हावयास प्रत्येक कैद्याच्या अंगीं तेवढी शक्ति राखणें हें जेलरचें कर्तव्य होतें. पण तरुणानें असा हट्ट धरला कीं, ‘ तूं मला सूर्यदर्शन घडविणार असशील तरच मी अन्न घेईन, नाहींतर नाहीं.’

जेलरनें असें वर्तन करण्याचा तुला नियमाप्रमाणें हक्क नाहीं असें सांगितलें. त्याचा उपयोग होईना, तेव्हां नियम मोडण्यावद्दल शासन करण्याचा धाक घातला. त्यानेंहि वळेना तेव्हां याच्या वर्तनानें इतर तरुण विघडूं नयेत या हेतूनें तुरुंगांतच हवाहि आंत न येणारी एक खोली होती तींत त्यास डांबून टाकलें.

जेलरला वाटलें, हवेच्या कमतरतेनें हा तरुण कासावीस झाला कीं झकत वठणीवर येईल. पण बराच काळ लोटला तरी तरुण हूं कीं चूं करीना.

जेलरच्या मनांत आतां भीति उत्पन्न झाली. हा तरुण हवेच्या अभावानें मेला तर ! तरी पण त्याला वाटत होतें कीं, अगदीं शेवटच्या क्षणास तरी हा तरुण जेलचे नियम पाळण्याचें कवूल करील व मग आपला हेतु सिद्धीस जाईल.

पण जेलरचा अंदाज खरा ठरला नाहीं. त्या तरुणाला स्वातंत्र्यसूर्याचें एकदां तरी दर्शन व्हावें याचाच निदिध्यास लागला होता. त्यानें आपणाला दरवाजा उघडून वाहेर घे असें जेलरला म्हटलें नाहीं.

'वेड्या माणसा, या तुरुंगाचे नियम आजपर्यंत कोणी मोडूं शकला नाहीं. तुलाच कोठून ही खुळी अवदसा आठवली आहे ? जेवण्याचें कबूल कर म्हणजे तुला बाहेर काढतों. उगाच मरणाच्या जबड्यांत तूं कशासाठीं उडी घेत आहेस ?' जेलरनें ओरडून तरुणास विचारिलें.

तरुण क्षीण झाला होता तरी त्यानें ठांसून उत्तर दिलें, 'सूर्यदर्शन करवीन असें वचन दे, नाहीं तर मी स्वतःच्याच पराक्रमानें आज या तुरुंगाच्या बाहेर जाऊन सूर्यदर्शन घेणार आहें.'

जेलर हांसला. 'हा क्षीण तरुण या अभेद्य तुरुंगाच्या बाहेर जाऊन सूर्य-दर्शन घेईन म्हणतो काय ? घेऊं दे कसा तो ! फुकट मरणार आहे झालें !'

त्या जेलरला त्या तुरुंगांतील अगडबंब पुस्तकांत असलेले सर्व नियम मुखोद्गत होते. पण बापड्याला आत्म्याच्या गतिशास्त्राचें बिलकुल ज्ञान नव्हतें !

इतक्यांत कसला तरी भयंकर आवाज झाला. जेलरला वाटलें तुरुंगाची भिंत कोठें तरी कोसळली; तेव्हां भीतीनें त्यानें त्या तरुणाच्या खोलीचें दार उघडलें. तेव्हां त्याला काय दिसलें ? त्या तरुणाचा पार्थिव देह तेथें पडलेला होता; पण त्याचा आत्मा कोठें गेला होता ? जेलरनें तपास चालविला. एकहि छिद्र नसणाऱ्या खोलींतून याचा आत्मा बाहेर कसा गेला याचें त्याला फार आश्चर्य वाटलें.

इतक्यांत त्या खोलीच्या भिंतीच्या दोन दगडांमधील थोडा चुना त्या जेलरच्या अंगावर पडला, व त्या दगडाच्या भेगींतून बाहेरील स्वातंत्र्यसूर्याचा एकच बारीक किरण त्या निबिड अंधकारांत येऊन पडला. पण तेवढ्यानें कधींहि उजेड न पाहिलेल्या त्या बास्तीलमधील रहिवाश्यांचे डोळे दिपले.

जेलरला आतां कळून चुकलें कीं, या बारीक छिद्रांतूनच त्या यतींद्र तरुणाचा आत्मा, आपण सुरक्षित समजतों त्या तुरुंगांतून बाहेर निघून गेला. आत्म्याच्या अंगीं तुरुंगाच्या अभेद्य भिंती फोडण्याचेंहि सामर्थ्य असतें हें जेलरला आतां उमजलें.

इतक्यांत जेलरच्या कानीं बाहेरील विकट हास्य पडलें. जेलरनें आपला डोळा त्या बारीक छिद्राला लावला. तेव्हां आपणाकडे पाहून तो यतींद्रच हंसत आहे असें दृश्य त्याच्या दृष्टीस पडलें. आपल्या निश्चयाप्रमाणें यतींद्रानें स्वातंत्र्याच्या प्रकाशांत आपला प्रवेश करून घेतला होता. जेलरच्या चेहेऱ्यावर खिन्नता पसरली.

पारतंत्र्याच्या निबिड अंधकारांत चांचपडत राहिलेल्या हिंदवासियांनो, तुमच्या गाढ निराशेच्या काळोखांत आशेचा किरण पाडून यतींद्रानें बाहेर पडण्याचा मार्ग दाखविला आहे. तुरुंगांतून बाहेर पडण्याचा हा एकच मार्ग आपणापुढें आहे. तुम्ही काय करणार आहांत ?

यतींद्रानें अनशनामुळें आपणावर ओढून घेतलेलें मरण शहाणपणाचें होतें कीं मूर्खपणाचें होतें, योग्य होतें कीं अयोग्य होतें, न्याय्य होतें कीं अन्यायाचें होतें, नीतिविहित होतें कीं अनीतिमूलक होतें, धर्मसंमत होतें कीं अधर्मपर होतें, याची चर्चा पोटाळ वावदुकांनीं पाहिजे तर करावी. यतींद्र तरी स्वतः, गदापर्वांतील ‘ **को नु स्वंततरो मया ।** ’ माझ्याहून जास्त चांगलें मरण दुसऱ्या कोणाचें ? किंवा मोरोपंतांच्या भाषेंत द्यावयाचें तर ‘ **स्वंततर कवण मजहुनि, आतां कर्तव्य राहिलें काय ?** ’ असेंच म्हणत आहे हें उघड आहे.

यतींद्रासारख्या संयमी, बेफाट तरुणाच्या आत्मयज्ञाची ज्वाला लागून तरी हिंदी लोकांच्या अंगांतील हुडहुडी नष्ट होईल काय ? यतींद्रांनीं पाडलेल्या व्हायोलेट ( रक्तनील ) किरणाच्या प्रक्रियेनें तरी हिंदी लोकांच्या अंगांत खिळलेला पारतंत्र्यरोग बरा होण्याच्या पंथास लागेल काय ? या प्रश्नाचें उत्तर एकच, आपण नियमानें या नव आशारश्मीचा उपचार चालू ठेवूं, तर निश्चयानें या रोगाचा नायनाट होईल. एका दिवसाच्या उपचारानें कोणता महान् रोग बरा झाला आहे ?

**प्रगति** } वर्ष १ अंक १६<br>ता. २१ सप्टेंबर १९२९

# “ ज्ञानोपासना व भारतीयांचें कर्तव्य ” *

येत्या आठवड्यांत सालाबादप्रमाणें वार्षिक गणेशोत्सव महाराष्ट्रांत सुरू होईल. गणपति ही सर्वविघ्ननाशक ज्ञानदेवता आहे. ज्ञानानेंच विघ्नांचा नाश होतो, याची निदर्शक ती देवता आहे. म्हणूनच लोकमान्यांनीं गणपत्युत्सव सुरू केला. पण त्या उत्सवाचा उपयोग आतां बहुधा ख्यालीखुशालीकडे व्हावयास लागल्याचें दृश्य दिसत आहे. वर्षांतून निदान दहा दिवस तरी ज्ञानोपासनेला संघटित चालना मिळेल तर तें कार्य लहान म्हणतां येणार नाहीं. तसेंच गणपति म्हणजे गणांचा पति. त्याच्या उपासकांनीं लोकांचे गण स्थापण्याच्या कार्याला वाहून घेतलें पाहिजे. पण या उत्सवाचें प्रत्यक्ष स्वरूप पाहिलें तर असें दिसून येतें कीं, उत्सवाच्या प्रत्येक ठिकाणीं, प्रत्येक वाडींत, प्रत्येक चाळींत किंवा प्रत्येक संस्थेंत भांडण, मारामारी, पक्षभेद नाहींत अशी जागाच कोठें सांपडणें कठीण ! याचें कारण हे गणपतीचे भक्त त्या ज्ञानदेवतेची उपासना करीत नाहींत हेंच होय. अज्ञानतिमिरपटल डोळ्यांवरून गेलें कीं आपोआप विघ्नांचा नाश झालाच म्हणून समजावें. मग पक्षभेद, मतभेद, भांडण किंवा मारामारी यांना अवकाशच रहाणार नाहीं. या देशांतील लोक अशा तऱ्हेची खरी ज्ञानोपासना विसरल्यामुळेंच त्यांची

---

* ‘ ज्ञानोपासना व भारतीयांचें कर्तव्य,—नव भारतग्रंथमाला, १ लें पुस्तक—कॉंग्रेसनगर नागपूर.

सर्व दृष्टींनीं हलाखीची स्थिति आली आहे. ज्ञानोपासनेचा खरा मार्ग सोडावयाचा व ज्ञानदेवतेला लाल शेंदूर व जास्वंदीचीं लाल फुलें तेवढीं वाहात बसावयाचें, असला उलटा कार्यक्रम हल्लीं सुरू आहे. तो सोडून खऱ्या ज्ञानमार्गाचें अवलंबन लोकांनीं करावें, त्यांच्यांतील अज्ञानघनतिमिराचा नाश व्हावा एतदर्थ महाराष्ट्रांत कांहीं विद्वानांनीं संघटित प्रयत्न करण्याचें योजिलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

लोकांच्या मायभाषेंत ज्ञान प्रकट झाल्याखेरीज, त्याचा फैलाव घरीं दारीं झाल्याखेरीज, लोकांना स्वभाषेंतच विचार करतां व ते विचार प्रकट करतां आल्याखेरीज ज्ञानोपासनेचा मार्ग आक्रमिणें अशक्यप्राय होऊन बसतें. हें ओळखूनच सहाशें वर्षांमागेंच ज्ञानेश्वरांनीं तत्कालीन विद्वानांच्या मार्गाविरुद्ध बंडखोरी पुकारून ज्ञानाचा प्रसार लोकांच्या रोजच्या बोलण्याच्या भाषेंत करण्याचा उपाय योजला. त्यानंतर महाराष्ट्रांतील लहानमोठ्या संतसाधूंनींहि त्यांचाच मार्ग पुढें चोखाळला. पण त्यांच्या प्रयत्नांचें क्षेत्र आध्यात्मिक व पारलौकिक कल्याणापुरतेंच गुरफटून राहून व्यावहारिक पदोपदीं रोज उपयोगास येणाऱ्या आवश्यक ज्ञानाचा प्रसार त्यांकडून होऊं शकला नाहीं. त्यामुळें भौतिकदृष्ट्या या देशांतील लोक बहुधा प्राचीन काळांतच गोंधळत राहिले. तिकडे यूरोपांत ड्रेक, हंफ्रे, कोलंबस, डायाझ प्रभृतींनीं पृथ्वीचा शोध प्रत्यक्ष जलपर्यटन करून चालविला असतां आम्हीं मात्र मॅकॉलेनें तुच्छतेनें म्हटलें आहे त्याप्रमाणें दुधादह्यांच्या सागरांत सुवर्णाच्या मेरू पर्वताभोंवतीं प्रदक्षिणा घालीत राहिलों. तिकडे कोपर्निकस, गॅलिलिओप्रभृति ज्योतिषी विश्वाचें वास्तविक स्वरूप समजावून देत असतांना आम्हीं मात्र राहूकेतूंच्या फेऱ्यांतून सूर्यचंद्रांना सोडविण्यासाठीं नदीच्या पाण्यांत उभें राहून अर्घ्यं देत राहिलों. या प्राचीन मार्गाबद्दल आमची निष्ठा एवढी जबर कीं नानासाहेब पेशवा निजाम चालून आला असतांना भीमेच्या पात्रांत स्नान करीत राहिला व दुसरीकडे निजामानें त्याचे सोन्याचांदीचे देव लुटून नेले! ज्यांचे देवसुद्धां देव्हाऱ्यांत सुरक्षित राहीनासे झाले, त्यांनीं त्या देवतांची उपासना करीत बसावें, याहून आत्मघातकी उपासनेचा मार्ग अन्य

कोणता ? शनिवारवाड्यांत व अन्य ठिकाणीं गणपतीस दुर्वा वाहण्याचा तडाखा सुरू ठेवण्याऐवजीं पेशव्यांनीं—ज्ञानरक्षक ब्राह्मणांच्या कुलांत जन्मलेल्या राज्यकर्त्यांनीं—आपल्या गणपतीला वाहण्याच्या दुर्वा तत्कालीन यूरोपीय पंडितांकडून जमविल्या असत्या तर किती चांगलें झालें असतें ? आणि मग या देशांतील लोकांचे देव देव्हाऱ्यांत रहाणें किती सोपें झालें असतें ? तसें न केल्यामुळें पेशव्यांच्या उपास्यदेवतेच्या नांवानें वसविलेला तो गणेश महाल व त्यांतील विघ्ननाशक ती ज्ञानदेवता दोघेंहि कोठें नाहींशीं झालीं ! तरी अजूनहि आमचे डोळे उघडले नसून आम्हीं त्या गणपति-महालाचें पाश्चात्य चित्रकारांनीं काढलेलें चित्रच पहाण्यांत दंग आहोंत !!!

इंग्रज राज्य होऊन आमच्या डोळ्यांत चरचरीत अंजन पडलें तेव्हां कोठें आमच्यांत एखादा ज्ञानोपासक लोकहितवादी निर्माण होऊन आमच्या लोकांना जागें करूं लागला. एखादा चिपळूणकर आमच्या देशाची स्थिति समजावून देऊन ती सुधारण्याचा मार्ग दाखवूं लागला. एखादा आगरकर आमच्यांतील वेडगळ प्रकारांवर कडक टीका करून त्यांचें हास्योत्पादकत्व लक्षांत भरवून देऊं लागला. अखेर या सर्वांच्या कार्यांचा समन्वय लोक-मान्यांनीं करून ज्ञानदेवतेची उपासना करण्याचा मार्ग महाराष्ट्रांत उघडिला. पण या देशांतील लोकांच्या डोळ्यांवरील झोंप एवढी जोराची कीं त्यांच्या मार्गाचें रहस्यसुद्धां गीतारहस्य वाचूनहि लोक लवकरच विसरले. कर्ममार्ग सुटून दुबळा झांजा वाजवून आरती करण्याचा भक्तिमार्ग सर्वत्र बोकाळला. एका महापुरुषाचें कार्य अशा रीतीनें विफल झालें !

ज्ञानेश्वरांची परंपरा आधुनिक काळांत निग्रहपूर्वक पुढें चालविणारे विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा मातृभाषेंत ज्ञान प्रकट करण्याचा मार्ग थोडेच लोक अजून चोखाळूं लागले आहेत. ज्ञानकोशकार डॉ. केतकर हे राजवाड्यांचा मार्ग अनुसरणारे अग्रगणी समजावे लागतील. फ्रान्स देशां-तल्याप्रमाणें या देशांत प्रचंड सामाजिक क्रांति व्हावयाची, सर्व जुनीं खरकटीं वाहून जाण्याइतका ज्ञानौघ समाजांत निर्माण व्हावयाचा तर प्रथम त्या देशांतील एन्सायक्लोपिडिस्टांप्रमाणें या देशांतहि अनेक ज्ञानकोशकार निर्माण

झाले पाहिजेत व त्यांच्या शास्त्रीय ज्ञानाचें व नवविचारांचें लोण गरीब शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत पोचलें पाहिजे. देशी भाषांतून सर्व व्यवहार, ज्ञानमार्ग, नवविचार, सुरू झाल्यावांचून या देशाची प्रगति तिळमात्रहि होणें नाही, हें ओळखूनच नागपूरच्या विश्वविद्यालयांतील मराठी भाषेचे अध्यापक महाराष्ट्रास सुपरिचित असे प्रो. श्रीनिवास नारायण बनहट्टी यांनीं अनेक विद्वानांच्या सहाय्यानें एक नवीन ज्ञानप्रचारक माला नुकतीच सुरू केली आहे व तिचें पहिलें प्रास्ताविक पुस्तक जें ' ज्ञानोपासना व भारतीय कर्तव्य ' तें स्वतः लिहून या कार्याला जोरानें प्रारंभ केला आहे. यः क्रियावान् स पंडितः या वचनाप्रमाणें महाराष्ट्रांत अनेक विषयांचे तज्ञ असे अनेक पंडित असले तरी लोकांच्या दृष्टीनें त्यांस फायदेशीर अशी क्रिया करणारे प्रो. बनहट्टी हेच या बाबतींत खरे पंडित ठरतात, यांत संशय नाहीं. शास्त्रीय विषयांचा अभ्यास हें त्यांचें विशिष्ट अभ्यासाचें क्षेत्र नसूनसुद्धां त्यांनीं प्रस्तुतसारखें वाचकांत कुतुहल उत्पन्न करणारें पुस्तक लिहावें हें त्यांस भूषणास्पद आहे. ज्ञानाचें क्षेत्र प्राचीन चौदा विद्या चौसष्ट कलांच्या बाहेर केवढें वाढलें आहे याची कल्पना आणून देण्यास प्रस्तुत पुस्तकाचा उपयोग चांगला होईल. जुन्या तऱ्हेच्या वातावरणांत वाढलेल्या बनहट्टींची दृष्टि जुनें तेवढें सोनें, भारतीय आर्यांची संस्कृति तेवढीच कायती आदर्श संस्कृति, आमच्या पूर्वजांचें शोध तेवढेच कायते खरे शोध, असें कल्पिणारी नाहीं ही विशेष आनंदाची गोष्ट आहे. भौतिक शास्त्रज्ञानांत व आधुनिक रोजच्या उपयोगाच्या असंख्य कलांत आम्हीं किती मागासलेले आहोंत याची कल्पना हें छोटें पुस्तक वाचून वाचकांस होईल. त्या त्या शास्त्रांची, विद्यांची, व कलांची सांगोपांग शास्त्रीय माहिती वाचकांस देणें हा या प्रास्ताविक पुस्तकाचा उद्देशच नसल्यामुळें त्यांतील माहितीची चिकित्सा त्या त्या शास्त्राच्या दृष्टीनें करण्याची जरूरी बिलकूल नाहीं; मराठी वाचकांस भारतवर्षाचें स्थान जगांत काय आहे, याची कल्पना आणून देण्यास प्रस्तुत पुस्तक पुरेसें आहे. या पुस्तकाच्या वाचनानें प्राचीन आर्यांप्रमाणेंच दुसरेहि अनेक अनार्य जातींचे लोक पराक्रमी होते, ज्ञानसंपन्न होते, कलानिष्णात होते, ही गोष्ट कळून येईल.

तसेंच या अनार्य लोकांच्या पूर्वीच केलेल्या शोधांचा उपयोग करून भारतीय आर्य कसें पुढारले ही गोष्टसुद्धां मनावर ठसेल. येणेंकरून पूर्वजां-विषयींचा अज्ञानमूलक खोटा अभिमान नष्ट होऊन परक्यांच्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण करणें, ही गोष्ट वाईट नाहीं, हेंच काय पण आपल्या पूर्वजांनींहि ती आचरलेली आहे हें ध्यानांत येईल, आणि एकंदरींत डोळ्यांवर आलेल्या अज्ञानतिमिरपटलाचा नाश होऊन लोकांत जागृति होईल. वनहट्टींची विषयप्रतिपादन करण्याची पद्धतीहि सुबोध आहे. भाषाहि सोपी व अर्थवाहक आहे. अशा या पुस्तकाचें एकवार वाचन सर्व वाचतां येणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं करावें असें आम्हीं आग्रहानें सुचवितों. ही सूचना केवळ मराठी जाणणाऱ्यांपुरती नसून इंग्रजी वाचकांनींहि तिचा अवलंब करावा अशा तऱ्हेचें प्रस्तुत पुस्तक आहे.

या पुस्तकांतील अनेक विषयच असे आहेत कीं ज्यांत मतमतांतरें फार व माहितीची गणिती दृष्टीनें पाहतां निश्चिती नाहीं. त्यांतूनहि रा. वनहट्टी यांची त्या त्या शास्त्रांच्या पारिभाषेशीं असावी तितकी दाट मैत्री असणें शक्य नसल्यामुळें कांहीं चुका होणें अपरिहार्य आहे. संकलनकाराचें व संग्राहकांचें काम नेहमींच या दोषानें लिप्त असतें. उदाहरणार्थ पृष्ठ १८७ वर निआंडरथॉल हें ठिकाण म्हटलेलें आहे. तसें तें ठिकाण नाहीं तर ती आतां विशिष्ट ठिकाणच्या मूळ हाडांवरून रूढ झालेली पारिभाषिक संज्ञा आहे. प्राचीन इराणांतील जगज्जेत्या राजाचें नांव पृष्ठ २९ वर लिहिल्या-प्रमाणें सायरस असें वाचावयाचें नसून इंग्रजी सीचा क असा उच्चार करून कायरस असें वाचावयाचें आहे. कायरस हा इराणी कैखुश्रू नांवाचा ग्रीक अपभ्रंश आहे. पृष्ठ १७९ वर मुंबई विश्वविद्यालयाच्या समाजशास्त्रपाठशाळेंत मानवशास्त्राचा पत्ताहि कोणास नाहीं असें म्हटलें आहे तें अज्ञानजन्य आहे. या विषयाचे एक अध्यापक मानवशास्त्रच मुख्यतः शिकवीत असतात व दुसरे समाजसंस्कृतिशास्त्र शिकवीत असतात. या देशांत हा विषय पूर्णपणें शिकविण्याजोगी सामुग्री एके ठिकाणीं सांठविलेली नाहीं, असें म्हटलें असतें तर तें जास्त खरें ठरलें असतें. या व अशा तऱ्हेच्या कांहीं समजुतीच्या

चुका या:पुस्तकांत आढळतील. पण त्यामुळें त्याच्या महत्त्वांत अणुरेणुहि फरक पडण्यासारखा नाहीं. या पुस्तकाचा उपयोग माहितीच्या अचुकपणासाठीं करावयाचा नसून डोक्याला चालना देण्यासाठीं करावयाचा आहे. एकंदरींत ही ' नवभारत ग्रंथमाला ' सुरू करून प्रो. बनहट्टींनीं ज्ञानोपासनेच्या जरूरीच्या कार्यास चांगली जोराची कलाटणी दिली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा तऱ्हेच्या शास्त्रीय ग्रंथांची माला पूर्वी पुण्याच्या दाभोळकर मंडळीनें प्रसिद्ध करण्याचें व्रत चालविलें होतें, व दुसरेहि अल्पस्वल्प प्रयत्न या बाबतींत झाले होते. पण त्यांहून प्रस्तुत प्रयत्न जास्त शास्त्रशुद्ध व उपयुक्त होण्याचा रंग दिसतो. अल्प किंमतींत अशा तऱ्हेचीं चांगलीं पुस्तकें मराठी वाचकांच्या हातांत देण्याच्या कामांत प्रो. बनहट्टींना यश आल्यास ज्ञानप्रसाराचें कार्य खालच्या थरापर्यंत जाऊन पोंचण्याचा चांगलाच संभव आहे. म्हणूनच या प्रयत्नास मराठी वाचकांनीं व विशेषतः संपन्न सद्गृहस्थांनीं अवश्य आश्रय देऊन हा प्रयत्न चिरंतन व यशस्वी करण्याच्या कामास हातभार लाविला पाहिजे. तसा तो लावला जावो व महाराष्ट्रांत ज्ञानाचा प्रसार घरोघर होवो, असें इच्छून आम्ही हा अभिप्रायपर लेख पुरा करतों. येत्या गणपत्युत्सवांत कोरड्या देशभक्तीच्या उथळ व्याख्यानांऐवजीं या ग्रंथाचें वाचन ठिकठिकाणीं होईल व त्यांतील प्रतिपादनास अनुसरून अनेक शास्त्रीय विषयांचीं शिक्षणमंडळें व चर्चामंडळें अनेक ठिकाणीं स्थापन होतील तर ज्ञानदात्या गणेशाची उपासना जास्त चांगली केल्याचें श्रेय लोकांस मिळणार आहे.

**प्रगति** } वर्ष ३, अंक १५<br>ता. १० सप्टेंबर १९३१

ग्रंथ

पत्रव्यवहार

# खुलासा

‘प्रगती’च्या १० सप्टेंबरच्या अंकांत ‘ज्ञानोपासना व भारतीयांचें कर्तव्य’ या पुस्तकावर आपण जो अभिप्राय दिला आहे, त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. त्यांतील इतर मजकुरासंबंधानें मला कांहींच म्हणावयाचें नाहीं. परंतु त्यांत माझ्या पुस्तकांतील ज्या तीन चुका म्हणून दाखविल्या आहेत त्या वस्तुतः चुका नाहींत येवढेंच मला या पत्राच्या द्वारें दाखवावयाचें आहे.

(१) पृ. १८७ वरील ‘निआंडरथॉल’ हें ठिकाण नाहीं असें आपण कसें म्हणतां हें मला समजत नाहीं. जर्मनींतील डयूसेलडॉर्फ नामक मोठ्या शहराजवळ निआंडरथॉल नांवाचें खोरें आहे. कोणत्याहि चांगल्या गॅझेटी-यरमध्यें आपल्याला त्याचा उल्लेख असलेला आढळेल. आतां तेथें सांपडलेल्या कवटीवरून ‘निआंडरथॉल’ हा शब्द पारिभाषिक संज्ञेसारखा झाला आहे हें खरें, परंतु त्यावरून तें ठिकाण नाहीं असें कसें ठरतें?

(२) पृ. २९ वर आलेल्या इराणच्या राजाच्या Cyrus या नांवाचा उच्चार इंग्रजींत ‘सायरस’ असाच करतात. आपण म्हणतां त्याप्रमाणें त्याचा ‘कायरस’ असा उच्चार इंग्रजींत होत नसून ‘सायरस’ असाच होतो हें Webster च्या विख्यात इंग्रजी कोशामध्यें शेवटीं दिलेल्या Pronouncing Biographical Dictionary मध्यें Cyrus हा शब्द

काढून पाहिल्यास आपल्या लक्षांत येईल. ( १९२८ची आवृत्ति पृ. २५०३ ) Lippincott च्या व्यक्तिनामकोशामध्येंहि ' सायरस ' असाच उच्चार दिलेला आहे. इंग्रज लोक प्रत्यक्ष उच्चारहि तसाच करितात. आपण देतां ती त्या शब्दाची व्युत्पत्ति ठीक आहे. व अपभ्रष्ट इंग्रजी शब्द न वापरतां मूळ ' कैखुश्रू ' हा शब्दच वापरावा असेंहि आपण प्रतिपादन करूं शकाल. परंतु तो मुद्दा अलाहिदा आहे. आज सर्व जगभर प्रचलित असलेला Cyrus हा शब्दच मीं योजिला आहे व तो सर्वमान्य उच्चाराप्रमाणें ' सायरस ' असाच लिहिणें बरोबर आहे, असें मला वाटतें.

( ३ ) पृ. १७९ वर आपण म्हणतां त्याप्रमाणें ' मुंबई विश्वविद्यालयाच्या समाजशास्त्रपाठशाळेंत मानवशास्त्राचा पत्ताहि कोणास नाहीं ' असा मजकूर मी लिहिलेला नसून ' ( आपल्याकडे ) मानवशास्त्राचा पत्ताहि **फारसा** कोणास असल्याचें दिसत नाहीं ' असें सर्वसामान्य व सावधगिरीचें विधान मीं केलें आहे. समाजशास्त्राची थोडीशी तरी जाणीव आपल्या इकडील लोकांस झालेली आहे; मानवशास्त्राची तितकी देखील झालेली नाहीं येवढेंच सांगण्याचा माझा उद्देश आहे. आपण म्हणतां त्याप्रमाणें मुंबई युनिव्हर्सिटींत मानवशास्त्राचा अभ्यास चाललेला असल्यास ती मोठी आनंदाची गोष्ट आहे. हाच अभ्यास यापुढें अधिक जोरांत चालावा व त्याचा सर्व महाराष्ट्रभर शीघ्र फैलाव व्हावा हीच माझी इच्छा आहे.

पुस्तकावरील अभिप्राय म्हणजे ज्या परीक्षकापुढें पुस्तककर्ता आपण होऊन उमेदवार म्हणून जातो, अशा परीक्षकानें दिलेला निकाल. या निकालाविरुद्ध तक्रार करणें किंवा त्यासंबंधानें वाद खेळूं पाहणें अगदीं असमंजसपणाचें होय; व तसें करण्याचा माझा लवमात्रहि उद्देश नाहीं. शिवाय आपला निकाल सुदैवानें मला अत्यंत अनुकूल असाच झालेला असल्याकारणानें तसें करण्याची जरूरीहि नाहीं. कांहीं प्रत्यक्ष सिद्ध गोष्टीं-संबंधानें ( Facts ) खुलासा केल्यास सत्यज्ञानास मदत होईल येवढ्याच बुद्धीनें मी हे चार शब्द लिहिण्यास प्रवृत्त झालों आहें. तरी त्यांना आपल्या सुंदर पत्रांत स्थळ दिल्यास मी आपला फार आभारी होईन. क. हे. वि.

काँग्रेस नगर, नागपूर
ता. १३।९।३१

आपला नम्र
**श्री. ना. बनहट्टी**

# खुलाशास उत्तर

प्रो. वनहट्टींचा खुलासा आम्ही मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करतों. प्रगतीचे संपादक स्वतःस सर्वज्ञ समजत नाहींत, आणि म्हणूनच आपल्याविरुद्ध लिखाणास केराची टोपली दाखविण्याचा त्यांचा प्रघात नाहीं. वनहट्टींच्या खुलाशावरून एक गोष्ट स्पष्ट होते व ती ही कीं, नामूलं लिख्यते किंचित् असा त्यांचा ओजस्वी पंडिती बाणा प्रस्तुत पुस्तकांतहि कायम आहे; पण आम्हीहि वनहट्टींप्रमाणेंच त्यांस सांगूं इच्छितों कीं केवळ चुका दाखवावयाच्या म्हणून आम्हीं उपरिनिर्दिष्ट दोष दाखविले नाहींत. वनहट्टींच्या चुका या कदाचित् शब्दार्थी चुका नसतील, पण त्यांच्या लिहिण्यांत एक प्रकारचा सैलपणा आहे एवढेंच आम्हांस दाखवावयाचें होतें. उदाहरणार्थ—

( १ ) निआंडरथॉल ही संज्ञा 'विशिष्ट ठिकाणच्या' मूळ हाडांवरून पडली आहे हें आम्हीहि आमच्या लिखाणांत म्हटलेलेंच होतें. अर्थात् तें ठिकाण नाहीं हें आमचें लेखन विशिष्ट अर्थानेंच केलें होतें हें वनहट्टींनाहि पटेल. आमच्या लिहिण्याचा आशय असा कीं ज्या विशिष्ट तऱ्हेच्या मनुष्यजातीचीं हाडें पॅलेस्टाइन, स्पेन, फ्रान्स, बेल्जम, जर्मनी, इतक्या वेगवेगळ्या प्रदेशांत सांपडलेलीं आहेत, त्या जातीला मूळ ठिकाणच्या नांवावरून निआंडरथॉल अशी संज्ञा मिळणें रास्त असलें तरी मूळ ठिकाणचाच तो माणूस असें म्हणण्यांत स्वारस्य व शास्त्रशुद्धता नाहीं, म्हणून निआंडरथॉल शब्दाचा

उपयोग विशेषणार्थीच करणें योग्य आहे. ( २ ) इराणच्या राजाच्या नांवाचा उच्चार बऱ्हंशीं सायरस असाच करतात हें आम्हांस माहीत आहे; हेंच काय पण आम्हीं स्वत:हि अगदीं कालपर्यंत तसाच उच्चार करीत होतों. कोशांनीं रूढ उच्चार द्यावें हें रास्तच आहे. पण पंडितांनीं ते स्वीकारणें व अनुसरणें मात्र नेहमींच योग्य ठरणार नाहीं. पंडितांचा अधिकार कोशकारांचेंहि लिखाण तपासून घेण्याचा आहे. भाषांतरित नामोच्चार नेहमींच कमीजास्त प्रमाणांत अपभ्रष्ट होत जात असतात. प्रत्येक भाषेची लकब व घडण वेगवेगळी असते. यूरोपीय भाषांतून मूळ ग्रीक व लातिन भाषांच्या लकबीमुळें व घडणीमुळें फारच गोंधळ माजलेला दिसून येतो. मूळ ग्रीक भाषेंत सी हें इंग्रजी अक्षर नाहीं. इंग्रजींत सीचा उच्चार स व क असा दोन्ही तऱ्हेचा होत असतो. ग्रीक भाषेंत क उच्चार फक्त के या अक्षरानेंच दाखविला जात असतो. लातिन भाषेंत आरंभीं सी या अक्षरानेंच क उच्चार दाखविला जात असे. यूरोपीय लिपींतील सी हें अक्षर ग्रीक गामा ऊर्फ जी या अक्षरापासूनच निघालेलें आहे. क आणि गचे उच्चार लातिन लोक सारखेच करीत असल्या-मुळें ते सी हें अक्षर जी या अक्षराशीं आरंभीं अभेदरूपानें किंवा विकल्पानें वापरीत असत. रोमन इतिहासाचा अभ्यास करणारांस ठाऊकच असेल कीं Caius व Gaius हीं नांवें सळभेसळीनें ग्रंथकाराच्या रुचीप्रमाणें त्या इति-हासांत वापरलेलीं असतात. पण कांहीं काळानंतर सीचा क हा उच्चार मागें पडून स हा उच्चारच अनेक वेळीं रूढ झाला. त्यामुळें ग्रीक के या अक्षरानें आरंभिलेले अनेक शब्द लातिन भाषेंत सी या क-उच्चारार्थी अक्षरानें लिहिले जात असूनहि त्यांचा रूढ उच्चार स असाच होऊं लागला. अजूनहि ही प्रथा मोडलेली नाहीं. इंग्रजींत सिनेमाटोग्राफ असा ज्याचा उच्चार केला जातो, तो शब्द मूळ किनेमाटोग्राफ असाच ग्रीक किनिओ या धातूपासून निघालेला आहे. पण लातिन वंशापैकीं फ्रेंच भाषेच्या मध्यस्थीनें हा शब्द इंग्रजी भाषेंत घुसडला गेल्यामुळें किनेमाच्या ऐवजीं सिनेमा असें रूपच आज रूढ झालेलें आपणास दिसतें. इतर शब्दांच्या बाबतींत असें झाल्यास त्यापासून फारशी नुकसानी नाहीं. पण नांवाच्या बाबतींत असा बदल झाल्यास मूळ

अगदींच लोपून जाऊन मोठ्या पुरुषांचीं व स्थळांचीं नांवें चुकीचीं उच्चारलीं जातात. हा प्रकार आम्हांस अगदीं गैर वाटतो व शल्याप्रमाणें बोंचतो. मूळ फारशी कुरु–श नांवाचें कुरश असें बाबिलोनी रूप झालें. त्याचें कोरेश असें यहुद्यांच्या भाषेंत रूपांतर होऊन त्यावरून ग्रीकांनीं कुरॉस असा उच्चार उचलिला, या कुरॉसवरून रोमन लोकांनीं आपल्या भाषेच्या घडणीस अनुसरून कायरस असें रूप तयार केलें. मात्र कालांतरानें सीचा क हा उच्चार लोपून सायरस हें अशुद्ध नांव रूढ झालें. खरें पाहूं जातां या इराणी नांवाच्या राजाप्रमाणेंच इतर अनेक लोकांचीं व स्थलांचीं नांवें संशोधिलीं जाणें अवश्य आहे. या गोष्टीकडे लक्ष वेधण्यासाठींच आम्हीं वनहट्टींची चूक कीं जी अगदीं कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें तर त्यांच्या मतें चूक ठरणार नाहीं, ती दाखविली होती. वनहट्टींनीं सायरस असा उच्चार करून मोठा अक्षम्य गुन्हा केला असें म्हणण्यासाठीं नव्हे. ( ३ ) मुंबई विश्वविद्यालयाच्या बाबतींतहि वनहट्टींचें लिहिणें ढिलें व अज्ञानजन्य आहे, हेंच आम्हांस दिग्दर्शित करावयाचें होतें. वनहट्टी आतां आपल्या वाक्यांत ‘ आपल्याकडे ’ असा शब्द त्यांच्या मनांत अभिप्रेत असलेला म्हणून स्पष्टार्थदर्शनासाठीं घालूं पाहतात. पण मूळ वाक्यांचा समन्वित अर्थ आम्हीं म्हणतों त्याप्रमाणेंच कोणीहि घेईल अशी आमची समजूत आहे. वाचकांच्या सोईसाठीं मूळ तीन वाक्यें येथें देतों—

‘ आज कित्येक वर्षे मुंबई युनिव्हर्सिटीनें उच्च वर्गीय विद्यार्थ्यांकरितां समाजशास्त्र शिकविण्याची एक पाठशाला चालविलेली आहे. त्याचप्रमाणें मराठींत कांहीं गृहस्थांनीं समाजशास्त्रावर पुस्तकें व निबंध लिहिले आहेत. परंतु मानवशास्त्राचा पत्ताहि फारसा कोणास असल्याचें दिसत नाहीं.’ – या वाक्यांवरून सामान्य वाचकास काय बोध होतो ? खरी स्थिति अशी कीं समाजशास्त्र या बृहन्नामांतच मानवशास्त्रहि संकलित झालेलें आहे हें वनहट्टींच्या चांगलेंसें लक्षांत उतरलें नाहीं. मुंबई विश्वविद्यालयांतील समाज-शास्त्राच्या अध्यापकाची पीएच्. डी. पदवीहि मानवशास्त्रांतच घेतलेली आहे, समाजशास्त्र या अभिधानानें नव्हे. तसेंच या पाठशाळेंतील ज्या

अनेक विद्यार्थ्यांचे प्रबंध—उदाहरणार्थ सौ. इरावतीबाई कर्वे यांचा चित्पावनांच्या कुळीवरील प्रबंध—मानवशास्त्रांतर्गतच आहेत. पण या गोष्टीचा पत्ता वनहर्ट्टींस नसल्यामुळें त्यांनीं दुसऱ्यांसच फारसा पत्ता नसल्याचें लिहिलें. त्यांचा या बाबतींतील भ्रम जावा एतदर्थच आम्हीं याबाबत कांहीं लिहिलें होतें. आशा आहे कीं या आमच्या उत्तरानें आतां तरी त्यांचें समाधान होईल.

—संपादक

प्रगती } वर्ष ३, अंक १७
ता. २४ सप्टेंबर १९३१

# गांवसासू *

'ब्राह्मणकन्या' कादंबरी पुस्तकरूपानें प्रसिद्ध होऊन एक महिनाहि लोटला नसेल, तोंच डॉ. केतकर यांची दुसरी एक कादंबरी पुण्याच्या 'विजय साहित्यमालेंतून' प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरीला केतकरांनीं मोठें ठसकेदार नांव दिलें आहे. 'गांवसासू' हा शब्द उच्चारतांच वाचकांच्या मनश्चक्षूंसमोर एका विशिष्ट तऱ्हेचें चित्र उभें राहील. पण तें चित्र या कादंबरींतील चित्रासारखेंच असण्याचा संभव असलाच तर थोडा आहे. सासू हा शब्द पौर्वात्य समाजाच्या वातावरणांत शोभण्यासारखा वाटतो, तर या कादंबरींतील गांवसासूचें कार्यक्षेत्र तमसानदीतीरावरील लंदन राजधानींत पसरलेलें आहे. गांवसासू हें परागंदा भारतीयांचें एक सामाजिक दृश्य आहे. आपल्या परांगदा कादंबरींत केतकरांनीं अमेरिकेंतील भारतीयांच्या समाजाचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला होता. या कादंबरींत विलायतेंतील हिंदी समाजाचें चित्र रंगविलें आहे. अमेरिकेंतील हिंदी लोक व विलायतेंतील हिंदी लोक हे दोघेहि परांगदा या दृष्टीनें एक असले तरी त्या दोघांच्या परिस्थितींत मूलतःच मोठा भेद आहे. अमेरिकेंत जाणारे हिंदी लोक विद्यार्जनाच्या हेतूनें जसें तिकडे जातात, तसेंच कांहीं आपल्या मातृभूमींतील

---

* लेखकः—डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर, एम्. ए. पीएच. डी., प्रकाशकः—विजयसाहित्यमाला, ५७० शनिवार, पुणें. किंमत १॥ रुपया

परतंत्र वातावरण दुःसह होऊन तिकडे गेलेले असतात. विलायतेस जाणाऱ्यांची मनःस्थिति ब्रिटिशसाम्राज्यरूपी गांवसासूला प्रसन्न करून घेण्याची असते, तर अमेरिकेस जाणाऱ्या लोकांची मनःस्थिति अनेक वेळां या आपल्या नशिवीं आलेल्या गांवसासूच्या तडाख्यांतून कांहीं काल तरी सुटावें अशी असते. अमेरिकेंतील हिंदी लोकांस काळे आदमी म्हणून प्राप्त होणारें हीनत्व मुकाट सहन करावें लागत असलें तरी अमेरिकेंतील एकंदर सामाजिक वातावरण साम्राज्यशाहीचें नसून लोकशाहीचें असल्यामुळें तिकडे रहाणाऱ्या हिंदी माणसास तितकेंच मनःस्वातंत्र्य लाभूं शकतें. हिंदी माणूस विलायतेंत गेला तरी त्यास खरें स्वतंत्र देशाचें वातावरण अनुभवितां येतें, असें पूर्णत्वानें म्हणतां येणार नाहीं. आपल्या पारतंत्र्याचे लोडणें हिंदी माणूस विलायतेंत गेला तरी त्यास झुगारून देतां येत नाहीं. अमेरिकेंत तें झुगारून देतां येतें. कारण जी गोष्ट इंग्लंडांत राजद्रोह ठरूं शकते, ती गोष्ट अमेरिकेंत अर्थातच ठरूं शकत नाहीं. यामुळें इंग्लंडाहून अमेरिकेंत हिंदी माणसास आचारस्वातंत्र्य बरेंच जास्त लाभतें. विलायतेंतील हिंदी माणसाचें आचरण इंग्रजांच्या डोळ्यावर नजर ठेवून चाललेलें असतें. इंग्लंडांत येऊन रहाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांचा हेतुसुद्धां शुद्ध विद्यार्जन हा नसून अर्थार्जनाला पोषक असें विद्यार्जन हा असतो. साहेबाला खूष करण्याची दृष्टि या वातावरणांत प्रामुख्यानें वास करतांना आढळते. सासूला खूष करूं पहाणाऱ्या सुनेची मनोवृत्ति त्यामुळें विलायतच्या वातावरणांत बरीच खेळती रहातांना सहाजिकच दिसते. आज वीस वर्षांनंतर ही स्थिति इतक्या प्रमाणांत शिल्लक राहिलेली नसली तरी या कादंबरींतील कथानकाच्या काळांत म्हणजे सन १९११–१२ च्या सुमारास वर वर्णिलेली परिस्थिति प्रामुख्यानें आढळत होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. महायुद्धापासून ती परिस्थिति बदलत असून अलीकडे ती बरीच बदललेली असावी.

डॉ. केतकर हे आपल्या कादंबऱ्यांत बहुधा स्वतः पाहिलेलें दृश्य व त्या दृश्याचें त्यांनीं आपल्या सूक्ष्म दृष्टीनें केलेलें पृथक्करण वर्णीत असतात. त्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांतील अनेक पात्रें चालू पिढीच्या कमीजास्त परिचयाच्या

व्यक्तींचीं प्रतिबिंबें भासतात. ‘ परागंदा ’ कादंबरींतील लाला लजपतराय, शंकरराव यांसारखीं सहज लक्षांत येण्यासारखीं पात्रें या कादंबरींत लेखकानें आणलेलीं नाहींत. ब्रिटिश अमदानींतील या देशाच्या तरुणांचें अत्युच्च ध्येय जें बादशाही आय्. सी. एस्. नोकरींत शिरण्याचें, त्याच्या भोंवतीं या कादंबरीची तार गुंडाळलेली आहे. हिंदुस्थानांतील सुविद्य वरच्या वर्गाच्या लोकांत या ध्येयाच्या आमिषानें केवढा सामाजिक अधःपात घडवून आणला आहे, याचें चित्र या कादंबरींत अंशतः पहावयास मिळेल. अर्थैरि विद्येचें उदाहरण यासारखें समर्पक अन्यत्र आढळणार नाहीं. लंडनमधील हिंदी विद्यार्थ्यांचा आयुष्यक्रम या कादंबरींत एकांगी पण आपल्या क्षेत्रापुरता परिपूर्ण वर्णिलेला आढळेल. समाजशास्त्रांतील विवाहाच्या प्रश्नांचा अभ्यास डॉ. केतकरांनीं विशेष केलेला आहे, हें त्यांच्या कादंबऱ्या वाचणारांस ठाऊक झालेलेंच आहे. या प्रश्नाची एक बाजू या कादंबरींत चांगलीच रंगविलेली दिसेल. भिन्नमानववंशविवाहाचे परिणाम हिंदुस्थानच्या सध्यांच्या परिस्थितींत कसें होतात, याचें एक दृश्य या कादंबरींत दाखवून दिलेलें आहे. या कादंबरीचा हिंदुस्थानांतील भाग कलकत्त्याच्या वातावरणांत कल्पिलेला आहे. असें करण्यानें ब्राह्मोपंथाच्या लोकांची परिस्थिति व मनःस्थिति पृथक्करण करून दाखविण्याची संधि ग्रंथकाराला लाभली आहे.

या कादंबरीचें कथानक अगदीं साधें आहे. किंबहुना या कादंबरीला एक मोठी गोष्ट असें म्हटलें तरी चालेल. कथानकांत गुंतागुंत फारशी नाहीं. एक बंगाली ब्राह्मण श्री. एककवडी मैत्र हे बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठीं विलायतेंत असतां एका इंग्रज खाणावळवाल्या बाईच्या मुलीशीं रत झाले. त्यामुळें त्यांच्या प्रणयाचें रूपांतर मिश्रविवाहांत झालें. मिश्रविवाहित माणसाला वावरण्यायोग्य समाज म्हणूनच ब्राह्मोपंथाची जरूर त्या काळीं विशेष भासत होती. या विवाहाचें एक अपत्य कुसुमकलिका हिचा विवाह उपेंद्र दास या दुसऱ्या एका बॅरिस्टराशीं झाला. कुसुमकलिकाबाई दास या कादंबरीची नायिका जी सुनीति तिची माता होत. कुसुमबाईंना स्वतःला मुलगा न झाल्यामुळें व सावत्र मुलाच्या द्वेषामुळें त्या मुलीच्या शिक्षणाच्या निमित्तानें

विलायतेंत जाऊन राहिल्या. त्यांच्या मिश्र जातित्वामुळें त्यांच्या मुलींचें विवाहक्षेत्र अगदीं मर्यादित होतें; पण मुलीला आय्. सी. एस्. खेरीज दुसरा पतीच करूं द्यावयाचा नाहीं, असा कुसुमाबाईनीं निश्चय केला होता. एका मुलीच्या बाबतींत तो फसला. पण दुसरी मुलगी जी सुनीति, तिला चंदनानी नांवाच्या सिंधी आय्. सी. एस्. तरुणाच्या गळ्यांत अडकवून देण्यांत तिला यश आलें. या कादंबरींत नायिका सुनीति इच्या मनोरचनेपेक्षां तिच्या आईच्याच मनोरचनेचें वर्णन विशेष पाल्हाळानें करण्यांत आलेलें आहे. आईचें आपल्या मुलीबद्दल कर्तव्य काय, याबद्दल कुसुमबाईच्या त्या सुशिक्षित व इंग्रज वंशाच्या असूनहि अगदीं व्यावहारिक समजुती होत्या. "आईचें कर्तव्य मुलीचें चांगलें लग्न करून देणें हें होय; खरें बोलणें हें नव्हे." असें तिचें स्पष्ट प्रतिपादन होतें. इष्टकार्यसिद्धीसाठीं काय करावें आणि काय करूं नये याचा विधिनिषेध तिला वाटत नव्हता. पैशापुढें प्रेमाची किंमत तिला बिलकुल वाटत नव्हती. या बाईनें मिसेस् कैलासनाथ नामक दुसऱ्या एका बाईच्या मदतीनें लटपटी करून व कारस्थान रचून सुनीतीचें चंदनानीशीं लग्न कसें जुळवून आणलें, हा कादंबरीचा मुख्य वर्ण्य विषय आहे. मिसेस् कैलासनाथ या लंडनमधील सर्व हिंदी विद्यार्थ्यांच्या स्वयंकृत पालक होत्या. म्हणून त्यांना गांवसासू हें नामाभिधान महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेलें होतें. या बाईच्या निमित्तानें हिंदी सुशिक्षित व श्रीमंत अधिकाऱ्यांच्या विलायतेंत रहाणाऱ्या स्त्रीवर्गाचें एक चित्र केतकरांनीं वाचकांपुढें ठेवलें आहे. संसारांतील कोणत्याहि प्रश्नाकडे पहाण्याची बायकांची रीत काय असते, याचें स्वरूप केतकरांस जितकें उकललेलें दिसतें, तितकें तें थोड्याच कादंबरीकारांस समजलेलें आढळेल. नीतिअनीतीचे प्रश्न व्यवहारदृष्ट्या अगदीं शांत मनानें सोडवण्याची केतकरांची रीत महाराष्ट्रीय वाचकांस आतां चांगलीच परिचित झालेली आहे. या कादंबरींत या परिचयाची उजळणी होईल.

कथानक आकर्षक करण्याची कला केतकरांत बरीच आहे. पण विषयाची मांडणी मात्र त्यांना व्यवस्थित करतां येत नाहीं, हें त्यांच्या कादंबऱ्या वाचणारांस ठाऊक झालेलेंच आहे. रचनेचा गबाळपणा हा केतकरांचा आतां कायम लेखनविशेष मानला पाहिजे. केतकर आतां कोमलतरुतुल्य राहिलेले

नसल्यामुळें त्यांची पद्धति आतां इष्ट तशी वांकेल, अशी आशा करणें खुळे-पणाचें ठरेल. केतकरांची कादंबरी विचारांच्या व वर्णनांच्या सूक्ष्मपणामुळें आकर्षक होत असते, रचनेच्या चातुर्यामुळें नव्हे. कादंबरींतील पात्रांच्या मनाचें पृथक्करण केतकर व्याख्यानरूपानें करतांना आढळतात. तें कलेच्या दृष्टीनें योग्य नव्हे, हें उघड आहे. पुष्कळ वर्षें परदेशांत गेल्यामुळें व केतकरांचें मिसळणें संमिश्र समाजांत होत असल्यामुळें मूळचीच फारशी जवळ नसलेली केतकरांची मराठी भाषा अगदींच घेडगुजरी झालेली आहे. भाषेच्या दृष्टीनें केतकरांचें लिखाण टाकाऊच समजावें लागेल. पण विचार-संपत्तीमुळें तें कधींहि टाकून देतां येण्यासारखें नाहीं. केतकरांच्या दृष्टि-पथांत आलेलें कोठलेंहि दृश्य फुकट जात नसलें पाहिजे. कादंबऱ्यांच्या रूपानें आपल्या मनांत सांठविलेलीं दृश्यें मराठी वाचकांसहि दाखवून देण्याचा केतकरांनीं जो उद्योग आरंभिला आहे तो स्तुत्य नव्हे, असें कोण म्हणेल ? नवीन समाजरचनेला केतकरांच्या लेखनाचा उपयोग फारच होईल, यांत संशय नाहीं.

केतकरांच्या कादंबऱ्या छापावयास घेणाऱ्या प्रकाशकाची जबाबदारी फारच वाढत असते. त्यांच्या लिखाणावर हात फिरविल्याशिवाय तें छाप-ण्याची सोयच नसते, असेंहि म्हणावयास हरकत नाहीं. या कादंबरींत अशीं अनेक स्थळें आहेत कीं जेथें वाचक अडखळतो. अशीं स्थळें शोधून काढून तीं ग्रंथकाराकडून सुधारवून घेणें, हें केतकरांच्या प्रकाशकांचें कर्तव्य मानणें भाग आहे. हें कर्तव्य प्रकाशकांकडून पार पडलेलें दिसत नाहीं. कांहीं ठिकाणीं शब्द सोडलेल्या धड्याचा भास होतो, तर कांहीं ठिकाणीं अर्थाचा अनर्थहि होतो. दुर्बोध वाक्यें तर पुष्कळच आहेत. व्याकरणाच्या चुक्यांवर नजर ठेवणेंहि कठीण आहे. याखेरीज छपाईच्या कामांतहि फारच ढिलाई दिसून येते. काने, मात्रा, उकार वगैरे किती ठिकाणीं लोपले आहेत, यांची गणति करण्यास बराच वेळ लागेल. म्हणून आम्हीं वर सांगितलेल्या कोणत्याहि दोषांचीं उदाहरणें येथें दाखविण्याच्या भरीस बिलकुल पडत नाहीं. प्रकाशकांनीं अनुस्वार गाळण्याचा पंथ कांहीं ठिकाणीं अमलांत आणल्याचा भास होतो. या कादंबरींत सिनेमा नटांचीं त्या त्या प्रसंगांस

अनुलक्षून तयार केलेलीं छायाचित्रें घालण्याचा जो उपक्रम केलेला आहे, तोहि आम्हांस अगदीं पसंत नाहीं. कारण जोंपर्यंत सुशिक्षित नट व चित्रकार उपलब्ध नाहींत तोंपर्यंत दृश्यांची रचना वर्णनाबरहुकुम होणें शक्य नाहीं. डिकन्सच्या कादंबऱ्यांना जसा अनुरूप चित्रकार लाभला होता, तसा तो लाभणें, हा योगायोगच म्हणावा लागेल. या कादंबरींतील छायाचित्रांची कसून छाननी करावयाची म्हटली तर स्वतंत्र लेख लिहावा लागेल. पोषाखांत, शृंगारांत, सामानसुमानांत, पार्श्वभूमींत, सर्वत्र कालविपर्यय, स्थानविपर्यय वगैरे दोष भरलेले आहेत. १९ पानावरच्या वर्णनास अनुलक्षून म्हणून जें चित्र घातलेलें आहे त्यांत चंदनानीच्या ऐवजीं पूरणसिंग नांवाचा दाढीवाला शीख आला आहे, तरी त्याचें भान प्रकाशकांस राहिलेलें दिसत नाहीं. हे सर्व दोष घिसाडघाईमुळें शिरलेले असण्याचा संभव आहे. दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं असे दोष दिसते तर आम्हीं तिकडे लक्षहि दिलें नसतें. पण ‘ रत्नाकराच्या ’ प्रकाशकांकडून कादंबरी अशा स्वरूपांत पुढें यावी याचा आम्हांस खेद वाटतो ! गोखल्यांनीं अशी गोष्ट पुनः होऊं देऊं नये.

डॉ. केतकरांचें नांव हैदराबाद मुक्कामीं भरणाऱ्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठीं सुचविण्यांत आलेलें आहे. राजवाड्यांच्या टाहोस अनुसरून आपली विद्वत्ता आपल्या महाराष्ट्रीय बांधवांच्या उपयोगास आणून देण्याची शिकस्त अनेक अडचणींस, अनेक निराशांस न जुमानतां डॉ. केतकर यांनीं चालविली आहे. द्रव्याची अनुकूलता नाहीं, शरीरस्वास्थ्य नाहीं, भाषा कमावलेली नाहीं, साधनेंहि फारशीं उपलब्ध नाहींत, अशा प्रतिकूल परिस्थितींत असूनहि आपला आशावाद अढळ ठेवणारे केतकरांसारखे कर्मयोगी या दरिद्री महाराष्ट्रांत झाल्यामुळेंच त्याचें वैभव वाढलेलें आहे. अशा माणसाचे उतराई होणें एवढें तरी मराठीभाषाविदांचें त्यांच्यासंबंधानें अवश्य कर्तव्य ठरतें. म्हणून या एका वर्षांत दोन विचारप्रवर्तक कादंबऱ्यांची भर महाराष्ट्रवाङ्मयांत घालणाऱ्या डॉक्टरसाहेबांना ह्या वर्षीं अवश्य अध्यक्षस्थान सर्वांनीं द्यावें असें आम्ही आग्रहानें सुचवितों. तिकडे हैदराबादकरांचें व इतर निवड करणारांचें लक्ष जाईल, अशी आम्हांस आशा आहे.

**प्रगति** } वर्ष २, अंक २९
ता. १८ डिसेंबर १९३०

# सह्याद्रीच्या पायथ्याशीं *

## आजचें व कालचें गोमंतक

चलच्चित्रपटांत गाजलेल्या 'देवदासी'चे वाङ्मयपिते श्री. विनायक सदाशिव सुखठणकर यांच्या आठ प्रादेशिक कथांचा हा गुच्छ पहिल्यानेंच महाराष्ट्रीय वाचकांच्या हातीं देण्यांत येणार आहे. या गुच्छांतील दोन पुष्पें पूर्वीच प्रसिद्ध झालेलीं असून बाकीचीं सहा प्रथमच वाचकांसमोर येत आहेत. ह्या आठ गोष्टी लिहिण्यांत सहा वर्षांचा काळ लोटलेला आहे, यावरून श्री. सुखठणकर लेखनाच्या कामांत किती काळजी बाळगीत असतील याबद्दल कांहींशी कल्पना येते. वाङ्मयांतील या कलाकुसरीच्या घडणींत सुखठणकरांनीं फारच परिश्रम नाजूक हातानें घेतलेले दिसत आहेत. या अंतर्गत कलाकुसरीच्या जोडीला पुस्तकाची सजावटहि डोळ्यांत भरण्यासारखी झाली आहे. मराठी वाङ्मयांतील लेखक स्वतः या बाबतींत डोकें घालतांना किंवा चालवितांना क्वचितच दिसतील, या गोष्टीला रा. सुखठणकर हे पहिलेच अपवाद दिसतात. गोष्टींतील कथानकाशीं जुळणारीं व त्या त्या प्रदेशांचीं सूचक अशीं चित्रें मुद्दाम काढवून घेऊन छापविण्यांत ग्रंथकारानें मोठी रसिकता व समर्पकता दाखविली आहे. अशा या नाविन्यपूर्ण कथासमूहाचें स्वागत मराठी वाचक उदर अंतःकरणानें करतील असा आम्हांस भरंवसा आहे.

---

* लेखक—वि. स. सुखठणकर, प्रकाशक—ध्रुव प्रकाशनालय टाटा ब्लॉक १४, मलबार हिल, मुंबई, किं. रु. २-४.

प्रस्तुत पुस्तकाला श्री. कमलादेवी चट्टोपाध्याय यांनीं इंग्रजींत प्रस्तावना लिहिली आहे. कमलादेवींचें मराठी भाषेचें ज्ञान वाचनापुरतें असलें तरी लेखनास तें पुरेसें नाहीं यामुळें व नित्याच्या सरावामुळें त्यांनीं इंग्रजींत ही प्रस्तावना लिहिली असावी. सुखठणकरांनीं मराठी वाचकांच्या सोयीसाठीं इंग्रजीचें मराठी रूपांतर करून परिशिष्टरूपानें मुद्दाम शेवटीं जोडलें आहे. अर्थात् त्यांना कुरकुर करण्यास जागा राहिलेली नाहीं. कमलादेवींची प्रस्तावना ग्रंथकाराच्या कृतीची ओळख तर वाचकांस करून देतेच, पण त्याखेरीज गोष्टींतील विषयांची थोडीबहुत चर्चाहि केलेली त्यांत आढळेल. लघुकथेच्या अभिनव प्रकाराचें वाङ्मयांतील स्थान व महत्त्व आरंभीं सांगून कमलादेवी तिच्या रचनेचा विचार करतांना दिसतात. कलाकृति जितकी लहान तितकी कलावंतावरील ती घडवण्याची जबाबदारी जास्त. सुखठणकरांच्या गोष्टी मासिकांतल्या गोष्टींइतक्या लहान नसल्या तरी त्या फारशा विस्तृतहि नाहींत. त्यामुळें त्यांची जबाबदारी या बाबतींत कांहींशी वाढली आहे व कांहीं अंशीं कमीहि झालेली आहे. ३०–३५ पानांच्या गोष्टींत गुंतागुंतीच्या कथानकाला अवकाश नाहीं. पण त्याचबरोबरच केवळ एका घटनेवर वाचकाचें मन वेधून घेऊन त्याच्यावर परिणाम घडवून आणण्याला सुद्धां ती सोईस्कर नाहीं. अर्थातच लहानशा व साध्या कथानकाचा परिणाम वाचकांच्या मनावर विशिष्ट रीतीनें बिंबविण्याकडे लेखकाला आकाराच्या मर्यादेचा उपयोग या ठिकाणीं करून घेतला पाहिजे. असा उपयोग करून घेण्यास सुखठणकरांनीं कथांचें स्वरूप प्रादेशिक ठेवलें ही गोष्ट मोठी सोईची झाली आहे. त्यामुळें टॉमस हार्डीच्या वेसेक्स टेल्सचें रम्यत्व सुखठणकरांच्या या गोमंतकीय कथांत उठलेलें स्पष्टपणें दिसत आहे. विशिष्ट प्रदेशांतील भौगोलिक व सामाजिक पार्श्वभूमि स्थानिक भाषेंत यथातथ्यपणें वर्णिणें, वाटतें तितकें सोपें नाहीं. त्याला चांगलाच कसबी कारागीर लागेल. सुखठणकरांनीं गोव्यांतील स्थानिक कोंकणी भाषेचा अवलंब या गोष्टी लिहिण्यांत केलेला नसून आधुनिक मराठी भाषेंतच त्यांनीं त्या सजविल्या आहेत. मात्र स्थानिक वातावरणाची कल्पना वाचकाच्या मनांत जागृत ठेवण्यासाठीं विशिष्ट स्थानिक शब्दांचा उपयोग मधून मधून त्यांनीं

खुबीदारपणानें केलेला आहे. गोष्टींची भाषा आधुनिक असली तरी ती आज सर्वत्र बोकाळलेल्या शहरीं व वर्तमानपत्री जातीची नाहीं. तिचें स्वरूप जुन्या वळणाच्या वालबोध व उच्च भावनापूर्ण कुटुंबांतील खेडवळ मुलीच्या स्वरूपा-सारखें आहे. गोष्टींस अनुरूप असे गोमंतकीय वाक्प्रचारालंकार या निष्पाप खेडवळ मुलीच्या अंगावर चढविण्यांत आलेले आहेत. ते जोगेश्वरीच्या बोळांतील इरसाल पुणेकरांस न आवडले तरी कोंकणांतील लोकांस खास नाक मुरडण्यासारखे वाटणार नाहींत.

कमलादेवी आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात त्याप्रमाणें रा. सुखठणकर कलावान् लेखक असल्यामुळें त्यांच्या गोष्टी समाजांतील विशिष्ट दोष दाखवून त्यांत सुधारणा सुचविणाऱ्या असल्या तरी त्या गोष्टींना सुधारकांच्या स्वमतप्रचाराचें स्वरूप मुळींच प्राप्त झालेलें नाहीं. समाजचित्र जसेंच्या तसें वाचकांसमोर ठेवून ते मोकळे होतात. चित्र रंगवितांना व चित्रासाठीं देखावे आणि प्रसंग निवडतांना त्यांनीं काय चाणाक्षपणा दाखविला असेल तेवढाच. एकदां प्रसंग ठरल्यावर तो कलादृष्टीनें रंगविण्यापलीकडे ते जास्त उपदेशपर व्याख्यानांत बिलकुल शिरत नाहींत. अलीकडील बहुतेक लघुकथालेखकांत व सुखठणकरांत दिसून येणारा ठळक भेद हाच होय. आजचे लघुकथालेखक कमीजास्त प्रमाणांत जाहीर सभेंतील व्याख्यान-बाजीवर जातांना दिसतात. हरिभाऊ आपट्यांसारख्या वरच्या दर्जाच्या लेखकांनाहि हा व्याख्यानबाजीचा मोह आवरतां आलेला दिसत नाहीं. सुखठणकरांत अशा प्रकाराला बिलकुल जागा नाहीं. या गोष्टी वाचून त्यांची कल्पनाशक्ति विशेष तीव्र असल्याचा भास होत नाहीं. पण कलादृष्ट्या गैर कोणतें व योग्य कोणतें हें ते सूक्ष्मपणें जाणतांना दिसतात. त्यांचा आत्मा अजून शहरीं झुंडवृत्तीचा बनलेला नाहीं. त्यांच्या मनांतील एकान्त गर्दीच्या व गडवडीच्या शहरांतील आंतून कडी घातलेल्या खोलींतील एकांतासारखा नाहीं. तो देशावरील ओसाड माळावरील एकान्तासारखा सौंदर्यहीन प्रदेशांतील एकांतही नाहीं. तर गोव्याच्या सुंदर मनोवेधक प्रदेशांतील तो एकांत आहे. सर्व प्रदेश डोळ्यांसमोर येण्यासाठीं थोड्याशा

उंच टेकडीवर लेखक जाऊन बसलेला असला तरी त्याला तेथून दाट झाडी, नद्या, खाड्या, गांव, घरें, बागा, सर्व कांहीं एकांताच्या ठिकाणीं बसूनही मुद्दाम न पाहतां दिसूं शकतात. हिंदी लोकांचा आत्मा अजूनहि वराचसा खेडेगांवांतच वावरणारा आहे. त्यांतील बहुजन समाजावरील धार्मिक संस्कार अजून पुसले गेलेले नाहींत. जुन्या चालीरीति व समजुती त्याला अजूनहि सोडाव्याशा वाटूं लागलेल्या नाहींत. प्राचीन संस्कृतीच्या तळ्यांत बुडी मारण्यांत त्याला अजूनहि आनंद वाटतो. विचारापेक्षां भावनेचा पगडा या देशांतील लोकांवर अजून राज्य करीत आहे. अशा या समाजाचें चित्र यथातथ्यपणें रंगविण्यास बहुतेक आधुनिक सुशिक्षित (?) नालायक असतात. सुखठणकरांत शिक्षणानें येणारी ही नालायकी उतरलेली दिसत नाहीं ही विशेष महत्त्वाची गोष्ट होय. याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांचा आधुनिक जगाच्या वाङ्मयांतील उच्च वाङ्मयकृतींशीं परिचय नाहीं. कमलादेवी सुचवितात त्याप्रमाणें रशियन लघुकथांची छाप सुखठणकरांच्या गोष्टींवर पडलेली आहे असें आम्हांस वाटत नसलें तरी त्यांतील सूक्ष्मसंवेदना चितारण्याचें कसब प्रस्तुत गोष्टींतहि चांगलेंच दिसून येतें: या गोष्टींतील प्रसंग डोळ्यांत भरण्यासारखे नसून अगदीं नित्याचे आहेत. पण या नित्याच्या प्रसंगांतून जाणाऱ्या माणसांच्या मनोभूमीचें आकलन लेखकाला विशेष आहे व मानसशास्त्रदृष्ट्या संवेदना कशा वर्णाव्या व भावनांचा परिपोष कसा रंगवावा हें तो चांगलें जाणतांना दिसतो. हीं चित्रें पाहून भावना उचंबळत नाहींत, मनोवृत्ति क्षुब्ध होत नाहींत, निद्रानाश होण्याचा बिलकुल संभव नाहीं. पण हृदयांतील अत्यंत सूक्ष्म तारा आपोआप हालूं लागतात व डोळ्यांतून नकळत अश्रुधाराहि सुरू होतात. कोणताहि रस भडकपणें ओतण्याकडे लेखकाची प्रवृत्ति नाहीं. एक प्रकारची गंभीर शांततेची पार्श्वभूमि सर्व प्रसंगांच्या मागें सारखी उभी आहे.

सुखठणकरांच्या गोष्टींचें महत्त्व समाजशास्त्रदृष्ट्या व मानसशास्त्रदृष्ट्या विशेष आहे. या पुस्तकांतील पहिली कथा जी ‘ जाईजुई ’ तींत दोघां मुलींच्या मनोविकासाचें चित्र सूक्ष्म रीतीनें रंगविलेलें आहे. त्यांतील एक मुलगी उच्च

जातिवंत घराण्यांतील असून दुसरी वेश्येची कन्या आहे. खेडेगांवांतील निष्पाप वातावरणांत वाढलेल्या या दोन बालमैत्रिणींचीं चरित्रें कशीं बनतात व काळाच्या ओघांत त्यांतील एक मैत्रीण दुसरीच्या नाशास अकल्पितपणें कशी कारणीभूत होते, याचें हृदयद्रावक चित्र या गोष्टींत आहे. वेश्येच्या मुलीला तीव्र इच्छा असूनहि आपलें आयुष्य पवित्र बनविणें कसें कठीण होतें, दूषित वातावरणांतून बाहेर सटकणें कसें अशक्य होतें, मनाचा निर्धार अतिशय हाल सोसूनही टिकविणें कसें दुष्कर असतें, याचें मानसिक चित्र या गोष्टींत रेखाटलेलें आहे. या गोष्टींतील कथानकाची रचना अकल्पनीय मानसिक घडामोडींवर अवलंबून ठेवण्यांत आलेली आहे. याबाबत ग्रंथकार लिहितात, " जगांत कित्येकदां अशा कांहीं गोष्टी घडून येतात कीं त्यांची कार्यकारणपरंपरा शोधून काढणें कठीण जातें ! रामरावांमागोमाग जाण्याची इच्छा जाईच्या मनांत कां उत्पन्न झाली व तिचा काय परिणाम घडून येईल—या प्रश्नांचीं उत्तरें स्वतः जाईलाच देतां आलीं नसतीं ! " ही गोष्ट खरी आहे. असे अनुभव जगांत येतात हें सत्य; पण त्यांच्यावर आपल्या कथेची मांडणी अवलंबून ठेवण्यांत सुखठणकरांनीं मनोविकासाच्या चित्राची पूर्तता केली असें म्हणवत नाहीं. जाईला रामरावांमागोमाग जाण्याची दुर्दमनीय प्रेरणा होणें व जुईला बेशुद्ध स्थितींतहि वरळण्यांत जाईचीच आठवण होणें व लहानपणची स्मृति त्यांतच ऐन वेळीं जागृत होणें या गोष्टी मानसशास्त्र-दृष्ट्या पूर्ण शक्य आहेत, नव्हे चांगल्याच संभवनीय आहेत. बालपणांत मनावर उठलेले संस्कार कसे कायम टांकीचे असतात, ही गोष्ट मनोविश्लेषण शास्त्रानें आतां उघड केली आहे. परिस्थितीमुळें दडपून गेलेले हे संस्कार हृदय तळापासून हालतें तेव्हां जोराच्या उमाळ्यानें वर येतात व वेगानें आपला प्रभाव दाखवून पुनः उपशम पावतात. या मनोगंडांतर्गत प्रमेयावर या कथेची उभारणी केलेली आहे व ती मोठी परिणामकारक झालेली आहे.

दुसरी कथा ऐतिहासिक आहे. प्राचीन काळच्या लोकांची मनोवृत्ति, त्यांच्या आकांक्षा, त्यांची समाजपरिस्थिति, यांचें वर्णन या कथेंत आहे. जुन्या काळच्या लोकांच्या मनोवृत्ति कशा असतील याची कल्पनाच आतां

करणें शक्य आहे. तीव्र कल्पनाशक्ति असणाऱ्या लेखकालासुद्धां जुन्या काळच्या लोकांचीं मनें खरींखुरीं कितीशीं रंगवितां येतात हा मानसशास्त्रांतर्गत वादग्रस्त प्रश्न आहे. इतिहासकारालासुद्धां अनेकवेळीं कल्पनाशक्तीवरच बरीचशी भिस्त ठेवावी लागते. पण कादंबरीलेखकाला त्याहून जास्त उड्डाण करण्याला सवड असते. या गोष्टींत रेखाटलेलें स्वभावचित्र प्राचीन काळचें म्हणण्यापेक्षां मध्ययुगीन हिंदू कालांतील तें चित्र आहे, असें म्हणणें जास्त शोभेल. कवींचें व भाटांचें कार्य त्या युगांत किती महत्त्वाचें होतें, याची साक्ष ही गोष्ट वाचून पटेल. या कथेंत दिलेल्या जोतीच्या गाण्याची खरी गोडी अक्षरें वाचून वाचकांस कळण्यासारखी नाहीं. तरी पण क्षणभर ही कथा त्याला जुन्या काळांत नेऊन सोडण्यास समर्थ होईल यांत संशय नाहीं. कर्तव्याची जाणीव जुन्या समाजरचनेंतील लोकांत आजच्याहून जास्त उत्कटतेनें वसत होती याची खात्री ही गोष्ट वाचून पटेल.

तिसरी गोष्ट 'ताम्रपट' टॉलस्टॉयच्या तत्त्वज्ञानावर उभारलेली दिसते. "सूर्यप्रकाश व हवा यांचा उपभोग घेण्याइतक्या जमिनीच्या उत्पन्नावर आपली उपजीविका करणें हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि म्हणून जमिनीच्या लागवडीसाठीं ज्यांकडून मेहनत घडत नाहीं, त्यांस तिजवर आपला हक्क सांगण्याचा व इतरांस तिची लागवड करूं न देण्याचा अधिकार पोंचत नाहीं." या टॉलस्टॉयच्या उताऱ्यानें कथेचा शिरोभाग चित्रित केलेला आहे व या उताऱ्याच्या स्पष्टीकरणार्थ जणूं पुढील कथा लिहिलेली आहे असा भास गोष्ट वाचतांना होतो. टॉलस्टॉयचें तत्त्वज्ञान कम्युनिस्टांच्या तत्त्वज्ञानाचें पुरोधावी तत्त्वज्ञान होतें ही गोष्ट त्याच्या विचारसरणीशीं परिचय असणाऱ्यांना माहीत आहे. भूमिप्रेम हा सुखठणकरांच्या एकंदर कथालेखनाचा मुख्य पाया आहे. आपल्या कथेच्या सिद्ध्यर्थ लेखकानें एका जुन्या ताम्रपटांतील उताऱ्याचा व त्यांतील विचारसरणीचा आश्रय केला आहे. असें करण्यांत लेखकाची कुशलता दिसून येते. जुन्या काळची समाजव्यवस्था आर्थिकदृष्ट्या गरिबांच्या पिळणुकीची कशी नव्हती, हें पिळणुकीच्या तत्त्वावर सर्व इतिहास जुळवूं जाणाऱ्या आधुनिक आधिभौतिकवाद्यांस व

बोल्शेविकांस यांवरून कळेल. जुन्या समाजरचनेंत काल्पनिक समतावाद नव्हता, तर सहकार्यवाद सर्वत्र विराजमान झालेला होता. समाजांतील वेगवेगळे वर्ग मानापुरतें समान नव्हतें तरी भोगदृष्ट्या आजच्याहून पुष्कळच जास्त समान पातळीवर होते. ही समाजव्यवस्था ढांसळून आतां तिचें विकृत स्वरूप तेवढें शिल्लक राहिलेलें दिसत आहे. आणि त्याचें चित्र या कथेंत अत्यंत मार्मिक रीतीनें काढण्यांत आलेलें आहे. ज्या जमिनीच्या उत्पन्नावर कधींच पोटभर जेवावयास मिळण्याचा संभव नाहीं, त्या जमिनीबद्दलसुद्धां गरीब शेतकऱ्यांचें किती प्रेम असतें व या प्रेमाच्या उत्कट भावनेच्या जोरावर कायमची आर्थिक हलाखी सोसण्यासहि ते कसे तयार असतात याचें हृदयद्रावक दृश्य या कथेंत नजरेस पडतें. उलटपक्षीं कोणत्याहि तऱ्हेची सामाजिक जबाबदारी न वाटणारा असा उपटसुंभ श्रीमंतांचा व जमिनदारांचा जो वर्ग सर्वत्र निर्माण झालेला आहे त्याच्या मूलभूत अनीतिमत्तेचें दृश्यहि या कथेंत तितक्याच हृदयस्पर्शी तऱ्हेनें दृष्टीस पडतें. आज सर्वांत मोठी सामाजिक क्रांति जर कोठें व्हावयास पाहिजे असेल तर ती या लोकांच्या मनोवृत्तींत. जर हे वर्ग आपल्या स्थानाची जबाबदारी ओळखून वागण्यास शिकतील तर कम्युनिस्टांचें तत्त्वज्ञान मुळांतच कोसळून पडेल. पण दुर्दैवाची गोष्ट हीच आहे कीं, हा वर्ग कांहींहि शिकण्यास किंवा आपलें वर्तन सुधारण्यास बिलकुल राजी दिसत नाहीं. या गोष्टींतील बाबासाहेबांची सदसद्विवेकबुद्धि ताम्रपटांतील ओळी वाचून तरी जागृत झालेली दिसते. पण त्यांच्या वर्गांतील बहुतेक लोक भीषण परिस्थितीनेंहि जागे होतांना दिसत नाहींत. या कथेंत गरीब शेतकऱ्यांच्या मनोवृत्तीचें जें चित्रलेखन केलेलें आहे तें अत्यंत समर्पक आहे. तसेंच श्रीमंत बाबासाहेबांचें चित्रहि मोठें बहारीचें वठलें आहे. दंतकथा व इतिहास यांत कशी तफावत पडते ही गोष्टहि या कथेंतील ताम्रपटाचा इतिहास व गरीब शेतकऱ्यांच्या तोंडींची लोककथा यांवरून दिसते. एकंदरींत ही कथा सर्वांत जास्त खळबळ उडविणारी आहे यांत संशय नाहीं.

यापुढील कथा " महापुराची शिकवण " ही आहे. ती आजच्या धर्मप्रसारकांच्या व धर्मसंशोधकांच्या डोळ्यांत चरचरीत अंजन घालण्यास

उपयोगी पडेल अशी आशा वाटते. कपाळावर कोणत्याहि धर्माचा छाप मारून घेणारा प्रत्येक माणून, परिणामीं समान गरजांचा व मनोवृत्तींचा सारख्याच हाडामांसाचा माणूस आहे ही गोष्ट धर्मप्रेमाच्या महापुरांत जे विसरतात त्यांची कानउघाडणी या गोष्टीनें होईल. सांतुशणै पावलू–दसा या हिंदू ख्रिस्ती शेजाऱ्यांच्या कथेच्या निमित्तानें लेखकानें धर्मसंघटणाची हास्यास्पद बाजू चवाट्यावर आणली आहे. क्षुल्लक कारणावरून पिढ्यान् पिढ्यांचें प्रेमसुद्धां कसें विनसतें याचें चित्र या गोष्टींत पहावयास सांपडेल. मोठ्या लोकांच्या शिकवणुकीचा अज्ञानी बालकांच्या मनावर कसा विकृत संस्कार होतो ही गोष्टहि या कथेवरून स्पष्ट होईल. शेक्सपियरनें ' व्हेनिसचा व्यापारी ' या आपल्या नाटकांत यहुद्यांच्या तोंडीं जे शब्द घातलेले आहेत त्यांतील तत्त्वज्ञानाची सत्यता या गोष्टींत उतरलेली दिसून येते. माणूस ख्रिस्ती झाला किंवा यहुदी झाला किंवा हिंदू–मुसलमान झाला म्हणून त्याच्या शरीरवेदना व मानसिक भावना वेगळ्या होतात काय ? हिंदुसंघटनवाल्यांच्या अंगाला मात्र या कथेमुळें खाजकोलती लागल्याप्रमाणें होईल.

यापुढील गोष्ट ' बरंडा ' नामक आहे. गोव्यांतील राण्यांच्या बंडांची हकीकत बहुतेकांच्या कानावरून केव्हां ना केव्हां गेलेली असेल. या बंडांच्या मागची समाजपरिस्थिति, उत्कट भावना, व त्यांत दिसून आलेलें अज्ञानी लोकांचें शौर्य हीं या गोष्टींत पहाण्यास सांपडतील. बंडांतील शिपाई बंडाची हकीकत कशी वर्णितो तें या कथेवरून कळेल. माणसाच्या मनांतील पशुत्वकरणीहि या कथेंत प्रतिबिंबित झालेली दिसून येईल. गरीब रयतेंतसुद्धां ज्या स्वाभिमान, शौर्य, स्वामिभक्ति, वीरपूजा वगैरे गोष्टी दिसून येतात, त्यांचें रसरसणारें स्वरूप या कथेंत डोळ्यांत भरेल. प्रदेशवर्णनाची बहारीहि या कथेंत प्रचीतीस येईल. ताम्रपटाप्रमाणें या कथेंतहि गरिबांचें अंतःकरण, त्यांचीं सुखदुःखें, त्यांचे दोष यांबद्दल कळवळा दाखविलेला दृष्टीस पडतो. अशा तऱ्हेची कथा मराठी वाङ्मयांत क्वचितच दृष्टीस पडेल.

यापुढील तीन गोष्टी गोव्यांतील आधुनिक समाजाच्या दृश्याच्या आहेत. ' दुबळी श्रीमंती ' या गोष्टींत गोव्यांतील सुखवस्तु हिंदू कुटुंबांच्या

दुबळेपणाचें व दोषांचें दृश्य पहावयास सांपडेल. ' महापुराची शिकवण ' या कथेंतील गोष्टीस ही कथा पूरक भासावी अशी ती आहे. सद्‌गुणांचा अतिरेक कसा हानिकारक व हास्यास्पद होतो हें या कथेवरून कळतें. हिंदूंचा गवाळपणा, भलतीच सहनशीलता, व प्रतिकाराक्षमता सर्वत्र प्रसिद्ध आहेत. या सार्वत्रिक दोषांची गोव्यांतील आवृत्ति दुबळ्या श्रीमंतींत दिसते. गोव्यांतील ख्रिस्ती समाजांतील एका वर्गाचा उद्धटपणा हींत सूचित केलेला आहे. ' पाद्र्यांची पुण्याई ' या कथेंत ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या युक्त्यांचें बहारीचें वर्णन केलेलें आहे. रचनाकौशल्य या गोष्टींत विशेष दिसून येतें. ख्रिस्ती धर्मांत लोकोत्तर चमत्कारांचें महत्त्व विशेष मानलेलें होतें. पण हे लोकोत्तर चमत्कार कोणत्या तऱ्हेनें घडवून आणले जात असत हें पाहून माणसाच्या श्रद्धाळूपणाचें हंसूं येतें. इतिहाससंशोधनामुळें एखादें बिंग कसें फुटतें तें ही कथा वाचून कळेल. शेवटची गोष्ट ' वंदे मातरम् ' गोव्याच्या प्रदेशांत घडलेली असली तरी तिचा विषय प्रादेशिक म्हणतां येणार नाहीं. ' वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि । ' या वचनानुसार उच्च ध्येयामुळें एका बाजूनें कठोर झालेल्या माणसांचीं अंतःकरणें दुसऱ्या बाजूनें किती मृदु असतात याचें हृदयंगम वर्णन या गोष्टींत पहावयास सांपडेल. किंबहुना असेंच म्हणतां येईल कीं त्यांची एका बाजूकडील मृदुता त्यांना दुसऱ्या बाजूनें कठोर बनावयास लावते. मनोविश्लेषणदृष्ट्या ही कथा बहारीची आहे. श्रद्धेचें स्वरूप, तिचें व्यक्तीच्या व समाजाच्या घडामोडींतील कार्य, यांची चर्चा कथारूपानें या हृदयद्रावक गोष्टींत केलेली सांपडेल. कोंवळ्या मनावर उठलेले ठसे कसें आयुष्यांत कार्यशाली ठरतात हें ही गोष्ट वाचून कळून येईल. या पुस्तकांतील दोन तीन गोष्टींत बालमानसशास्त्राचीच आवड ग्रंथकारानें दाखविली आहे.

ग्रंथकारानें या कथा लिहितांना इतकी काळजी घेतलेली आहे कीं, त्यांत दोष दाखविणें जवळ जवळ अशक्य आहे. सर्व गोष्टींतून मनोरचना-विश्लेषणावरच ग्रंथकारानें विशेष भर दिलेला आहे. प्रदेशवर्णन व समाजवर्णन ही कथांची पार्श्वभूमि ठेवलेली आहे. पुस्तकाच्या शेवटीं

परिशिष्टांत ग्रंथकारानें ज्या टीपा दिलेल्या आहेत, त्यामुळें स्थानिक शब्द, वाक्प्रचार, भूगोल, इतिहास, समाजरचना वगैरे सर्व गोष्टींची कल्पना येण्यास उत्तम मदत होते. किंबहुना अशा टीपांवांचून कथांतील रस बाहेरच्या वाचकांस चाखतां येणें कठीण पडलें असतें. गोमांतक अनेक कारणांमुळें बृहन्महाराष्ट्राबाहेर पडल्यासारखा झाला होता. आतां तो जोरानें बृहद्राष्ट्रीय ओघांत येऊन मिसळत आहे. समाजाचें दृढीकरण करण्यास, स्थानिक द्वेष नष्ट करण्यास, गैरसमजांचा निरास करण्यास, अशा तऱ्हेच्या प्रयत्नांचा विशेष उपयोग होईल. आज शिक्षणदृष्ट्या अशा तऱ्हेच्या प्रयत्नांची विशेष जरूरी आहे. प्रत्येक प्रदेशाचे वर्णनपर सचित्र भूगोल, इतिहास, कथागुच्छ यांची जरूरी समाजसंघटनदृष्ट्या निकडीची आहे. पाश्चात्य देशांतून असे प्रयत्न, स्थानिक मंडळें करीत असतात. आमच्या देशांत अजून तितकी प्रगति झाली नाहीं, तरीहि सुखठणकरांप्रमाणें वैयक्तिक प्रयत्न करण्यास आतां हरकत असूं नये. प्रत्येक जिल्ह्यानें किंबहुना तालुक्यानें आपलें वैशिष्ट्य सर्वांच्या नजरेस आणून दिलें पाहिजे. येणें-करून परस्परांत प्रेम वाढेल व सर्वत्र आपुलकीचा भाव वृद्धिंगत होईल. टॉलस्टॉय, तुर्गेनेव्ह, चेकोव्ह प्रभृतींच्या गोष्टी वाचून जशी रशियाची कल्पना येते, कन्यूट हॅम्सनच्या गोष्टी वाचून जशी नॉर्वेची कल्पना येते, लॅडिस्लास सेंट रेमाँत याच्या कादंबऱ्या वाचून जशी पोलंडची कल्पना येते, तशी त्या त्या भूमीची कल्पना डोळ्यांसमोर उभी करण्यास सुखठण-करांसारख्या लेखकांची सर्वत्र जरूरी आहे. ठराविक तऱ्हेच्या नीरस कादंबऱ्या लिहिण्याच्या धंद्यांत हल्लीं पुष्कळ लोक पडलेले दिसतात. त्यांचें लक्ष सुखठणकरांच्या या पुस्तकामुळें स्थानिक विषयांकडे वेधलें तर फार उत्तम होईल. या पुस्तकांत सुखठणकरांनीं एखादा नकाशा जोडला असता तर चांगलें झालें असतें. पुस्तकाच्या परिपूर्णतेंत तेणेंकरून भर पडली असती. स्थानिक बोलीचे नमुनेसुद्धां जास्त घालावयास पाहिजे होते, असें आम्हांस वाटतें.

पुस्तकाचें निरीक्षण येथवर केलें. याहून जास्त सूक्ष्म छाननी करण्यास

व स्थानिकदृष्ट्या राहिलेले दोष निवडून काढण्यास गोव्यांतील कोणी-तरी विद्वान् टीकाकारानें पुढें येणें जरूर आहे. अशा तऱ्हेचा सूक्ष्म परीक्षणात्मक टीकालेख प्रगतींतून प्रसिद्ध करण्याची आम्ही व्यवस्था करीत आहों. त्या वेळीं वाचकांस याहून जास्त ज्ञानलाभ होईल. सध्यां वाचकांस आम्हीं एवढेंच सुचवितों कीं, त्यांनीं सुखठणकरांच्या निरलस श्रमांचें, दुर्मिळ वैदग्ध्याचें व उच्च वाङ्मयप्रेमाचें चीज अवश्य करावें कीं जेणेंकरून त्यांच्या सह्याद्रीच्या पायथ्याशीं चाललेल्या आक्रमणाचें दुसरें पाऊल वाच-कांच्या नजरेस लवकरच पडेल.

प्रगति { वर्ष ३, अंक २३–२४<br>ता. ५ नोव्हेंबर–डिसेंबर १९३१

# सुशीलेचा देव

महाराष्ट्र हा विचारी वृत्तीच्या लोकांचा देश आहे; बंगाल किंवा गुजरात-प्रमाणें भावनाप्रधान लोकांचा नाहीं. या विचारी मनोवृत्तींचें दडपण या प्रदेशांतील लोकांच्या बहुतेक सर्व आचरणावर पडलेलें दिसतें. विचारी वृत्ति जशी कांहीं बाबतींत फायद्याची तशी कांहीं बाबतींत तोट्याचीहि असते. विचारी माणसांच्या आचरणाचा पाया बळकट असतो पण त्यांत सौंदर्य येऊं शकत नाहीं. सृष्टिरचनेचीं जीं अनेक सत्य अंगें आहेत, त्यांतील एक सत्यांग सौंदर्य हें आहे. पण या सत्याची जाणीव महाराष्ट्रीयांत फार थोड्या प्रमाणांत आढळते. महाराष्ट्रीय माणूस एकदम गडथाला हात घालतो, भोंवतालच्या पसाऱ्यास मायिक समजतो. जिलबी खावयाची झाली तर ती हातावर घेऊनहि खातां येते किंवा सभोंवतीं रांगोळी काढलेल्या व पुढें उदबत्त्यांचा घमघमाट सुट-लेल्या पाटावर चांदीच्या ताटांत घेऊनहि खातां येते. पण महाराष्ट्रीय बहुधा ती हातांत घेऊनच खाईल, फार झालें तर केळीच्या पानापर्यंत मजल मारील, पण त्यापुढें जाणें कठीण. तीच गोष्ट घराच्या बाबतींत. पुण्यांतील जुने वाडेवाले सरदार आपलें घर नेटावे देऊन गेलीं शंभर वर्षे उभें आहे पण पडलें नाहीं, असें अभिमानानें सांगतील. पण हा मजबुतपणाचा अभि-मान धरतांना सौंदर्याकडे आपण पूर्ण दुर्लक्ष करीत आहों हें बिचाऱ्यांच्या लक्षांत येत नाहीं. पुण्यांतील एकाहि जुन्या सरदाराला घरापुढें बाग असावी असें वाटलेलें नाहीं, हीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

वाङ्मय हा लोकांच्या मनाचा आरसा आहे. एखाद्या समाजांतील गुणदोष त्यांत चांगल्या तऱ्हेनें दिसूं शकतात. इंग्रजी, फ्रेंच, रशियन, जर्मन, इतालियन किंवा नॉर्वेजियन नोबेल प्राइज मिळविणाऱ्या ग्रंथकारांचीं पुस्तकें वाचलीं तर या म्हणण्याचा प्रत्यय तावडतोब येईल. अनातोले फ्रान्स या ग्रंथकारांच्या लेखनांत जें सौंदर्य आहे, त्याचा मागमूस इंग्रज ग्रंथकारांच्या लेखनांत क्वचितच दिसतो. सिल्व्हेस्टर बोनॉर्ड वाचतांना फ्रेंच लोकांच्या सौंदर्योपासक जीविताचें जसें प्रतिबिंब दिसतें तसें तें इंग्रजी कादंबरींत क्वचितच दिसेल. कन्यूट हॅम्सन याचें Growth of the soil वाचतांना मनोवृत्ति जशी नितांत शांत बनते तशी दुसरें पुस्तक वाचतांना क्वचितच होतें. नॉर्वे देशांतलि ओसाड रम्य प्रदेशाची शांतता हॅम्सनच्या कादंबऱ्यांत प्रतिबिंबित झालेली दिसते. रशियन कादंबऱ्यांत जसा अंतर्मनाचा देखावा सूक्ष्म तऱ्हेनें प्रतिबिंबित दिसतो तसा तो इतरत्र कचितच आढळेल. लॅडिस्लास सेंट रेमॉन्त या ग्रंथकाराची ‘ शेतकरी ’ ही एकच कादंबरी वाचून पोलंडांतील आयुष्य जसें मनांत ठसतें तसें तें वर्णनाचीं शंभर पुस्तकें वाचूनहि बहुधा ठसणार नाहीं. बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्यांतील भावनांचा सळसळाट किंवा कलेचा उत्कर्ष मराठी कादंबऱ्यांत कधीं दिसून येईल, अशी आशा करणेंहि चुकीचें दिसतें.

विचारप्रधान महाराष्ट्रांत स्वतंत्र विचार करणारीं अशीं जीं कांहीं थोडीं माणसें आहेत, त्यांत प्रो. वामन मल्हार जोशी हे पहिल्या दहांत बसण्यासारखे सहजच ठरण्यासारखे आहेत. त्यांच्या ‘ रागिणी ’ कादंबरीनें मराठींत एक नवीन कादंबरीप्रकार सुरू केला. या एकाच कादंबरीनें वामनरावांचें नांव महाराष्ट्रांत सर्वतोमुखीं झालें. वामनरावांच्या लेखनांत कलाविस्तारापेक्षां बुद्धीची कसरत जास्त असते, असें म्हटल्यानें त्यांच्या लेखनाची योग्यता कमी ठरते असें आम्हांस वाटत नाहीं. अर्थात् वामनराव नवीन ग्रंथ लिहित आहेत अशी बातमी ऐकतांच वाचकाच्या मनांत करमणुकीपेक्षां बौद्धिक मेजवानीचीच अपेक्षा उद्‌भूत होण्याचा संभव फार आणि ही त्याची अपेक्षा आमच्याकडे आलेल्या ‘ सुशीलेचा देव ’ या कादंबरीच्या वाचनानें सफल

होईल, यांत बिलकुल संशय नाहीं. ही कादंबरी आमच्याकडे येऊन वरेच दिवस झाले; पण तिचा परामर्ष घेण्याचा योग वरेच दिवस येईना. एका अर्थी पाहतां 'सुशीलेचा देव' अशासारख्या पुस्तकांचें परीक्षण करण्याची वस्तुतः कांहींच आवश्यकता नाहीं. ग्रंथकर्त्याचा हेतूच गूढ प्रश्न सामान्य जनांस मनोरंजक रीतीनें उकलून सांगणें हा असल्यानें व हा हेतु सिद्धीस नेण्याची सर्व तयारी व कौशल्य ग्रंथकाराजवळ भरपूर असल्यानें अशा पुस्तकांवर अभिप्राय देण्यापेक्षां एका वाक्यांत तें सर्वांनीं अवश्य वाचावें, अशी विनंति करणेंच जास्त योग्य ठरेल. कारण वामनराव तत्त्वज्ञानी असल्यामुळें जरी त्यांच्या लेखनांत सूत्रमयता वरीच आढळते तरी त्यांनीं आपलें लेखन सूत्रपद्धतीनें केलेलें नसून शंकराचार्यांच्या भाष्यपद्धतीनें केलेलें आहे. ज्याप्रमाणें आचार्यांचें भाष्य वाचणारास वहुधा इतर गोष्टींची मदत घेण्याची आवश्यकता नाहीं त्याचप्रमाणें वामनरावांच्या ग्रंथांस टिप्पणींची जोड देण्याचें कांहींच कारण नाहीं. उत्तम गवयाची चीज ऐकून मन प्रसन्न झालें असतां ज्याप्रमाणें त्याच्या रागदारीची चर्चा करण्याचें कारण राहात नाहीं, सुंदर वस्तु पाहून मन उचंवळलें असतां तिची स्तुति करण्यानें सौंदर्यांत भर पडते असें नाहीं; फुलांचा सुवास लुटीत असतां त्याच्या जातीची चिकित्सा करण्याचें मनांत येत नाहीं; त्याप्रमाणेंच याहि ठिकाणीं आहे. वामनरावांच्या या नवपुष्प-करंडकाचा सुवास तो 'रत्नाकरा'च्या वागेंत असतांनाच दरवळूं लागला होता. अनेकांच्या तोंडून या नव्या कृतीच्या उच्चत्वावद्दल प्रशंसोद्गार निघालेलेहि कानीं पडूं लागले होते. पण ग्रंथस्वरूपांत पूर्णपणें एखादी कृति हातीं पडल्याखेरीज ती वाचण्याचा आमचा प्रघात नसल्यामुळें त्यावेळीं तो वाचणें आमच्याकडून झालें नाहीं. पण पुस्तक हातांत आल्यानंतर तावडतोव वाचण्यास सुरुवात झाली. पहिलीं कांहीं प्रकरणें वाचतांच पुस्तक मिटून ठेवावेसें वाटलें. असें वाटण्याचें कारण मात्र नेहमींचें म्हणजे वाचतांना झोंप येऊं लागली हें नसून एवढें उंची पक्वान्न एकदम खाण्यापेक्षां तें पुरवून खाणें चांगलें अशी कृपण मति झाली. ही कादंबरी फक्त पावणे तीनशें पानांचीच आहे; पुस्तकाचा आकार छोटासा

असून टाईपहि बारीक नाहीं. पण एवढ्या लहान जागेंत इतके गहन प्रश्न एके ठिकाणीं खचून भरलेले आहेत कीं, त्या प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र विचार अभ्यासकास करावा लागेल. विचार गहन आहेत हें ऐकून एखाद्यास वाटेल कीं, ते वाचतांना डोक्यास शीण पडेल, तर त्याची कल्पना मात्र चुकल्याशिवाय राहणार नाहीं. विचार गहन असले तरी त्यांची मांडणी अशा तऱ्हेनें केलेली आहे कीं, इतके विचार कादंबरींत आलेले आहेत याची जाणीवहि कादंबरी वाचतांना वाचकाला होऊं शकत नाहीं. गहन विचारांची ही कादंबरी रुक्ष नाहीं इतकेंच नव्हे, तर ती इतर कोणत्याहि कादंबरीप्रमाणें वाचकाचें मन कथौघाबरोबर ओढीत नेऊन तिच्यावर मन रोखून ठेवण्याइतकी मनोवेधक आहे. कडू औषध शर्करावगुंठित करून द्यावें लागतें त्याप्रमाणेंच वामनरावांनीं आपणांस सांगण्याचे कठिण किंबहुना कडु विषय कादंबरीरूपानें वाचकांपुढें मांडण्याचा मुद्दाम प्रयत्न केला आहे, असें कादंबरी वाचणारास आपोआप कळतें. पूर्वी प्राचीन काळीं आर्यावर्तांतील ऋषि ज्याप्रमाणें गहन तत्त्वें घरगुती संवादरूपानें समजावून देतांना उपनिषदादि ग्रंथांत आढळतात, किंवा प्लेटो गुरु–शिष्य संवादरूपानें आपलें तत्त्वज्ञान प्रकट करतांना आढळतो; तसाच कांहींसा प्रकार या कादंबरींत दिसतो. या कादंबरीची नायिका जी सुशीला, ती मैत्रेयीप्रमाणेंच गूढ तत्त्वांचा विचार करतांना व त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल व इष्टानिष्टतेबद्दल वादविवाद करतांना आढळते. ही कादंबरी म्हणजे एका अर्थी या सुशीलेचीच तसबीर आहे. या तसबिरींत सुशीलेचा मनोविकास रंगवावयाचा असल्यानें रंग भरण्यासाठीं कादंबरींतील प्रसंग निर्माण केलेले आहेत. सिनेमा चित्रपटांत ज्याप्रमाणें मुख्य नायक–नायिकांचीच प्रतिकृति सूक्ष्म तऱ्हेनें मोठ्या आकारांत व भडक रंगांत दाखविण्यांत येते, त्यांचेच हावभाव तेवढे स्वतंत्रपणें मोठ्या प्रमाणांत दाखविले जातात, त्याप्रमाणें याहि कादंबरींत आहे. कादंबरींतील इतर पात्रांचे मनोविकास फारसे दाखविलेले नाहींत. त्यांचीं चित्रें पार्श्वभूमि म्हणून लहान आकारांत, फिकट रंगांत काढलेलीं आहेत. चित्रलेखनाचे दोन प्रकार असतात. एक स्वतंत्र तसबिरीचा व दुसरा समूहरूपाचा. पहिल्यांत एका

व्यक्तीचीच ओळख करून देण्याचा हेतू असतो. दुसऱ्यांत एक व्यक्ति प्रधान नसून समूहाचीच ओळख करून द्यावयाची असते. प्रस्तुत चित्र पहिल्या जातीचें आहे.

या कादंबरीचें स्वरूप दुसऱ्यानें संपादिलेल्या एखाद्या व्यक्तीच्या आत्मचरित्रा-प्रमाणें आहे. आत्मचरित्र एक तर ग्रंथकारास पूर्णपणें उपलब्ध नाहीं किंवा तें असूनहि त्याचें समाधान तेणेंकरून होऊं शकत नाहीं. अर्थात् आत्मचरित्राच्या माहितीला इतर स्वतः पाहिलेल्या, किंवा ऐकलेल्या, किंवा तर्किलेल्या माहितीची जोड देणें ग्रंथकारांस जरूर वाटलें. आत्मचरित्रपर कादंबऱ्यांची टूम महाराष्ट्रांत लोकप्रिय होत आहे, असें वाटतें. रा. तुळजापुरकर यांनीं लिहिलेली ‘ माझें रामायण ’ ही कादंबरी शुद्ध आत्मचरित्रस्वरूप आहे. ‘ सुशीलेचा देव ’ ही कादंबरी तशी नसून मिश्र आहे. या मिश्र पद्धतींतील सांधा मात्र पूर्णपणें साधलेला नाहीं. सांधकामांतील कसब सांधा न दिसून येण्यांत असतें. तसें तें या कृतींत साधलेलें नाहीं.

या कादंबरीची रचना कांहींशी मराठींत तरी नवीन तऱ्हेचीच आहे. रचना मुद्दाम अशा तऱ्हेनें करण्यांत आली आहे कीं, वर्णनाला शक्य तितका संक्षेप आपोआप मिळावा व कायम ठशाचीं लांबलचक वर्णनें वाचण्याचा प्रसंग वाचकावर येऊं नये. कादंबरी केवळ आत्मचरित्रस्वरूप ठेवली असती तर वर्णनसंक्षेप साधणें बरेच वेळीं अशक्य झालें असतें. पण संमिश्र रचना झाल्यामुळें आत्मचरित्राचा सत्याभास उत्पन्न होऊन कादंबरीला चटकदार-पणा आणण्यास मदत झाली आहे. कादंबरीच्या रचनेंतील दुसरा विशेष तिच्यांत पत्रलेखनाच्या युक्तीचा भरपूर अवलंब केलेला आहे, हा होय. जी हकीकत कथौघानें पुढें मांडण्यास कदाचित् योग्य संधीच मिळणें कठीण झाले असतें, किंवा तशी संधि मिळूनहि कादंबरीचा आकार पुष्कळ मोठा झाला असता, ती हकीकत पात्रांनीं परस्परांना लिहिलेल्या पत्रांत गुंफून दिल्यामुळें व तीं पत्रें योग्य जागीं मधून मधून घालण्याचा क्रम ठेविल्यामुळें वर्णनसंक्षेपास फारच मदत झाली आहे. पुनः असें करण्यानें मनोवेधकता कमी झालेली नसून उलट वाढलेली दिसते. वर्तमानपत्रांतील उतारे देऊन

समाजचित्र रंगविण्याचा प्रकारहि कुतूहलजनक आहे. पण या सर्व गोष्टींचा परिणाम वाङ्मयदृष्ट्या हानिकारक होत नसला तरी ग्रंथकर्त्याला हानिकारक होण्याची खात्रीच त्यामुळें निर्माण होते हें वाईट होय. भिकार कादंबरी-कारांनीं प्रकाशक पृष्ठसंख्येवर मोबदला ठरवितात म्हणून कादंबरीचा आकार भरमसाट वाढवावा आणि प्रकाशकांनीं लठ्ठ पुस्तकें छापून त्यावर भरपूर किंमत आकारून आपला फायदा वाढवावा व वामनरावांसारख्यांच्या उच्च कृतीस थोडी किंमत पडून लेखकाला त्यांत चारआठ आणे सुटण्याचाहि संभव नाहींसा व्हावा, ही गोष्ट आम्हांस अत्यंत दुःखदायक वाटते. वामनरावांनीं पोरींची शाळा हांकून कसाबसा निर्वाह करावा, ज्ञानकोशकार डॉ. केतकर, यांनीं आपलीं पुस्तकें खपविण्यासाठीं वणवण करून कसेंबसें जीवित कंठावें, राजवाड्यांनीं जिवाचें रान करून इतिहास–सामुग्री गोळा करावी आणि ज्यांच्या डोक्यांत स्वतंत्र विचार किंवा उच्च कल्पना कधींहि येत नाहींत अशा समाजभक्षक महाशंखांनीं शेंकड्यांनीं रुपये ओढावे याहून दुःखद स्थिति आम्हांस दुसरी भासत नाहीं. ती कधीं बदलेल काय !

( २ )

"सुशीलेचा देव" ही कादंबरी भाषादृष्ट्या पहिल्या दर्जाची ठरण्यासारखी नाहीं. ग्रंथकर्त्याचे विचार व्यक्त करण्यास या कादंबरींतील भाषा समर्थ असली तरी ती ग्रंथाच्या महत्त्वाला शोभण्यासारखी नाहीं, असें आम्हांस वाटतें. भाषा रोजच्या बोलचालीची आहे. तींत रसाळपणा फारसा नाहीं. भाषेवर सर्वत्र नागरपणाची छाप सारखी पडलेली नसून स्थानिक वाक्प्रचार तींत मधून मधून दृग्गोचर होतात. कुलाबा जिल्ह्यांत प्रचारांत असलेल्या बोलीची छाप भाषेवर पडलेली आहे ती कादंबरींतील पात्रांचें वसतिस्थान कल्पितां गैर म्हणतां येणार नाहीं. बोलताय्, करताय्, अशा तऱ्हेचीं रूपें या प्रदेशाखेरीज अन्यत्र ऐकावयास यावयाचीं नाहींत, पण वामनरावांच्या कादंबरींत अशीं रूपें न येतीं तर जास्त चांगलें झालें असतें. समजत आहे याबद्दल समजताय् किंवा करावयाचा याबद्दल कराचा अशीं रूपें सर्वत्र वाचण्यांत येणाऱ्या शिष्ट ग्रंथांत न आल्यास त्यामुळें कांहीं रसहानि होईल, असें नाहीं. खेरीज अशा तऱ्हेची स्थानिकवासाची भाषा मिसेस् स्वीट या

इंग्रज बाईच्या तोंडीं तर योग्य ठरणार नाहींच ( पृष्ठ १६९ ). कादंबरींतील शुद्धलेखनहि जुन्या रूढ तऱ्हेहून थोडें वेगळें आहे. उदाहरणार्थ, कादंबरीचें नांवच घ्या. सुशीलेचा देव या शब्दांतील दीर्घ 'शी' मागील पिढीच्या शुद्धलेखकानें बहुधा ऱ्हस्व लिहिली असती. या बाबतींत हल्लीं मराठींत थोडा गोंधळच माजल्यासारखा झाला आहे. पुढें विभक्तिप्रत्यय लागल्यामुळें शेवटच्या ऱ्हस्व अक्षराचें दीर्घ अक्षर होतें, हा नियमहि सर्वत्र पाळण्यांत आलेला नाहीं. यावरून वामनरावांना एक तर या गोष्टीबद्दल कांहीं वाटत नाहीं किंवा विकल्पानें ऱ्हस्व-दीर्घ वाटेल तसा लेखनप्रकार रूढ व्हावा असें त्यांस वाटतें, किंवा हा सर्व हलगर्जीपणाचा किंवा छापखान्याचा दोष असावा असें अनुमान होतें. सुनंदा व सुनंद असा नांवाच्या रूपांतहि भेद झालेला दिसून येतो. हल्लीं मराठींत कांहीं नवीन प्रकार सुरू होत आहेत. आकारान्त स्त्रीलिंगी विशेषनामांना प्रत्यय लावतांना मागील अक्षराचें रूप बदलण्याचा प्रघात अनेक लेखक व लेखिका बंद पाडतांना दिसत आहेत. नुसतें प्रभा असें नांव ऐकून त्यावरून प्रभा हा पुरुष आहे कीं स्त्री आहे, हें समजणें दुष्कर होत चाललें आहे. पूर्वीं प्रभाकर हें नांव असणाऱ्या मुलास प्रभ्या असें कोणी म्हणतांना ऐकूं आलें असतें; व मुलीला प्रभे या नांवानें संबोधिलें गेलें असतें. पण हल्लीं अरे प्रभा, अग प्रभा, प्रभाला बोलवायला आलों होतों किंवा आल्यें होत्यें अशीं रूपें प्रचारांत येत आहेत. भाषा इष्टार्थवाही असली पाहिजे असें मानलें तर प्रभाला या रूपावरून स्त्रीचा किंवा पुरुषाचा बोध झाला पाहिजे; पण रूपभेदाच्या अभावामुळें तो होऊं शकत नाहीं. प्रभेला बोलाविलें आहे, व प्रभ्याला बोलाविलें आहे अशीं स्वतंत्र रूपें योजल्यानें कार्यनिष्पत्ति होऊं शकते. पण त्याला पूर्वींचा आकारान्त पुल्लिंगी विशेषनामें न ठेवण्याचा नियम पाळावयाला पाहिजे. एकाच नांवाचीं सुनंद किंवा सुनंदा अशीं रूपें ठेवल्यानें इष्टकार्यसिद्धि होण्यास अडथळा उत्पन्न होतो. म्हणूनच या क्षुल्लक गोष्टीबद्दल येथें कांहीं लिहिलें. अशा तऱ्हेचे दोष सामान्य ग्रंथकारांत असल्यास त्याकडे कोणी पाहणारहि नाहीं, पण वामन-रावांसारख्यांच्या लेखनांत ते आढळल्यामुळें विवेचन करावेंसें वाटलें.

ही कादंबरी ' रत्नाकर ' मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध होत गेल्यामुळें तिच्या रचनेंत रहावी तितकी व्यवस्था राहूं शकलेली नाहीं. ज्याप्रमाणें हरीभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या आठवड्या आठवड्यास लिहिल्या गेल्या तशीच वामनरावांच्या कादंबऱ्यांची स्थिति झाली आहे. बाबाजी सखाराम कंपनीकडून टोंचणी आल्यावर हरीभाऊंनीं रात्रीचा दिवस करून चालू कादंबरीचा आठवड्याचा भाग लिहावयाचा असा क्रम कित्येक वर्षें चालत असे. वामनरावांचे भागहि तसेच ' रत्नाकर 'कर्त्यांकडून सूचना आल्यानंतर लिहिले जात असावेत. ताजमहालासारखी प्रमाणबद्ध, बांधेसूद, सर्वांगसुंदर इमारत त्यांतील सर्व भागांचा पूर्ण विचार आधीं झाल्यासच बांधतां येते. शिल्पकाराच्या मनांत ताजमहालाचें स्वरूप आधीं डोळ्यांसमोर असल्या-शिवाय त्याची आंखणी त्याच्याकडून होऊं शकली नसती. शेक्सपिअरचीं नाटकें कशीं प्रमाणबद्ध असतात, हें मोल्टनच्या ग्रंथाचें अध्ययन करणारास ठाऊक झालेलेंच असेल. बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्यांतहि प्रमाणबद्धता बरीच दिसून येते; पण महाराष्ट्रियांत गेल्या लेखांकांत सांगितल्याप्रमाणें सौंदर्या-भिलाषा कमी असल्यामुळें प्रमाणबद्ध व्यवस्थित रचना क्वचितच झालेली दिसून येते. ज्या ग्रंथकाराला अनेक दृष्टींनीं आपला ग्रंथ आदर्शभूत व्हावा असें वाटत असेल, त्याला अशा तऱ्हेची काळजी अवश्य बाळगली पाहिजे. पण वामनरावांचा हेतु कादंबरी लिहिणें हा नसून नवीन तत्त्वें समाजाच्या गळीं उतरविणें एवढाच असल्यामुळें कलादृष्टया जरूर ती साफसफाई त्यांच्या हातून होऊं शकलेली नाहीं. या कादंबरींत जे विचार गोंवलेले आहेत ते देवाच्या कल्पनेच्या विकाससूत्रानें बद्ध आहेत म्हणूनच त्यांना एका कादंबरीचें स्वरूप देतां आलें आहे इतकेंच.

वयोमानाप्रमाणें ग्रंथकाराच्या कृतींत आपोआप फरक पडत जातो. कांहीं लेखांवरून लेखकाचें वय काय असावें, याचें अनुमान बसविणें सोपें असतें. शाळेंतील मुलगा जसें लिहितो तसें कॉलेजांतील लिहीत नाहीं; व नवा ग्रॅज्युएट ज्या भरारींत असतो तिचा अवशेष चाळिशीनंतर फारसा रहात नाहीं. वामनरावांच्या ' रागिणीं'त जसें पांडित्यप्रदर्शन दिसून येतें तसें

तें 'सुशिलेच्या देवां'त दिसून येत नाहीं. पांडित्य मागें पडून व्यावहारिक विचार पुढें सरसावले आहेत. त्यामुळें या कादंबरीला काव्य-शास्त्र-विनोद असें नांव देतां यावयाचें नाहीं. व्यक्तींचे स्वभाव व ध्येयें, वय, परिस्थिति, शिक्षण, समाजरचना, व्यक्तींवर येणारे प्रसंग, वगैरे बाह्य उपाधींनीं बदलतात; मूळस्वभाव प्रबळ व दुरतिक्रम असला तरी बाहेरच्या आघातांचा परिणाम त्यावर होतोच होतो; मनुष्यजात वाटते इतकी विवेकप्रधान नाहीं; असें ग्रंथकारांना या कादंबरींत दाखवावयाचें आहे, असा भास या कादंबरीच्या वाचनानें होतो. या कादंबरींतील पात्रें जे वादविवाद करतात त्यांची उभारणी अगदीं आजतागायतच्या शास्त्रीय ज्ञानावर झालेली आहे. पण त्या शास्त्रांचे सिद्धांत अनुषंगिकरीत्या सांगण्यापलीकडे या कादंबरींत संवादांची मजल फारशी गेलेली नाही. वामनरावांची दृष्टि तत्त्वज्ञाची आहे, इतिहाससंशोधकाची नाहीं, याचा अनुभव या कादंबरींत झालेल्या एका कालविसंवादित्व दोषावरून येतो. तत्त्वज्ञ हा दिक्कालाबाधित कायम तत्त्वाचाच विचार करीत असतो; पण इतिहाससंशोधकास स्थल आणि काल यांचें महत्त्व अपरंपार भासतें. वामनरावांनीं ' देवांची कुस्ती ' या कादंबरींतील पांचव्या प्रकरणांत सन १९०० च्या सुमारास तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या मुख्य गांवीं मोटारी सुरू असून त्यांचा उपसर्ग मुलांस झाल्याचें दाखविलें आहे; पण मुंबईत पहिली मोटारगाडी सन १९०४ सालींच सुरू झाली व त्यांचा संचार जिल्ह्यांत व्हावयास लागून अजून पंधरावीस वर्षेंहि झालेलीं नाहींत. महायुद्धानंतरच्या कालांतच त्यांचा सुळसुळाट झालेला आहे. या बाबतींत कमींत कमी एका दशकाचा कालविपर्ययदोष कादंबरींत घुसला आहे.

कादंबरी प्रमाणबद्ध नसली तरी तिचे भाग सुंदर आहेत. थोड्या वाक्यांत भावनेचें केंद्र गांठण्याची युक्ति वामनरावांस चांगली साधली आहे. पाल्हाळिक वर्णनांत न पडतां गळ्यासच हात घालून वाचकांच्या डोळ्यांतून चटकन अश्रू काढण्याची कला वामनरावांजवळ उत्कर्ष पावलेली दिसून येते. कादंबरींतील बहुतेक पात्रें मानुष्यसुलभ लघिम्यानें व्यावृत आहेत. धीरोदात्त वीरमणी नायक निर्मिण्याचा वामनरावांचा विचार नसल्यानें सर्वसाधारण

जगांतच वरीं वाईट माणसें कशीं वावरतात हें त्यांनीं दाखविलें आहे. त्यामुळें सोंवळ्या टीकाकारांस नायिकेची 'अब्रुनुकसानी' झाल्याचा भास व्हावा, देवव्रतांस देवसदृश माणसांचा अनुभव यावा व दगडव्रतांस दगडपात्रें. स्वशीलानुरूप वरीं दिसावीं अशीं पात्रें या कादंबरींत रंगविलेलीं दिसून येतात. विरोधाभास, बौद्धिक कोटिबाजपणा व विनोद हे वामनरावांचे अभिमत लेखनालंकार आहेत. त्यांची रेलचेल या वर्णनसंक्षेप झालेल्या लहान कादंबरींतहि दिसून येते.

या कादंबरींतील अनेक उतारे वर सांगितलेल्या गोष्टींच्या उदाहरणार्थ देण्यासारखे आहेत. पण त्यांच्या भरीस पडल्यास अनेक पानें भरावीं लागतील. पात्रांचीं मनें व वाचकांचीं मनें क्षणभर तरी समरस होणें यांत कादंबरीकाराच्या वर्णनाचें कौशल्य सांठविलेलें असतें. असें कौशल्य दाखविणारे प्रसंग या कादंबरींत बरेच आहेत. सुनंद तुरुंगांतून जाऊन आल्यानंतर जेव्हां त्याला कोणी भेटण्यासहि धजत नव्हता तेव्हां आपल्या या बुद्धिमान् शिष्यास, त्याचें आचरण आपल्या मतांच्या अगदीं विरुद्ध असूनहि, भेटीस बोलाविणाऱ्या गिरिधररावांच्या मनाचें चित्र वामनरावांनीं फारच हृदयस्पर्शी रीतीनें रंगविलें आहे. "Don't talk of that. I cannot bear it" हे शब्द गहिंवरलेल्या गिरिधररावांच्या तोंडून बाहेर पडतात तेव्हां डोळ्यांतून अश्रू न येणारा वाचक असूं शकेल असें आम्हांस वाटत नाहीं. माणसाच्या मतापेक्षां मनाकडे पाहून वागणारे गिरिधरराव जगांत पुष्कळ होतील तर जगांतील वरींचशीं दुःखें व आपत्ति नष्ट होतील, यांत संशय नाहीं. सुखवादाचें परिणामचित्र रंगवितांना वामनरावांनीं जरा भडक रंगाचा उपयोग केला आहे. पण रावबाच्या सारखीं माणसें क्वचित् आढळतात, हें कांहीं खोटें नाहीं. वामनरावांनीं मवाळ, जहाल व ज्वलज्जहाल यांच्या सन १९०७–८ सालच्या सुमारच्या मनःस्थितीचें जें चित्र रंगविलें आहे, त्यावरून आजच्या वाचकांस, ते वयानें मोठे असल्यास त्या काळची आठवण होईल व लहान असल्यास त्या काळांतील समाजचित्र डोळ्यांसमोर उभें राहील. राजकीय मतमतांतरांचें इतकें निःपक्षपातानें काढलेलें सुंदर चित्र

आमच्या पहाण्यांत नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वीच्या वर्तमानपत्रांच्या फायली चाळून ह्या काळाची जी कल्पना येणार नाहीं, ती वामनरावांनीं अगदीं थोडक्यांत आणून दिली आहे. तीच गोष्ट वर्तमानपत्रांतील उतारे देऊन सजविलेल्या प्रकरणांतील उताऱ्यांची आहे. पुराणप्रिय राष्ट्रीय, प्रागतिक सुधारक व आचरट संशोधक यांच्या मनोरचनेचें प्रतिबिंब या प्रकरणांत चांगलें दिसतें. स्त्रियांच्या अगदीं अंतर्हृदयाचें आविष्करण सुशीला काफशीं झालेल्या आपल्या वर्तनाचें समर्थन करतांना करते, अशा तऱ्हेचें आविष्करण मराठी वाङ्मयांत क्वचितच आढळेल. म्हणून तो उतारा येथें देऊन आजचा लेखांक पुरा करूं:—

'पण थोर आकांक्षाच्या सिद्धीबद्दल निराश होऊन जीव द्यायला निघालेल्या काफसारख्या सरळ, निष्पाप मनुष्याला आणि लोणावळ्याच्या मिश्र शाळेंत पुष्कळ सलगीनें वागलेल्या शाळामित्राला, त्यानें अत्यंत सात्विक भावानें केवळ माझा हात हातांत धरला म्हणून झिडकारणें हें मला त्या स्थितींत अशक्यप्राय होतं. त्याच्या नातलगांनीं त्याला कसं फसवलं आहे, त्याच्या पालकांनीं त्याला कसं नागवलं आहे, आणि इतर ठिकाणीं त्याला कसले कटुतर अनुभव आले आहेत, हें सगळं जर तुम्हांला ठाऊक असतं, तर तुम्हांला त्याच्याबद्दल माझ्याप्रमाणेंच सहानुभूति वाटली असती. आणि तुमचं मन मृदु झालं असतं. त्याच्या बौद्धिक आणि नैतिक आकांक्षा तुम्हाला काय ठाऊक असणार? आम्ही एकमेकांनीं एकत्र बसून जगाला किती शिव्या दिल्या आहेत आणि जग सुधारण्याबद्दल किती योजना, किती निश्चय केले आहेत, हें काय ठाऊक? परवांच्यापेक्षां अधिक मोहकारक अनेक प्रसंगांतून निभावून पावित्र्य कसं सांभाळलं आहे, याची तुम्हांला काय जाणीव असणार? आणि काफ मला जेव्हां म्हणाला कीं, 'सुशीला, जीव देण्याचा निश्चय झाला आहे, पण केवळ तुम्हांला भेटण्याची अखेरची इच्छा तृप्त करावी आणि मरणापूर्वी उच्च विचाराच्या आणि आनंदाच्या वातावरणांत वावरावं म्हणून मी येथें सोनगांवला आलों'—असं जेव्हां मला तो म्हणाला, तेव्हां माझ्या हृदयांत काय झालं असेल याची जाणीव तुम्हांला कशी असणार?'

वरील उताऱ्यानें सुशीलेच्या हृदयाची जाणीव ज्याला होणार नाहीं, तो पाषाणहृदयी म्हणावा लागेल.

(३)

या कादंबरींतील मुख्य पात्र, नायिका सुशीला, हें होय. तिच्याच मनाचा विकास व विशेषतः देवाविषयींच्या तिच्या भावनांचीं स्थित्यंतरें दाखविणें, हा कादंबरीचा प्रधान हेतु आहे. माणसाच्या मनांतील देवविषयक कल्पना कुटुंबावर, समाजावर, वयावर, अनुभवांवर व परिस्थितीवर अवलंबून असतात; ज्ञानानें या कल्पनांत रेखीवपणा येत असेल पण या कल्पनांचा उगम कांहीं ज्ञानमूलक नसतो, असें ग्रंथकारांना दाखवावयाचें आहे असें वाटतें. यासाठीं त्यांनीं सुशीला वयानें दहा महिन्यांची असतांना देवबाप्पा म्हटल्यावरोवर हात जोडून नमस्कार करीत असे, तेव्हांपासूनचें तिचें मन रंगवावयास सुरुवात केली आहे. या ग्रंथांतील देवविषयक कल्पनांची मीमांसा आम्ही एक स्वतंत्र लेखांक लिहून करणार आहों. येथें फक्त पात्रांच्या स्वभावपरिपोषावर कोणत्या गोष्टीचा किती परिणाम घडला, हें दाखवावयाचें आहे. सुशीलेच्या देववादाचीं स्थित्यंतरें रंगविण्यासाठीं ग्रंथकारानें पहिल्यानें तिला कर्मठ, श्रद्धाळू, जुन्या तऱ्हेच्या वातावरणांत जन्मास घालून व वाढवून, नंतर एका नास्तिक घराण्यांत तिचें लग्न लावून दिलें आहे. तिचे बालत्वसुलभ विचार स्थिर होण्यासाठीं हुषार, विचारी मुलांच्या संगतीची तिला जोड देऊन तिचे देवविषयक विचार तर्काच्या पायावर उभे करण्याची योजना ग्रंथकारानें मोठ्या कुशलतेनें केली आहे. नास्तिक—केवल सुखवादी तिच्या नवऱ्याचें आयुष्य भडक रंगानें रंगवून त्या गोष्टीचा परिणाम सुशीलेची ईश्वरगुणयुक्त मानवी अवताराची कल्पना नष्ट करण्यांत झाला, असें ग्रंथकारानें दाखविलें आहे. यानंतर तर्कप्रधान, समाजहितकारक देवाची अधिष्ठापना तिच्या मनांत करण्याकडे कादंबरीचा उत्तरार्ध खर्ची पडला आहे. समाजहितकारक अत्यंत आवश्यक अशीं नीतितत्त्वें व्यक्तीच्या देवविषयक कल्पनेशीं किती निगडित असतात, हें दाखविण्यासाठीं कादंबरीच्या उत्तरार्धांत विधवा सुशीलेला प्रेमाच्या भोंवऱ्यांत सोडून दिलें आहे. देव मानला नाहीं

तरी दैवी गुण मानावे लागतात; व हे दैवी गुण म्हणजेच समाजहितकारक मूलभूत नीतितत्त्वें होत कीं ज्यांच्या अस्तित्वाशिवाय समाजांत बेबंदशाही माजेल, असा ग्रंथकाराच्या विवेचनाचा मथितार्थ दिसतो.

आपल्या मुख्य हेतूच्या सिद्धतेसाठीं वामनरावांनीं निर्मिलेलीं दुसरीं पात्रेंहि आनुषंगिकरीत्याच कां होईना, सुंदर रंगविलेलीं आहेत. या पात्रांत व त्यांच्या परिस्थितींत मोठाच योजकपणा ग्रंथकारानें दाखविला आहे. आपल्या समाजांत दारिद्र्य, हुषारी, ध्येयवाद व दुर्दैव हीं एके ठिकाणीं समाजव्यवस्थेमुळेंच कशीं येतांना दिसतात, हें सुनंदाचें चित्र रंगवून ग्रंथकारानें पटविलें आहे. हें चित्र रंगवितांना ग्रंथकारांना आपला स्वतःचा अनुभव बराच उपयोगी पडलेला असावा. सेनापति बापटांचीहि आठवण, सुनंदाचा आयुष्यक्रम पाहतांना, आरंभीं तरी झाल्याशिवाय राहात नाहीं. समाजांत उच्च तत्त्वें व विचार मधुनमधून वावरतांना दिसतात; पण त्यांची अंमलबजावणी क्वचितच होतांना दिसते. व जेथें ती होते तेथें व्यक्तींवर दुःखांचे डोंगर कोसळलेले दिसतात. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चतुष्टयांपैकीं अर्थाचेंच प्रावल्य बहुधा समाजव्यवहारांत आढळतें. सुशीलेचे वडील विनायकराव हे विचारांनीं जहाल, देशभक्तिप्रवण दिसतात; सुनंदासारखा गरीब पण हुषार मुलगा घरजांवई करून घ्यावा, असाहि विचार त्यांच्या मनांत येतांना दिसतो; पण अखेर ज्यांची ते टवाळकी करतांना दिसतात, निदान ज्यांच्याबद्दल त्यांच्या मनांत फारसा आदर असलेला दिसत नाहीं, त्या मवाळ स्पेन्सरशिष्य गिरिधररावांच्या गैरहुषार मुलालाच ते आपली मुलगी देतांना दिसतात. या बाबतींत बायकोच्या आवडीचें दडपण त्यांच्यावर विशेष पडलेलें दिसतें; आणि तसें तें समाजांत नसतें, असें कोण म्हणेल ? मुलीच्या आईला आपली मुलगी दागिन्यांनीं मढवलेली दिसावयास पाहिजे, आपली विहीण चांगली भपकेबाज दोन हजार रुपयांची नथ घालून मिरविणारी प्रतिष्ठित बाई पाहिजे म्हणून सुशिक्षित व संपन्न बापांच्या सर्वगुणसंपन्न मुलींचींहि लग्नें अनेक वेळीं अननुरूप माणसांशीं होतांना किती वेळां दिसतात बरें ? याचा परिणाम दुहेरी वाईट होतो. सद्‌गुणी, हुषार

माणसाला आयुष्यांत वर येण्याला संधीच मिळत नाहीं व त्याचे गुण वायां जातात, ही पहिली समाजहितनाशक गोष्ट घडते व अनेक सद्‌गुणी मुलींचे संसार नासले जातात, ही दुसरी वाईट गोष्ट. जर सुशीलेचें सुनंदाशीं लग्न होतें तर बहुधा तिची मूळची देवविषयक कल्पना आघातानें ढांसळूं शकली नसती. तसेंच सुनंदाचें आयुष्यहि बहुधा वेगळें व जास्त यशस्वी—म्हणजेच समाजहितकारक—झालें असतें, असें मानण्यास बळकट जागा राहाते. सुनंद हा दुसऱ्यांकडे काम करून राहाणाऱ्या गरीब बाईचा मुलगा म्हणून अगदींच कमी दर्जाचा म्हणून सोडला, तरी मध्यम स्थितींतील विश्वनाथपंतांच्या ऊर्फ विश्वासरावांच्या हुषार, सुशील व सुविचारी बाळूशीं सुशीलेचें लग्न होतें तरीहि तिचें आयुष्य व बाळूचेंहि आयुष्य वेगळें होऊन जास्त समाजहित साधलें गेलें असतें. पण अशी गोष्टहि समाजांत बहुधा घडतांना दिसत नाहीं. सुशीलांचीं लग्नें बहुधा संपन्न राववांशींच होतात व त्यामुळें समाजांतील अनेक, एरवीं सुस्थिति असलेले संसार दुःखमय झालेले आढळून येतात. वामनरावांनीं सुनंद, बाळू व राववा हीं तीन घरचीं तीन पात्रें रंगवितांना चांगलीच योजकता दाखविली आहे. समाजांतील विवाहविषयक सांवळ्या गोंधळाचें वस्तुस्थितिदर्शक चित्र यामुळें चांगलें वठलें आहे. या पुस्तकांतील विवाहविषयक जीं मतें ठिकठिकाणीं प्रतिपादिण्यांत आलीं आहेत, त्यांचा विचार एक स्वतंत्र लेखांकच लिहून आम्ही पुढें करूं.

कादंबरींतील पूर्वार्धाचा नायक, सुशीलेचे पहिले पतिराज राववा, हा आहे. त्याचे वडील हेडमास्तर स्पेन्सरभक्त गिरिधरराव यांचें चित्र ग्रंथकारानें चांगलेंच रेखाटलें आहे. तें न्याहाळतांना अनेक वाचकांस, महाराष्ट्रांतील गेल्या पिढींतील एका स्पेन्सरभक्त हेडमास्तराची खरोखरीच आठवण झाल्याखेरीज राहाणार नाहीं. नेमस्तपणाच्या मुळाशीं बहुधा ध्येयशून्यता, उत्कट भावनांचा अभाव, उच्च विचारांचें नास्तित्व, आधिभौतिक सुखवाद, हीं कशीं असतात हेंहि या चित्रांत चांगलें दिसून येतें. गिरिधररावांच्या निमित्तानें वामनरावांनीं सन १९०७–०८ सालच्या मवाळ, जहाल व ज्वलज्जहाल पक्षांचें जें चित्र पुढें मांडलें आहे, तेंहि उद्‌बोधक आहे.

वामनराव स्वतः त्या काळच्या लाटेंत भिजून बाहेर पडलेले असल्यामुळें या चित्राला स्वानुभवाचा रंग चढलेला दिसत आहे. नेमस्त पक्षाला आपल्या बाजूस ओढून सरकार राष्ट्रीय पक्षाला चिरडून टाकील व तो चिरडल्यानंतर मागाहून नेमस्त पक्षालाहि धाब्यावर बसवील व या एकंदर प्रकारामुळें राष्ट्राची प्रगति थांबेल, हें टिळक त्यावेळीं ओळखून होते असें ग्रंथकार म्हणतात. त्या मताची सयुक्तिकता आजहि तितकीच शिल्लक आहे, हें केवढें आश्चर्य ! ज्या दिवशीं नेमस्तपक्षाला हाताशीं धरून राष्ट्रीयपक्षाला मारण्याचा मार्ग सरकारास शिल्लक उरणार नाहीं, त्याच दिवशीं राष्ट्राचें गाडें प्रगतिपर होईल, असें वामनरावांचें मत असावें. अस्तु. रावबा ही स्पेन्सरच्या अज्ञेय-वादानें पोसलेली मूर्ति व्यवहारांत रंगवितांना ग्रंथकारानें मोठेंच कौशल्य दाखविलें आहे. आधिभौतिक सुखवादानें मनुष्य कर्मतत्पर होतो, कार्यप्रवीण होतो, संशयरहित होतो व एकंदरींत त्याची समाजांतील कार्यक्षमता वाढते हें खरें; पण त्याच्या विपरीतपणाचा अनुभव आयुष्याचा हेतु बदलण्यांत होतांना आढळून येतो. रावबाला जगांतील सर्व सद्‍गुण हे स्वार्थाचींच वेगवेगळीं रूपें वाटतात; सात्विकतेचा अर्थ त्याला कळत नाहीं, कोमलता हा एक मूर्खपणाचाच प्रकार असें त्याला वाटतें. ‘सुखाशिवाय मला साध्य नाहीं, भौतिकशास्त्रांच्या नियमांशिवाय मला नियमन नाहीं, वस्तूंच्या गुण-धर्मांव्यतिरिक्त मी धर्म जाणत नाहीं. जीवन कलहांत टिकेल तो खरा, टिकणार नाहीं तो फुकट, हा माझा आद्यसिद्धांत. परिस्थिति अनुरूप वागणं हें माझं व्यावहारिक धोरण आणि अनुरूप याचा अर्थ अधिकांत अधिक सुख देणारं व जीवनाच्या झगड्यांत टिकाव धरण्याचं अधिकांत अधिक सामर्थ्य देणारं.’ असें त्याचें प्रवचन आहे. त्यामुळें आईबापांना ‘स्वाभाविक शिक्षा’ देतांना त्याला कांहींहि वाटत नाहीं. रावबाच्या जीवनतत्त्व-ज्ञानाला धक्का बसतो काय तो त्याच्या पत्नीच्या व आईच्या श्रद्धेमुळें व सद्‍गुणांमुळें. त्यामुळें त्याचा या जन्मींच पुनर्जन्म होऊन तो द्विज बनतो. जगांतील स्वार्थरहित चांगुलपणाचें अस्तित्व, हेंच आधिभौतिक सुखवादाचें प्रत्यक्ष खंडण आहे, त्यामुळें हा वाद खोटा ठरतो, हें वामनरावांनीं उत्तम रीतीनें दाखविलें आहे.

कादंबरीचा उत्तरार्ध प्रचलित खासगी मालमत्तेच्या तत्त्वावर उभारलेल्या समाजव्यवस्थेंतील गोंधळ दाखवून या गोंधळांतून चांगली समाजव्यवस्था कशी निर्माण करतां येईल, या गोष्टीच्या चर्चेकडे खर्चिण्यांत आलेला आहे. सुशीलेला समाजहितकारक व्यक्तींचें ध्येय हाच देव असें वाटावयास लागतें, अशा वेळीं कादंबरी परिसमाप्त करण्यांत आली आहे. श्रद्धेशिवाय ध्येय-प्रणवता साध्य होऊं शकत नाहीं, आधुनिक शास्त्रीय मानलेले सिद्धान्तहि परिणामीं श्रद्धेनेंच कबूल करावे लागतात, नीतिमत्ता ही जास्तींत जास्ती सुखाच्या तत्त्वावर ठरवितां येत नाहीं. वगैरे सिद्धान्त या भागांत पुढें मांडण्यांत आलेले आहेत. या भागांत कित्येकांना बोल्शेविझमाजिज्ञासा आढळते, हा त्यांच्या स्वतःच्याच वृत्तीचा दोष आहे. या कादंबरींत आणलेला विश्वकुटुंबवाद म्हणजे बोल्शेविझम नव्हे. वयोमानाप्रमाणें व काळाप्रमाणें माणसांचीं ध्येयें न बदललीं तरी तीं साधण्याचे त्यांचे मार्ग थंडावतात हें या कादंबरीच्या उत्तरार्धावरून मनावर चांगलें ठसतें. आयुष्यारंभीं सुनंद असलेले अनेक तरुण पुढें ठेंचा खाऊन वाळू बनतात, असा ठसा या कादंबरीच्या वाचनानें मनावर उमटतो. समाजासाठीं व्यक्तीनें किती स्वार्थत्याग करावा, ‘ लोकांचीं कामं करण्याची रीत ’ कितीशी योग्य आहे, यासंबंधीं स्वानुभवानें ग्रंथकार शहाणे बनले असावेत, असा तर्क वाचकांस सहज करतां येतो.

( ४ )

या कादंबरीचे जनक प्रो. वामनराव जोशी हे तत्त्वज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. पण वामनरावांचें तत्त्वज्ञान आध्यात्मिक जातीचें नाहीं. या विश्वाचें आदिकारण काय, त्याचें स्वरूप काय तऱ्हेचें आहे वगैरे गूढ गोष्टींच्या चिंतनाकडे त्यांचा ओढा नसून समाजांतील कार्याकार्यव्यवास्थितीकडेच त्यांचा स्वाभाविक कल आहे. त्यामुळेंच त्यांनीं नीतिशास्त्रप्रवेश लिहिला व विचार-विलास प्रकट केला. हल्लींच्या युगाचा विशेषच हा आहे कीं, या काळांत माणसांचें लक्ष परलोकापेक्षां इहलोकाकडे वेधावें. या कादंबरींतील मुख्य सूत्र देवाच्या कल्पनेचा विचार, हें आहे. अर्थातूच हा प्रश्न आध्यात्मिक

स्वरूपाचा आहे; पण वामनरावांनीं देवाच्या स्वरूपाची चर्चा फारशी उपस्थित न करतां देवाच्या कल्पनेच्या संवेदनेचे परिणाम माणसांच्या मनावर काय होतात व ते कसकसे बदलत जातात, हें दाखविण्याकडेच लक्ष पुरविलें आहे; व तसें तें पुरविणें कादंबरीदृष्ट्या अपरिहार्यहि आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, वामनरावांचें मत आधिभौतिक पक्षाकडे झुकतें. तसा कांहीं प्रकार नसून वामनरावांचें व्यक्तिशः मत या कादंबरीच्या शेवटीं तरी आध्यात्मिक तत्त्वज्ञानाकडे व त्यावर उभारलेल्या धर्मवृत्तीकडे झुकत आहे, असा भास होतो. पण या युगांत कोणतीहि चर्चा केवळ तर्काधिष्ठित ठेवून चालण्यासारखें नाहीं. शास्त्रीय ज्ञानाची जोड दिल्याखेरीज आध्यात्मिक गोष्टींचाहि खल करणें या युगांत शक्य राहिलेलें नाहीं. शास्त्रीय ज्ञान म्हटलें कीं तें स्पेन्सरच्या मताप्रमाणें ज्ञेय गोष्टींच्या कक्षेंतच आलें पाहिजे. अर्थात्च आध्यात्मिकज्ञान आपोआपच अज्ञेय गोष्टींच्या कक्षेंत जातें, व त्यामुळें कार्याकार्यव्यवस्थितीचा विचार कर्तव्य असतां तें कांहींसें बाहेर टाकल्यासारखें होतें. वामनराव स्पेन्सरप्रमाणें विश्वाचें आदिकारण अज्ञेयाच्या कक्षेंत ढकलून व तें श्रद्धाविषय मानून धर्मखात्याकडे सोंपविण्यास तयार नसले तरी त्यांचें लक्ष इहलोकांतील घडामोडींकडेच लागलेलें असल्यामुळें याच लोकीं, याच देहांत देवस्वरूप होणें हें माणसाचें कर्तव्य किंवा ध्येय आहे, असें त्यांस वाटत असावें. म्हणूनच ते बळवंतरावांच्या तोंडून माणसांच्याच पोटीं देवांचे अवतार घडवून आणूं पहात असावे. अर्थात् त्यांचा देव परिपूर्णावस्थेस पोंचलेल्या माणसासारखाच असावा. नरानें करणी करून नारायण होण्याचाच हा पंथ आहे; पण त्यावरून अखेर या परिपूर्णावस्थेस पोंचलेल्या देवाचें स्वरूप काय असेल, याचा बोध होऊं शकत नाहींच. परिपूर्णावस्था ही शब्ददृष्ट्या व तर्कदृष्ट्या एकरूप असली तरी तिच्या स्वरूपांत कर्त्यांच्या मनाप्रमाणें फेरबदल होण्यास जागा रहातेच. म्हणजे ही परिपूर्णावस्था विकासवादाच्या भोंवऱ्यांत घुटमळत रहाते. विकास किती व्हावा याला मर्यादा नाहीं. अर्थात्च विकसित पूर्णावस्था काय स्वरूपाची असावी, याचाहि बोध नाहीं. यूरोपीय यहुदी तत्त्ववेत्ता स्पिनोझा याच्या

मताशीं वामनरावांचें मत जुळत असावें, असा भास त्यांच्या एकंदर विचारसरणीवरून होतो. स्पिनोझाच्या तत्त्वज्ञानाचा हेतु 'To discover and attain something which would enable him to enjoy supreme, continuous and permanent happiness ( अशी गोष्ट शोधून संपादन करावयाची कीं जेणेंकरून आपणाला अत्युच्च, अविरत, शाश्वत सुख भोगण्याचें सामर्थ्य येईल ),' हा होता. त्याचें ध्येय भवसागरांत गटांगळ्या खाणाऱ्या व्यक्तीच्या मनाला चिरशांति आणून देणें व माणसाचें सामाजिक आयुष्य उच्चपदास चढविणें, असें होतें. त्याचें अमृतत्त्व हें याच लोकीं याच देहीं भोगावयाची चीज होती. असें अमृतत्व मिळण्याचा मार्ग त्याच्या मतें पुरेसें ज्ञान संपादन करणें, हा होता. अर्थात्च त्याचें मन आध्यात्मिक विचारापेक्षां नीतिअनीतींच्या विचारांनींच भरून गेलेलें होतें. स्पिनोझा बुद्धि व इच्छाशक्ति हे गुण आपल्या ईश्वराच्या ठायीं कल्पित नसे. अशाच स्वरूपाचें वामनरावांचें तत्त्वज्ञान असावें असा ही कादंबरी वाचून आमचा ग्रह झाला आहे.

देवाच्या कल्पनेचा मानवी समाजांतील विकास ऐतिहासिकदृष्ट्या दाखविण्यासाठीं, वामनरावांनीं क्रमानें सुशीलेच्या मनाचीं स्थित्यंतरें बालपणापासून रंगविलेलीं असावीं. मनाच्या आधिदैवतपर्यायी अवस्थेंतून आधिभौतिक सुखवादाकडे सुशीलेचें मन नास्तिक घराण्यांत नास्तिक नवऱ्याशीं विवाह झाल्यामुळें झुकलें; पण शेवटीं त्या वादामुळें नवऱ्याची काय अवस्था झाली, हें पाहून ती त्या सुखवादालाहि विटली, असें ग्रंथकारानें दाखविलें आहे. गिरिधररावाचें व रावबाचें चित्र रंगवितांना वामनरावांनीं स्पेन्सरच्या तत्त्वज्ञानाचा थोडासा विपर्यासच केलेला आहे, असें म्हणावें लागतें. कदाचित् त्यांना आधिभौतिक सुखवादाचे दुष्परिणाम परिणामकारक रीतीनें वाचकांच्या मनावर व सुशीलेच्या मनावर बिंबवायाचे असावेत. गिरिधरराव व रावबा या पितापुत्र स्पेन्सर शिष्यांची जोडी दाखवून कदाचित् वामनरावांना असें ठसवावयाचें असेल कीं, मूळ सच्छील घराण्यांत जन्मलेल्या व वाढलेल्या माणसानें गिरिधररावांप्रमाणेंच मागाहून विचारपूर्वक आधिभौतिक सुखवादाचें

तत्त्वज्ञान अवलंबिलें तरी त्यापासून फारसा तोटा त्या व्यक्तीच्या आयुष्यांत झालेला कदाचित् दिसणार नाहीं; पण अशा सुखवाद्याच्या घरांतच ज्याचा जन्म होईल त्याच्यावर कांहीं अंशीं आनुवंशिक व कांहीं अंशीं तात्त्विक कारणामुळें एवढा दुष्परिणाम होण्याचा संभव आहे कीं त्यामुळें ती व्यक्ति स्वतःचें व समाजाचें सुख व हित नष्ट करील. रावबाच्या तोंडीं वामनरावांनीं स्पेन्सरचा विकासवाद व सुखवाद घातला आहे; पण स्पेन्सरनें आपलें मुख्य तत्त्वज्ञान आपल्या नीतिशास्त्राच्या ग्रंथांतच लिहिलें आहे, या गोष्टीचा विसर त्यांस पडलेला दिसतो. स्पेन्सरला जीवनकलहाचें तत्त्व मान्य होतें. पण त्यावरून व्यक्तीनें परोपकार करूं नये असा निष्कर्ष त्यानें काढलेला नाहीं, किंबहुना स्पेन्सरचें जीवनकलहाचें तत्त्व समाजघटनेपुरतें लावावयाचें असून व्यक्तीच्या आयुष्यांत त्याचा फारसा उपयोग व्हावा अशी त्याची इच्छा नसावी, असाच त्याच्या लिहिण्याचा एकंदर रोंख आहे. समाजाचें संघटित स्वरूप जें राज्य, त्या राज्याचें कर्तव्य व्यक्तीव्यक्तींत व राष्ट्राराष्ट्रांत कलह होऊं न देणें व झाल्यास त्यांपासून व्यक्तींचें व राज्याचें रक्षण करणें एवढेंच आहे, असें स्पेन्सरचें मत होतें. शिक्षणासारखें पवित्र कार्य सुद्धां त्याला राज्याकडून चालविलें जाणें पसंत नव्हतें. जर गिरिधरराव स्पेन्सरचे खरे शिष्य असते तर ते सरकारी शाळेंत शिक्षक झालेच नसते. स्पेन्सरच्या मतें राज्याचें कर्तव्य व्यक्तींना मदत करणें, हें नव्हतें; तरी समाजांतील सज्जन माणसांनीं गरिबांस मदत करूं नये, असें त्यास वाटत नव्हतें. आपल्या नीतिशास्त्रांतच त्यानें गरिबांना मदत करण्याबाबत लिहिलें आहे. पण वामनरावांनीं रावबा ‘ दीनदुबळ्यांना हातभार लावण्याच्या विरुद्ध ’ असल्याचें दाखविलें आहे. तसेंच मालक आणि मजूर यांच्यांतहि केवळ आर्थिक तीव्र जीवनकलह चालावा, असें त्याचें म्हणणें नव्हतें. भूतदयेचें अस्तित्व व इष्टत्व स्पेन्सर मानीत होता. म्हणूनच त्यानें Positive beneficence व Negative beneficence वर कांहीं लिहिलें आहे.

वामनरावांचें शास्त्रीय ज्ञान बरेंच आजतागायत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें मानसशास्त्र अलीकडे उदयास आलेल्या Behaviou-

ristic School म्हणजे व्यक्तीच्या बाह्य वागणुकीवरून तिच्या मनाचा अंदाज करण्याच्या पद्धतीकडे झुकत असावें, असा भासमुद्धां कादंबरींतील वाद-विवादावरून क्वचित् होतो. पण हें नवें मत सर्वस्वीं वामनरावांच्या एकंदर तत्त्वज्ञानाला जुळण्यासारखें नाहीं, हें उघड आहे. या कादंबरींत मुख्य खुबी ही आढळते कीं, त्यावरून ग्रंथकाराच्या मताचा निःसंदिग्ध अंदाज करणें कठीण किंबहुना अशक्य व्हावें. वामनराव अधिभौतिकवादी नसतील, पण त्यांना दुसऱ्यांचीं कामें करण्याची रीतहि पसंत नाहीं किंवा समाजासाठीं व्यक्तीनें केवढा स्वार्थत्याग केव्हां करावा याबद्दल त्यांस संशय वाटतो. म्हणजे पर्यायानें स्पेन्सरच्या मताप्रमाणें व्यक्तीनें स्वतःचें सुख, करमणूक, शरीर-प्रकृति यांकडे दुर्लक्ष करूं नये; हीं सर्व संभाळून नंतर काय तो परोपकार करावा, असें त्यांस वाटत असावें. आधिभौतिक सुखवादाला पोषक असें शास्त्रमतहि त्यांस जास्त संमत असावें. चार्वाकमताचें अधिष्ठान भूतसृष्टीच्या एकमेव सत्यावर ठेवलेलें असतें. या भूतसृष्टींतील सर्व घडामोडी एका पदार्थविज्ञानशास्त्राच्या कक्षेंत आणतां येतात किंवा जसजसें प्रयोगजन्य ज्ञान वाढेल तसतशा त्या आणतां येतील या काल्पनिक सिद्धान्तावर चार्वाकमत आधुनिक युगांत उभारलेलें असतें. पण या सिद्धान्तास हल्लीं सर्वांत मोठा ठोका पदार्थविज्ञानशास्त्रांतील ऐन्स्टैनच्या नव्या Relativity च्या सिद्धान्ता-नेंच दिला आहे. ( या जर्मनींतील यहुदी शास्त्रवेत्त्याचें इंग्लंडांत मि. बर्नार्ड शॉ यांच्या अध्यक्षतेखालीं नुकतेंच जें स्वागत करण्यांत आलें त्याची बातमी वाचकांनीं वर्तमानपत्रांत वाचलीच असेल. शॉनें ऐन्स्टैनला ' महापुरुषांतील महापुरुष ' असें बहुमानदर्शक विशेषण आपल्या भाषणांत लावलें होतें.) पूर्वी पदार्थ हा कालदृष्ट्या तरी बदलत नव्हता, आतां विश्वाच्या अंतरालांत तो कालानुसार बदलणारा असें ठरलें आहे. म्हणजे कोणतीच गोष्ट आतां शाश्वत किंवा टिकाऊ म्हणतां येणार नाहीं. अध्यात्मशास्त्रांत पदार्थांचें सत्यत्व केव्हांच नष्ट झालेलें होतें, पण भौतिक प्रयोगजन्य शास्त्रांकडूनच आतां त्यास धोका आला. वामनराव सजीव सृष्टींत कांहीं प्रेरक हेतु आहे किंवा नाहीं या गोष्टीवरून ईश्वराचें अस्तित्व संशयित मानतात ( पृष्ठ २४७ ).

पण या गोष्टीच्या सिद्धयर्थ जीविशास्त्रांत शिरण्याचें कारण नाहीं. जेथें निर्जीव सृष्टींत सर्वसामान्य सिद्धान्त आढळत नाहींत तेथें सजीव सृष्टींत शिराच कशाला? या बाबतींत प्रसिद्ध इंग्रज शास्त्रज्ञ मि. बर्ट्रंड् रसेल यानें लांगेच्या History of Materialism या ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतरास लिहिलेली प्रस्तावना मोठी उद्बोधक आहे. ( रसेल स्वतः वामनरावांप्रमाणेंच संशयात्माच आहे. ) तींतून एतद्विषयक वाक्यसमूह पुढें उद्धृत करतों:—" In the world of pure physics there are a number of fundamental occurrences which cannot at present be reduced to law. No one knows why some atoms of a radio-active element disintegrate while others do not; we know statistical averages, but what goes on in the individual atom is completely obscure. Again, the spectrum of an element is caused by electrons jumping from one possible orbit to another. We know a great deal about the possible orbits, and about what happens when a jump takes place, and about the proportion that choose one possible jump as compared to those that choose another. But we do not know what ( if anything ) decides the particular moment at which an electron jumps, or the particular jump that it sees fit to make when several are possible. "

( ५ )

मागील अंकीं दिलेल्या मि. बरट्रँड रसेल यांच्या प्रस्तावनेंतील इंग्रजी उतारा दिला होता, त्यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, आज सजीव किंवा निर्जीव दोन्हीही सृष्टीच्या शास्त्रांत एकमेव सत्य किंवा एकमेव नियम उपलब्ध होऊं शकलेला नाहीं. कित्येक शास्त्रज्ञांच्या मतें सर्व सृष्टि रसायनशास्त्र व पदार्थविज्ञानशास्त्र या दोन शास्त्रांच्या आधारानें पूर्णपणें समजूं शकते व वर्णितां येते. कित्येकांच्या मतें तशी ती वर्णितां येत नाहीं. पहिल्या तऱ्हेचें ज्यांचें मत आहे त्यांच्या दृष्टीनें पाहतां सर्व गोष्टी यंत्राप्रमाणें चाललेल्या आहेत. यांच्यापैकीं एक शास्त्रज्ञ लोएब यानें असें दाखवून दिलें कीं एका

टांचणीपासून समुद्रांतील एक सूक्ष्म प्राणी जन्मूं शकतो व या सिद्धांताचा उपयोग प्राणिसृष्टींत लावूं लागलें म्हणजे सर्व गोष्टींची उपपत्ति लावणें सुलभ होतें. या यंत्रवादी लोकांच्या मतें एक काळ असा येईल कीं ज्या वेळीं रासायनिक प्रयोगशालेंत ज्यांपासून मनुष्यजातीचा प्राणी तयार होतो, असे सूक्ष्म जंतु—जे सध्यां माणसाच्या वीर्यांत सांपडतात ते—तयार करतां येतील, त्या दिवशीं अर्थात्च सृष्टीचा कर्ता ईश्वर, असें म्हणणें कठीण होऊन बसेल. या बाबतींत कांहीं वर्षांमागें आम्हीं असेंही वाचलें होतें कीं, अमेरिकेंतील एका शास्त्रज्ञानें नुकत्याच मेलेल्या माणसांच्या शरीरावर प्रयोग करून त्यांच्यांत पुनः चेतना उत्पन्न करून दाखविली होती. त्यानें सुमारें पन्नास प्रयोग करून पाहिले होते. त्यांत त्याला असें आढळून आलें कीं लहान मुलांच्या प्रेतांत चेतना उत्पन्न करणें सोपें जातें. अपघातानें एकदम मेलेल्या माणसांतसुद्धां चेतना लवकर उत्पन्न होऊं शकतें. पण अजून या बाबतींत म्हणण्यासारखें शास्त्रीय यश आलेलें दिसत नाहीं. कारण आम्ही वरील बातमी वर्तमानपत्रांतील अद्‌भुत चमत्कारांसारख्या सदरांत कोठें तरी वाचली होती. सर्वप्रमाण शास्त्रीय ग्रंथांत या शोधांचा उल्लेख अजून आलेला नाहीं. जर हा शोध खरा मानला तर आर्यांची आत्म्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाची समजूत खोटी पडेल. जर एकदां देह सोडून गेलेला आत्मा उपायांनीं शरीरांत पुन्हां येऊं लागला तर त्याचें आत्मत्व तें कोठें राहिलें ? अर्थात् आत्मवादावर उभारलेलें आमचें सर्व औपनिषदिक तत्त्वज्ञान ढांसळून पडेल, अशी भीति वाटते. पण अशी गोष्ट होण्यास अजून बराच काळ लोटावा लागेल. खेरीज या सर्व प्रकारावर मानसशास्त्रजन्य अपवाद आणतां येतातच. सर्व प्रयोगजन्य ज्ञान माणूस स्वतःच्या बुद्धीनें करून घेत असल्यामुळें ज्ञानाचें स्वरूप त्याच्या बुद्धीच्या कांचेप्रमाणें चित्रित दिसणें शक्य आहे, हें उघड आहे. तें कसेंहि असलें तरी आज तरी तर्काधिष्ठित अध्यात्मशास्त्राप्रमाणें पहातां चार्वाकवाद ढांसळून पडतो, हें सत्य आहे.

या कादंबरींतील नायिका सुशीला हिच्या मनाचीं ईश्वरकल्पनाविषयक स्थित्यंतरें कादंबरीकारांनीं सूक्ष्मपणानें दाखवून त्यावरून सध्यांच्या समाजांतील

देवविषयक कल्पनांचें फोलपण दाखविलें आहे. या कल्पना "कांहीं अंशीं वयोनुसार आणि मनोविकासानुसार, कांहीं अंशीं विशिष्ट अनुभवामुळें व कांहीं अंशीं संगतींतील लोकांच्या सहवासामुळें" बदलत गेल्या, असें वामनरावांनीं दाखविलें आहे. कादंबरींत विशिष्ट भावनास्पर्शी प्रसंग निर्माण करण्यांत आलेले असल्यामुळें या कल्पनास्थित्यंतराचें सयुक्तिकत्व तात्पुरतें तरी एकदम पटतें; पण अनुभवामुळें व प्रसंगामुळें ज्या कल्पना बदलतात त्या बुद्धीला पटणाऱ्या कल्पना मुळांतच नसतात. तो केवळ भावनांचा खेळ असतो. आजच्या समाजांतील ईश्वरवाद हा धर्माच्या सांगाड्यांत बसविलेला आहे. अर्थातच जेव्हां जेव्हां धार्मिक ढोंगें किंवा अनाचार माणसाच्या प्रत्ययास येतात तेव्हां त्याची कल्पना अशी होते कीं, हा सर्व खोट्या देवाचें अस्तित्व मानण्याचा परिणाम आहे. वस्तुतः त्याचा ईश्वरवादाशीं कांहींच संबंध नसतो. ग्रंथकारानें समाजांतील दुबळ्या माणसांचीं मनें कशीं हेलकावत व बदलत असतात, हें योग्य दाखविलें आहे. पण त्यावरून देवविषयक वादाचा निकाल लागण्यास मात्र मदत होण्यासारखीं नाहीं. आजच्या समाजांतील धार्मिक ऊर्फ आस्तिक मानले जाणारे आपल्या वर्तनानेंच असें दाखवीत असतात कीं, त्यांचा तर्कदृष्ट्या पाहतां ईश्वरावर विश्वास नाहीं. जर ईश्वरावर त्यांचा खरा विश्वास असेल तर जगांतील सर्व पापें, अत्याचार व मनुष्यकृत आपत्ति समाजावर कोसळणार नाहीं. तर्कदृष्ट्या हें सर्व खरें वाटतें; पण ईश्वरावरील विश्वास किंवा गैरविश्वास माणसाच्या नैतिक आचरणावर कितीसा परिणाम करूं शकतो, हें निश्चित आहे काय ? श्रद्धेचा किंवा अश्रद्धेचा वर्तनावरील परिणाम नेहमीं समाजानुकूलच होईल असें म्हणण्यास आधार आहे काय ? निरीश्वर आधिभौतिकवादी जसे दुराचारी समाजकंटक असतातच असें नाहीं त्याप्रमाणेंच ते सदाचारी, मानवहितप्रवण, समाजकल्याणसाधक निपजतील, असेंहि म्हणतां येणार नाहीं. आज रशियांत तेथील सत्ताधीश बोल्शेविक ईश्वरवाद उखडून काढण्याच्या प्रयत्नांत आहेत. पण श्रद्धेचें समाजांतील कार्य काय व ईश्वरविषयक श्रद्धा वेगवेगळ्या माणसांच्या बाबतींत, वेगवेगळ्या परिस्थितींत, कोणत्या तऱ्हेच्या आचरणाला सहाय्यभूत

होते यांचा विचार त्यांच्या मनांत बहुधा वागत नसल्यामुळें त्यांच्या प्रयत्नांचा परिणाम समाजावर कोणत्या तऱ्हेचा होईल, याविषयीं आजच अनुमान करतां येणें शक्य नाहीं. तसें तें करूं पाहणें हें निश्चित अशास्त्रीय अर्थात् धोक्याचें आहे. आजची रशियांतील मोठी पिढी देवविषयक श्रद्धेंत जन्माला आलेली असून तिच्या वर्तनावर व तिच्या वर्तनाच्या अनुकरणानें धाकट्या पिढीवर देवविषयक कल्पनांचा परिणाम अजूनहि बराच होत असला पाहिजे. सश्रद्ध बापांचे अश्रद्ध मुलगे आज कदाचित् योग्य तऱ्हेनें वागत असतील पण या अश्रद्ध मुलग्यांचे त्याहून जास्त अश्रद्ध मुलगे कसें वागतील, त्यांच्या वर्तनाला कोणतें बंधन, कोणती भीति बाधूं शकेल, याचा विचार आज करणें कठीण आहे. कोणत्याही कार्यक्षम, सुसंघटित समाजाची रचना त्या समाजांत प्रचलित असलेल्या श्रद्धाविषयांवर अवलंबून असते व त्या समाजाचें वर्तन श्रद्धाविषयांच्या भावनांवर अवलंबून असतें. आज अनेक समाजशास्त्रज्ञ* रानटी जातींच्या मनोरचनेचा अभ्यास करण्यांत गुंतलेले आहेत. त्यांपैकीं कित्येकांस असें आढळून आलें आहे कीं, अनेक रानटी जातींत पाश्चात्यांच्या संसर्गामुळें बेबंदशाही उद्भूत झाली. कारण जुन्या खुळ्या मानल्या गेलेल्या समजुतींना धक्का बसून त्या नष्टप्राय झाल्या व त्यांच्या जागीं नव्या सुधारलेल्या शास्त्रीय पायावर उभारलेल्या समजुती शिक्षणाच्या अभावामुळें रूढ होऊं शकल्या नाहींत. या गोष्टीचा अनिष्ट परिणाम असा झाला कीं, त्या त्या जातींचें संघटित मनोजीवन नष्ट झालें. त्यामुळें त्या जातीचा पराक्रमही लुप्त होऊन त्या दिङ्मूढ, निराश, दैववादी बनल्या व झपाट्यानें ऱ्हासाचा मार्ग चालूं लागल्या. अनेक किंबहुना बहुतेक जाती नष्ट किंवा नष्टप्राय झाल्या आहेत. या उदाहरणावरून बोध असा होतो कीं, एखाद्या समाजांतील खऱ्या वा खोट्या फार काळ चालत आलेल्या समजुती एकदम नष्ट करतां कामा नये. तेणेंकरून अराजक बोकाळून समाज नष्ट होण्याचा संभव फार. म्हणूनच समाजांत कमीजास्त प्रमाणांत दंभ शिल्लक रहाणें

* ज्यांस या गोष्टीचा समाजशास्त्रदृष्ट्या अभ्यास करणें असेल त्यांनीं रिव्हर्स, मालिनौस्की, पिट–रिव्हर्स, यांचे ग्रंथ वाचावे.

अपरिहार्य ठरतें. समाजांतील कांहीं व्यक्तींच्या मनांत कांहीं नवे विचार आले, कांहीं जुन्या समजुती त्यांस पटेनाशा झाल्या, त्यांच्या दृष्टीनें त्या खोट्याहि ठरल्या तरीसुद्धां सर्व समाजाच्या कल्याणासाठीं त्यांस असें वागणें भाग आहे कीं, जणुं काय आपण इतरांच्याच सारखे आहोंत. सूक्ष्म नीति-दृष्ट्या असें करणें दंभ असेल, पण हें दंभ समाजहितसाधक आहे यांत संशय नाहीं. वामनराव आपल्या कादंबरींतील सहाव्या प्रकरणांत—या प्रकरणाचें नांव त्यांनीं "आनुवंशिक संस्कार" असें ठेवलें आहे—ज्या सामाजिक कृत्रिमपणाविषयीं व खोटेपणाविषयीं चर्चा करतांना आढळतात, तशा तऱ्हेचा कृत्रिमपणा याच हेतूनें निर्माण झालेला असतो. असा कृत्रिमपणा समाजांत नसेल तर समाजांतील पात्रें एकमेकांवर आदळून उगाच मोठा आवाज होईल व त्यांपैकीं अनेकांना पोंचे येऊन कांहीं फुटतीलहि.

विषयविवेचनाच्या भरांत आम्ही दुसरीकडेच आलों. वामनराव आपल्या कादंबरींतील (२४४–२४५) पानांवर आजच्या रूढ ईश्वरवादाचा जो उच्छेद करतांना आढळतात त्या ईश्वरवादाचें मंडन समाजहितदृष्ट्या वरच्याप्रमाणें करतां येण्यासारखें आहे. जर एखादी खुळी समजूतहि समाजांतील बहुसंख्येच्या सद्वर्तनास कारणीभूत होत असेल, जर अनेकांच्या पशुत्वसहजवृत्तीस ती दावांत ठेवूं शकत असेल, जर अनेकांच्या समाधानांस ती आधार होत असेल तर ती चालू रहाण अनिष्ट कसें ठरेल? अजून-पर्यंत शास्त्रदृष्ट्याहि ईश्वराचें अस्तित्व निखालसपणें खोटें ठरलेलें नाहीं. तसें तें ठरण्याचा संभव पुढें दिसत असला तरी समाजहितदृष्ट्या त्या कल्पनेचा आजच उच्छेद करण्याच्या नादांत पडण्याचें कारण नाहीं. ध्येय हाच देव, असें मानलें तरी तेणेंकरून मनुष्याच्या दुबळ्या मनोवृत्तीला बिलकुल आधार मिळत नाहीं किंवा समाधान लाभूं शकत नाहीं. मानवजातीच्या समूहरूप भावनेला जें स्पर्शूं शकेल, असें ध्येय ठरविणें आज तरी अशक्य-प्राय वाटतें. इंग्लंडचा राजा पहिला चार्लस हा "No King! No God," असें म्हणत असे. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, समाजांत आज्ञा-पालनवृत्ति निर्माण होण्यास व टिकण्यास कांहींतरी अत्युच्च प्रतीकाची

आवश्यकता आहे. कारण आज्ञापालनवृत्ति ही सर्व समाजबंधनांत मूलभूत-वृत्ति आहे. मग त्या आज्ञा धर्मांच्या असोत, राजाच्या असोत, शास्त्रांच्या असोत, कीं ध्येयाच्या असोत. आज अगदीं प्राचीन कालापासून चालत आलेली व अखिल मानवजातीला स्पर्शूं शकणारी अशी भावना ईश्वरविषयक श्रद्धेचीच आहे. बोल्शेविक त्या जागीं आपल्या विशिष्ट, त्यांना परिपूर्ण वाटत असलेल्या, समाजहितसाधक मार्गाची प्राणप्रतिष्ठा करूं पाहत आहेत; पण त्यांचा समाजहितसाधक मार्ग हा समाजांतील सर्व तऱ्हेच्या माणसांना पटण्यासारखा किंवा खरोखरीच त्यांचें हित साधणारा आहे असें म्हणतां येत नाहीं. आज तरी बोल्शेविकांच्या वर्तनामुळें अनेकांचें हित साधण्याऐवजीं तें नष्ट झालेलें दिसत आहे. या कादंबरींतील मुख्य पात्रांनीं स्थापन केलेली विश्वकुटुंबी संस्था ईश्वरवादी नाहीं किंवा निरीश्वरवादीहि नाहीं, तर सत्यवादी आहे, असें म्हटलेलें आहे. कोणत्याहि एका वर्गाचा इतरांवर जुलूम असावा, हेंही या संस्थेच्या चालकांस मान्य नाहीं. हें सर्व ठीक आहे, पण या सर्व तत्त्वज्ञानांत ग्रंथकार स्वतःच म्हणतात त्याप्रमाणें माणसाच्या वृत्तींत उत्साह उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं. आजची समाजरचना सुधारून पूर्णत्वास नेण्यासाठीं किंवा धर्माच्या नांवावर चाललेला सावळागोंधळ बंद पाडण्यासाठीं ईश्वराचा नायनाट करण्याचें वास्तविक कारण नाहीं. तर्कदृष्ट्या, भावनादृष्ट्या, आज उपलब्ध असलेल्या शास्त्रदृष्ट्या, समाजशास्त्रदृष्ट्या व इतिहासदृष्ट्या ईश्वराचें अस्तित्व मानणें भाग व इष्ट आहे, असें आम्हांस वाटतें.

प्रगति } वर्ष २, अंक २१ ते २५

अपरिहार्य ठरतें. समाजांतील कांहीं व्यक्तींच्या मनांत कांहीं नवे विचार आले, कांहीं जुन्या समजुती त्यांस पटेनाशा झाल्या, त्यांच्या दृष्टीनें त्या खोट्याहि ठरल्या तरीसुद्धां सर्व समाजाच्या कल्याणासाठीं त्यांस असें वागणें भाग आहे कीं, जणुं काय आपण इतरांच्याच सारखे आहोंत. सूक्ष्म नीति-दृष्ट्या असें करणें दंभ असेल, पण हें दंभ समाजहितसाधक आहे यांत संशय नाहीं. वामनराव आपल्या कादंबरींतील सहाव्या प्रकरणांत—या प्रकरणाचें नांव त्यांनीं "आनुवंशिक संस्कार" असें ठेवलें आहे—ज्या सामाजिक कृत्रिमपणाविषयीं व खोटेपणाविषयीं चर्चा करतांना आढळतात, तशा तऱ्हेचा कृत्रिमपणा याच हेतूनें निर्माण झालेला असतो. असा कृत्रिमपणा समाजांत नसेल तर समाजांतील पात्रें एकमेकांवर आदळून उगाच मोठा आवाज होईल व त्यांपैकीं अनेकांना पोंचे येऊन कांहीं फुटतीलहि.

*विषयविवेचनाच्या भरांत आम्ही दुसरीकडेच आलों.* वामनराव आपल्या कादंबरींतील (२४४–२४५) पानांवर आजच्या रूढ ईश्वरवादाचा जो उच्छेद करतांना आढळतात त्या ईश्वरवादाचें मंडन समाजहितदृष्ट्या वरच्याप्रमाणें करतां येण्यासारखें आहे. जर एखादी खुळी समजूतहि समाजांतील बहुसंख्येच्या सद्वर्तनास कारणीभूत होत असेल, जर अनेकांच्या पशुत्वसहजवृत्तीस ती दाबांत ठेवूं शकत असेल, जर अनेकांच्या समाधानांस ती आधार होत असेल तर ती चालू रहाण अनिष्ट कसें ठरेल? अजून-पर्यंत शास्त्रदृष्ट्याहि ईश्वराचें अस्तित्व निखालसपणें खोटें ठरलेलें नाहीं. तसें तें ठरण्याचा संभव पुढें दिसत असला तरी समाजहितदृष्ट्या त्या कल्पनेचा आजच उच्छेद करण्याच्या नादांत पडण्याचें कारण नाहीं. ध्येय हाच देव, असें मानलें तरी तेणेंकरून मनुष्याच्या दुबळ्या मनोवृत्तीला बिलकुल आधार मिळत नाहीं किंवा समाधान लाभूं शकत नाहीं. मानवजातीच्या समूहरूप भावनेला जें स्पर्शूं शकेल, असें ध्येय ठरविणें आज तरी अशक्य-प्राय वाटतें. इंग्लंडचा राजा पहिला चार्लस हा "No King! No God," असें म्हणत असे. त्याच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, समाजांत आज्ञा-पालनवृत्ति निर्माण होण्यास व टिकण्यास कांहींतरी अत्युच्च प्रतीकाची

आवश्यकता आहे. कारण आज्ञापालनवृत्ति ही सर्व समाजबंधनांत मूलभूत-वृत्ति आहे. मग त्या आज्ञा धर्माच्या असोत, राजाच्या असोत, शास्त्रांच्या असोत, कीं ध्येयाच्या असोत. आज अगदीं प्राचीन कालापासून चालत आलेली व अखिल मानवजातीला स्पर्शू शकणारी अशी भावना ईश्वरविषयक श्रद्धेचीच आहे. बोल्शेविक त्या जागीं आपल्या विशिष्ट, त्यांना परिपूर्ण वाटत असलेल्या, समाजहितसाधक मार्गाची प्राणप्रतिष्ठा करूं पाहत आहेत; पण त्यांचा समाजहितसाधक मार्ग हा समाजांतील सर्व तऱ्हेच्या माणसांना पटण्यासारखा किंवा खरोखरीच त्यांचें हित साधणारा आहे असें म्हणतां येत नाहीं. आज तरी बोल्शेविकांच्या वर्तनामुळें अनेकांचें हित साधण्याऐवजीं तें नष्ट झालेलें दिसत आहे. या कादंबरींतील मुख्य पात्रांनीं स्थापन केलेली विश्वकुटुंबी संस्था ईश्वरवादी नाहीं किंवा निरीश्वरवादीहि नाहीं, तर सत्यवादी आहे, असें म्हटलेलें आहे. कोणत्याहि एका वर्गाचा इतरांवर जुलूम असावा, हेंही या संस्थेच्या चालकांस मान्य नाहीं. हें सर्व ठीक आहे, पण या सर्व तत्त्वज्ञानांत ग्रंथकार स्वतःच म्हणतात त्याप्रमाणें माणसाच्या वृत्तींत उत्साह उत्पन्न करण्याचें सामर्थ्य नाहीं. आजची समाजरचना सुधारून पूर्णत्वास नेण्यासाठीं किंवा धर्माच्या नांवावर चाललेला सावळागोंधळ बंद पाडण्यासाठीं ईश्वराचा नायनाट करण्याचें वास्तविक कारण नाहीं. तर्कदृष्ट्या, भावनादृष्ट्या, आज उपलब्ध असलेल्या शास्त्रदृष्ट्या, समाजशास्त्रदृष्ट्या व इतिहासदृष्ट्या ईश्वराचें अस्तित्व मानणें भाग व इष्ट आहे, असें आम्हांस वाटतें.

प्रगति } वर्ष २, अंक २१ ते २५

# ‘ ब्राह्मण—कन्या ’

**ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांची ‘ ब्राह्मणकन्या ’** कादंबरी पुस्तकरूपानें बाहेर पडली, ही या आठवड्यांतील मराठी वाङ्मयविषयक महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे. केतकरांच्या मागील कादंबऱ्या ज्यांनीं वाचल्या असतील त्यांना याहि कादंबरीच्या एका विशिष्ट तऱ्हेच्या आकर्षकपणाची शिफारस करण्याचें कारण नाहीं. या कादंबरींत अनेक समाजशास्त्रीय कोड्यांची उलगडणी केलेली वाचकांस पहावयास सांपडेल. वैवाहिक नीतिमत्ता कोणत्या सूत्रांनीं जखडलेली आहे, या सूत्रांपैकीं कोणतीं सूत्रें तोडून टाकण्याची वेळ आतां आलेली आहे, सुशिक्षित व मिळवत्या तरुण स्त्रीपुरुषांचे विवाहसंबंध कसे जुळविले जावे, प्रौढविवाहाबरोबर कलंकितांचा जो वर्ग सहाजिकच समाजांत निर्माण होतो त्यांचा प्रश्न कोणत्या तऱ्हेनें सोडवावा वगैरे अनेक सामाजिक महत्त्वाचे प्रश्न केतकरांनीं व्यवस्थितपणें चर्चिलेले आहेत. जातिभेद कसे व कोणी मोडावे, धर्मभेद, वंशभेद व वर्णभेद यांमुळें उत्पन्न होणारे वैवाहिक प्रश्न कसे सोडवावे, अर्थोत्पादन किंवा अर्थार्जन न करणाऱ्या उच्च समाजसेवकांनीं कोणतीं विवाहबंधनें पाळावीं व कोणतीं झुगारून द्यावीं, नीतिमत्ता आणि अर्थार्जन यांचा किती निकट संबंध आहे वगैरे प्रश्नांवरहि केतकरांनीं सूर्यप्रकाश पाडला आहे. विशेषतः

मजुरांच्या प्रश्नांचा उलगडा कसा करावा, यावद्दलचा केतकरांचा उपदेश समाजसेवकांनीं डोळ्यांखालीं घालण्यासारखा आहे.

* * *

**ब्राह्मणकन्या व सुशीलेचा देव,** या दोन कादंवऱ्यांची तुलना केली तर असें म्हणतां येईल कीं, वामनराव जोशांचा व डॉ. केतकरांचा अधिकार निराळ्या तऱ्हेचा आहे. बुद्धीचा विलास वामनरावांच्या कादंवरींत जास्त आहे तर केतकरांच्या कादंवरींत समाजाचा प्रत्यक्ष अनुभव सांठविलेला आहे. जोशांची कादंवरी कल्पनासृष्टींतील, असें केवळच म्हणतां आलें नाहीं तरी ती वास्तविक, सृष्टींतील, असेंहि पूर्णपणें मानणें कठीण जाईल. जग कसें आहे, यापेक्षां जग कसें असावें, याचाच विचार जोशांच्या मनांत जास्त घोळत असावा. डॉ. केतकर हे प्रत्यक्ष जमिनीवर उभे राहून व डोळ्यांनीं समाजावलोकन करून पावलोपावलीं उत्पन्न होणारे सामाजिक प्रश्न कसे उलगडावे याच्याच विचारांत गर्क दिसतात. अनुभवाच्या नाण्याचा नाद केतकरांच्या कादंवरींत जसा निघतो तसा व तितका तो जोशांच्या कादंवरींतून निघतांना ऐकूं येत नाहीं. लेखकाचें कौशल्य केतकरांपेक्षां जोशांत अधिक आहे तर समाजाचें निरीक्षण जोशांपेक्षां केतकरांत अधिक आहे. नेहमीं जाड्या शास्त्रांत गुंतून राहणारा माणूस केतकरांइतका विनोदप्रिय क्वचित् दिसेल. एकंदरींत ही कादंबरी लेखक उपदेशितात त्याप्रमाणें अनेकच वेळ मन लावून वाचण्यासारखी आहे यांत संशय नाहीं.

* * *

**राजवाडे व डॉ. केतकर** यांचा बराच निकट परिचय व सहवास झाला होता. राजवाड्यांच्या चरित्राची एक बाजू व मनाचे कांहीं कप्पे केतकरांना जसे अवगत झाले होते त्याप्रमाणें इतरांस ते झाले नव्हते. महाराष्ट्रीय समाज कांहीं बावतींत इतका संकुचित मनोवृत्तीचा आहे कीं त्याला मोठ्या माणसाच्या आपणांस न आवडणाऱ्या—न पटणाऱ्या नव्हे—गोष्टीहि ऐकून घ्याव्याशा वाटत नाहींत. राजवाड्यांनीं सात वर्षांमागें ‘ चित्रमय जगत् ’ मासिकांत विवाहसंबंधावर लेख लिहिण्याला सुरवात केली होती. ‘ चित्रमय

जगत्'चे मालक वासुकाका जोशी हे राजवाड्यांचे एक चहाते स्नेही होते. तरीहि पण महाराष्ट्रांत लोकमान्यांच्या सांप्रदायामुळें बलिष्ठ झालेल्या विशिष्ट समाजाला विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकांतहि विवाहसंबंधाची शास्त्रीय सडेतोड मीमांसा ऐकून घेणें असह्य वाटलें. त्यामुळें त्यांनीं वासुकाकांवर गिल्ला करून त्यांस राजवाड्यांची लेखमाला बंद पाडण्यास भाग पाडलें. एका मृत धर्ममार्तंड रावबहाद्दुरांनीं राजवाड्यांच्या लेखांचें खंडन करण्याचा उपद्व्यापहि केला होता. आर्यसंस्कृतीचे राजवाड्यांसारखे जाज्वल्य अभिमानी थोडेच झाले असतील. त्यांचें वर्तन तर ब्राह्मण्याचा एक आदर्श अशा जातीचें होतें; पण त्यांचेंहि म्हणणें ऐकण्यास आर्यसंस्कृतीचे अभिमानी नाखुष. यावरून आर्यसंस्कृतीच्या अभिमान्यांची मनोवृत्ति कळून येईल. आज आर्यसंस्कृति, आर्यसंस्कृति म्हणून बोंबलणारे लोक आर्यसंस्कृति या संज्ञेचा अर्थ एवढाच समजत असतात कीं, सध्यां चालू रूढ असलेली समाजव्यवस्था. मग तिच्यांत कितीहि दोष असोत किंवा प्राचीन आर्यपुत्रांच्या वागणुकीशीं ती कितीहि विसंगत असो !

* * *

**राजवाड्यांचीं लोकांना न रुचणारीं मतें** डॉ. केतकरांनीं 'ब्राह्मणकन्ये'त समाविष्ट केलीं आहेत. त्याबद्दल राजवाड्यांच्या एका जातीच्या चाहत्यांना कदाचित् बरें वाटणार नाहीं. तसेंच वैजनाथशास्त्र्यांच्या तोंडीं घातलेले विचार खरोखरीच राजवाड्यांचे होते किंवा नाहींत याबद्दल कित्येक टीकाकार शंका दाखवितील. वैजनाथशास्त्र्यांच्या मुखानें केतकरांनीं स्वयंप्रणीत मतें समाजावर लादण्याचा अट्टाहास चालविला आहे, असेंहि कांहीं म्हणतील; दुसरे कोणी वैजनाथशास्त्र्यांच्या मतांच्या मिषानें आपली इतरांस शिव्या देण्याची हौस डॉक्टरसाहेबांनीं फेडून घेतली आहे, असाहि गवगवा करतील. हे सर्व दोष संभवत असूनसुद्धां राजवाड्यांचें चित्र केतकरांच्या कुंचल्यानें रंगविलेलें पाहणें आल्हादजनक होणार आहे. राजवाड्यांचा निःस्पृहपणा व सडेतोडपणा केतकरांत मुळचाच बराच असावा. राजवाड्यांच्या सहवासानें या मुळच्या गुणांत कदाचित् भर पडली असावी. निदान अंगचे गुण तीव्रतर खास झाले असले पाहिजेत. अशोधित धातू-

तील हीण जाळून टाकून तीस उजाळा देण्याचें काम राजवाड्यांकडून चांगलें होत असे. अर्थात्‌च अखंड हीणच असणाऱ्या पण मूल्यवान्‌ धातु म्हणून मिरविणाऱ्या माणसांची तिरपीट राजवाड्यांच्या सहवासांत उडत असे. राजवाड्यांच्या सहवासांत हे हिणकस राहिल्यास ते सबंधच जळून जाण्याचा संभव असे. त्यामुळें अशी मंडळी त्यांच्या जवळपास येत नसे. किंवा आल्यास लवकरच तेथून पळ काढीत असे. डॉ. केतकर राजवाड्यांच्या मुशींतून सलंग बाहेर पडले त्या अर्थी ते हीण नव्हते, असेंच ठरतें.

*　　　*　　　*

**राजवाड्यांचीं विवाहविषयक मतें** शास्त्रीय पायावर उभारलेलीं होतीं. बाबा वाक्यांचें प्रमाणत्व ते फारसें मानीत नसत. हीं मतें आजच्या रूढ समजुतीशीं इतकीं विसंगत होतीं कीं तीं राजवाड्यांचींच आहेत, असें बरेच वेळीं कोणी खरें मानलें नसतें. सामाजिक बंधनांची आंच स्वतःला लागलेली असल्याशिवाय त्यांचें मर्म सहसा लक्षांत येऊं शकत नाहीं. राजवाड्यांच्या विचित्र आयुष्यक्रमामुळें त्यांस अनेक बंधनांचें कार्यांकारत्व चांगलें कळून चुकलें होतें. याच्या जोडीला अनेक शास्त्रांचें अवलोकनहि त्यांचीं मतें रूढ हितकर समजल्या जाणाऱ्या नियमांपासून वेगळीं होण्यास कारणीभूत झालें असावें. आज हिंदु समाजाचा सर्वांत मोठा दोष हा आहे कीं, त्याला अप्रिय वाटणाऱ्या किंवा रूढ समजुतींना धक्का देणाऱ्या गोष्टी डोळ्याआड करण्याची व जणुं काय त्यांचें अस्तित्वच नाहीं, असें भासविण्याची खोड जडली आहे. त्यामुळें अनेक सामाजिक प्रश्न छातीठोक पुढें येऊन सोडविण्याची व्यवस्था समाजधुरीणांकडूनहि होऊं शकत नाहीं. लोकमान्य टिळकांसारख्यानांहि या समाजापुढें हात टेकावे लागले व या समाजाच्या अनिष्ट चालींना मान तुकवावी लागली. जर टिळकांसारख्या जहांबाजाची ही गोष्ट तर हलक्या समाजसुधारकांची काय त्रेधा उडत असेल, याचा विचारच न करणें बरें !

*　　　*　　　*

सामाजिक प्रश्न कडू वाटतात म्हणून डोळ्यां आड केले म्हणजे त्यांतून समाज मोकळा झाला असें नाहीं. आजची आमची समाजरचना अशा तऱ्हेची आहे कीं, तींत व्यक्तीच्या पराक्रमाचा अंकुरच खुडला जावा. असें बोलूं नको आणि तसें चालूं नको, हें खाऊं नको आणि तें टाकूं नको, हा मार्ग सोडूं नको आणि दुसरा धरूं नको अशाखालीं व्यक्तींचा पराक्रम घरच्या सासुरवासामुळें लुप्त व्हावा यांत आश्चर्य तें काय? आज समाजांत अशा कित्येक व्यक्ति दिसतात कीं ज्यांचें दुःख केवळ सामाजिक दुष्ट बंधनामुळें उद्भूत झालें आहे. सृष्टिनियमांनीं जीं दुःखें माणसावर येतात तीं सहन करणें अपरिहार्यच असतें व अशा दुःखांची संख्याहि थोडी नाहीं, पण या संख्येंत मनुष्यकृत दुःखांची भर पडावी व अनेकांचे संसार विषमय व्हावे हें केवढें आश्चर्य? हिंदू समाजांतील बरीचशीं दुःखें केवळ मनुष्यकृत आहेत. तशा तऱ्हेचीं दुःखें दुसऱ्या समाजांत तितक्या प्रमाणांत आढळत नाहींत. विशेषतः व्यक्तींच्या व समाजाच्या आयुष्यांतील उल्हास आनंद वगैरे गुण नाहींसे करण्यांत प्रचलित हिंदुसमाजरचनेनें मोठें यश मिळविलेलें आहे. पारशी, ख्रिस्ती, यहुदी, किंवा मुसलमान समाजांतील ज्या तऱ्हेचीं माणसें आनंदांत रहातांना दिसतात, ज्या परिस्थितींतील माणसें उल्हसित वृत्तीचीं आढळतात, तशा आनंदाचीं किंवा उल्हसित वृत्तीचीं माणसें हिंदुसमाजांत जवळजवळ मुळींच आढळत नाहींत. त्यांतहि गुजराती समाजापेक्षां महाराष्ट्रीय समाज या बाबतींत फारच दोषास्पद आहे. समाजांतील लहान मुलांच्या व तरुणांच्या चेहऱ्यावरहि उल्हसितपणा दिसावयाचा नाहीं. त्यांचे चेहेरे चिंताग्रस्त, सुरकतलेले दिसावयाचे, हा कशाचा परिणाम? बंधनें किंवा नियम हे आयुष्यांतील आनंद नाहींसा करण्यासाठीं केलेले आहेत कीं समाजांतील व्यक्तीचें सुख वाढविण्यासाठीं यांची योजना आहे? उत्साह हा सात्त्विक गुण आहे व तो कोणत्याहि पराक्रमाचा प्रवर्तक आहे. त्याचाच उच्छेद केल्यावर समाज कर्तव्यविन्मुख दुबळा झाला तर त्यांत दोष कोणाचा? आज बहुतेक कर्त्या पुरुषांचीं आयुष्यें जीं आमच्या दृष्टीस पडत आहेत, पाहतां असें दिसतें कीं, या माणसांच्या जीवनांत आनंदाला कोठें

अवसरच नाहीं. समाजानें अशा कर्त्या माणसांचीं आयुष्यें इतकीं कष्टतर, आनंदरहित केलीं तर त्यापासून त्या पुरुषांपेक्षां समाजाचेंच विशेष नुकसान जास्त नाहीं काय? अशीं खडतर आयुष्यें दृष्टीस पडत असतांना कोणता देशहिततत्पर तरुणसुद्धां समाजकार्याकडे वळेल किंवा देशकार्याच्या खाईंत उडी घेईल? ज्या देशांत किंवा ज्या समाजांत एखाद्याला घरदारच काय पण नुसतें स्वतंत्र बिऱ्हाड किंवा पुरेसें खायला व ल्यायाला मिळत नाहीं, त्या व्यक्तीनें त्या समाजाचें किंवा देशाचें कार्य करावें किंवा विचार करून तें व्हावें असें समाजानें अपेक्षावें, हें आश्चर्य नव्हे काय? हिंदू समाज असें मानतो कीं समाजहितप्रवण माणसाला जणूं मनच नाहीं, किंवा मनुष्यसहज गरजा, आकांक्षा वगैरेसुद्धां नाहींत. सर्वस्वाचा होम करून इतरांचें हित साधण्यास कोणी तें लागावें, अशी त्याची समजूत व अपेक्षा आहे. पण जर एखाद्याचें या जगांत कांहींच नाहीं तर त्याला त्या जगाच्या हिताचाच विचार करण्याचें कारणच काय? ही स्थिती हिंदू समाज ओळखीत नाहीं. देशाच्या किंवा समाजाच्या हिताची भावना केवळ तत्त्ववेत्त्याला बाळगण्याचें या रीतीनें कारणच उरत नाहीं, ही गोष्ट समाज असें करतांना विसरतो व आपल्या वर्तनामुळें तो अनेक चांगल्या माणसांच्या स्वहितपर पराक्रमाला मुकतो.

प्रगति { वर्ष २, अंक २६
ता. २७ नोव्हेंबर १९३०

# " माझें रामायण "

' श्रुतिबोध ' मासिकाचे विद्वान् संपादक या नात्यानें महाराष्ट्रास परिचित असलेले मुंबईचे वकील रा. दत्तो अप्पाजी तुळजापुरकर यांनीं ' माझें रामायण ' नांवाची सुमारें सहाशें पृष्ठांची एक मोठी कादंबरी प्रसिद्ध केली आहे. तुळजापुरकर हे स्वतःस या ग्रंथाचे लेखक म्हणविण्यास तयार नसून आपण फक्त संपादक असल्याचें ते लिहितात. जर तुळजापुरकर हे या ग्रंथाचे लेखक नसतील तर ही कादंबरी एका दुर्दैवी बाईचें आत्मचरित्र मानावें लागेल. पण संपादक प्रस्तावनेंत वाचकांस बजावतात कीं, " या ग्रंथांत कोणी कोणाचें रूप पाहाण्याचा यत्न न करितां कल्पनासृष्टींतील एक कादंबरी म्हणूनच ती वाचावी." ही त्यांची विनंती आम्ही मानावयाची तर ग्रंथाचें कर्तृत्व, निदान कायदेशीररीत्या टीकेपुरतें तरी, त्यांनीं स्वतःकडे घेतलें पाहिजे. कारण आम्हीं कादंबरी ग्रंथ वाचावयाचा तर त्यावर टीकाहि कादंबरी या दृष्टीनेंच करणें भाग. वाचकांस अज्ञात व संपादकांस ज्ञात अशा हतभागी बाईच्या कशा तरी लिहिलेल्या आत्मचरित्रावर अभिप्राय देण्यास कोण टीकाकार धजावेल? पण असा ' ऋजु साच अभिप्राय ' संपादकांस पाहिजे आहे त्या अर्थी त्यांनीं तो कादंबरीलेखक या नात्यानें स्वीकारणें उचित. बाकी आम्हीं ही बाब जास्त छेडावयास लागलों तर कदाचित् रा. तुळजापुरकर, त्यांचे स्नेही संदेश'कार कोल्हटकर यांचें अनुकरण करून,

आमच्या तोंडावर वत्सलावहिनींच्या फोटोप्रमाणें एखादा उषाताईचा फोटोहि फेंकून देतील. कारण कादंबरींतील पुराव्यावरून ते ' फोटो फेकिंग'च्या कामांत चांगलेच निष्णात असावेत.

वास्तविक पाहातां दुसऱ्याच्या नांवानें प्रथमपुरुषीं लेखन करणें ही वर्तमानकालीन सामाजिक कादंबरी लिहिणाऱ्या लेखकांची 'कायम ठशाची'च युक्ति आहे. या युक्तीमुळें कादंबरींतील पात्रांबद्दल वाचकांस, तीं सत्यसृष्टींतील आहेत, या खुळ्या कल्पनेनें, चुटपुट लागते व एक प्रकारची कधींहि पुरी न होणारी जिज्ञासाहि उत्पन्न होते. अशी जिज्ञासा उत्पन्न होणें हा तर कादंबरीकाराच्या कलेचा परम उत्कर्ष होय.

मम्मटानें काव्यलेखनास प्रेरक असे जे हेतु सांगितले आहेत ते लक्षांत घेऊन आपण प्रस्तुत कादंबरीलेखनांत कर्त्याचा काय हेतु असावा हें पाहूं लागलों तर प्रथमदर्शनींच मलपृष्ठावरील अल्प किंमतीकडे लक्ष वेधतें. सुमारें सहाशें पृष्ठांच्या मोठ्या आकाराच्या बारीक अक्षराच्या सचित्र कादंबरीस जी अडीच रुपये किंमत ठेवली आहे तिची इतर पोटभरू कादंबरीकारांच्या प्रतिमासीं प्रसविल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांच्या किंमतीशीं तुलना करतां सखेदाश्चर्य वाटतें. त्यांपैकीं खेद हा ' सरससुरस ' वाङ्मयाच्या लठ्ठ मूल्याबद्दल वाटत असून, आश्चर्य प्रस्तुत ग्रंथाच्या स्वल्प मूल्याचें वाटतें. ग्रंथकार जाहिरातीसाठीं आंतबट्टयाच्या व्यवहारानें हा ग्रंथ विकीत आहेत म्हणावें, तर ग्रंथांतच ते सांगतात कीं, या ग्रंथाच्या विक्रीपासून कांहीं प्राप्ति झाल्यास ती या ग्रंथाची हस्तलिखित प्रत लिहून घेणाऱ्या गरीब बाईकडे पाठवावयाची आहे. म्हणजे निदान प्रस्तुत किंमत ही कांहीं केवळ आंतबट्टयाची नसून बऱ्याच प्रती खपल्यास त्यापासून कांहीं शिल्लक राहाण्याचा संभव आहे. तें कसेंहि असलें तरी एक गोष्ट स्पष्ट आहे कीं, ग्रंथकाराचा हेतु निदान ' अर्थकृते ' तरी खास नाहीं. मग तो काय असावा ?

कादंबरी म्हटली कीं, ती आल्हाददायक, मनोरंजकहि पाहिजेच, तेव्हां ग्रंथकारानें ती शक्य तितकी चटकदार करण्याचा प्रयत्न करणें हें त्याचें आद्य कर्तव्यच ठरतें. तेवढ्याच गुणाच्या कसोटीस प्रस्तुत ग्रंथ लावला तरी तो

वराच वरच्या दर्जाचा ठरेल. पुस्तक वाचावयास घेतल्यापासून संपेपर्यंत खालीं ठेववत नाहीं. असें जरी प्रस्तुत ग्रंथासंबंधानें म्हणतां न आलें, तरी त्यानें हातांत घेतल्याबरोबर झोंप येते असेंहि म्हणवत नाहीं. जर ग्रंथकारांनीं महाभारतकारांप्रमाणें आपणास सांगावयाचा कोणताहि विषय–मग त्याचा मुख्य कथेच्या सरणीशीं संबंध असो वा नसो–कोठें तरी घुसडून देऊन वाचकांच्या गळीं उतरविण्याचा अट्टहास धरला नसता तर ग्रंथाचें मनोरंजकत्व बरेंच जास्त वाढलें असतें. पण मग कदाचित् ‘ माझें रामायण ’ या नांवांतील रामायण शब्दाचा व्यंग्यार्थ जो “ कंटाळवाणें चऱ्हाट ” तो सार्थ झाला नसता ! कदाचित् ग्रंथकारांचा ग्रंथलेखनांतील आम्हांस वाटणारा प्रधान हेतु जो आपले अनेक विषयांवरील विचार कोठेंतरी मनोरंजक रीतीनें वाचकांसमोर मांडणें, तो सिद्धीस गेला नसता ! कारण ग्रंथावरून स्पष्ट दिसतें कीं, ग्रंथकाराचा हेतु कोणकिडून तरी कादंबरीकार होणें हा नसून आपणास विचारप्रदर्शनास अवसर मिळावा हाच असावा. कादंबरी हें येथें साध्य नसून साधन आहे, औषध नसून त्याचें शर्करावगुंठन आहे. अर्थात् मनोरंजन, आटोपशीरपणा, प्रमाणबद्धता, एकसूत्रता वगैरे कादंबरीरचनाशास्त्रास पोषक असे कलेचे नियम पाळण्याकडे ग्रंथकाराचें असावें तसें लक्ष नाहीं. वाङ्मयदृष्ट्या हा ग्रंथाचा मोठाच दोष होय. वर्तमानपत्रांतील चालू कादंबरी म्हणून कदाचित् अशी रचना खपून गेली असती, पण कपाटांत ठेवावयाचें संग्राह्य वाङ्मय या दृष्टीनें हा दोष ग्रंथकारांनीं टाळला पाहिजे होता. आपले विचार सध्यांच्या वाचकांनीं वाचल्यानंतर मग आपलें पुस्तक मागें पडलें तरी चालेल अशी ग्रंथकारांची भावना असल्यास नकळे !

ग्रंथांत आलेले कांहींसे अप्रस्तुत विषय तेथें येणें इष्ट होतें कीं नाहीं ही दृष्टि सोडून त्या विषयांच्या प्रतिपादनाकडे पाहिलें तर विवेचन बहुधा मुद्देसूद व सर्वांस पटण्यासारखें वाटतें. ग्रंथकार हे वेदशास्त्रसंपन्न असून पुन्हां ‘ वेदाभ्यासजड ’ अरसिक नसल्यानें शास्त्रीय विषयहि सोपे करण्याची कला त्यांस अवगत आहे. उदाहरणार्थ, फलज्योतिषाचा त्यांनीं उडविलेला बोजवारा हा फलज्योतिषखंडनपर एक मुद्देसूद निबंध आहे. सर्वधर्मपरिषदेंतील

अनेक धर्ममतांचा तुलनात्मक विचार व त्यांतील तात्त्विक भागांचा समन्वय मार्मिक रीतीनें केलेला आहे. ‘ खेडेगांवचें स्वराज्य ’ व ‘ सरलाश्रम ’ हे ग्रंथांतील दोन सर्ग म्हणजे ग्रामराज्य व गृहव्यवस्था या विषयावरील ग्रंथ-कारांचीं किंडरगार्टन पद्धतीचीं दोन व्याख्यानेंच होत. ‘स्वराज्याचा मासला’ हा ‘ संस्थानी स्वराज्याची सुधारणा व घटना ’ या विषयावरील एखाद्या ग्रंथांत शोभण्यासारखा एक भाग वाटतो. ‘ आला हजरतची मुलाखत ’ म्हणजे हिंदी स्त्रियांच्या उन्नतीचे मार्ग दाखविणारी एखाद्या कमिशनला सादर केलेली साक्ष होय. उषाताईंच्या ‘ आत्मविश्वास ’ मासिकाची योजना म्हणजे एखाद्या आदर्शभूत मासिकाचा एक नमुना अंक भासतो. रौलेट ॲक्ट व जालियनवाला बाग या प्रकरणांचें वर्णन व विवेचन एखाद्या रॉयल कमिशनपुढें दिलेली कैफियत वाटेल. प्रश्न एवढाच कीं, हे विषय येथें मांडल्यावांचून चाललें नसतें किंवा काय !

ग्रंथकाराच्या मनांतील विषयांचें प्रतिबिंब प्रचलित सामाजिक कादंबरींत उठावयाचें नाहीं तर तें कोठें दिसणार ? रा. तुळजापूरकर हे मूळचे संस्थानां-तील रहिवाशी आहेत व म्हणूनच त्यांस संस्थानांच्या स्वराज्याचा प्रश्न जिव्हाळ्याचा वाटतो. एरवीं संस्थानांची स्थिति, संस्थानिकांची वृत्ति व एकंदर तत्संबंधीं प्रश्न यांस ग्रंथांत एवढी मोठी जागा मिळाली नसती. तसेंच ग्रंथ-कारांनीं कितीही झांकून ठेवण्याचा प्रयत्न केला तरी त्यांतील कांहीं विशिष्ट वर्णन एका विशिष्ट संस्थानासच लागू पडतें हें मराठी वाचक कसें ओळ-खल्यावांचून राहातील ? ग्रंथकारांचा हेतु या प्रकरणीं तरी संस्थानी प्रजेची दुःखें इंग्रजी प्रजेपुढें मांडण्याचा दिसतो. त्यांतच संस्थानी प्रजेस तिच्या उन्नतीची दिशा दाखविण्याची संधि साधली आहे. तसेंच ग्रंथकाराच्या धंद्याचें प्रतिबिंब ग्रंथांत सगळीकडे पडलेलें दिसतें. ग्रंथाचा बराच मोठा भाग केवळ कोर्टांतील कज्जे, न्यायाधीश, कज्जेदलाल, सॉलिसिटर, वकील व एकंदरींत न्यायाच्या सुताच्या धाग्यावरील कसरती यांनीं व्यापलेला आहे. या भागाचा कथानकाशीं संबंध असल्यामुळें हा भाग अप्रस्तुत नाहीं, तरी ग्रंथकाराचा प्रधान हेतु येथेंही पुढें येतो. तो म्हणजे, लोकांस कायद्याच्या

खाचखळग्या दाखवून सावध करणें, राज्यव्यवस्थेच्या या एका मुख्य अंगांतील दोष दाखवणें व जातां जातां शक्य तर आपणास झाडावयाचा ताशेरा झाडून टाकण्याची पर्वणी साधणें, एवंच स्वतःचे या विषयावरील विचार वाचकांसमोर मांडणें, हा स्पष्ट प्रत्ययास येतो. हा भाग ग्रंथकारांच्या अनुभवाचा असल्यामुळें सरस वठला आहे व चांगला मनोरंजकही झाला आहे. क्वचित् कांहीं ठिकाणीं ग्रंथकाराच्या रागद्वेषांचा अनुभव हा भाग वाचतांना येतो. विशेषतः सॉलिसिटरांवरील ताशेरा व्यक्तिविषयक स्वरूपाचा भासतो. एखादा सॉलिसिटर कादंबरीकार असला तर तो वकिलांच्या युक्त्यांचीहि अशीच टर उडवूं शकेल. वास्तविक पाहतां दोघेहि वर्ग एकाच दुष्ट पद्धतींतील दुवे आहेत. इंग्रजी राज्यामुळें ज्या अनिष्ट व नीतिदृष्ट्या अधोगतीस पोंचविणाऱ्या गोष्टींची हिंदुस्थानांत आयात झाली त्यांत इंग्रजी न्यायपद्धति अग्रस्थानीं घालावी लागेल. या अनिष्ट पद्धतीचा दुसरा तोटा म्हणजे समाजांत हेच वर्ग श्रीमान् व वजनदार झाल्यामुळें याच लोकांच्या हातीं देशाचें राजकीय पुढारीपण गेलें व त्याचीं कडू फळें हिंदुस्थानास सध्यां भोगावीं लागत आहेत. जगांत भांडणें आहेत तोंपर्यंत वकील, व रोग आहेत तोंपर्यंत डॉक्टर, यांचा धंदा चालणार ही गोष्ट खरी असली, तरी दोन्हीही धंदे समाजांतील दोषांचा फायदा करून घेणाऱ्या लोकांचे आहेत हें विसरतां येणार नाहीं.

ग्रंथाची मनोरंजकता कमी करणारें एक प्रमुख कारण विषयाचें व समाजचित्राचें नावीन्य नसणें हें होय. ग्रंथकारांनीं ग्रंथांत ज्या स्वतःच्या आठवणी म्हणून ग्रथित केल्या आहेत त्या बऱ्याच चर्वितचर्वण स्वरूपाच्या भासतात. रानडे, कुंटे व चिपळूणकर व त्यांच्या काळचें पुणें; चाफेकर प्रकरण व प्लेगांतील अंदाधुंदी; रौलेट ॲक्ट व जालियनवाला बाग; अशांसारखे भाग लोकांस पूर्ण परिचित आहेत. ग्रंथकारांचा हेतु ह्या प्रकरणांची स्मृति लोकांत जागृत राहावी असा असावा असें वाटतें. तसें असल्यास या त्यांच्या हेतूच्या युक्ततेबद्दल जरा संशय वाटतो. चाफेकर, सावरकर प्रभृति माणसांचीं उदाहरणें तरुणांसमोर ठेवण्याचे परिणाम इष्ट होतात

कीं अनिष्ट होतात याचा विचार ग्रंथकारांनीं अवश्य केला पाहिजे होता. एका काळाला लागू असणारे मार्ग दुसऱ्या अगदीं वेगळ्या काळच्या तरुणांसमोर ठेवल्याचे परिणाम हिंदुस्थानास सध्यांच भोंवत आहेत! शूरपणाच्या नांवाखालीं दुसऱ्या अनेक दुर्गुणांवर पांघरूण घालतां येतें. पण तेणें करून देश सुधारत नाहीं खास.

ज्या समाजाचें व कालाचें चित्र रा. तुळजापुरकरांनीं रेखाटावयास घेतलें त्या समाजाचीं व कालाचीं सर्वांगीण चित्रें हरिभाऊ आपट्यांनीं आपल्या "आजकालच्या गोष्टीं"त केव्हांच रेखाटून टाकलीं आहेत, व तीं इतकीं पुष्कळ, सरस व भडक आहेत कीं, त्या क्षेत्रांत आतां बहुधा दुसऱ्या कादंबरीकारांस शिरण्यास वावच राहिलेला नाहीं. हरिभाऊंचीं चित्रें प्रत्यक्ष स्वतः वावरलेल्या क्षेत्रांतील व अगदीं समकालीन होतीं, त्यामुळेंच तीं इतकीं सरस वठलीं. रा. तुळजापुरकरांचीं चित्रें दुसऱ्यांनीं सांगितलेल्या आठवणींवर उभारलेलीं असल्यामुळें तितकीं सरस नाहींत. तसेंच प्रत्येक गोष्टीच्या प्रकाशनास असा एक योग्य काल असतो कीं, त्या सुमुहूर्तावरच त्या त्या गोष्टी यशस्वी होऊं शकतात. आरंभींच्या 'करमणूक' पत्रांत प्रसिद्ध झालेल्या हरिभाऊंच्या कादंबऱ्या अशा काळीं निर्माण झाल्या कीं त्या काळांत त्या उत्तमच ठराव्या. चिपळुणकरांचे निबंध आजच्या काळांत प्रसिद्ध होत असते तर त्यांचे वाभाडे निघून ते परिणामकारक झाले नसते. हरिभाऊंच्या काळचा सुशिक्षित महाराष्ट्र-समाज इतका अल्प, निवडक व संकुचित होता कीं, त्याची पुण्यामुंबईच्या पांढरपेशा, मुख्यतः ब्राह्मणसमाजा-पुरतीच व्याप्ति होती. त्यांचेंच आयुष्य, त्यांचेंच समाजचक्र, त्यांचींच ध्येयें व आकांक्षा बहुधा हरिभाऊंनीं ग्रथित केल्या आहेत. त्या, त्या काळीं रुचल्या पचल्या व खपल्या. आतां त्यांचें अनुकरण कोणी केल्यास तें नीरस, शिळें वाटेल. हे विचार येथें सुचण्याचें कारण असें कीं, प्रस्तुत कादंबरीवर हरि-भाऊंची बरीच छाया पडलेली दिसते. विशेषतः 'मी' व 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबऱ्यांची छाप पडलेली असावी. मात्र तुळजापुरकरांचीं पात्रें तितकीं ठसठशीत वठलेलीं नाहींत. हरिभाऊंच्या शंकरमामंजींसमोर

तुळजापुरकरांचा श्रीधरमामंजी फिका वाटतो. भावानंदाच्या शेजारीं सरलानंद मनांत भरत नाहीं. जातिगुणांचीं तुलनात्मक चित्रें यांत पाहावयाचीं असें म्हटलें तर, आपट्यांचा भावानंद हा चित्पावनी कठोर मनाचा ( वाईट अर्थी नव्हे ) राजकीयभावनाप्रधान देशभक्त आहे. तुळजापुरकरांचा सरलानंद हा देशस्थी हळव्या मनाचा, कांहींसा उतावळा पण धर्मवासनाप्रधान समाजसुधारक आहे. पहिला विचारप्रधान, चळवळ्या, बहिर्मुख असा राजचक्रावर दृष्टि ठेवणारा तर दुसरा भावनाप्रधान, शांतिसुखरत, अंतर्मुख असा खेडेगांवांतील सामान्य जनांवर नजर देणारा दिसतो. आपट्यांचा भावानंद हा त्यांच्या काळाच्या अघाडीस असल्यामुळें नवीन व म्हणूनच परिणामकारक वठला. तुळजापुरकरांचा सरलानंद हा सन १९२७ त फारसा मनांत ठसण्यासारखा नाहीं. कदाचित् १९२१ सालीं तो बराच यशस्वी झाला असता.

स्वयंनिर्मित पात्रांचा स्वभावपरिपोष करणें यांत कादंबरीकाराचें खरें कसब आहे. तुळजापुरकरांच्या अंगीं तें कौशल्य नाहीं. एक तर स्वभावपरिपोष करण्याची त्यांची रीति हरिभाऊंप्रमाणेंच दुय्यम तऱ्हेची म्हणजे वर्णनात्मक आहे. बाह्य वर्णनानें हकीकत सांगून पात्रांची रूपरेषा वाचकांसमोर मांडणें हा प्रकार अंतर्मनाच्या चित्रपटावर उठणाऱ्या सूक्ष्म विचार—विकार —लहरींचें मार्मिक यथातथ्य आविष्करण कथौघांतच सहजरीत्या करणें या प्रकाराहून बराच खालच्या दर्जाचा होय. हिंदुस्थानांतील कादंबरीकार अजून मागें पडलेल्या वॉल्टर स्कॉटचेच बहुधा शिष्य आहेत. टॉलस्टॉय, डोस्टोविस्की वगैरे रशियन कादंबरीकार किंवा बाल्झॅक, ड्यूमा, अनातोले फ्रान्स यांसारखे फ्रेंच कादंबरीकार यांची धाटणी बहुधा इकडे कोणी अद्याप उचललेली नाहीं. आपल्या बुद्धीचा गर्व वाहणारे आपण हिंदी ब्राह्मण अजून शुद्ध वाङ्मयाच्या क्षेत्रांतहि खालच्या पायरीवर आहों याची साक्ष येथें पटते. रवींद्रनाथांच्या छोट्या गोष्टींतून कोठें कोठें ही प्रतिभा दृग्गोचर होते, पण त्यांनाहि मोठ्या प्रमाणावर एखाद्या कादंबरींत ती बराच काळ तळपत ठेवणें साधलेलें नाहीं. ही कला ज्यांना साधत नाहीं त्यांना आपल्या गोष्टींत आकर्ष-

कता निर्माण करण्यासाठीं दुसऱ्या क्लृप्त्यांचा अवलंब करावा लागतो. त्या म्हणजे, सामान्य जनांहून आपलीं पात्रें बऱ्याच वरच्या दर्जाचीं निवडणें, लोकापवादात्मक भावनाक्षोभक प्रसंगांचा अंतर्भाव आपल्या कृतींत करणें, राष्ट्रेतिहासांतील ज्या व्यक्ति, हकीकती, घडामोडी व स्थलें वाचकांचें मन साहजिकच ओढतील अशांचा समावेश करणें; उदात्त विचार, वक्तृत्वपूर्ण भाषा, शब्दश्लेष इत्यादि कादंबरीकारांच्या मुख्य कर्तव्याशीं फारशा निगडित नसलेल्या व कांहींशा अप्रस्तुत अशा गोष्टींचा मारा करणें; वगैरे होत. रा. तुळजापुरकरांची उषाताई व नाना ऊर्फ सरलानंद हीं दोन मुख्य पात्रें आपल्याला रस्त्यानें सहज जातांना भेटणाऱ्या वर्गांतील नव्हत, अर्थात्च तितक्या प्रमाणांत तीं असंभवनीय कोटींत जातात. त्यामुळें कादंबरीवाचनानें करमणूक झाली तरी कादंबरी वाचून संपल्यावर आपण स्वप्नसृष्टींतून या मर्त्यलोकावर उतरल्याचा भास होतो व कादंबरीचा बोध मनावर ठसत नाहीं. कादंबरी हें असणाऱ्या जगाचें प्रतिबिंब असलें पाहिजे, आपणाला हवेसें वाटणाऱ्या जगाचें चित्रलेखन उपयोगी नाहीं. तुळजापुरकरांना जें जें व्हावेंसें वाटतें, त्यांची ज्या प्रकारची रचना असावी असें वाटतें व ती ज्या मार्गानें घडवून आणावी असें त्यांचें मत आहे, त्या सर्वांचें वर्णन या कादंबरींत त्यांनीं आणलें आहे. किंडरगार्टन पद्धतीच्या शिक्षणाचा हा मार्ग होय. जरी प्लेटोचें ‘ प्रजासत्ताक राज्य ’ किंवा सर टॉमस मोरचें काल्पनिक ‘ रामराज्य ’ याप्रमाणें आमूलाग्र समाजाची घटना लोकांपुढें मांडण्याचा ग्रंथकाराचा विचार नसला तरी तशाच तऱ्हेचा हा अगदीं प्राथमिक प्रयत्न आहे. उषाताईचें मृत्युपत्र म्हणजे या घटनेची अंधुक रूपरेषा भासते.

आपल्या समकालीन लोकांसमोर विशिष्ट सद्यःस्थितींत कांहीं ध्येयें ठेवण्याचा किंवा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न अनेक इंग्रजी कादंबरीकारांनीं केलेला आहे. ग्लॅडस्टनचे प्रतिस्पर्धी, लिटनशाहीचे पाठिराखे व चिपळुणकरांनीं ‘ यहुदी उमराव ’ या नांवानें ज्यांचा उल्लेख केला आहे ते इंग्लंडचे गाजलेले प्रधान बेंजामिन डिझरायली ऊर्फ अर्ल बीकन्सफील्ड

यांनीं अशा कादंबऱ्यांची एक मालिकाच इंग्लंडमध्यें गुंफली होती. त्या काळचा इंग्लंडचा इतिहास वाचून त्याच्या जोडीला या कान्झर्वेटिव पक्षाची बाजू मांडणाऱ्या कादंबऱ्या वाचल्या तर त्या काळचें कांहीं विशेषच चित्र आपल्या डोळ्यासमोर उभें राहातें. डिकन्सच्या कादंबऱ्या तत्कालीन खालच्या वर्गांची स्थिति पुढें मांडतात. इतिहासकाराची मजल ज्या भागापर्यंत जाऊं शकत नाहीं किंवा समाजाच्या ज्या अंगांतून त्यास प्रवेशच नसतो त्या ठिकाणीं कादंवरीकाराच्या कारवाईस पूर्ण अवकाश मिळतो. वुद्धिमान् व विद्वान् कादंवरीकारांच्या समकालीन समाजचित्रें दाखविणाऱ्या कादंबऱ्या ह्या एका दृष्टीनें इतिहासाच्या पूरक होत. हा मान मागच्या काळावर लिहिल्या जाणाऱ्या सद्यःकालीन कादंबऱ्यांस मात्र देणें योग्य नाहीं. या कादंबऱ्या बऱ्याच वेळां मागल्या काळाची अगदीं विकृत कल्पना वाचकांस देतात. मराठशाहीवर प्रसिद्ध होणाऱ्या सध्यांच्या बऱ्याच कादंबऱ्या या वर्गांत जातील. पुष्कळ वेळां मागील काळाचें भ्रामक रूपच वाचकांसमोर ठेवणें ज्यांस तात्पुरतें तरी फायद्याचें वाटतें असे इतिहासकार व इतिहाससंशोधक या प्रयत्नांची स्तुति करून त्यांस पुष्टि देतात. त्यामुळें खरा इतिहास लोकांच्या मनावर ठसणें कठीण होतें. नाटकें व सिनेमाचे चित्रपट हीं तर याहीपेक्षां इतिहासहानि करतात. कारण कादंबऱ्या ज्या गोष्टी मनश्चक्षूंसमोर आणतात त्यांची प्रत्यक्ष छाया प्रेक्षकांच्या डोळ्यांवर हे प्रकार पाडतात व त्यांचें प्रतिबिंब प्रेक्षकांच्या मनावरून पुसदून टाकणें दुष्कर होतें. रा. तुळजापूरकरांची कृति समकालीन इतिहासाचें यथातथ्य चित्र म्हणतां येणार नाहीं. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या मोठ्या जाहिरातींत त्यांनीं प्रस्तुत ग्रंथास सत्तावन सालच्या बंडापासूनच्या महाराष्ट्राचा आदर्श म्हटलें असलें तरी तें अवास्तविक आहे. त्यांची कृति ही एच. जी. वेल्स या इंग्रज कादंबरीकाराच्या कांहीं कृतीच्या वर्गांतील आहे. आधुनिक महाराष्ट्राची समाजघटना कशी व्हावी याबद्दलचे विचार तींत मांडले आहेत. या विचारांचें विवेचन कादंबरींत ठिकठिकाणीं पसरलेलें असून त्याचा सारांश शेवटच्या सर्गांत–उषाताईच्या मृत्युपत्रांत–दिलेला आहे. त्याची चर्चा आतां करूं.

रा. तुळजापुरकर हे सदसद्विवेकबुद्धीनुसार चालणारे वेदांती आहेत. ते ‘ बाबा वाक्यं प्रमाणं ’ मानणारे नाहींत, किंवा अंधश्रद्धेनें चालणारे भक्तिमार्गी नाहींत. पण त्याबरोबरच ते अधार्मिकहि नाहींत किंवा निरभिमानीही नाहींत. राष्ट्रीय धर्माचा विचार कर्तव्य असतां ते हिंदुधर्मास विसरण्यास तयार नाहींत किंवा हिंदुस्थानच्या राजकारणाचा विचार करतांना ते महाराष्ट्र डोळ्यांआड करूं शकत नाहींत. या त्यांच्या कांहींशा परस्परविरोधी तत्त्वांमुळें त्यांचे सिद्धांत नेहमीं तर्कशुद्ध असणें शक्य नाहीं. हिंदुधर्माचा अभिमान तर सुटत नाहीं, पण त्याबरोबर तो शुद्ध वेदांती हिंदुधर्म पाहिजे. चातुर्वर्ण्य व मूर्तिपूजा ह्यांना ते हिंदुधर्माचीं लक्षणें मानण्यास तयार नाहींत. कारण रा. तुळजापुरकरांचा धर्म म्हणजे केवळ तत्त्वज्ञान होय. नैतिक, सामाजिक व व्यावहारिक गोष्टींची ते शुद्ध धर्माशीं भेसळ करूं इच्छित नाहींत. हिंदु आईबापांच्या पोटीं जन्मलेल्या पण उघड हिंदुधर्मास सोडचिठी न देणाऱ्या प्रत्येकास ते हिंदूच म्हणणार, मग तत्त्वज्ञानदृष्ट्या किंवा त्यांच्या शुद्ध धर्मदृष्ट्या तो नास्तिक असो वा जडवादी असो. तसेंच जन्मतः हिंदु नसून ज्यानें हिंदुधर्माचीं तत्त्वें मान्य केलीं आहेत त्यालाहि ते हिंदु म्हणतात; पण हिंदुधर्माची तत्त्वें निश्चयानें हींच व एवढींच असें ते म्हणत नाहींत. अंधश्रद्धा, देवभोळेपणा, निरर्थक धार्मिक विधि, नवस, फलज्योतिष, अस्पृश्यता, सोवळें ओवळें यांपैकीं कांहींच त्यांस नको आहे. बालविवाह, हुंडा, शुल्क, वगैरे प्रकारांच्या ते विरुद्ध आहेत. पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, सक्तीचें शिक्षण, वाचनालयें, स्त्रीपुरुष या उभयतांसाठीं व्यायामशाळा व लष्करी कवाईत, स्वदेशी हे सर्व प्रकार त्यांस पाहिजे आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजें राजकीय व धार्मिक, राष्ट्रीय व सामाजिक दृष्ट्या ते सुधारक आहेत. धार्मिक बाबतींत प्रत्येक समाजास स्वातंत्र्य असावें असें त्यांचें मत आहे, तरी धर्माच्या नांवाखालीं दुसऱ्या धर्माच्या लोकांवर जुलूम करण्यास किंवा त्यांचा अपमान करण्यास ते वाव देऊं इच्छित नाहींत; मात्र ही गोष्ट व्यवहारांत कशी आणावयाची याचा ते ऊहापोह करीत नाहींत. वास्तविक पूर्ण धार्मिक

स्वातंत्र्य देणें म्हणजेच दुसऱ्याच्या अपमानास सवड ठेवणें असें आहे. मुसल्मानांस गाय मारण्याचें धार्मिक स्वातंत्र्य द्यावयाचें तर हिंदूंचीं मनें दुखवल्याशिवाय कशीं राहातील ?

मृत्युपत्राच्या अकराव्या कलमांत रा. तुळजापुरकर ग्रन्थप्रामाण्याचें, शब्दप्रामाण्याचें किंवा व्यक्तिमहात्म्याचें स्तोम माजवूं नये असें सांगतात, तर सोळाव्या कलमांत भगवद्गीता हा हिंदुधर्माचा प्रमाणग्रंथ मानावा असें सुचवितात. चाळिसाव्यांत रानडे–गोखले–टिळक यांना ब्रह्मा–विष्णु–महेश ठरवितात. कोणताहि ग्रंथ प्रमाण म्हणून मानावयास लागा, त्यांतील कांहीं नियम तुमच्या मनाविरुद्ध निघतीलच. कोणत्याहि महापुरुषाचे तुम्ही एकात्मतेनें शिष्य व्हावयास पाहा, तुम्हांस तुमच्या मनाविरुद्ध वागण्याचें प्रसंग आलेच. वरें हिंदुस्थानांतील कोणत्याहि भाषाविभागानें आज आपल्यापुरतेंच पाहाणें इष्ट व शक्य आहे काय ? विशेषतः मराठ्यांसारख्या जवळच्या इतिहासाशीं संलग्न असणाऱ्या लोकांनीं या बाबतींत जरा जपून शहाणपणानें वागलें पाहिजे. नाहीं तर त्यांचा स्वाभिमान ऊर्फ गर्व त्यांस स्वतःसहि नडेल व इतरांसहि दुःख देईल. इतिहासांतील मोठेपणावर आज कोणी कोणास ओळखीत नाहींत. पराक्रमी वंशजांनीं वडिलांची कीर्ति सांगावी हें कदाचित् शोभेल व खपेल, पण सर्वस्वीं हीनदीन झालेल्या लोकांनीं असें केल्यास त्यांचा उपहास तर होईलच, पण वर त्यांच्या प्रगतीच्या मार्गांत पर्वत उभे राहातील ते खेरीज. मराठ्यांनीं ज्या गुणांच्या जोरावर मागील काळांत यश मिळविलें त्या गुणांचें आजच्या काळांत वर्चस्व नाहीं. त्या गुणांचें पुनरुज्जीवन करून आज त्यांस कोणताहि फायदा होणें शक्य नाहीं. प्रत्येक युगांत निरनिराळ्या गुणांची चलती असते. शिवाजीमहाराजांची आठवण करून मिशांला पीळ देण्यानें मद्रासी व बंगाली या निर्वीर्य समजल्या जाणाऱ्या लोकांनीं आज हिंदुस्थानांतील उच्च बौद्धिक व राजकीय सत्तेच्या जागा भरून टाकल्या आहेत हें थोडेंच खोटें ठरणार, किंवा हिंदुस्थानांतील संपत्ति पारशी, मारवाडी व गुजराती बळकावून बसले आहेत ती थोडीच त्यांच्या घशांतून निघणार आहे ? संपत्तीच्या अभावीं त्यांनींच मृत्युपत्राच्या एकेचाळिसाव्या कलमांत

सांगितलेली शैक्षणिक वसाहत महाराष्ट्रांत निघणें शक्य आहे काय? महाराष्ट्रांतील ध्येयवादी लोकांनीं बौद्धिक स्वप्नसृष्टीच्या मनोराज्यांत गटंगळ्या खात बसावें व दुसरीकडे एकेकट्या गुजराती शेट्यानें स्वतःच्या सामर्थ्यावर एक एक संस्था काढावी असा क्रम सध्यां सुरू आहे, तरीहि मराठ्यांचें पुनः शिवाजी महाराजकी जय! ग्रंथकारांनीं ग्रंथांत महाराष्ट्रीयांच्या स्वाभिमानावर, मोठेपणावर व पराक्रमावर जरा फाजील जोर दिला असल्यामुळें आम्हांस इतकें लिहिणें भाग झालें इतकेंच.

ग्रंथकारांच्या स्वतःच्या म्हणूनहि कांहीं सूचना मृत्युपत्रांत आहेत. दर पिढीस एक परिषद भरवून इष्ट त्या सामाजिक सुधारणा अंमलांत आणाव्या, वाहात्या पाण्यावरोबर समाज वाहावूं देऊं नये, ही त्यांची सूचना योग्य आहे. समाजांत कोणी अविवाहित राहूं नये, शाकाहारी व मांसाहारी हे भेद मोडण्याचा यत्न करूं नये, केवळ विजातीय असे विवाह न व्हावे, असे त्यांचे विचार आहेत. महाराष्ट्रांतील सर्व सुशिक्षितांनीं मराठीच्या खालोखाल इंग्रजीचा व्यासंग ठेवावा हें त्यांचें मत मराठ्यांची सध्यां होत असलेली फजिती पाहून बनलें असावें! महाराष्ट्रीय तरुणांनीं विद्या संपादण्यासाठीं व व्यापारधंद्यांसाठीं परदेशांत जावें असें ते सांगतात, पण मार्ग सुचवीत नाहींत. महाराष्ट्रानें शिवाजीमहाराजांची जयंति किंवा मृत्युतिथि साजरी करण्यापेक्षां राज्याभिषेकदिन साजरा करावा अशी त्यांची इच्छा आहे. त्याप्रमाणें पुण्यास दरसाल एक लहानसा उत्सव होतोच. तरुणांनीं प्रपंचास आरंभ करण्यापूर्वी कांहीं काळ तरी खेड्यांच्या सेवेंत घालवावा हा उपदेश विचारणीय आहे. तसें झाल्यास देशसुधारणा झपाट्यानें होईल.

ग्रंथरचनाकौशल्याकडे ग्रंथकारांचें असावें तसें लक्ष नाहीं हें आरंभींच सांगितलें आहे. रा. तुळजापुरकर हे गडकऱ्यांच्या भाषेंत 'शब्दवेल्हाळ' आहेत. थोड्याशा काळजीनें ग्रंथाचा आकार बराच कमी करतां आला असता. एकाच विषयाच्या प्रतिपादनार्थ कादंबरी असली तर ती एकसूत्री चांगली वठते; पण ग्रंथकाराप्रमाणें सगळेच विषय तींत आणण्याचा विचार केला कीं, तिचा विस्तार आवरशक्तीच्या बाहेर जातो. सत्तावन सालच्या बंडा-

पासून शिवजन्मतिथिनिर्णयापर्यंत विषय एका कादंबरींत गुंफण्याचा प्रयत्न करणें धाडसाचें व कौतुकास्पद असेल, पण वाङ्मयदृष्ट्या शहाणपणाचें खास नाहीं. असे दोष असूनहि कादंबरी चांगलीच साधली आहे. त्याचें एक मुख्य कारण ती निर्मल, उच्च व सत्य सृष्टीचा आदर्श आहे हें होय. या जगांत सुखाचा शोध करूं म्हटलें तर तुकारामाच्या 'सुख पाहतां जवापाडें। दुःख पर्वताएवढें ॥' या उक्तीचा प्रत्यय माणसास पदोपदीं येतो. हें जग नेहमींच दुःखमेघांनीं पूर्ण व्याप्त असून त्यांत क्वचित् कोठें विद्युल्लेखा दिसत असते. पण ही इतकी क्षणभंगुर असते कीं, तिच्या पाठोपाठ अशनिपात हा ठेवलेलाच. य क्षणिक सुखाचा कार्यभाग संसारचक्रांत हाच कीं, त्याच्या आशेवर माणूस आपला दुःखपर्वतांतील मार्ग कंठीत असतो. अशी वस्तुस्थिती आहे तरी कादंबरीकारांच्या व नाटककारांच्या सृष्टींत बहुधा उलट प्रकार आढळतो. सत्याचा जय, न्यायाचा जय, उच्च ध्येयाचा जय, या गोष्टी उपदेशास फार चांगल्या पण त्यांची सोदाहरण खात्री पटविणें फार दुष्कर आहे. सत्याचा जय होतो म्हणून सत्यानें वागावें असें नीतिशास्त्र सुद्धां म्हणत नाहीं. रा. तुळजापुरकरांनीं ही गोष्ट चांगली दाखविली आहे. व म्हणूनच त्यांची कृति ही बाकीच्या कादंबरीकारांच्या सुलभसुखादर्शापेक्षां सत्याची जास्त आदर्शभूत आहे. दुसरें, उच्च ध्येयांची कृतींत सांगतां करणें किती दुरापास्त आहे. गोड फळालाच किडींची बाधा जास्त कशी, हें या कादंबरीनें चांगलें मनावर ठसतें. हिच्यांत निरर्गल शृंगार, अश्लील भाषा व इतर दूषित वातावरणाचा प्रसार करणारे प्रकार अगदीं नाहींत. रा. वामनराव जोशांच्या "रागिणी"नंतर इतक्या उच्च दर्जाची सामाजिक कादंबरी मराठींत उतरलेली दिसत नाहीं. अशा उच्च कृतीची वाङ्मयांत भर टाकल्याबद्दल वाचकवर्ग रा. तुळजापुरकरांचें अभिनंदन करील यांत संशय नाहीं.

ग्रंथाची भाषा शुद्ध, सुबोध आहे तरी कमावलेली दिसत नाहीं. आपला ग्रंथ बराच काळ टिकावा अशी ज्याची इच्छा असेल त्या ग्रंथकारानें शब्दांच्या निवडीकडेहि लक्ष पुरविलें पाहिजे. रा. तुळजापुरकरांची

भाषा वर्तमानपत्रांत वाङ्मययोग्य वाटण्यासारखी असली तरी वाङ्मयांत वर्तमानपत्रीच भासते. ग्रंथांतील बरेच भाग मनोरंजकतेसाठीं मुद्दाम भावनोद्दीपक केलेले दिसतात, व ते कांहींसे असंभवनीयहि आहेत. उदाहरणार्थ, ग्रंथारंभींचीं तीन पत्रें. या पत्रांच्या धाग्यावर एक तृतीयांश कादंबरी झुलत ठेवली आहे. पण त्यांतील पहिल्या पत्रासारखें विचित्र पत्र कोणी विनोदी नवराहि आपल्या बायकोबद्दल लिहील असें वाटत नाहीं. एका वाक्याच्या अर्थानें अनर्थ होण्यासारखे प्रकार गुप्त पोलिसांच्या कारवाईत शोभतात, उच्च सामाजिक कादंबरींत ते असूं नयेत. ग्रंथांत स्त्रियांच्या तोंडीं घातलेलीं कांहीं वाक्यें व हकीकती स्त्रिया आपलें आत्म-चरित्र लिहितांनाही त्यांत लिहितील कीं काय याची शंका वाटते. ग्रंथांतील संवाद हे शालोपयोगी पुस्तकांतील रचिक संवादांप्रमाणें वाटतात. संवादमय कादंबरी लिहिण्याला फार कसब लागतें. ड्यूमाच्या कांहीं सबंधच्या सबंध कादंबऱ्या संवादमय आहेत, पण त्यांत कधीं एका वेळीं एका माणसाच्या तोंडीं चार वाक्यांचा प्यारा आढळणार नाहीं, कीं सबंध ग्रंथांत एकपानी वर्णनहि सांपडणार नाहीं. कथानकाचे धागे गोष्टीच्या सरणींत आपोआप सहज उकलत जावयाचे, त्यांत कधीं मागें वळून हकीगत सांगण्याची पद्धत नाहीं. असे ग्रंथकार इकडे कधीं निपजतील ते निपजोत! क्वचित् ग्रंथांत सामाजिक चालीरीतींकडे दुर्लक्ष झालें आहे. सरलाताईबरोबर विधवा दुर्गा-ताई पाठराखणी म्हणून ठेवल्या आहेत तसा प्रकार देशस्थांतहि होतो असें वाटत नाहीं. नांव बदलणारे नवरे आपल्या समाजांत शक्य दिसत नाहींत. तसेंच अटी घालणाऱ्या वधू हाहि नवीनच प्रकार होय. रात्रीं दहांच्या पुढें एकटेंच फिरावयास जाणारें जोडपें आजही पुण्यांत क्वचित् असेल, चाळीस वर्षांपूर्वी तर अशक्यच दिसतें. कायद्याचे इंग्रजी शब्द तसेच मराठींत घातले आहेत ते कसेसेच वाटतात. उदाहरणार्थ, टाउट हा शब्द. मराठींत हा प्रायः कोणास समजणार नाहीं. मराठींत इंग्रजी किती घालावयाचें हें अधिकारी वाङ्मयविशारदांनीं ठरविलें पाहिजे, नाहींतर ज्याप्रमाणें पारशांच्या गुजराथी लेखांतून अर्धी वाक्यें इंग्रजी आढळतात तसें व्हावयाचें.

' ग्रंथकारांनीं, छापखान्याच्या चुक्यांकडे दयार्द्र दृष्टीनें पाहाण्यास प्रस्तावनेंतच विनविलें आहे तेव्हां त्या प्रकाराबाबत न बोलणेंच बरें. कारण कांहीं ठिकाणीं सबंध अक्षर खाल्ल्यानें अर्थही दुर्बोध झाला आहे. एका ठिकाणीं तर घाईच्या लिहिण्यामुळें एका पुरुषाच्या वाचक दर्शक सर्वनाम ओघांत वाचतांना दुसऱ्याच पुरुषास चिकटतें. ( पृ. १४५ ) इतकी घाई बरी नव्हे. रा. तुळजापुरकरांचा आणखी कादंबऱ्या लिहिण्याचा विचार असल्यास त्यांनीं कांहीं निवडक पाश्चात्य कादंबऱ्यांचा प्रथम अभ्यास करावा अशी आमची प्रेमाची सूचना आहे. 'काव्यज्ञशिक्षयाभ्यासा'चें महत्त्व ते जाणतच असतील. प्रतिभावान् माणसानेंही तिकडे दुर्लक्ष करूं नये.

रा. तुळजापुरकरांचे विचार म्हणजे राजकारणाच्या, समाजसुधारणेच्या व वाङ्मयक्षेत्राच्या नेहमीं कांठावर उभे असणाऱ्या पण कांहींतरी कारणामुळें त्यांत न पडलेल्या विचारी पुरुषांचे विचार होत. आपणास तर या पुरांत उडी घालणें झालें नाहीं, तरी पण कांठावर बसून इतरांना पोहतांना जें आपण पाहिलें व त्यामुळें त्याबाबत जे विचार आपणास सुचले ते त्यांनीं दुसऱ्या धाडशी पोहणारासाठीं ग्रथित केले आहेत. पुष्कळांच्या डोक्यांत असे विचार घोळत असतात, पण अगदीं नवीन पद्धतीनें लोकांसमोर मांडण्याचा साक्षेप त्यांनी दाखविला आहे. हा त्यांचा उद्योग प्रशंसनीय व अनुकरणीय आहे.

**विविधज्ञान विस्तार**—मे १९२७

# ‘ ओलेती ’

जबलपूर ता. १४–११–३० इ.

- कृ. सा. न. वि. वि.

आपला व माझा प्रत्यक्ष परिचय नाहीं; पण मी आपल्या “ प्रगति ” साप्ताहिकाचा एक ग्राहक व चाहता आहें. अत्यंत स्वतंत्र बाण्याचे व विचाराचे जे दोनचार लेखक माझ्या पाहण्यांत आहेत त्यांपैकीं आपण एक आहां, म्हणूनच मी आपणांस तसदी देत आहें.

“ रत्नाकर ” मासिकांतील “ ओलेती ”चें चित्र व त्यावर मीं ज्ञानप्रकाशांत केलेली टीका यामुळें उपस्थित झालेला वाद आपल्या अवलोकनांत आलाच असेल. सदर विषयासंबंधीं स्त्रीवर्गाचें मतच अधिक ग्राह्य असें समजून मीं केसरी व ज्ञानप्रकाशद्वारें सर्व सुशिक्षित भगिनींना आपलें स्पष्ट मत अनुकूल प्रतिकूल कळविण्याची विनंति केली. स्त्रियांच्या स्वाभाविक विनयामुळें या विनंतीस कितपत मान मिळेल याचा अद्याप नक्की अंदाज आलेला नाहीं.

तथापि मी स्वतः या विषयावर लिहिण्यापूर्वी आपल्यांतील चार विचारी लोकांस याविषयीं काय वाटतें हें जाणण्याची माझी इच्छा आहे. आपणास आपल्या पत्रांत या विषयावर चार ओळी लिहितां आल्यास माझ्यावर फार उपकार होतील. कांहीं कारणानें तसें न शक्य झालें तर खाजगी पत्रद्वारें आपण आपलें निर्भीड मत मला कळवावें अशी विनंति आहे. तसदीची माफी असावी. कळावें, लोभ करावा, हे विनंति.

आपला,

**गं. गो. कानेटकर**

जवलपूरच्या ट्रेनिंग कॉलेजांतील प्रोफेसर रा. गंगाधर गोविंद कानेटकर, एम्. ए. यांचें वरील पत्र आम्हांकडे येऊन बरेच दिवस झाले. कानेटकरांच्या ज्या मूळ ' ज्ञानप्रकाशांतील ' लेखामुळें चित्रकार ठाकूरसिंग यांच्या ओलेती चित्राचा वाद सुरू झाला, त्या लेखाकडे आरंभींच आमचें लक्ष वेधलें गेलें होतें.पण त्यावर इतकें रण माजेल अशी कल्पना मात्र आम्हांस आली नव्हती. रा. कानेटकरांचें मत हें एकट्या त्यांचेंच नसून त्यांच्यासारख्या मनोवृत्तीच्या अनेक कुलीन सुशिक्षित घरंदाज सद्‌गृहस्थांचें आहे असें आम्ही समजतों व म्हणूनच अनेक टीकाकारांप्रमाणें व्यक्तिविषयक टीकेच्या भरीस न पडतां प्रस्तुत विषयाची तात्त्विक चर्चा आम्ही करूं इच्छितों. या चर्चेंत इतरत्र ज्या मुद्यांचें विवरण येऊन गेलें आहे त्यांचा उल्लेख आम्ही टाळणार आहों.

सध्यांच्या हिंदी समाजाप्रमाणें जेव्हां एखादा समाज जोराच्या संक्रमणावस्थेंत असतो तेव्हां त्या संक्रमणावस्थेच्या वेगाशीं ज्यांना समांतर राखतां येत नाहीं त्यांची सहाजिकपणें त्रेधा उडते. सर्व समाज एकदम एका उडीसरशीं एका अवस्थेंतून दुसरींत जात नसतो. समाजांतील वेगवेगळे थर निरनिराळ्या वेगानें संक्रमण करीत असतात. ज्या कारणांमुळें समाजांतील व्यक्तींत विषमता व भिन्नता उत्पन्न होतांना दिसते, त्याच कारणांमुळें त्या व्यक्तींच्या मनोवृत्ति व भावना वेगवेगळ्या बनतांना आढळतात. यासाठीं व्यक्तीच्या मतांचा विचार कर्तव्य असतां ही गोष्ट दृष्टीआड करतां कामा नये. आपल्या खेडेगांवाबाहेर कधींहि न गेलेल्या एखाद्या सोंवळ्या ब्राह्मणाला तो प्रथम मुंबईस येतो तेव्हां शेजारच्या रामभटजींचा विसू इराण्याच्या हॉटेलांत बसलेला पाहून काय वाटतें व त्या वाटण्यास अनुसरून कोणते उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतात तें पाहिलें, म्हणजे मनुष्यस्वभावाची कांहीं कल्पना माणसास येईल व त्याच्या तोंडून कधींहि दुसऱ्याच्या भावनांबद्दल अनुदार उद्गार बाहेर पडूं शकणार नाहींत. कानेटकरांच्या लिहिण्याच्या धाटणीवरून आमची अशी समजूत झाली आहे कीं, कांहीं बाबतींत ते पुण्यामुंबईच्या महाराष्ट्रीय समाजाच्या मागें दूरवर गेल्यामुळें पडले असावेत. एरवीं त्यांच्या लिहिण्यांत दिसला आहे त्या तऱ्हेचा किंवा तितका

भावनाप्रकर्ष दिसला नसता. ज्याप्रमाणें व्यंकोजीच्या वेळीं तंजावरास जाऊन राहिलेले महाराष्ट्रीय कांहीं बाबतींत अजून शिवकालांत असलेले आढळतात, तशीच कांहीं स्थिति कदाचित् कानेटकरांची झाली असेल. कदाचित् विशिष्ट तऱ्हेच्या गृहशिक्षणाचा किंवा सभोंवारच्या समाजाचा त्यांवर विशिष्ट परिणाम झालेला असावा. तें कांहींहि असलें तरी आजच्या संक्रमणावस्थेंत कानेटकरांस त्यांच्या मनोवृत्ती आहेत त्या स्थितींत राखतां येणार नाहींत हें स्पष्ट दिसतें. रत्नाकराच्या ताज्या अंकांत श्रीमंत औंधकरांसारख्या जुन्या पिढींतील आर्यसंस्कृतीच्या अभिमान्यानें कानेटकरांना जें उत्तर दिलें आहे व एका पदवीधर मुलीनें जी विचारसरणी अवलंबिली आहे ती पाहून कानेटकारांचीहि याबाबत खात्री पटेल.

आतां कानेटकरांच्या कांहीं समजुतींच्या योग्यायोग्यतेची चर्चा करूं. पोषाखाची किंवा वस्त्रांची उत्पत्ति समाजांत शरीरक्षणार्थ किंवा लज्जारक्षणार्थ झालेली नाहीं हें ऐतिहासिक व समाजशास्त्रीय सत्य आहे. सौन्दर्यवर्धनासाठीं अलंकारमिषानें वस्त्रांचा उपयोग प्रथम होऊं लागतो. आफ्रिकेंतील रानटी लोकांत आजहि या गोष्टीचा अनुभव मिळतो. वस्त्र लज्जारक्षणार्थ आरंभीं प्रचारांत आलें नाहीं हेंच काय, पण उलट तें स्त्रीपुरुषांचा परस्परांबद्दलचा निसर्गसिद्ध आकर्षकपणा वाढविण्यासाठीं निघालेलें असावें असाच समाज-शास्त्रज्ञांचा कयास आहे. शृंगारचेष्टेंत लज्जाप्रदर्शनामुळें आकर्षकता वाढत असल्यामुळें अलंकारार्थ धारण केलेल्या वस्त्रांची पुढें लज्जारक्षणाच्या कार्याशीं सांगड पडली. वस्त्रें वापरणें नेहमींचें झालें तेव्हां नंतर अनुभवामुळें त्यांच्या शरीरक्षणार्थ होणाऱ्या उपयोगाची समज मनुष्यास आली. अलंकारार्थ, लज्जारक्षणार्थ व शरीररक्षणार्थ अशी ऐतिहासिक परंपरा वस्त्रांच्या बाबतींत लागते. वस्त्रांचा उपयोग सर्रहा झाला तेव्हांहि त्यांचा आकार असाच ठरविण्यांत आला कीं तेणेंकरून शरीरसौष्ठव खुलून दिसावें. यास अपवाद फक्त धार्मिक संन्यासमार्गी वस्त्रांचा. जुन्या पेशवाई अंगरख्यांची रचना अशी होती कीं, तेणेंकरून छातीचा पेलेदारपणा दृष्टींत भरावा. स्त्रियांच्या चोळीचीहि व्यवस्था तीच. व्यक्तींचें समाजांतील महत्त्व व स्थान सूचित

करण्यासाठींहि पोषाखाची रचना करण्यांत येत असे. रशियाची महाराणी कॅथेराइन हिचा दरबारी झगा पाउणशें वार लांबीचा असून तो उचलण्यास पन्नास नोकर लागत. उच्चवर्णीय माणसांचे पोषाख खालच्या वर्गापेक्षां जास्त भरदार असण्याचें कारण महत्त्वदर्शन. ही वस्त्रमीमांसा समजून घ्यावयाची असेल तर प्रो. फ्लुगेल यांचा The Psychology of Clothes हा नवा ग्रंथ वाचावा.

वस्त्रांचें मूळ कसेंहि असलें तरी त्यांचें रूढ कार्य आज वर सांगितलेल्या तीनहि जातींचें आहे. यांपैकीं पहिलें कार्य जें शरीरभूषणाचें त्याच्या बाबतींत अतिशय मतवैचित्र्य संभवतें. कोणत्या गोष्टीनें सौन्दर्य खुलतें याबद्दल सार्वत्रिक एकमत आढळत नाहीं इतकेंच नव्हे, तर जें एका ठिकाणीं किंवा एका काळीं सौंदर्यपोषक मानलें जातें, तें दुसऱ्या ठिकाणीं किंवा अन्य काळीं सौन्दर्यहानिकारक मानलें जातांना दिसतें. नीतीच्या कल्पनेंतहि असेंच मतवैचित्र्य आढळतें. सर्व हिंदी आर्यांची समजूतहि एक तऱ्हेची आढळत नाहीं. मलबारांत चोळीशिवाय स्त्रियांनीं फिरणें गैर मानलें जात नाहीं. पंजाबांत डोक्यावर पदर घेतल्याशिवाय जाणाऱ्या दक्षिणी स्त्रिया वेश्यासदृश समजल्या जात असत. विलायतेंतील स्त्रिया झग्यांची लांबी तोकडी करण्याच्या विचारांत, तर महाराष्ट्रीय स्त्रिया रस्ते झाडणारीं गंधर्व फॅशन लुगडीं नेसण्याच्या पंथांत ! गेल्या पिढीपर्यंत महाराष्ट्रीय स्त्रियांत चोळीनें लज्जारक्षण होतें असें मानलें जात असे, आतां पोलकें किंवा निदान जाकीट लागतें. गेल्या पिढींतील स्त्रियांस लुगड्यांस टांचण्या लावण्याची जरूर भासत नव्हती आतां पोरींना-सुद्धां टांचण्या लागतात. यावरून नीति वाढते आहे असें समजावयाचें कीं कमी होत आहे असें मानावयाचें ? खरी स्थिति अशी कीं, ह्यांत नीतीच्या किंवा अनीतीच्या भावनापेक्षां फॅशनची भावनाच फार. सौन्दर्याच्या कल्पना बदलत असतात तशी फॅशनहि बदलत जाते. गेल्या पिढींतील शेंडीच्या भोंवतीं संजाब किंवा भोवरा राखणारे आजच्या केशकलापी लोकांपेक्षां कमी अकडबाज होते असें नाहीं; पण जुने लोक नव्यांनाच तेवढे छिचोर म्हणतांना आढळतील. एवढें विवेचन करण्याची आवश्यकता इतकीच कीं कानेटकर

म्हणतात त्याप्रमाणें एकमेव ‘ आर्यपद्धतीची सदभिरुचि ’ अस्तित्वांत नाहीं हें दाखवून द्यावयाचें. सांची, भर्हूत, अजिंठा वगैरे ठिकाणच्या शिल्प-चित्रकलांचे नमुने ‘ जुनाट आर्यपद्धतीच्या सदभिरुचीचे ’ निदर्शक मानावयाचे नाहींत तर त्यांचा आदर्श शोधावयाचा तरी कोठें ? नग्न किंवा अर्धनग्न स्वरूपाचीं चित्रें पाश्चात्यांचींच असें म्हणणें इतिहासाला धरून नाहीं. युरोपांत किंवा अमेरिकेंत आंखूड झगे, शरीरवर्णी पायमोजे व मुलांसारखे केस कापण्याची फॅशन रूढ होऊनहि नीतीची कल्पना सुटली आहे असें नाहीं. नुकतेंच एका हास्यचित्रांत समुद्रकिनाऱ्यावर आंखूड झगा घालून फिरणारी एक अमेरिकन तरुणी व तिच्या झग्याचें माप फूटपट्टीनें घेणारा पोलीसशिपाई यांचें दृश्य आमच्या पाहाण्यांत आलें. त्यावरून तिकडील सरकारहि या बाबतींत नियमन करीत असतें हें दिसून आलें. सिनेमा चित्रपटांतील नाचांतूनहि अशीच व्यवस्था दिसून येते. कलेचें ध्येय चित्रकार काळे म्हणतात त्याप्रमाणें मनोरंजन एवढेंच नसून सौंदर्यशिक्षण हेंहि आहे. गांवढळाला कपोलफलक दिसत नाहींत, कुचकुंभ भासत नाहींत किंवा सृष्टीचें सौंदर्यहि कळत नाहीं. हा सर्व कलावाङ्मयांचा परिणाम आहे—असें शिक्षण कलावाङ्मयांकडून दिलें जाऊं नये, कारण तेणेंकरून विषयवासना जागृत होतात, असें कानेटकरांचें म्हणणें आहे काय ? काम हा आर्यांच्या पुरुषार्थचतुष्ट्यापैकीं एक आहे व त्याचें महत्त्व, अर्थ, धर्म, व मोक्ष यांच्या बरोबरीचें धरलें आहे हें कानेटकरांस मान्य नाहीं काय ? ज्या विषयाचें महत्त्व जुनाट आर्यांनीं पुरुषार्थांत त्याचा समावेश करून दाखवून दिलें, त्याला आम्ही बुजावें काय ? कालिदास, भवभूति, बाणभट्ट, हे प्राचीन आर्यसंस्कृतीचे प्रतिनिधीभूत नाहींत असें कानेटकरांना वाटतें काय ? त्यांच्या कृती कशांनीं भरल्या आहेत ? भवभूतीला मालतीमाधवांत ‘ मचूडक ’ आणि तें आर्यस्त्रियांच्या संवादांत आणतांनाहि कांहीं वाटलें नाहीं. बाणभट्टानें चंद्रापीडाच्या कामसंवेदनेचें वर्णन योगाशीं त्याची तुलना करून केलें आहे. वेदांतांत रमणारा वामन पंडित ‘ ऐकुनि अंतरिं, तोषले श्रीहरि, देखुनि कामगृहें अति गोरीं । ’ येथपर्यंत मजल नेतांना आढळतो ! हें सर्व वाङ्मय, हें सारें ‘ कवित्व, ’ केवळ

शिमग्यासाठींच खास निर्मिलेलें होतें काय ? मग कानेटकरांनीं आधुनिक चित्रकारांवर तेवढा कां दांत धरावा व पाश्चात्यांचें अनुकरण म्हणून त्यांना कां हिणवावें ?

ज्या स्त्रीपुरुषांच्या, मुलांमुलींच्या, लेकीसुनांच्या, समाजांत ओलेती-सारखीं चित्रें शिरूं नयेत अशी कानेटकरांची इच्छा, त्या समाजाच्या किती वाटा ते बंद करूं शकणार आहेत ? अमेरिकन सिनेमा चित्रपट, कीं ज्यांत बहुतेक सर्व शृंगारचेष्टा आढळूं शकतात; सचित्र मासिकें व वृत्तपत्रें, तसेंच शिल्पचित्रकलांचीं पुस्तकें; कामशास्त्रावरील शेंकड्यांनीं नव्हे हजारांनीं प्रसिद्ध होणारीं साकृति पुस्तकें; कोठें म्हणून माणूस आळा घालणार ? आजच्या जगाची रचना अशी बनत चालली आहे कीं एके ठिकाणीं सुरू झालेला प्रकार लौकरच सर्वत्र पसरतो. या गोष्टीला थोपवून धरणें इष्ट असलें तरीहि शक्य नाहीं. दुसरीकडून येणारा प्रकार प्रथम सर्वांनाच जोराचा धक्का देतो. धक्क्याचा आघात माणसाच्या मनोवृत्तीप्रमाणें त्यास कमी जास्त भासतो. कानेटकरांना किंवा त्यांच्या कन्येला ओलेतीचें चित्र पाहून धक्का बसला नसेल असें आम्ही म्हणत नाहीं. त्यांच्याप्रमाणेंच इतरांनाहि तो बसला असणें शक्य आहे. पण या गोष्टीस उपाय मात्र आम्हांस दिसत नाहीं. ज्याप्रमाणें मोरो-पंतकवींसारखे कांहीं शिष्ट, नटांचें मुखावलोकन होऊं नये म्हणून, पेशवाईत तमाशा पाहाण्यास जात नसत म्हणून, तमाशे, लावण्या, दौलतजादा, वगैरे प्रकार बंद पडूं शकले नाहींत, त्याचप्रमाणें कानेटकरांच्या सात्विक उद्वेगा-नेंहि आज कांहीं कार्यभाग होईल असें आम्हांस वाटत नाहीं. कानेटकरांस रत्नाकरासारखीं मासिकेंच वैषयिकवृत्ति चेतवण्यास मदत करतात असें वाटत असेल तर तोहि त्यांचा भ्रम आहे. कानेटकरांना ओलेती पाहून जसा धक्का बसला, तसाच स्वतः नाटकांत काम केलेल्या आमच्या एका पन्नाशी उलटलेल्या स्नेह्यांना गोऱ्या रामाच्या देवळांतील कीर्तनामुळें नुकताच बसला. कारण बोवांना स्त्रियांच्या किळसवाण्या स्थितींतल्या उपमा कीर्तनांत–स्त्रीबाहुल्य असलेल्या ठिकाणीं–आणतांना त्यांनीं ऐकिलें. महाराष्ट्रांतील मासिकेंच च्यवलीं असें म्हणावें तर हिंदी, बंगाली, गुजराती, मासिकांत तेंच दृश्य

दिसतें. सुधा नांवाचें हिंदी खास स्त्रियांचें मासिक कानेटकरांच्या पहाण्यांत असेलच. त्यांत हल्लीं एक डॉक्टरमहाशय लिहित असतात. त्यांचे लेख जननेंद्रियांचीं स्पष्ट सूचीसह चित्रें–आकृति देऊन सजवलेले असतात. हें मासिक स्त्रियांच्या व मुलींच्याच हातीं विशेष पडत असावें. वैद्यकग्रंथांतच आढळणाऱ्या आकृती स्त्रियांच्या मासिकांत पाहून आम्हांसहि कानेटकरांप्रमाणें कसेंसेंच वाटलें ! पण जग हें असें आहे, असें म्हणून स्वस्थ बसणें भाग. आपल्यासारखेच दुसरेहि कांहीं समदुःखी आहेत हें ऐकून कानेटकरांस कांहीं समाधान वाटत असेल तर त्यांनीं तसें मानून घ्यावें व तुकारामाच्या उक्तीप्रमाणें

**तुका म्हणे उगें रहावें । जें जें होईल तें तें पहावें ॥**

या पंथाचा अवलंब करावा हेंच आजच्या काळांत श्रेयस्कर दिसतें.

आगगाड्या व आगबोटी यांचें युग आल्याबरोबर ज्याप्रमाणें अस्पृश्यत्वाच्या कल्पनेचा मोड झाला; हॉटेलांच्या व परदेशगमनाच्या प्रचारामुळें खाण्यापिण्याचा विधिनिषेध सुटूं लागला, त्याप्रमाणेंच आधुनिक शास्त्रज्ञानाच्या वाढीमुळें अश्लीलत्वाची मर्यादा क्षितिजाच्या रेषेप्रमाणें मागें मागें सरत जाणार हें स्पष्ट दिसतें. जीविशास्त्र, मानसशास्त्र, मनोविश्लेषणशास्त्र, कामशास्त्र वगैरेंच्या आधुनिक अभूतपूर्व वाढीमुळें नीती–अनीतीच्या कल्पना झपाट्यानें बदलत जाणार हें स्पष्ट दिसूं लागलें आहे. आधुनिक जगाची आर्थिक व सामाजिक स्थितीहि या वाढीस पोषक होत आहे. या फेऱ्यांतून जगांतील कोणताहि देश किंवा कोणताहि समाज सुटणें शक्य दिसत नाहीं. हा सर्व विचार ध्यानांत घेऊन कानेटकरांनीं आपल्या भावना बदलण्यास लागावें हें उचित दिसतें.

**प्रगति** } वर्ष २, अंक २८
ता. ११ दिसेंबर १९३०

# देवदासी

सध्यां मुंबईत जें वातावरण आहे, त्यांत सिनेमा पाहाण्याकडे कोणाचें लक्ष वेधूं नये अशी स्थिति आहे. पण या जगाची रचना भर्तृहरीनें म्हटल्या-प्रमाणें 'क्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपि च हाहेति रुदितम् । क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः ॥' अशा स्वरूपाची आहे. एकीकडे सत्याग्रही व पोलीस यांचा सामना सुरू असूनहि शहरांत नाटकें, सिनेमा चालूच आहेत; त्यांना कमी गर्दी असते असें वाटत नाहीं; कारण एकेक चित्रपट दोनदोन आठवडे चालतांना दिसतात. अशांपैकींच येथील रिआल्तो सिनेमांत आतां दुसरा आठवडा सुरू असलेला 'देवदासी' चित्रपट आहे. येथील ओरिएंट पिक्चर्स कॉर्पोरेशन नामक चित्रपट तयार करणाऱ्या कंपनीकडून खास आमंत्रण आल्यावरून व चित्रपट कथालेखक श्री. वि. स. सुखठणकर यांच्या प्रयत्नाबद्दल कौतुक मनांत वसत असल्यामुळें हा चित्रपट पाहाण्यास आम्हीं गेलों होतों. या चित्रपटाची कथा रा. सुखठणकर यांनीं लिहिलेल्या एका सामाजिक गोष्टीवरून बसविलेली आहे. सुखठणकर गोमांतकस्थ आहेत व तेथील समाजचित्रें रंगविण्यांत त्यांचा हातखंडा आहे. हल्लींच्या तरुण महाराष्ट्रीय लेखकांत जे थोडे ध्येयवादी व कलाप्रेमी लेखक आहेत, त्यांत सुखठणकर मोडतात. ध्येयवादी माणूस नेहमींच समाजाच्या पुढें असल्यामुळें समाजास तो विक्षिप्त वाटत असतो, व त्याच्या प्रयत्नाचें महत्त्व

सामान्य जनतेच्या लक्षांत चटकन् भरूं शकत नाहीं. पण नाविन्यावर ज्यांचा धंदा अवलंबून, ते नाटकवाले व सिनेमावाले असल्याच माणसांच्या शोधांत राहातात. असें नसतें तर गडकरी अज्ञात राहिले असते. अस्तु. सुखठणकरांची मूळची गोष्ट सामाजिक व गोमांतकांतील देवदासींच्या आयुष्यांशीं निगडित आहे. देवदासींच्या संस्थेचा उगम कसा झाला असावा, हा समाजशास्त्राचा प्रश्न आहे. जगावरील सर्व राष्ट्रांत ज्या सामान्य धर्मसमजुती प्रचलित होत्या व आहेत, त्यांपैकीं एक कुमारिकांना देवदासी बनविणें ही एक आहे. रोमन लोकांतील Vestal Virgins, मध्ययुगांतील जोगिणी, आपल्याइकडील बुद्धकाळांतील व जैनधर्मांतील जोगिणी, खंडोबाच्या मुरळ्या वगैरे सर्व प्रकार या एकाच समजुतीचे अवतार आहेत. देवदासींची संस्था मुख्यत्वेंकरून दाक्षिण हिंदुस्थानांत चालू आहे. कोण्या ना कोण्या देवतायतनाशीं त्या संबद्ध असतात. देवळांतील प्रत्यक्ष पुजेखेरीज बाहेरचीं अनेक कामें त्यांच्याकडून करून घेतलीं जातात, व देवापुढें नृत्यगायन करणें हें त्यांचें विशेष काम मानलें जातें. या मूळ देवसेविकांची अधोगति केव्हांपासून व कशी झाली हें प्रसिद्ध नाहीं. पण मनुष्याच्या मनांतील षड्विकारांपैकीं आद्य व श्रेष्ठ जे कामाजीराव, त्यांचा हा प्रताप आहे हें उघड आहे. ग्रीक व रोमन लोकांतील Orgies हा प्रकार आपल्याकडील शाक्तांच्या कांहीं प्रकारांप्रमाणें होता. त्यांत मद्यपान, स्त्रीपुरुषांचें एकत्र गाननृत्य व संमीलन हे प्रकार असत. बौद्धांचा व जैनांचा धर्म ऱ्हास पावण्याचें कारण बहुधा मठांतील अनीतिमत्ता हें असावें, असें अनेक विचारवंतांचें मत आहे. असाच कांहींसा प्रकार दक्षिणेंतील देवदासींच्या पद्धतीचा झाला असावा. आपल्याकडेच असा प्रकार झाला असें नसून पाश्चात्यांतही तसाच प्रकार सर्वत्र घडला. ज्यांस तो जाणण्याची इच्छा असेल त्यांनीं इतिहासकार लेकी याचा History of European Morals हा सुविख्यात ग्रंथ वाचावा. मानवसमाजांतील एक सर्वांत जुनी संस्था वेश्यांची होय. देवदासींच्या संस्थेशीं ही दुसरी संस्था संबद्ध झाली, व त्या रूपानें ती आजवर टिकून राहिली आहे. वेश्याव्यवसायाचें समूळ उच्चाटण

मानवजातींतून कधीं होईल कीं काय, याबद्दल समाजशास्त्रज्ञांस फार संशय वाटतो. त्यांपैकीं अनेकांच्या मतें हा व्यवसाय म्हणजे समाजाचा Safety valve आहे. पण तें कसेंही असलें तरी हा व्यवसाय देऊळ या पवित्र संस्थेशीं निगडित राहावा, ही गोष्ट आधुनिक बुद्धिवाद्यांस पटण्यासारखी व मानवण्यासारखी नाहीं. अर्थात् या संस्थेचें कायदेशीर उच्चाटण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मद्रास कौन्सिलांत डॉ. मुथूलक्ष्मी रेड्डी यांनीं याबाबत ठराव आणला होता हें सुप्रसिद्धच आहे. गोमांतकांतील गायकसमाजांतसुद्धां अशा तऱ्हेची चळवळ सुरू आहे. अशा वेळीं हा चित्रपट पुढें यावा ही योगायोगाचीच गोष्ट म्हटली पाहिजे.

सुखठणकरांची मूळ गोष्ट बरीच विस्तृत व गुंतागुंतीची आहे. तशी ती यथातथ्य चित्रपटांत आणणें चित्रपटकारांस शक्य झालें नाहीं. त्यांनीं त्या गोष्टीचें स्वरूप बरेंच बदलून तिला ऐतिहासिक पोषाख चढविण्याचा यत्न केला आहे. कथानकाचें स्थल सुप्रसिद्ध प्राचीन हिंदु राज्याची राजधानी जें विजयनगर हें ठरविण्यांत आलें. या स्थलीं जे इमारतीचे वगैरे ऐतिहासिक अवशेष आहेत, त्यांचा उपयोग फोटोग्राफीच्या सहाय्यानें चित्रपटांत मोठ्या कुशलतेनें करून घेण्यांत आला आहे. गोष्टीचें स्थल व काळ यांस अनुरूप अशीं तिकडील पात्रें चित्रपटांत निश्चित करण्यांत आलीं. तिकडील चालीरीतींची पार्श्वभूमि चित्रपटांत घेतली गेली. त्यामुळें सुखठणकरांच्या मूळ कथानकांत फारच फरक पडला आहे. विजयनगरच्या राज्यांतील सोळाव्या शतकाचें दृश्य चित्रपटांत उतरविण्याचा प्रयत्न चित्रपट कंपनीनें येथील झेविअर कॉलेजचे इतिहासाचे प्रोफेसर पिताश्री हेरास यांच्या सहाय्यानें केला. हेराससाहेब हे विजयनगरच्या इतिहासांत रंगून गेलेले असल्यामुळें त्यांस तेथील ऐतिहासिक अवशेषांचा फायदा कंपनीस करून देतां आला. सोळाव्या शतकांतील पोषाखाची सामान्य कल्पना येण्यास चित्रपट योग्य आहे, पण ऐतिहासिक दृष्टीनें सूक्ष्मपणें पाहूं जातां त्यांत अनेक दोष इतिहासज्ञात्यास दिसतात. चित्रपटकारांसमोर प्रेक्षकांस रमविण्याचा मुद्दा सर्वांत पुढें असल्यानें कथालेखक व इतिहासकार यांच्याशीं

ते एकरूप होणें जवळ जवळ अशक्य होतें. आपल्याकडील चित्रपटकार बहुधा कलानभिज्ञ व इतिहासशून्य द्रव्यदृष्टि असल्यामुळें कलेच्या व ऐतिहासिक दृश्याच्या दृष्टीनें चित्रपटांत मोठें वैगुण्य येतें, अशीच थोडीफार स्थिती प्रस्तुत चित्रपटांत झालेली दिसून येते. कथानकांतील मुख्य नायिका जी देवदासी नागला तिचा पोषाख, तिची नृत्यपद्धति, तिचे हावभाव हे इतिहासयुक्त व शास्त्रशुद्ध नाहींत. अलीकडे जुने ऐतिहासिक हिंदी लोक दाखवितांना अजिंठ्याच्या लेण्यांतील भिंतीवरील चित्रांच्या दृश्याचा फार उपयोग करण्याचा प्रघात पडत चाललेला आहे. पण सातव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत जो फरक पडला, त्याचें रूप प्रस्तुत चित्रपटांत दिसलें पाहिजे होतें, तें आणलें गेलेलें नाहीं. तसेंच फोटोग्राफीच्या दृष्टीनें व खर्चाकडे पाहतां व आधुनिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठीं चित्रपटकंपनीनें जो मर्सीराइज्ड ऊर्फ खोट्या रेशमाच्या आधुनिक युरोपीय पद्धतीच्या पोषाखाचा अवलंब नृत्यप्रसंगीं केला आहे, तो सर्वथा अनुचित आहे. अशाच तऱ्हेच्या सूक्ष्म ऐतिहासिक दृष्टीस दिसणाऱ्या व भासणाऱ्या अनेक बाबी चित्रपटांत आहेत. त्यामुळें मनोरंजनांत कांहीं विघात येत नसला तरी ऐतिहासिक यथातथ्यत्वाच्या दृष्टीनें तो मोठा दोष आहे.

प्रस्तुत चित्रपटांत फक्त मुख्य गोष्ट तेवढी सरळ दाखविलेली आहे. प्रेक्षकांत कुतूहल उत्पन्न होण्यासाठीं व तें टिकण्यासाठीं, ज्या तऱ्हेची गुंतागुंत पाहिजे तशी बहुतेक मुळींच शिल्लक ठेवलेली नाहीं. भूतकालीन दृश्य चित्रपटावर दाखवितांना प्रेक्षकांस सहज कल्पना येण्यासाठीं जशी पद्धतशीर रचना व्हावी लागते तशी ती झालेली नाहीं. चित्रपट फार आंखडता घेतल्यामुळें असा प्रकार झाला असावा. चित्रपटांतील दृश्यांतून अनेक वेळीं मोठ्या लोकसमुदायाची आवश्यकता होती. पण मोडक्या शहरांतील पडक्या देवळांत चित्रपट बसविले गेल्यानें जरूर तो जनसंमर्द आणतां आला नाहीं. खेरीज अशा चित्रपटांत जुन्या तऱ्हेचा पोषाख केलेलेच अनेक लोक पाहिजेत. तसे ते सामान्य जनसमूहांतून मिळण्याची व्यवस्था आपल्या समाजांत होणें कठीण आहे; किंबहुना शक्य नाहीं.

युरोपांत सर्वत्र फॅन्सी ड्रेस बॉलचें प्रस्थ असतें. त्या गोष्टीचा फायदा चित्रपट कंपनींना मिळूं शकतो.' अनेक लोक केवळ हौसेखातर ऐतिहासिक पोषाख लेवून हजर राहूं शकतात. आपल्याकडे तो प्रकार संभवत नाहीं, तोंपर्यंत चित्रपटांत अशा तऱ्हेचें वैगुण्य राहाणार हें निश्चित आहे.

चित्रपटांतील इतिहास कानडी प्रदेशांतील असूनहि गुजराती, पारशी, मुसलमान वगैरे चित्रपटांतील पात्रांनीं आपलीं कामें बरींच सफाईनें केलीं आहेत. ओरिएंट पिक्चर्स कॉर्पोरेशनचे व्यवस्थापक नवल गांधी, मि. लवं-गिया व मुख्य नायिकेचें काम करणाऱ्या जुबैदाबाई यांचीं कामें चांगलीं वठतात. जर हींच कामें त्या त्या प्रांतांतील लोकांकडूनच झालीं असतीं, तर किती चांगलें झालें असतें, असें कलाप्रेमी माणसास वाटल्यावांचून राहात नाहीं. हिंदुस्थानांत वास्तविक या बाबतींत प्रांतिक सहकार्याची अत्यंत जरूरी आहे. कोणतेंही सोंग सफाईत आणणें हें नटाचें कौशल्य तर खरेंच, पण कांहीं वेळीं तरी मानववंशाची अडचण भासल्यावांचून राहात नाहीं. चित्रपट बोलके झाल्यास ती अडचण पुढें फारच भासेल. या कोणत्याही बाबींत सुधारणा व्हावयाची तर, हिंदुस्थानांतील सर्व सुशिक्षित कलाभिज्ञांची एक संयुक्त संस्था स्थापणें अवश्य आहे. केवळ नाटकी लोकांकडून मूलभूत सुधारणा होणें शक्य नाहीं. चित्रपटांच्या कलेमुळें ज्या ज्या माणसांजवळ शरीरसौन्दर्य व सामर्थ्य, आकारवैचित्र्य, अभिनयकुशलता व कलापारंगतता असेल त्यांस पोट भरण्यास हा नवा मार्ग उत्पन्न झाला आहे. त्याचा फायदा सुशिक्षितांनीं कां घेऊं नये, केवळ कचेऱ्यांतून गर्दी करण्याची मनीषा कां बाळगावी, हें समजणें कठीण आहे.

एकंदरींत पहातां प्रस्तुत चित्रपट सर्वांनीं एकवार अवश्य पाहाण्यासारखा आहे. विजयनगरचा इतिहास वाचून जो परिणाम सामान्य वाचकांच्या मनावर होऊं शकणार नाहीं, तो प्रस्तुत चित्रपट पहाण्यानें सहज होऊं शकेल. तुंगभद्रा तीराचा देखावा, तिकडील नद्या उतरून जाण्याची पद्धत, देवळांवरील नकशीचीं दृश्यें, देवाच्या उत्सवमूर्तीची पालखी, राजाची स्वारी, सैन्याची दौड वगैरे पाहून इतिहासाची बरीच कल्पना चटकन वाचकांस

होईल. त्यांपासून प्रेक्षकांचें मन एकदम मागल्या काळांत नेण्याचें काम सुलभतेनें होतें. महाराष्ट्रीयांजवळ लक्ष्मीचा अभाव असल्यामुळें त्यांस गुजराती व पार्शी लोकांच्या औदार्यावर अवलंबून राहावें लागतें. एरवीं सुखठणकरांना आपली कथा महाराष्ट्रांत कां बसवितां आली नसती ? पण विद्यमान स्थितींत असेंच सहकार्य करणें अवश्य आहे. सुखठणकरांना या नव्या प्रयत्नापासून जो अनुभव प्राप्त झाला आहे, त्याचा उपयोग ते पुढें करून घेतील अशी आशा आहे.

प्रगति } वर्ष २, अंक ४<br>ता. २६ जून १९३०

# प्रेमाचें एक अप्रतीम प्रतीक.

" Not Architecture ! as all others are,
But the proud passion of an Emperor's love
Wrought into living stone, which gleams and soars
With body of beauty shrining soul and thought;
.........As when some face
Divinely fair unveils before our eyes—
Some woman beautiful unspeakably—
And the blood quickens, and the spirit leaps,
And will to worship bends the half-yielded knees,
While breath forgets to breathe, So is the Taj ! "

*Sir Edwin Arnold*

सर एड्विन अर्नोल्डनीं लिहिलें तें खरेंच ! ताजमहाल स्थापत्यशास्त्राचें एक उदाहरण म्हणून पहावयाचा नसून एका वैभवशाली सम्राटाच्या अभिमानास्पद अनुरागाचें जिवंत पाषाणांत उतरलेलें स्वरूप त्यांत पहावयाचें आहे. आणि पाषाणांत, बहुमूल्य संगमरवरी पाषाणांतहि, इतकें सचेतन, इतकें मनाला उड्डाण करावयास लावण्यासारखें लावण्य उतरलेलें पृथ्वीतलावर दुसरें कोठें पहावयास सांपडणार आहे ? आपल्यासमोर एखादी अवर्णनीय सुंदर देदिप्यमान देवीसदृश स्त्री ठाकली असतां आपली जी अवस्था व्हावी,

तीच ताजमहालाच्या महाद्वारांत जातां होते. रक्ताचा प्रवाह खरोखरीच जोरानें वाहूं लागतो. हृदय उडूं लागतें. गुडघे टेंकून त्यापुढें नमण्याचेंच हें स्थान आहे अशी सहृदय प्रेक्षकाची तेव्हांच खात्री होते. श्वासोच्छ्वास मंद होतो. डोळ्यांतून अनिवारणीय अश्रू आपोआप बाहेर पडूं लागतात. खरोखरीच आमची अशी अवस्था झाली ! बोलतांना कंठ दाटून आला. जर आमची ही स्थिति, तर ज्या भाग्यशाली विलासप्रिय शहाजहान पातशहानें आपल्या प्रेमाचें अप्रतीम प्रतीक म्हणून ही महालमूर्ति उठविली, त्याची आग्र्याच्या बुरुजांतील बंदीखान्यांतून मृत्युशय्येवरून या सौंदर्यराशीकडे पहातांना काय अवस्था झाली असेल बरें ? एका बंगाली चित्रकाराच्या या प्रसंगावर काढलेल्या चित्राकडे पाहूनच जर अश्रुधारा सुरू होतात, तर प्रत्यक्ष ताजमहालाच्या महाद्वारांत ती कल्पना आमच्या इतिहासमग्न चक्षूंसमोर आल्याबरोबर आमची छाति भरून आली यांत नवल तें काय !

बरोबर तीनशें वर्षें झालीं. सन १६३१ च्या जून महिन्यांत ताजमहालाची अधिष्ठात्री देवता जी सम्राज्ञी मुमताजमहल्, ती बुऱ्हाणपुर मुक्कामीं बाळंतपणांत मरण पावली. तिच्या मरणानें शहाजहान पातशहाला परमावधीचें दुःख झालें ! एक आठवडाभर त्यानें कोणा प्रधानाचीहि भेट घेतली नाहीं. मग राज्याचें काम करणें दूरच राहिलें. राज्य मुलांत विभागून देऊन स्वतः वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याची कल्पनाहि त्याच्या डोळ्यांसमोरून गेली. नंतरच्या दोन वर्षांत राजदरबारांत सर्वत्र दुःखवटा पाळण्यांत आला. गाणेंबजावणें, अत्तर गुलाब, अलंकारपरिधान, उत्सवसमारंभ, सर्वांस बंदी होती. राणीच्या मृत्यूचा मुसल्मानी महिना जिल्काद हा पुढें अनेक वर्षें दुःखाचा मानण्यांत येत असे. बुऱ्हाणपुराहून मुमताजचें कलेवर आग्र्यास नेण्यांत आलें व तेथें ताजमहाल बांधून होईपर्यंत तें तेथील बागेंत तात्पुरतें पुरण्यांत आलें होतें. शहाजहान पातशहानें आपल्या प्रेमाचें स्मारक एक अद्वितीय इमारत बांधून कायम करण्याचें निश्चित केलें. या निश्चयाचेंच मूर्तिमंत सिद्धीस गेलेलें दृश्य आजचा ताजमहाल होय.

तत्कालीन जगांत सर्वांत श्रीमंत म्हणून गाजलेल्या शहाजहानानें अद्वितीय स्मारक करण्याचें जाहीर करतांच देशोदेशींचे स्थापत्यशास्त्रज्ञ व कारागीर एकत्र जमावे यांत आश्चर्य कसलें ? इताली, इस्तंबूल, बगदाद, शिराझ, समरकंद वगैरे ठिकाणचे पिढीजाद शास्त्रज्ञ आपल्या कल्पना घेऊन पुढें आले. त्यांतील इस्तंबुली उस्ताद इसा याची कल्पना उचलण्यांत आली. पण सर्वच कल्पना अगदीं त्याचीच एकट्याची असेल असें म्हणवत नाहीं. स्थूल नकाशा त्याचा असून निरनिराळ्या भागांची कारागिरी स्वतंत्र ठरविली गेली असावी असा तर्क आहे. युरोपीय लोकांस हें सर्व एका इतालियन कारागिराचें डोकें असें वाटतें, कारण असें काम काय पौर्वात्य करूं जाणत ? तुलनात्मक दृष्ट्या बोलावयाचें तर ताजमहालासारखी इमारत दुसऱ्या कोठेंहि नाहीं. इस्तंबूल, कायरो, फ्लॉरेन्स, व्हेनीस, बगदाद, शिराझ, समरकंद वगैरे ठिकाणच्या नामांकित इमारतींची झांक ताजमहालांत कोठें ना कोठें दिसत असेल, पण सर्व इमारतीवर हिंदुस्थानची छाप पडलेली दिसून येते. शहाजहानच्या कारकीर्दीत इराणी जातीच्या स्त्रैणत्वाची झांक मोगल दरबारांतील सर्वच गोष्टीवर पडलेली दिसत होती. त्याप्रमाणें ताजमहालावरहि ती पडलेली दिसलीं तर तें कालानुरूपच आहे. ताजमहालच्या कामांत जगांतील अनेक ठिकाणच्या कारागिरांची योजना झालेली होती. जरूरीच्या वस्तूहि उत्तम मिळतील तेथून पैदा करण्यांत आलेल्या होत्या. रत्नें, चित्रविचित्र दगड, मिळतील तेथून आणण्यांत आलेलीं होतीं. वीस हजार माणसें सतरा वर्षें खपलीं तेव्हां ही अद्‌भुत इमारत वठली. इमारतींत आरंभीं थडग्यावर मोत्यांची चादर होती, सभोंवतीं सोन्याची रत्नखचित जाळी होती, चांदीचे दरवाजे होते, बहुमूल्य रेशमी गालिचे सर्वत्र पसरलेले होते. या सर्व चिजा मागाहून लुटल्या जाऊन आज फक्त दगडी इमारतच जागेवर आहे, तरीहि ती अद्वितीय भासते. ताजमहाल बरहुकूम दुसरा ताजमहाल यमुना नदीच्या पैलतीरावर बांधून व त्यांत आपल्या कबरेची योजना करून या दोन इमारती मोठ्या शोभिवंत पुलानें एकमेकांशीं जोडण्याचा शहाजहानाचा विचार होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं. आजच्या ताजमहालांतच आपल्या प्राणाहूनहि प्रिय राणीशेजारीं

त्याचें मृण्मय शरीर पुरलें गेलेलें आहे. दोघांच्या अकृत्रिम प्रेमांत यमुनेचा अडथळा तरी कां यावा ? एकाच सुखशय्येवर बिलगून चिरनिद्रा त्याहून बरी नव्हे का ?

ताजमहालचें वर्णन अनेक प्रवासवर्णनांतून वाचकांनीं बरेंचदां वाचलें असेल, म्हणून त्याची पुनरावृत्ति करण्याचा आमचा विचार नाहीं. ताजमहाल व त्याभोंवतींच्या इमारती म्हणजे एक लहानसें स्वतंत्र नगरच आहे. सर्व रचना सुज्ञात मोगल पद्धतीची आहे. बाहेरील तटबंदीच्या, धर्मशाळांच्या व महाद्वारादि इतर इमारतींच्या कामास बहुधा आग्र्याजवळील प्रदेशांतील तांबड्या दगडाचा उपयोग केलेला आहे. या दगडाचीं कामें दक्षिणेंतील काळ्या दगडाच्या कामापेक्षां स्वभावतःच जास्त शोभिवंत दिसतात. त्यांतहि ताजमहालासारखीं स्थळें हल्लीं झाडून पुसून स्वच्छ राखण्यांत येत असल्या-मुळें त्यांच्या शोभेचें खरें स्वरूप दृष्टीस पडण्यास अडचण पडत नाहीं. खुद्द ताजमहालच्या आवाराच्या बाहेर जें पटांगण आहे, तें कमानींच्या धर्मशाळांनीं वेढिलेलें आहे. या पटांगणांतून महाद्वारानें ताजमहालाच्या आवारांत शिरावें लागतें. या महाद्वाराची इमारतच इतकी सुंदर आहे कीं तशी इमारत उभ्या पुण्यांत मिळावयाची नाहीं असें वाटतें. या महाद्वाराच्या कमानींतूनच ताजमहालाचें प्रथमदर्शन होतें. हें महाद्वार व ताजमहालाचा पाया यांत सुमार अर्धा फर्लांग अंतर असेल. हें अंतर जलाशयांनीं व कारंजांनीं भरलेलें आहे. या जलाशयांच्या दोन्ही बाजूंस शुभ्र संगमरवरी दगडांचे चबुतरे व पायमार्ग राखलेले असून मध्यंतरींच्या चबुतऱ्यावरील संगमरवरी कोचावर बसून ताजमहाल पहाणें मोठें आल्हादजनक वाटतें. ताजमहालच्या कोणत्याहि पूर्ण छायाचित्रावरून या जलाशयांच्या रचनेची कल्पना येईल. महाद्वारांत उभें असतांनाच आम्हांस मृत्युशय्येवरून ताजमहालाकडे पाहणाऱ्या शहाजानच्या चित्राची आठवण झाली व त्याचें वर्णन रियासतकार सरदेसाई यांजवळ करीत असतांना आमच्या डोळ्यांतून नकळत अश्रू बाहेर पडले. ज्यानें आपल्या प्रेमाच्या केवळ स्मृतीसाठीं एवढा पैसा खर्च करून एवढें सुंदर स्मारक उभारलें, त्याला मृत्युसमयींसुद्धां त्या

थडग्याचें दर्शन बंदीखान्यांतूनच घ्यावें लागावें काय? आणि हा बंदिखाना तरी शहाजहानला कोणी दिला होता? तर त्याच्याच औरस पुत्रानें! आणि जिचें थडगें पाहण्याची संधि या बंदिस्थ पादशहाला नाकारण्यांत आली होती, ती या कुपुत्राची कोण लागत होती, तर जन्मदात्री माता! सर्वच केवळ दैवदुर्विलास!

ताजमहालाच्या आवाराच्या चार बाजूंस चार इमारती आहेत व त्या चतुष्कोणाच्या भिंतींच्या बरोबर मध्यावर बांधलेल्या आहेत. यमुनेच्या कांठावर ताजमहाल व त्याच्या बरोबर समोर महाद्वार, डाव्या बाजूस जमायतखाना व उजव्या बाजूस प्रार्थनेची मशीद, या सर्वच इमारती चांगल्या आहेत; पण खुद्द ताजमहालासमोर इतरांस पहातें कोण? प्रत्येक दर्शनोत्सुक तडक थेट मुख्य देवळांत जातो. ताजमहाल हें पवित्र थडगें असल्यामुळें बहुतेक हिंदी लोक आपलीं पादत्राणें खालींच उतरून ठेवतात. पण तीं उतरून ठेवावीं असा नियम नसल्यामुळें युरोपियन लोक व कांहीं हिंदी लोकहि त्यांचें अनुकरण करून तसेंच वर जातात. धर्मभावना सोडून दिली तरी इतर भावनांच्या दृष्टीनेंहि व इमारतीच्या रक्षणाच्या दृष्टीनेंसुद्धां पादत्राणें या ठिकाणीं न वापरणें इष्ट नव्हे काय? असे विचार आमच्या मनांत आले. ताजमहाल ही इमारत मोठ्या लांबलचक अशा पायाच्या मध्यभागीं उंचावर उभारलेली आहे. या इमारतींत वर चढून जावें लागतें व वर गेल्यावर गच्चीवर गेल्यासारखा भास होतो. या उंच इमारतीच्या चार कोपऱ्यांवर चार मनोरे आहेत. त्यांतील एकावर चढून आम्हीं दूरवरचा देखावा पाहिला. नदीकांठच्या मनोऱ्यांतून आग्ऱ्याचा किल्ला स्पष्ट दिसतो. नदीपलीकडचा ओसाड मुलुखहि दृष्टिपंथांत येतो. हल्लीं कालव्यांची वाढ झाल्यापासून नदीचें पात्र जवळ जवळ सुकलें आहे व त्यामुळें नदीकांठास म्हणून बांधलेल्या या इमारतीची तेवढी शोभा नष्ट झाली आहे. खुद्द ताजमहालाची शोभा वर्णन करणें अशक्यप्राय आहे. वरील दर्शनी थडग्याभोंवतींच्या जाळीदार संगमरवरी पडद्यांची शोभा वर्णावयाची मनांत आणली तरीहि तें कठीण जाईल; मग रत्नखचित वनस्पतींच्या चित्रांची शोभा कशी वर्णन करणार? ज्याप्रमाणें

साखरेच्या गोडीचें वर्णन करून गोडी समजावून देणें कठीण, त्याप्रमाणेंच वर्णनानें या गोष्टीची शोभा पटवून कठीण. तसें पाहूं गेलें तर सर्व कारागिरीचें काम अगदीं साधें आहे. पण या साधेपणांतच त्याचें सौंदर्य सांठविलेलें आहे. या ठिकाणची प्रत्येक गोष्ट अगदीं प्रमाणबद्ध जेथल्या तेथें सुताचाहि फरक न होतां केलेली आढळेल. कोठेंहि न्यूनता नाहीं व कोठेंहि अणूभर आधिक्यहि नाहीं. यांतील अमूक एक गोष्ट अशा अशा तऱ्हेनें बदलली असतां ती जास्त चांगली दिसेल असें म्हणणें कठीण आहे. परिपूर्णता म्हणतात ती हीच.

शहाजहान व मुमताजमहल यांच्या कबरी शेजारीं शेजारीं आहेत. पूर्वी पातशहांसमोर जातांना दरबारांत नजराणा करावा लागत असे. या भावनेचा फायदा घेऊन हल्लींसुद्धां या थडग्यांचे रक्षक प्रेक्षकाकडून कांहीं नजराणा अपेक्षितात. पातशहापुढें नजराणा म्हणजे सोन्याचाच हवा; पण निदान चांदीचा तर हवाच हवा. बाकी हल्लीं बहुतेकजण कांहींहि देत नाहींत व कोणी कांहीं देऊं नये, अशी पुराणवस्तुसंशोधकखात्याची स्पष्ट आज्ञाच आहे. वरील दर्शनी थडग्यांच्या खालीं भुयारांत खरीं थडगीं—कीं ज्या ठिकाणीं कलेवरें पुरलेलीं आहेत—आहेत. या ठिकाणींहि प्रेक्षकांस जातां येतें. मात्र थडग्यांना प्रदक्षिणा करतांना विजेच्या किंवा अन्य दिव्याची जरूरी आहे. मुसलमानी थडग्यांच्या इमारतींत अशीं दोन थडगीं ठेवण्याचा प्रघात अस्तित्वांत आहे, पूर्वी तळघरांतील थडगीं वर्षांतून एकदांच श्राद्धतिथीच्या दिवशीं उघडीत असत. आतां तीं नेहमींच उघडीं असतात. बर्नीयरलासुद्धां हें थडगें पाहण्यास मिळालें नव्हतें. आतां वाटेल तो यःकश्चित् इसम तें नित्य पाहूं शकतो.

ताजमहाल सोडतांना मनाला एक तऱ्हेच्या शांत गंभीर मुग्ध आनंदाचा व समाधानाचा अनुभव येतो. एवढा सगळा खटाटोप व खर्च एका मोठ्या वैभवशाली पातशहानें कशासाठीं केला होता बरें? तर एका प्रेमाच्या स्मृती-साठीं. प्रेम कडू आहे कीं गोड! त्याच्या स्मृतीनें दुःख होतें कीं आनंद? दुःख वाढविण्यासाठीं का कोणी प्रीतीचें स्मारक करूं पहातो? बरें गतांच्या

आठवणीनें आनंद होतो, हें म्हणणें तरी कितपत खरें समजावयाचें ! प्रेम-भावना हें जगांतील एक न सुटलेलें कोडें आहे हेंच खरें. मानसशास्त्रज्ञांनीं मनाचें कितीहि पृथक्करण केलें व कामशास्त्रज्ञांनीं लैंगिक मीलनाची नैसर्गिक इच्छा हीच प्रेमाच्या मुळाशीं आहे असा केवढाहि टाहो फोडला तरी त्यांनी हें कोडें सुटण्याच्या मार्गास लागलेलें नाहीं. एका जुन्या इंग्रजी कवीनें हें कोडें पुढीलप्रमाणें विरोधाभासानें वर्णिलें आहे—

If Love's a Sweet Passion, why does it torment?
If a Bitter, Oh tell me whence comes my content?
Since I suffer with pleasure, why should I complain?
Or grieve at my Fate, when I know 'tis in vain?
Yet so pleasing the pain is so soft, the Dart,
That at once it both wounds me and tickles my Heart.

प्रगति { वर्ष २, अंक ५२
ता. २८ मे १९३१ }

REFBK-0005971

# विभावरी शिरूरकर, बी. ए.

यांचीं पुस्तकें

कळ्यांचे निःश्वास [ दुसरी आवृत्ति ]
किंमत १ रुपया

हिंदोळ्यावर
किंमत १। रुपया

विरलेलें स्वप्न
किंमत १ रुपया

हृदयशारदा
—कमलाबाई टिळक
किंमत १॥ रुपया

सुषमा
—वामन चोरघडे
किंमत १ रुपया

सोल एजंटः—

परचुरे, पुराणिक आणि मंडळी

माधवबाग—मुंबई ४